रविवार
१२
एप्रिल २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : १०
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत




बेजबाबदार खेळीनंतर ऋषभ पंतवर टीकेची झोड (पान ७ वर)

## थोडक्यात

### अर्बन नक्षलवाद्यांवर शरद पवार गप्प का?



**मुंबई :** वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारांची घुसखोरी झाल्याची चिंता व्यक्त करणाऱ्या शरद पवार यांनी, याच संप्रदायात शिरकाव केलेल्या अर्बन नक्षलवाद्यांवरही कधीतरी बोलावे. या घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी पवारांकडे काय योजना आहे आणि त्यांची संख्या किती, हे त्यांनी एकदा महाराष्ट्रासमोर स्पष्ट करावे, असे आव्हान भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शनिवारी दिले. भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. शरद पवार यांच्या विधानाचा समाचार घेताना बन म्हणाले की, वारकरी संप्रदाय हा प्रबोधन करणारा आणि भागवत धर्माची पताका उंचावणारा संप्रदाय आहे. या संप्रदायात धर्मांध शक्ती नाहीत. खरं तर औरंगजेब आणि अफजल खानाची वंशावळ हीच खरी धर्मांध शक्ती आहे. महाराष्ट्रात सध्या लव्ह जिहाद, व्होट जिहाद आणि लँड जिहादचे संकट उभे ठाकले असताना ज्येष्ठ नेते असूनही पवार यावर का बोलत नाहीत?

### ममता बॅनर्जी यांचा भाजपवर जोरदार हल्ला

**केशियारी:** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर गंभीर आरोप करत भवानीपूर मतदारसंघातून आपली उमेदवारी रद्द करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा केला. पश्चिम मेदिनीपूर जिल्ह्यातील केशियारी येथे झालेल्या प्रचारसभेत त्यांनी सांगितले की, भवानीपूरमधून माझी उमेदवारी रद्द करण्यासाठी दोन खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले होते. त्यांना तसे करता आले नाही; पण कल्पना करा जर ते माझ्या विरोधात असे करू शकत असतील, तर इतरांच्या विरोधात ते काय काय करू शकतील! भवानीपूर मतदारसंघात त्यांच्याविरोधात भाजपचे नेते शुभेंदू अधिकारी रिंगणात आहेत.

### मतदारांचे १०० टक्के मॅपिंग: काळाची गरज

**नवी दिल्ली:** निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी १०० टक्के मतदार मॅपिंग (नकाशांकन) करणे ही काळाची गरज असल्याचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी म्हटले आहे. तसेच, या आघाडीवर महाराष्ट्र राज्य इतर राज्यांच्या तुलनेत काहीसे मागे असल्याचेही त्यांनी मान्य केले. विशेष सखोल आढावा बैठकीत ते बोलत होते. मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी मतदार याद्यांचे १०० टक्के मॅपिंग करणे ही काळाची गरज आहे.

# वारकरी संप्रदायावरून राजकीय वाद पेटला!

## शरद पवारांचा तो लेख अत्यंत चुकीचा: मुख्यमंत्री

**दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या एका वक्तव्यावरून सध्या राजकीय वाद निर्माण झाला आहे. वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीत आता प्रतिगामी विचारांच्या लोकांनी घुसखोरी केल्याचे मत मांडत धर्मांध शक्तींना बळ देणाऱ्या लोकांची आम्ही यादी तयार करायला सुरुवात केल्याचं भाष्य शरद पवार यांनी महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्त प्रकाशित स्मरणिकेत केलं. मात्र, शरद पवारांच्या या वक्तव्यावरून भाजपाने त्यांच्यावर जोरदार टीका केली आहे.
यावर आता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया देत मोठं भाष्य केलं आहे. 'शरद पवारांचा तो लेख अत्यंत चुकीचा आहे आणि मला



अतिशय दु:ख आहे की शरद पवारांनी अशा प्रकारचा लेख लिहिला', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तसेच 'शरद पवारांचा वारकरी विचारांशी संबंध राहिलेला नाही', अशी टीकाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर केली. ते दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. शरद पवार यांचं महाराष्ट्राच्या विकासात योगदान असलं तरीही वारकरी विचारांशी त्यांचा फार संबंध राहिलेला नाही. कारण ज्या प्रकारची चळवळ या महाराष्ट्रात त्यांनी उभी केली किंवा त्यांच्या अनुयायांनी उभी केली ही चळवळ एक प्रकारे निधर्मी अशी चळवळ होती. याबाबत त्यांनी स्वत:ही अनेकदा सांगितलेलं आहे की, ते निधर्मी आहेत. ते धर्म मानत नाहीत किंवा त्यांचा जो पिंड आहे तो निधर्मी आहे. त्यामुळे मला असं वाटतं की वारकरी संप्रदायाच्या संदर्भात त्यांच्याजवळ योग्य माहिती नसावी, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### यादी मी त्यांना पाठवून देईल....

प्रत्येकाला मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. कुठल्याही साहित्य संमेलनात वेगवेगळी मते येत असतात. कोणी काय लेख लिहावा, शेवटी ते महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री म्हणून किंवा देशाचे माजी कृषीमंत्री म्हणून किंवा राजकीय क्षेत्रातील त्यांचं योगदान पाहता त्यांचा लेख घेतला असेल. आता त्या लेखात काय लिहायचं? हा त्यांचा प्रश्न आहे. त्यामुळे त्यांनी ते लिहिलं असेल. मात्र, जर शरद पवार यांना यादी हवी असेल तर वारकरी विचारांच्या विरोधात जाऊन जे लोक वारकरी संप्रदायामध्ये विचार मांडण्याचा प्रयत्न करतात अशा लोकांची यादी मी त्यांना पाठवून देईल, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

# टीएमसी सरकारने केंद्र सरकारच्या सर्व योजनांना खीळ घातली- मोदी

**कटवा: दि.११ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू आहे. पंतप्रधान मोदींनी शनिवारी पश्चिम बंगालमधील बर्दवान जिल्ह्यातील कटवा येथे एका निवडणूक सभेला संबोधित केले आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसवर (टीएमसी) जोरदार हल्ला चढवला.
यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, टीएमसी सरकारने केंद्र सरकारच्या सर्व योजनांना खीळ घातली आहे. भाजप सरकार स्थापन होताच या योजना लागू केल्या जातील. पंतप्रधान मोदींनी दावा केला की, बर्दवानमधील हजारो लोकांची ही सभा बंगालमध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल. हे दृश्य ४ मे रोजीच्या निकालांची एक झलक आहे. ते म्हणाले की, निवडणुकीत त्यांना तुमचा उत्साह, तुमचा जोश, तुमची ऊर्जा आणि तुमचा दृढनिश्चय दिसत आहे. ही भीतीवर विश्वासाच्या विजयाची घोषणा आहे. बंगाल बदलासाठी सज्ज आहे.



### जुलूम करणाऱ्यांनाही जबाबदार धरले जाईल

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जो कोणी भारतात घुसला आहे त्याला हाकलून दिले जाईल. त्यांनी प्रत्येक घुसखोराला आपले सामान बांधून निघून जाण्यास सांगितले जाईल. ज्यांनी कागदपत्रांमध्ये फेरफार केली त्यांनाही जबाबदार धरले जाईल. ते म्हणाले की, 'सबका साथ, सबका विकास' (सर्वांसोबत, सर्वांचा विकास) हा भाजपचा मंत्र असला तरी, लुटारू आणि जुलूम करणाऱ्यांनाही जबाबदार धरले जाईल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, भाजपने बंगालला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार केला आहे. ते म्हणाले की, कालच बंगाल भाजपने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यात मी तुम्हाला दिलेल्या सहा हमींची अंमलबजावणी करण्याचा आराखडा आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, या अद्भुत जाहीरनाम्याबद्दल मी बंगाल भाजपच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करतो.टीएमसीच्या क्रूर सरकारच्या भीतीचे विश्वासात (पान २ वर)

# कराडमध्ये सह्याद्री एक्सप्रेसवर दरोडा!

## सिग्नल बिघाड करून प्रवाशांची लूट

**कराड: दि.११ वृत्तसंस्था**

कराड तालुक्यात सह्याद्री एक्सप्रेसवर दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सिग्नलमध्ये छेडछाड करून रेल्वे थांबवण्यात आली आणि त्यानंतर प्रवाशांचे मोबाईल व दागिने लुटण्यात आले.
मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापूरहून पुण्याकडे जाणारी सह्याद्री एक्सप्रेस मध्यरात्री शेणोली स्टेशनजवळ आली असता सिग्नल अचानक बंद पडला. संशयितांनी मुद्दाम सिग्नलमध्ये बिघाड करून रेल्वे थांबवली, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. रेल्वे थांबल्याचा फायदा घेत अज्ञात दरोडेखोरांनी डब्यांमध्ये प्रवेश करून प्रवाशांचे मोबाईल आणि सोने लुटले. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच मिरज लोहमार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, तपास सुरू केला आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत. या घटनेमुळे सातारा आणि सांगली जिल्ह्यात खळबळ उडाली असून रेल्वे सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# छगन भुजबळ हेलिकॉप्टर अपघात प्रकरणाची चौकशी होणार: मुख्यमंत्री

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या अपघाती लँडिंगबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुरंदरमध्ये मंत्री छगन भुजबळ सुरक्षित आहेत, पण पायलटचा निष्काळजीपणा उघड झाला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, या संपूर्ण घटनेची चौकशी नक्की केली जाईल.राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंगबाबत पुरंदरमध्ये एक धक्कादायक आणि तितकाच थरारक प्रकार समोर आला आहे. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त



खानवडी येथे आयोजित कार्यक्रमाला जात असताना, पायलटने हेलिकॉप्टर हेलिपॅडवर न उतरवता चक्क वाहनांच्या पार्किंगमध्ये उतरवले. या प्रकारामुळे उपस्थित पोलीस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची मोठी धावपळ उडाली असून, सुदैवाने मोठा अनर्थ टळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, क्रांतीज्योती महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी छगन भुजबळ हेलिकॉप्टरने येणार होते. प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून खानवडी गावात त्यांच्या (पान २ वर)

# आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

भारतीय संगीत क्षेत्रातील दिग्गज गायिका, आशा भोसले यांची प्रकृती बिघडल्याने मुंबईतील प्रसिद्ध ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आल्याचं म्हटलं जात आहे.
शनिवारी म्हणजेच ११ एप्रिल सकाळी आशाताईंच्या छातीत दुखू लागल्यानं आणि अस्वस्थ वाटू लागल्यानं त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलां. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत अद्याप अधिकृत मेडिकल



बुलेटिन प्रसिद्ध करण्यात आलेलं नाही, परंतु डॉक्टरांनी त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे म्हटलं आहे. आशा भोसले या ९२ वर्षांच्या असून आजही त्या संगीत क्षेत्रात सक्रिय आहेत. त्यांच्या रुग्णालयात दाखल झाल्याची बातमी सोशल मीडियावर वाऱ्यासारखी पसरताच जगभरातील चाहत्यांनी आणि कलाकारांनी त्या लवकरात लवकर बऱ्या व्हाव्यात यासाठी प्रार्थना केली आहे.

# नरहरी झिरवाळ कथित 'व्हिडीओ' प्रकरणात ट्विस्ट!

## संशयित आरोपीने मुंबई उच्च न्यायालयात केली याचिका दाखल

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित एका कथित आक्षेपार्ह व्हिडिओ प्रकरणाने आता कायदेशीर संघर्षाचे रूप धारण केले आहे. या वादग्रस्त व्हिडिओचे चित्रीकरण आणि प्रसार केल्याचा ठपका ज्या व्यक्तीवर ठेवण्यात आला आहे, त्या संशयित आरोपीने आता थेट मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.
आपल्यावर दाखल करण्यात आलेला प्रथम खबरी अहवाल (एफआयआर) बेकायदेशीर असून, तो रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.



### धमकावण्याचा प्रयत्न

या प्रकरणातील अधिक गंभीर बाब म्हणजे, केवळ व्हिडिओ प्रसारित करून आरोपी थांबला नाही, तर या चित्रफितीचा वापर करून संबंधित व्यक्तीला धमकावण्याचा आणि मानसिक त्रास देण्याचा प्रयत्नही करण्यात आला.

या न्यायालयीन हस्तक्षेपामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा राज्यस्तरावर चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहे. काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर एक व्हिडिओ प्रचंड वेगाने प्रसारित झाला होता, (पान २ वर)

# पिकअपला आग लागून ४ जणांचा मृत्यू

**नाशिक: दि.११ वृत्तसंस्था**

सिन्नर तालुक्यातील पंचाळे-शहा रोडवर शुक्रवारी रात्री भीषण अपघात घडून चार जणांचा जळून मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, पंचाळे गावातील एक आदिवासी कुटुंब धार्मिक कार्यक्रम आटोपून पिकअप व्हॅनने घरी परतत होते. याचदरम्यान समोरून येणाऱ्या ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ट्रकने पिकअप व्हॅनला तब्बल १०० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले. या घर्षणामुळे वाहनाच्या टायरने पेट घेतला आणि काही क्षणांतच संपूर्ण पिकअप व्हॅन आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

# डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यात शुल्कात मोठी वाढ





**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

जागतिक तेल बाजारातील वाढती अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली मोठी वाढ पाहता, केंद्र सरकारने डिझेल आणि विमान इंधनाच्या निर्यात शुल्कात मोठी वाढ केली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत इंधनाचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि किमती नियंत्रणात राहाव्यात, या उद्देशाने वित्त मंत्रालयाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.
वित्त मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या (पान २ वर)

### 'आधी आपला देश'

दरम्यान, ब्रेंट क्रूडचा भाव सध्या १०० डॉलर प्रति बॅरलच्या पार गेला आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' परिसरातून होणारा तेल पुरवठा विस्कळीत आहे. जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाचे दर गगनाला भिडतात, तेव्हा खासगी कंपन्या देशांतर्गत विक्री करण्याऐवजी निर्यातीला प्राधान्य देतात. अशा स्थितीत भारतात डिझेलचा तुटवडा भासू नये आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला फटका बसू नये, यासाठी निर्यातीवर जास्तीचे शुल्क लावून सरकारने 'आधी आपला देश' हे धोरण स्पष्ट केले आहे.

# रुग्णालयांची मनमानी आकारणी: समस्येवर तोडगा काढण्यासाठी नवीन समिती

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

आजच्या काळात गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. अनेकदा हेल्थ इन्शुरन्स असूनही रुग्णालयांच्या मनमानी बिलांमुळे खिसा रिकामा होतो. रुग्णालयाची मोठी बिले भरणे हे प्रत्येकासाठी एक त्रासाचे काम आहे. आरोग्य विमा असला तरीही, या प्रक्रियेला बराच वेळ लागू शकतो. या परिस्थितीला प्रतिसाद म्हणून आणि प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने एक नवीन नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, जो दावा प्रक्रिया सुलभ करेल आणि रुग्णालयांना मनमानी बिले आकारण्यापासून रोखेल. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक नवीन उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.ही उपसमिती आरोग्य विम्याच्या





माध्यमातून नावीन्य, व्यापक व्याप्ती, उत्तम जोखीम व्यवस्थापन आणि सुधारित आर्थिक संरक्षण यांना प्रोत्साहन देण्यासाठी नियामक, धोरणात्मक आणि कार्यान्वयन उपाययोजनांची शिफारस करेल. ग्राहकांसाठी प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि पॉलिसीधारकांसाठी विमा अधिक सुलभ करणे हा या समितीचा उद्देश आहे. प्रोबसचे व्यवस्थापकीय संचालक, राकेश गोयल म्हणाले, सध्याची सर्वात मोठी समस्या ही आहे की, विमा असल्यामुळे लोकांकडून जास्त शुल्क आकारले जात आहे, असे त्यांना वाटते. दर आणि रुग्णालयांच्या नेटवर्कमधील या तफावती दूर करणे हे नवीन समितीचे मुख्य कार्य आहे. याचा थेट फायदा असा होईल की, उपचारांच्या किमती योग्य असतील आणि बिलिंगमध्ये सुसंगतता येईल.

### डिजिटल प्रणाली सुव्यवस्थित

या समितीच्या स्थापने मागे आणि नवीन नियमां मागे आयआरडीएआयचा उद्देश स्पष्ट आहे. लोकांचा दावा करण्याचा अनुभव सोपा करणे हे त्यांचे ध्येय आहे. रुग्णालयांचे दर सुधारणे हे त्यांचे ध्येय आहे, जेणेकरून ते रुग्णांकडून मनमानी शुल्क आकारू शकणार नाहीत. यामुळे डिजिटल प्रणाली सुव्यवस्थित होईल आणि फसवणूक रोखली जाईल. शिवाय, संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक होईल, ज्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढेल.

**निकाल** | **मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय**

# ऑफिसमध्ये महिलांकडे एकटक बघणे गुन्हा नाही!

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

मुंबई उच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी म्हणजे ऑफीसमध्ये होणाऱ्या वर्तनाबाबत एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, ऑफीस महिला सहकाऱ्याकडे एकटक पाहणे किंवा निरखून पाहणे हे नैतिकदृष्ट्या चुकीचे आणि आक्षेपार्ह असू शकते, परंतु भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४सी अंतर्गत याला 'व्हॉय्युरिझम' (दुसऱ्याचे खाजगी आयुष्य चोरून पाहणे) चा गुन्हा मानले जाऊ शकत नाही. न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की, नैतिकता आणि कायदा यांच्यात एक सूक्ष्म सीमारेषा आहे



आणि कोणत्याही कायद्याचा अर्थ त्याच्या निर्धारित मर्यादेपलीकडे लावला जाऊ शकत नाही. मॅक्स लाईफ इन्शुरन्सचे कर्मचारी अभिजीत निगुडकर यांच्याविरुद्ध दाखल केलेला एफआयआर रद्द करताना न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकल खंडपीठाने हा निकाल दिला. न्यायालयाने हे मान्य केले की, आरोपीचे वर्तन व्यावसायिक वातावरणाला न शोभणारे असले तरी, तांत्रिक आणि कायदेशीर कारणास्तव त्याला परपीडेच्छा म्हणता येणार नाही. हा संपूर्ण वाद एका विमा कंपनीमध्ये सुरू झाला. कंपनीतील एका महिला कर्मचाऱ्याने तिच्या वरिष्ठ सहकाऱ्यावर गंभीर आरोप केले. तक्रारदाराने सांगितले की, बैठकांदरम्यान, आरोपी सामान्यपणे नजर मिळवण्याऐवजी, मुद्दाम तिच्या छातीकडे एकटक पाहत असे. इतकेच नाही तर, तिने असाही आरोप केला की, त्या व्यक्तीने अनुचित टिप्पणी करून कामाच्या ठिकाणी अस्वस्थ वातावरण निर्माण केले. मात्र, कायदेशीर कारवाई सुरू होण्यापूर्वीच, कंपनीच्या अंतर्गत तक्रार समितीने या प्रकरणाची चौकशी केली.

### कार्यालयात महिलेकडे एकटक पाहणे हा गुन्हा आहे का?

मुंबई उच्च न्यायालयाने एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, जेव्हा एखादी महिला खाजगी कृत्य करत असताना तिला पाहिले जाते, तेव्हा 'डोकावून पाहणे' हा गुन्हा लागू होतो; कार्यालयात एकटक पाहणे हा गुन्हा ठरत नाही. न्यायमूर्ती बोरकर यांनी स्पष्ट केले की, कार्यालयीन वातावरणात एखाद्याकडे एकटक पाहणे नैतिकदृष्ट्या त्रासदायक असू शकते, परंतु ते 'खाजगी' या श्रेणीत येत नाही. न्यायालयाने असे मत नोंदवले की, जो व्यक्ती गुन्ह्याच्या वैधानिक आवश्यकता पूर्ण करत नाही, त्याला दोषी ठरवण्यासाठी कायद्याच्या मूळ हेतूच्या पलीकडे जाऊन त्याचा शब्दश: अर्थ लावता येणार नाही.

## पान 1 वरून...

### टीएमसी सरकारने केंद्र ...

रूपांतर करणे ही मोदींची हमी आहे. ही हमी कशी पूर्ण केली जाईल याचा संपूर्ण आराखडा भाजपच्या जाहीरनाम्यात आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आसाम, केरळ आणि पुदुचेरीमध्ये मतदान आधीच झाले आहे. तिथे मोठ्या प्रमाणात मतदान झाले आहे. मोठ्या संख्येने लोक मतदानासाठी बाहेर पडले आहेत. ते म्हणाले की, महिलांनी मोठ्या संख्येने मतदान केले आहे. तिन्ही राज्यांमध्ये कोणत्याही अनुचित घटनेशिवाय मतदान पार पडल्याबद्दल त्यांनी निवडणूक आयोगाचे अभिनंदन केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, भाजपचे सरकार स्थापन झाल्यास पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत आयुष्मान भारत योजना लागू केली जाईल. ते म्हणाले की, मतुआ समुदाय, नामासुद्र आणि सर्व निर्वासित कोणत्याही टीएमसी नेत्याच्या कृपेने येथे आलेले नाहीत, याची हमी देण्यासाठी ते आले आहेत. पंतप्रधान म्हणाले की, सीएए कायदा लागू करून मोदींनी हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे की, तुम्ही सर्व भारतीय संविधानाच्या संरक्षणाखाली येथे आहात.

### छगन भुजबळ हेलिकॉप्टर ...

लँडिंगसाठी सर्व निकष पाळून सुरक्षित ठिकाणी हेलिपॅड तयार केले होते. हेलिकॉप्टर खानवडीच्या आकाशात पोहोचल्यानंतर पायलटने खाली जागा शोधण्यास सुरुवात केली. यावेळी त्याला कार पार्किंगची मोकळी जागा दिसली. पायलटने त्या जागेलाच हेलिपॅड समजले आणि थेट पार्किंगच्या दिशेने हेलिकॉप्टर खाली घेण्यास सुरुवात केली. गाड्यांच्या पार्किंगमध्ये हेलिकॉप्टर उतरत असल्याचे पाहताच तिथे तैनात पोलिसांनी धावत जाऊन परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केला. गाड्यांच्या पार्किंगमध्ये हेलिकॉप्टरचे चाक टेकताच पोलिसांनी तात्काळ पायलटशी संपर्क साधून ही जागा अधिकृत हेलिपॅड नसल्याचे ओरडून सांगितले. आपली चूक लक्षात आल्यावर पायलटने तात्काळ पुन्हा इंजिनचा जोर वाढवला आणि हेलिकॉप्टर हवेत झेपावले. त्यानंतर, काही अंतरावर असलेल्या नियोजित आणि सुरक्षित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्यात आले. या सर्व प्रकारात कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नसले तरी, काही काळ परिसरात प्रचंड गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

### नरहरी झिरवाळ कथित ...

ज्यामध्ये नरहरी झिरवाळ हे एका तृतीयपंथीय व्यक्तीसोबत आक्षेपार्ह स्थितीत असल्याचे दावे करण्यात आले होते. या प्रकरणाने आता एक अत्यंत वेगळे वळण घेतले आहे. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत मुंबईतील कफ परेड पोलीस ठाण्यात रीतसर गुन्हा नोंदवण्यात आला असून, या प्रकरणातील कायदेशीर गुंतागुंत आता समोर येऊ लागली आहे. विशेष म्हणजे, ही तक्रार त्याच तृतीयपंथीय व्यक्तीने दाखल केली आहे, जिचा संबंध या व्हिडिओशी जोडला गेला होता.तक्रारदार व्यक्तीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी हा दुसरा कोणी नसून तिचा स्वतःचा भाऊ आहे. आरोपीने मुळात अस्तित्वात असलेल्या व्हिडिओमध्ये संगणकीय प्रणालीद्वारे किंवा अन्य तांत्रिक माध्यमांतून फेरफार केला. मूळ व्हिडिओशी छेडछाड करून तो हेतुपुरस्सर अशा पद्धतीने संपादित करण्यात आला, जेणेकरून त्यातून संबंधित नेत्याची आणि तक्रारदार व्यक्तीची प्रतिमा मलीन होईल. हा बनावट किंवा संपादित व्हिडिओ सार्वजनिकरित्या प्रसारित करून सामाजिक स्तरावर मानहानी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

### डिझेल आणि विमान इंधनाच्या ...

अधिसूचनेनुसार, नवीन दर तातडीने लागू करण्यात आले आहेत. सुधारित दरांनुसार, डिझेलवरील निर्यात शुल्क २१.५ रुपये प्रति लीटरवरून थेट ५५.५ रुपये प्रति लीटर करण्यात आले आहे. विमान इंधन एटीएफवरील ड्युटी २९.५ रुपये प्रति लीटरवरून वाढवून ४२ रुपये प्रति लीटर केली आहे. विशेष म्हणजे, पेट्रोलच्या निर्यातीवरील शुल्कात कोणताही बदल करण्यात आलेला नाही; ते पूर्वीप्रमाणेच 'शून्य' ठेवण्यात आले आहे. ११ एप्रिल रोजी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत सरकारने स्पष्ट केले आहे की, सध्याची जागतिक परिस्थिती पाहता हे पाऊल उचलणे अनिवार्य होते. सेंट्रल एक्साईज ॲक्ट १९४४ आणि फायनान्स ॲक्टमधील तरतुदींनुसार हे बदल करण्यात आले आहेत. सध्या उद्भवलेली परिस्थिती पाहता जनहितार्थ तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते, असे वित्त मंत्रालयाने नमूद केले आहे.

# सुनेत्रा पवारांच्या जीवाला धोका?

## पत्रामुळे मोठी खळबळ, दमानियांची चौकशीची मागणी

**मुंबई , दि. ११** वृत्तसंस्था



बीड जिल्ह्यातून समोर आलेल्या एका धक्कादायक पत्रामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या पत्रात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका असल्याचा गंभीर दावा करण्यात आला असून, हा धोका रुपाली चाकणकर यांच्याकडून असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सदर पत्र तपासासाठी विशेष तपास पथकाकडे सुपूर्द करण्यात आले असून, त्याची सखोल पडताळणी सुरू आहे. हे पत्र केवळ खोडसाळपणातून लिहिले गेले आहे की त्यामागे काही ठोस कारण किंवा कट आहे, याचा तपास यंत्रणा बारकाईने शोध घेत आहेत. सुरक्षेच्या दृष्टीनेही या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सध्याच्या राजकारणातील अनिश्चिततेवर भाष्य केले. ''आजच्या राजकारणात कधी काय घडेल, याचा काही नेम राहिलेला नाही. अशा प्रकारचे पत्र समोर आल्यास त्याची तात्काळ आणि सखोल चौकशी होणे अत्यावश्यक आहे,'' असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी अशोक खरात प्रकरणाचा उल्लेख करत, ''जर सुनेत्रा पवार यांच्या जीवाला धोका असल्याची शक्यता व्यक्त होत असेल, तर अशोक खरात यांच्या सुरक्षेबाबतही शंका निर्माण होते,'' असे मत व्यक्त केले. या संपूर्ण प्रकरणातील सत्य समोर येणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या पत्रामागील खरे कारण काय आहे, हे तपासानंतरच स्पष्ट होणार असून, तोपर्यंत राज्यातील राजकीय वातावरण तापलेले राहण्याची शक्यता आहे.

# महायुती सरकारच्या मंत्र्यावर गंभीर आरोप

**मुंबई , दि. ११** वृत्तसंस्था

महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवणारी बातमी समोर आली आहे. राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी एका धक्कादायक अनुभवाचा खुलासा करत, एका मंत्र्याने ''मला माझ्या खात्यासाठी महिला सचिव नको'' असे म्हणत त्यांना नाकारल्याचा गौप्यस्फोट केला आहे.

हा अनुभव त्यांनी आपल्या ३३ वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीत प्रथमच आल्याचे सांगितले आहे. दिल्ली येथे झालेल्या महिला अधिकाऱ्यांच्या संमेलनानिमित्त प्रकाशित स्मरणिकेत त्यांनी हा कटू प्रसंग मांडला आहे.म्हैसकर यांच्या म्हणण्यानुसार, २०२३ मध्ये राज्यात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांची प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी एका मंत्र्याने त्यांच्या कामाच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित करत केवळ त्या महिला असल्यामुळे आपल्या विभागात घेण्यास नकार दिला.

तीन दशकांहून अधिक काळ विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्यानंतरही केवळ लिंगाच्या आधारावर असा अनुभव आल्याने त्यांनी खंत व्यक्त केली. त्यांच्या मते, हा प्रकार प्रशासनातील पुरुषी मानसिकतेचे उदाहरण आहे.

**राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण**

म्हैसकर यांनी संबंधित मंत्र्याचे नाव उघड केलेले नाही. मात्र, ''२०२३ मधील सरकार'' असा उल्लेख केल्यामुळे हा आरोप सध्याच्या सत्ताधारी गटातील एका वरिष्ठ मंत्र्यावर असल्याची चर्चा रंगली आहे.

या खुलाशानंतर मंत्रालयात आणि राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, संबंधित मंत्री नेमका कोण याबाबत चर्चा सुरू झाली आहे. तसेच प्रशासनातील पुरुष-महिला भेदभावाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# पाच दिवसांपूर्वी झालेल्या शिवसेना कार्यकर्त्याच्या मृत्यूचे गूढ उकलल



**मुंबई , दि. ११** वृत्तसंस्था

### प्रेयसीच्या आईनेच दिली सुपारी

नांदेडमध्ये पाच दिवसांपूर्वी घडलेल्या शिवसेना कार्यकर्ता सोनू कल्याणकर (वय ३५) यांच्या खून प्रकरणाचा उलगडा झाला असून, या हत्येमागे प्रेयसीची आईच मास्टरमाइंड असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणामुळे मराठवाड्यात मोठी खळबळ उडाली आहे.

शहरातील श्रीनगर भागात ६ एप्रिल रोजी पहाटे मॉर्निंग वॉकला गेलेल्या सोनू कल्याणकर यांच्यावर चार हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी हल्ला केला होता. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर राजकीय वातावरणही तापले होते.

पोलिस तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. जुन्या प्रेमसंबंधातून हा खून झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार म्हणून इंदुबाई मंगनाळे या महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तिने गुन्ह्याची कबुली दिली आहे.तपासानुसार, सोनू कल्याणकर यांचे सुमारे १० ते १२ वर्षांपूर्वी एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, मुलीच्या कुटुंबीयांचा या नात्याला विरोध होता. कुटुंबीयांनी तिचे लग्न दुसरीकडे ठरवले असताना सोनू यांनी ते लग्न मोडल्याचा राग कुटुंबीयांच्या मनात होता.

याच सूडभावनेतून इंदुबाई मंगनाळे यांनी कट रचून मारेकऱ्यांना लाखो रुपयांची सुपारी दिल्याचे समोर आले आहे. ''जोपर्यंत सोनू मरणार नाही, तोपर्यंत मला शांत झोप लागणार नाही,'' असे वक्तव्य त्यांनी आपल्या मुलाच्या मित्र पियुष शिंदे याच्याकडे केल्याची माहिती तपासात उघड झाली आहे. सुरुवातीला या प्रकरणात संबंधित तरुणीच्या भावावर संशय व्यक्त करण्यात आला होता. मात्र पुढील तपासात वेगळेच सत्य समोर आले. आरोपी महिलेचा मुलगा कुख्यात रिंदा गँगचा सदस्य असून सध्या तो कारागृहात आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, २०२१ मध्येही या वादातून सोनू कल्याणकर यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता. त्या वेळी ते थोडक्यात बचावले होते. अखेर जुन्या वैमनस्यातूनच त्यांची निर्घृण हत्या झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# जन्मदात्या आईने केली ६ वर्षीय चिमुकल्याची निर्घृण हत्या

**बीड, दि. ११** वृत्तसंस्था




प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्यानं आईने प्रियकराच्या साथीनं चक्क ६ वर्षाच्या चिमुकल्याची पाण्यात बुडवून आणि भिंतीवर डोकं आपटून हत्या केल्याची धक्कादायक घटना कुरुळीमधील खेड तालुक्यात घडली आहे. घटनेनंतर संबंधित महिलेनं या चिमुकल्याचा मृतदेह बीड जिल्ह्यातील धर्मापुरी या मूळ गावी नेऊन हृदयविकाराच्या झटक्यानं त्याचा मृत्यू झाल्याचे सांगितले. मात्र, नातेवाइकांना संशय आल्यानं महिलेचे बिंग फुटले. यानंतर बीड पोलिसांनी ही माहिती दक्षिण महाळुंगे पोलिसांना दिली.

अवेज मेहबूब शेख (वय ६) असं हत्या झालेल्या मुलाचं नाव आहे. हत्येप्रकरणी पोलिसांनी मुलाच्या आई बसरीन मेहबूब शेख (वय २७, कुरुळी, मूळ धर्मापुरी, ता. परळी, जि. बीड) हिला अटक केली. तिचा प्रियकर राम विनायक कजेवाड (रा. कुरुळी, मूळ पुस, ता. अंबेजोगाई, जि. बीड) याच्यावरदेखील गुन्हा दाखल केला आहे. इसाक महमद शेख (वय ४९, पुस, ता. आंबेजोगाई, जि. बीड) यांनी प्रकरणाबाबत गुन्हा दाखल केला असून ही धक्कादायक घटना ४ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास कुरुळीच्या खेड तालुक्यात घडली.

**नेमकं काय घडलं ?**

मुलाची आई बसरीन आणि तिचा प्रियकर कजेवाड यांनी ४ एप्रिल २०२६ रोजी रात्री अवेज या चिमुकल्याला बाथरूममध्ये नेलं. त्याचं डोकं बादलीतील पाण्यात बुडवून आणि भिंतीवर आपटून या दोघांनी त्याची निघृण हत्या केली. त्यानंतर मृतदेह धर्मापुरीला नेऊन त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यानं झाल्याचा बनाव केला. मात्र, नातेवाईकांना या संशय आल्यानं नातेवाइकांनी परळी ग्रामीण पोलिसांना याबद्दल माहिती दिली.

त्यानंतर पोलिसांनी शवविच्छेदन करण्यास सांगितलं. त्या अहवालात अवेजचा मृत्यू पाण्यात बुडाल्यानं झाल्याचं निष्पन्न झालं. यानंतर पोलिसांनी आई बसरीनची चौकशी केली असता तिनं मुलाची हत्या केल्याचं कबूल केलं. आरोपी महिलेला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या महिलेचा प्रियकर राम कजेवाड हा फरार असून, पोलिस पथक त्याच्या त्याचा शोध घेत आहेत.

# शिंदेवाडीचा राजेंद्र पुजारी बनला राज्य कर सहाय्यक

**मुंबई, दि. ११** वृत्तसंस्था



अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्दीच्या जोरावर यश मिळवत शिंदेवाडी (ता. खटाव) येथील राजेंद्र लिंगाप्पा पुजारी याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात १७ वी रँक मिळवत राज्य कर सहाय्यक पद पटकावले आहे. या यशामुळे परिसरात त्याचे कौतुक होत असून, त्याने अनेकांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

राजेंद्रचे आई-वडील १९८५ साली रोजगाराच्या शोधात कर्नाटकातून महाराष्ट्रात आले. सालगडी म्हणून काम करत त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत कुटुंबाचा गाडा ओढला. स्वतः निरक्षर असतानाही त्यांनी मुलाच्या शिक्षणासाठी अथक प्रयत्न केले.राजेंद्रचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, शिंदेवाडी येथे झाले. माध्यमिक शिक्षण ताथवडा (फलटण) येथील आश्रमशाळेत, तर महाविद्यालयीन शिक्षण खटावमधील शहाजीराजे महाविद्यालयात पूर्ण झाले. पुढे त्याने शिवाजी विद्यापीठ येथे पदव्युत्तर शिक्षण घेतले. लहानपणापासून शेतीकाम करत, मर्यादित साधनांमध्ये शिक्षण घेत असतानाही राजेंद्रने स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्याचा निर्धार कायम ठेवला. कोणत्याही क्लासशिवाय स्वअभ्यासाच्या जोरावर त्याने तयारी केली. २०२१ पासून सलग पाच वेळा मुख्य परीक्षा दिल्या, मात्र अपयश आले तरीही त्याने हार मानली नाही. अखेर डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या गट-क परीक्षेत त्याने यश संपादन केले. ६ एप्रिल रोजी लागलेल्या निकालात खुल्या प्रवर्गातून राज्यात १७वी रँक मिळवत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामागे आई-वडिलांचा मोठा वाटा असल्याचे राजेंद्रने सांगितले. तसेच मित्रपरिवार आणि गावकऱ्यांनीही कठीण काळात साथ दिल्याचे तो म्हणाला.

# आरक्षण उपवर्गीकरणाबाबत पुढील आठवड्यात सुनावणी

**मुंबई : दि.११ वृत्तसंस्था**

**राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याबाबत अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीसमोर १७, १८ एप्रिल रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे.**

या सुनावणीत आपली मते मांडू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी १५ एप्रिलपर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणासंदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या एक सदस्यीय समितीने आपला अहवाल १६ मार्च २०२६ रोजी शासनाला सादर केला आहे. या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. ज्यांना या विषयावर आपली बाजू मांडायची आहे, त्यांनी आपले निवेदन किंवा अर्ज -. या इमेल आयडीवर पाठवावा. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १५ एप्रिल २०२६ आहे. अर्जासोबत अर्जदाराने आपला मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.

# महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघणार; काँग्रेसमध्ये होणार मोठे फेरबदल

**मुंबई, दि. ११** वृत्तसंस्था



महाराष्ट्र काँग्रेस पक्षात मोठे संघटनात्मक बदल होणार असल्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. पक्षात 'संघटन सृजन' अभियानांतर्गत सुमारे ७,५०० नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

यामध्ये बहुतांश नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. पुण्यात माध्यमांशी संवाद साधताना सपकाळ यांनी ही घोषणा केली. यावेळी त्यांनी बारामती पोटनिवडणूक, बारामती लोकसभा निवडणूक, निवडणूक आयोगाची भूमिका आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका यासारख्या विविध मुद्द्यांवर भाष्य केले. तसेच सत्ताधारी पक्ष भाजप आणि निवडणूक आयोगावर तीव्र टीका केली. काँग्रेसमध्ये ७,५०० नवीन चेहऱ्यांना संधी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी 'संघटन सृजन' ही विशेष प्रक्रिया राबवली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्रात जिल्हा, तालुका आणि गावपातळीपर्यंत सुमारे ७,५०० नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल. सपकाळ यांनी सांगितले की, यातील बहुसंख्य जागा नवीन चेहऱ्यांना देण्यात येणार आहेत. याशिवाय, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उमेदवारांच्या प्रशिक्षण कार्यक्रमही सुरू करण्यात आले आहेत. पक्षाला मजबूत आणि तरुण नेतृत्व देण्याचा हा प्रयत्न असल्याचे सपकाळ यांनी नमूद केले. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीबाबत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की, काँग्रेसने या निवडणुकीतून माघार घेतली असली तरी कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा दिलेला नाही. ते म्हणाले, ''राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेत असताना स्वतःला काँग्रेसशी जोडण्याचा दावा करणे चुकीचे आहे.'' पुणे शहरासाठी दोन शहराध्यक्ष नेमणे ही केवळ संघटनात्मक प्रक्रिया असल्याचेही त्यांनी सांगितले.

सपकाळ यांनी बारामती लोकसभा निवडणुकीबाबतही स्पष्ट भूमिका मांडली. ते म्हणाले, ''काँग्रेसने या पोटनिवडणुकीतून माघार घेतली असली तरी हा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दबावाखाली घेतलेला नाही. सुनेत्रा पवार यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची भेट घेऊन विनंती केली होती. त्यानंतर प्रदेश काँग्रेसने हा निर्णय घेतला.'' मात्र, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस नक्कीच स्वतंत्र उमेदवार देईल आणि मैदानात उतरेल, असा विश्वास सपकाळ यांनी व्यक्त केला.

# सरकारने पॅन कार्डच्या नियमांत केले ४ महत्वाचे बदल!

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**




तुमच्या ओळखपत्रात आधार कार्डासोबत पॅन कार्डचा समावेश असतो. इन्कम टॅक्स डिपार्टमेंटने १ एप्रिल २०२६ पासून पॅन कार्ड अर्ज प्रक्रियेत महत्त्वाचे बदल केले आहेत. आता जुने फॉर्म रद्द झाले असून, त्यांच्या जागी चार नवीन फॉर्म आणले गेले आहेत. यामुळे अर्ज प्रक्रिया अधिक स्पष्ट आणि वर्गवारीनुसार झाली आहे.आतापर्यंत पॅन कार्डसाठी मुख्यतः दोन फॉर्म वापरले जात होते फॉर्म ४९ (भारतीय नागरिक आणि संस्थांसाठी) आणि फॉर्म ४९ (परदेशी नागरिक आणि संस्थांसाठी). १ एप्रिल २०२६ पासून हे दोन्ही फॉर्म रद्द करण्यात आले आहेत. आता अर्जदारांच्या प्रकारानुसार चार वेगळे नवीन फॉर्म भरावे लागतील: फॉर्म ९३ भारतातील सामान्य नागरिक (भारतीय नागरिक असलेले व्यक्ती) यांच्यासाठी. फॉर्म ९४ भारतीय कंपन्या, संस्था किंवा भारतात नोंदणीकृत/स्थापित झालेल्या संस्थांसाठी. फॉर्म ९५ परदेशी नागरिक (भारतीय नागरिक नसलेले व्यक्ती) यांच्यासाठी. फॉर्म ९६ परदेशात नोंदणीकृत कंपन्या किंवा संस्थांसाठी.या नवीन फॉर्ममुळे अर्ज प्रक्रिया अधिक सोपी आणि व्यवस्थित झाली आहे. अर्जदाराने आपल्या वर्गवारीनुसार योग्य फॉर्म निवडणे अनिवार्य आहे. फॉर्म बदलण्याव्यतिरिक्त, अर्जातील माहिती भरण्याच्या नियमांमध्येही काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. या बदलांचा उद्देश पॅन कार्ड प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि फसवणूक-मुक्त करण्याचा आहे.

**राजकीय घडामोडी** | एकनाथ शिंदे यांची मोठी खेळी

# महाराष्ट्रातील मोठी राजकीय आघाडी फुटली

**मुंबई, दि. ११** वृत्तसंस्था



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतरही महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी थांबलेल्या नाहीत. निवडणुकीपूर्वी तिकिटांसाठी पक्ष बदलणारे नेते आता निवडणुकीनंतरही पक्ष सोडत असल्याचे चित्र समोर येत आहे.

याच पार्श्वभूमीवर पंढरपूर आणि मंगळवेढा येथील तीर्थक्षेत्र विकास आघाडीमध्ये मोठी फूट पडल्याचे समोर आले आहे. या फुटीमुळे संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.पंढरपूर नगरपरिषदेत तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे वर्चस्व आहे. मात्र, या आघाडीतील प्रमुख नेत्यांनी शिवसेनेत (एकनाथ शिंदे गट) प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने आघाडीत तीव्र मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.भालके कुटुंबीय आणि अनिल सावंत यांचा शिवसेना प्रवेश

तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके, पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रणिता भालके आणि भैरवनाथ शुगरचे उपाध्यक्ष अनिल सावंत हे तिघे १२ एप्रिल २०२६ रोजी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

या प्रवेश सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पंढरपूर दौरा नियोजित असल्याचे सांगितले जात आहे. या तिन्ही नेत्यांच्या पक्षप्रवेशामागे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मोठी राजकीय खेळी असल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.

**मंगळवेढ्यातील नेत्यांची नाराजी**

भगीरथ भालकेंच्या शिवसेना प्रवेशाच्या निर्णयानंतर तीर्थक्षेत्र विकास आघाडीत मोठी फूट पडली आहे. मंगळवेढा येथील तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्षा सुनंदा बबनराव आवताडे यांचे पती आणि ज्येष्ठ नेते बबनराव आवताडे यांनी भालकेंविरोधात जाहीर नाराजी व्यक्त केली आहे.

या घडामोडींमुळे पंढरपूरसह सोलापूर जिल्ह्यातील राजकारणात नवे समीकरणे तयार होण्याची शक्यता आहे. तीर्थक्षेत्र विकास आघाडी ही स्थानिक स्तरावर प्रभावशाली आघाडी मानली जाते. आघाडीत पडलेली फूट आणि काही नेत्यांचा शिवसेनेकडे झुकलेला कल यामुळे महायुती आणि विरोधक दोघांनाही नवे संकेत मिळाले आहेत.

भगीरथ भालके, प्रणिता भालके आणि अनिल सावंत यांच्या १२ एप्रिलच्या प्रवेश सोहळ्यानंतर पंढरपूरच्या राजकीय चित्रात काय बदल होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### काय म्हणाले बबनराव आवताडे?

आमच्या मंगळवेढ्यात तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे २० नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष मिळून एकूण २१ जण आहेत. आम्ही शिवसेनेत प्रवेश करणार नाही. आमची आघाडी जो निर्णय घेईल तो आम्हाला मान्य असेल. मात्र, भालकेंच्या पक्षप्रवेशाबाबत आम्हाला काहीच माहिती नव्हती. कोणत्याही बैठका झाल्या नाहीत, कोणी निरोप दिला नाही. हे अचानक ठरले आहे. आम्ही कोणीही जाणार नाही. आमच्या आघाडीचे अध्यक्ष जो निर्णय घेतील तो आम्ही मान्य करू. बबनराव आवताडे यांनी स्पष्ट केले की, मंगळवेढ्यातील तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे सर्व नगरसेवक भालकेंसोबत जाणार नाहीत आणि ते आघाडीसोबत भक्कमपणे उभे राहतील.

# दिव्यांगांना दिलासा; जिल्हा परिषदेची योजना

**मुंबई :** सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली. मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागात काम करताना अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यांच्या कार्यकाळात दिव्यांगांसाठी योजनांची अंमलबजावणी वेगाने झाली, त्यामुळे दिव्यांग समाजात त्यांच्याबद्दल विश्वास आणि आदर निर्माण झाला. यामुळेच त्यांच्या बदलीचा निर्णय रद्द करावा अशी मागणी होत आहे. तर तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांना न्याय देवू शकते असा विश्वास दिव्यांग बांधव व्यक्त करत आहेत. तसेच राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात संताप व्यक्त करत आहेत. एकीकडे दिव्यांगांमध्ये अशा पद्धतीने सरकारविरोधात रोष असतानाच रायगड जिल्हा परिषदेच्या दिव्यांग कल्याण विभागाने दिव्यांगांसाठी नावीन्यपूर्ण योजना सुरू केली आहे.

# इराणमधून भारतीयांची ‘घरवापसी’!

**नवी दिल्ली/तेहरान : दि.११ वृत्तसंस्था**

अमेरिका इराण मधील शांतता चर्चांदरम्यान भारतासाठी एक मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. इराणमध्ये अडकलेल्या भारतीयांची घरवापसी सुरु झाली असून ३१२ मच्छिमारांना सुखरुप मायदेशी आणण्यात आले आहे. हा भारताचा मोठा राजनैतिक विजय मानला जात आहे. जयशंकर यांनी याची माहिती सोशल मीडियावरुन दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (११ एप्रिल) भारत सरकारने राबवण्यात आलेल्या रेस्क्यू मोहिमेअंतर्गत ओर्मेनियाच्या

## युद्धाच्या खाईतून मच्छिमारांची सुटका



मार्गे ३१२ मच्छिमारांना सुखरुप परत आणले आहे. इराणमधील बिघडलेली परिस्थिती आणि इंटरनेट बंदीमुळे थेट संपर्क साधणे कठीण झाले होते. परंतु परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केलेल्या राजनैतिक हालचालींमुळे भारतीयांची मायदेशी वापसी झाली आहे. जयशंकर यांनी यासाठी आर्मेनिया सरकार आणि समकक्ष अरारात मिर्झोयान यांचे आभार मानले आहेत.

इस्लामाबादमध्ये चर्चेला सुरुवात याच वेळी दुसरीकडे इस्लामाबादमध्ये पाकिस्तानच्या मध्यस्थीने अमेरिका इराण शांतता चर्चेला सुरुवात झाली आहे. पाकिस्तानने इराणच्या शिष्टमंडळाशी संवाद सुरु केला आहे.

इराणच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिफब करत आहे. या चर्चेत इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषदेतील महत्त्वाचे नेते अली अकबर अहमदियन यांचा समावेश आहे.

यानंतर पाकिस्तान अमेरिकेच्या शिष्टमंडळाशी चर्चा करणार असून याचे नेतृत्व उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस करत आहे. या चर्चेपूर्वी जेडी वेंस यांनी इराणला उघड इशारा दिला होता. इराणने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही किंवा अमेरिकेची फसवणूक केली तर त्यांना मदत केली जाणार नाही.

सध्या दोन्ही देशांनी एकमेकांसमोर अत्यंत कडक अटी ठेवल्या आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला स्ट्रेट ऑफ होर्मुझ खुला करण्यास, अण्वस्त्र कार्यक्रम नष्ट करण्यास आणि युरेनियमचे संवर्धन पूर्णपणे थांबवण्यास सांगितले आहे. तर दुसरीकडे इराने देखील १० अटी ठेवल्या आहेत. तसेच अमेरिकेवर विश्वास नसल्याचेही इराणने स्पष्ट केले आहे. सध्या या चर्चेचा निकाल संपूर्ण जगासाठी अत्यंत निर्णयाक मानला जात आहे. ही चर्चा यशस्वी व्हावी अशी जगभरातून अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## चिलीमध्ये सापडले ४०० वर्षांपूर्वीचे चांदीचे नाणे

**सँटियागो दि.११ वृत्तसंस्था**

दक्षिण चिलीतील ‘स्ट्रेट ऑफ मॅगेलन’ जवळ पुरातत्त्वशास्त्रज्ञांना ४०० वर्षांपूर्वीचे एक दुर्मीळ स्पॅनिश नाणे सापडले आहे. १६ व्या शतकातील वसाहतवाद्यांनी एका विशेष धार्मिक विधीचा भाग म्हणून हे चांदीचे नाणे तिथे ठेवले होते.

या शोधामुळे शतकांपूर्वी नष्ट झालेल्या एका स्पॅनिश वसाहतीचे स्थान आणि इतिहास सिद्ध करण्यास मोठी मदत झाली आहेसँटियागो येथील बर्नार्डो ओ'हिगिन्स विद्यापीठाच्या संशोधक सोलेदाद गोन्झालेझ डायझ यांच्या नेतृत्वाखाली हे उत्खनन करण्यात आले. सापडलेले नाणे ‘८-रिअल’ प्रकारातील असून ते चांदीचे आहे. १६ व्या शतकात या नाण्याला ‘पीस ऑफ एइट’ असेही म्हटले जात असे. सन १५८४ मधील ऐतिहासिक कागदपत्रांनुसार, जेव्हा स्पॅनिश लोक नवीन वसाहत स्थापन करत असत, तेव्हा ख्रिश्चन विधीनुसार नाणी अर्पण करण्याची प्रथा होती.

हे नाणे त्याच विधीचा एक भाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे नाणे ‘सिउदाद डेल रे डॉन फ ेलिप’ या वसाहतीच्या पहिल्या चर्चच्या पायाखालील एका दगडावर ठेवलेल्या अवस्थेत सापडले.स्पॅनिश खलाशी पेड्रो सार्मिएंटो डी गॅम्बुआ याने हे नाणे तिथे ठेवल्याची नोंद त्याच्या लेखनात आढळते. संशोधकांनी सांगितले की, या शोधामुळे जुन्या कागदपत्रांमधील माहिती आणि प्रत्यक्ष जमिनीतील पुरावे यांचा अचूक मेळ बसला आहे.

## महत्त्वाचे

### डोसा पीठ केसची चक्रं फिरली, संशयाच्या फेऱ्यात दोघे

**अहमदाबाद :** गुजरातमधील अहमदाबाद शहरात चांदखेडा येथे राहणाऱ्या प्रजापती कुटुंबातील दोन चिमुरड्या बहिणींचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबीयांनी डोशाच्या पिठाला जबाबदार ठरवलं होतं. मात्र फॉरेन्सिक तपासणीच्या प्राथमिक निष्कर्षांमुळे तपासाची दिशा बदलली आहे. या तपासाचा केंद्रबिंदू आता अन्नातून विषबाधा झाल्याच्या संशयावरुन जीव देण्याच्या सामूहिक प्रयत्नाच्या शक्यतेकडे वळला आहे. या कुटुंबाच्या घरातून एक डायरी जप्त करण्यात आली आहे. त्यामध्ये मुलगा व्हावा यासाठी केलेल्या नवसाचा उल्लेख आढळल्यामुळे पोलिसांचा संशय बळावला आहे. सखोल तपासणीनंतरच या संपूर्ण प्रकरणाबाबत अधिक स्पष्टता येईल, असे पोलिसांनी म्हटले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तीन महिन्यांची राहा आणि चार वर्षांची मिश्री यांच्या मृत्यूचं नेमकं कारण निश्चित करण्यासाठी अंतिम फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीज अहवालाची प्रतीक्षा असली, तरीही या घटनेतून बचावलेल्या पालकांच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये ॲल्युमिनियम फॉस्फेट आणि जस्त (झिंक) हे प्रमाणाबाहेर असल्याचे आढळून आले आहे.चांदखेडा येथून समोर आलेल्या या घटनेमुळे यापूर्वी भेसळयुक्त अन्नाबाबत चिंता व्यक्त केली गेली होती.

### अंतराळात सापडली तीन आकाशगंगांची प्रणाली

**वॉशिंग्टन :** खगोलशास्त्रज्ञांनी अंतराळात तीन आकाशगंगांची एक अत्यंत मनोरंजक प्रणाली शोधून काढली आहे. या प्रणालीला ‘द स्टिंगरे’ असे टोपणनाव देण्यात आले असून, ही प्रणाली तेव्हाची आहे जेव्हा आपले विश्व केवळ १.१ अब्ज वर्षे जुने होते. या ‘खगोलीय समुद्री जीवा’च्या नवीन विश्लेषणामुळे अवकाशातील ‘लिटल रेड डॉटस्’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनाकलनीय वस्तूंच्या स्वरूपाबद्दल महत्त्वाची माहिती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.‘लिटल रेड डॉटस्’चा शोध सर्वप्रथम २०२२ मध्ये जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपद्वारे लावला गेला होता. सुरुवातीला खगोलशास्त्रज्ञांनी असा तर्क लावला होता की, सुरुवातीच्या विश्वात सर्वत्र दिसणाऱ्या या लाल वस्तू म्हणजे अशा आकाशगंगा असाव्यात, ज्यांच्या केंद्रस्थानी वेगाने ऊर्जा शोषून घेणारे ‘ब्लॅक होल्स’ (कृष्णविवर) आहेत. याव्यतिरिक्त, हे कोसळण्याच्या स्थितीत असलेले प्राचीन महाकाय तारे किंवा ‘ब्लॅक होल स्टार्स’ असावेत, असेही काही सिद्धांत मांडले जातात. ९ मार्च रोजी ‘ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स’ या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासामध्ये शास्त्रज्ञांनी या ‘स्टिंगरे’ प्रणालीतील ताऱ्यांच्या निर्मितीचा इतिहास शोधला आहे.

## चीन इराणला गुपचूप पुरवतोय घातक शस्त्र

**बीजिंग:दि.११ वृत्तसंस्था**



अमेरिका इराणमधील तणाव सध्या निवळताना दिसत आहे. पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे दोन्ही देशांची शांतता बैठक पार पडणार आहे. परंतु या बैठकीपूर्वी एक मोठा खुलासा करण्यात आला आहे. अमेरिकन गुप्तचर यंत्रणांनी दावा केला आहे की चीन इराणला गुपचूप घातक शस्त्रास्त्रांचा पुरवठा करत आहे. या खुलास्यामुळे अमेरिकेला मोठा धोका निर्माण झाला असून यामुळे युद्धाचा पुन्हा भडका उडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.अमेरिकेच्या गुप्तचर यंत्रणांनी दावा केला आहे की, चीन इराणला अत्याधुनिक हावई संरक्षण प्राणी पुरवण्याच्या तयारीत आहे. येत्या काही दिवसांत इराणला एक मोठी खेप मिळण्याची शक्यता आहे. यामुळे पश्चिम आशियातील तणावा वेगळे स्वरुप मिळण्याची भीती तज्ज्ञांनी वर्तवली आहे.

विशेष म्हणजे हा खुलासा अशा वेळी करण्यात आला आहे जेव्हा चीनने इराणला वाटाघाटी चर्चेच्या टेबलावर आणल्याचा दावा केला जात होता.मात्र आता इराणला तिसऱ्या देशामार्फत शस्त्रास्त्रे पुरवली जात आहेत. यामुळे चीनच्या दुटप्पी धोरणावर प्रश्न उपस्थित केले जात आहे. यामुळे अमेरिकेचीही चिंता वाढली आहे. चीन इराणला मॅनपॅड्स म्हणजे खांद्यावरुन डागता येणारी क्षेपणास्त्रे देखील पुरवत असल्याचे अमेरिकन गुप्तचर संस्थांनी म्हटले आहे. कमी उंचीवरुन उडणाऱ्या विमानांसाठी ही प्रणाली घातक ठरु शकते. अलीकडे इराणने अमेरिकेचे फाटर जेट अशा प्रकारच्या हीट-सीकिंग मिसाइलने पाडल्याचा दावा केला होता. चीनने इराणला प्रगत शस्त्रे पुरवली तर अमेरिकेच्या सैन्यासमोर मोठी आव्हाने उभी राहू शकतात. परंतु वॉशिंग्टन येथील चीनच्या दूतावासाने हे सर्व आरोप फेटाळले आहेत. चीनने या संघर्षात कोणत्याही देशाला शस्त्र पुरवली नाहीत.

अमेरिकेने कोणत्याही पुरव्याशिवाय अफाव पसरवणे थांबवावे असे दूतावासाने स्पष्ट केले आहे.

## पाकिस्तानात चर्चा, अमेरिकेत सावळागोंधळ

### दोन अहवालांनी खळबळ, इराणच्या ताकदीचा अंदाज येईना!

**तेहरान: दि.११ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराण यांच्या प्रतिनिधींमध्ये पाकिस्तानात चर्चा सुरु आहे. गेल्या दीड महिन्यांपासून सुरु असलेला संघर्ष संपवण्यासाठी दोन्ही देशांचे वरिष्ठ नेते इस्लामाबादला पोहोचले आहेत. तर दुसरीकडे इराणच्या सैन्य क्षमतेवरुन अमेरिकेचा संरक्षण विभाग (पेंटागॉन) आणि गुप्तचर अहवालांमध्ये मोठी तफावत आढळून आली आहे.

इराणकडे अद्यापही हजारो बॅलेस्टिक क्षेपणास्त्रं असल्यां अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या अधिकाऱ्यांना वाटतं. याच्या परस्पविरोधी माहिती पेंटॅगॉनकडे आहे. इराणी लॉन्चर आणि क्षेपणास्त्रं पूर्णपणे निष्प्रभ झाल्याचा दावा पेंटागॉनकडून करण्यात आला आहे. त्यामुळे इराणच्या सैन्य क्षमतेवरुन अमेरिकेतच संभ्रम



पाहायला मिळत आहे.

इराण त्यांच्याकडे असलेल्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांचा वापर हा साठा भूमिगत परिसरात असलेल्या लॉन्चर्समधून पुन्हा करण्याची शक्यता आहे. अमेरिकेचे संरक्षण मंत्री यांनी या पीट हेगसेथ यांनी इराणच्या शस्त्र सज्जतेवर नुकतंच भाष्य केलं होतं. इराणचा क्षेपणास्त्र कार्यक्रम आता पूर्णपणे निष्प्रभ झाला आहे. त्यांचे लॉन्चर्स आणि क्षेपणास्त्रं आता प्रभावी राहिलेले नाहीत, असा दावा हेगसेथ यांनी केला होता.अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या अहवालानुसार, इराणचे अर्ध्याहून अधिक लॉन्चर्स उद्ध्वस्त झाले आहेत. ते ढिगाऱ्याखाली दाबले गेले आहेत. पण अनेक लॉन्चर्सची दुरुस्ती केली जाऊ शकते. ही लॉन्चर्स भूमिगत परिसरांमधून खोदूनही काढली जाऊ शकतात.

जवळपास ४० दिवस चाललेल्या युद्धानंतर इराणकडे असलेला क्षेपणास्त्र साठा निम्म्यावर आल्याचं अमेरिका आणि इस्रायली अधिकारी सांगतात. यानंतरही त्यांच्याकडे हजारोंच्या संख्येनं मध्यम आणि लघु पल्ल्याची क्षेपणास्त्रं आहेत. या युद्धात इराणनं मोठ्या प्रमाणात ड्रोन्सचा वापर केला आहे. इराणकडे आता ५० टक्क्यांहून कमी वन वे अटॅक ड्रोन शिल्लक आहेत. पण इराण रशियाच्या मदतीनं त्यांची संख्या वाढवू शकतो.गुप्तचर विभागाच्या अहवालांनुसार, इराणकडे आजही क्रूझ क्षेपणास्त्रंचं एक लहान भंडार कायम आहे. शांतता चर्चा अयशस्वी ठरल्यास इराण या क्षेपणास्त्रांचा वापर पर्शियन आखातात असलेल्या जहाजांना हल्ला करण्यासाठी किंवा अमेरिकेन सैनिकांना लक्ष्य करण्यासाठी वापर करु शकतो.

## मोबाईल ‘फ्लाईट मोड’वर टाकून आई-वडिलांना ‘डिजिटल अरेस्ट’पासून वाचवले!

**लखनौ : दि.११ वृत्तसंस्था**


आजच्या काळात जिथे मोठे लोक सायबर फसवणुकीला बळी पडत आहेत, तिथे उत्तर प्रदेशच्या बरेली येथील एका १३ वर्षांच्या मुलाने आपल्या हुशारीने पालकांना लुटण्यापासून वाचवल्याचे प्रकरण समोर आले आहे. तन्मय नावाच्या या आठवीतील विद्यार्थ्याने ‘डिजिटल अरेस्ट’ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सायबर गुन्हेगारांचा डाव उधळून लावला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, तन्मयचे वडील संजय सक्सेना, जे बेकरीचे मालक आहेत, त्यांना एका अज्ञात नंबरवरून कॉल आला. समोरच्या व्यक्तीने स्वतःची ओळख ‘एनआयए’ अधिकारी अशी करून दिली. तुमच्या फोन नंबरचा संबंध दहशतवाद्यांशी असून, ३०० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा झाला आहे, अशी भीती त्यांना घालण्यात आली. या गुन्हेगारांनी चक्क व्हॉटस्ॲपवर बनावट अरेस्ट वॉरंट पाठवले, ज्यामुळे सक्सेना दाम्पत्य प्रचंड घाबरले. सायबर फसवणूक करणाऱ्यांनी त्या जोडप्याला घराबाहेर न पडण्याचा, व्हिडीओ कॉल बंद न करण्याचा आणि खाणे, बोलणे किंवा झोपणे यासारखी प्रत्येक कृती कॅमेऱ्यासमोरच करण्याचा आदेश दिला.फसवणूक करणाऱ्यांनी त्यांच्यावर मानसिक दबाव कायम ठेवला आणि त्यांच्या संभाषणातून त्यांच्या बँक खात्यांविषयी महत्त्वाची माहिती मिळवली. त्यांचे ध्येय पैसे उकळणे हे होते आणि त्यांचे उद्दिष्ट जवळजवळ साध्य झाले होते. भीतीच्या सावटाखाली असलेल्या पालकांनी आपल्या बँक खात्यांचे तपशील, दागिने आणि मालमत्तेची माहिती गुन्हेगारांना दिली होती.

## ट्रम्प गुन्हेगारी टोळीचे म्होरक्या!

### कमला हॅरिस यांचा इराण युद्धावरून ट्रम्पवर संताप

**वॉशिंग्टन : दि.११ वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात आता पुन्हा एकदा ठिणगी पडली आहे. माजी उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या परराष्ट्र धोरणांवर, विशेषतः इराणसोबतच्या युद्धाच्या भूमिकेवरून अत्यंत तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. हॅरिस यांच्या मते, ट्रम्प यांच्या अदूरदर्शी निर्णयामुळे अमेरिका आता आपल्या मित्र राष्ट्रांसाठी एक ‘‘अविश्वासू भागीदार’’ बनत चालली आहे. नॅशनल क्शन नेटवर्क कॉन्फरन्समध्ये बोलताना त्यांनी मांडलेले विचार सध्या जागतिक चर्चेचा विषय ठरले आहेत.कमला हॅरिस यांनी आपल्या भाषणात शब्दांची कोणतीही मर्यादा पाळली नाही. त्यांनी ट्रम्प



यांची तुलना थेट एका गँगस्टरशी केली. हॅरिस म्हणाल्या, ‘‘डोनाल्ड ट्रम्प हे एखाद्या राष्ट्राध्यक्षासारखे नाही, तर गुन्हेगारी टोळीच्या म्होरक्यासारखे वागतात. ते जगाकडे एका केकसारखे पाहतात आणि त्याची वाटणी आपल्या जवळच्या मित्रपक्षांमध्ये करतात. ‘तुम्ही पूर्व युरोप घ्या, मी पश्चिम गोलार्ध घेईन’ अशा प्रकारची त्यांची भाषा अमेरिकेचे जागतिक स्थान कमकुवत करत आहे.’’ ट्रम्प यांनी नाटोवर केलेले हल्ले आणि इराणशी छेडलेले युद्ध हे अमेरिकेला विनाशाकडे नेणारे पाऊल असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

अमेरिकेच्या भवितव्याबद्दल चिंता हॅरिस यांनी सांगितले की, अमेरिकेची सध्याची जागतिक स्थिती पाहून त्यांना रात्री झोप लागत नाही. एकेकाळी जगाचे नेतृत्व करणारा हा देश आता स्वतःच्याच कोषात अडकत चालला आहे. ट्रम्प यांच्या ‘‘अमेरिका फर्स्ट’’ या धोरणामुळे मित्र राष्ट्रे दुरावली जात असून, रशिया आणि इराणसारख्या देशांना त्याचा फायदा होत आहे. हॅरिस यांनी असा दावा केला की, ट्रम्प यांनी जागतिक प्रभाव प्रमुख शक्तींमध्ये विभागल्यामुळे लोकशाहीवादी देशांचे मनोबल खचले आहे.

## युद्धावरुन लक्ष भरकटवण्याचा प्रयत्न?

### मेलानिया ट्रम्प यांचा मोठा खुलासा, जगभरात खळबळ

**वॉशिंग्टन : दि.११ वृत्तसंस्था**

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पत्नी आणि अमेरिकेच्या फर्स्ट लेडी मेलिनिया ट्रम्प यांनी एक अत्यंत खळबजनक विधान केले आहे. यामुळे संपूर्ण जगभरात खळबळ उडाली आहे. मेलिनिया यांनी एपस्टीन प्रकरणाबाबत मोठा खुलासा केला आहे. हा खुलासा अशा वेळी करण्यात आला आहे, जेव्हा इस्लामाबाद येथे अमेरिका आणि इराणमध्ये आज शांतता बैठक पार पडणार आहे. अशा परिस्थितीत हे विधान आल्यामुळे या चर्चेवरुन जगाचे लक्ष हटवण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

०९ एप्रिल २०२६ रोजी मेलानिया ट्रम्प यांनी अचानक एक पत्रकार परिषद बोलावली. यावेळी पत्रकारांना वाटले की इराणमधील युद्धबंदीबाबत काही अपडेट असले. परंतु मेलानिया ट्रम्प यांनी जेफ्री एपस्टीन प्रकरणाबाबत अचानक मौन सोडले. यामुळे संपूर्ण जगभरात खळबळ उडाली असून ट्रम्पही हादरले आहेत.



मेलानिया ट्रम्प यांनी स्पष्ट केले की, त्या एपस्टीन पीडिता नाहीत. त्यांचा किंवा डोनाल्ड ट्रम्प यांचा एपस्टीनशी कोणताही जवळचा संबंध नाही. ते दोघेही केवळ एका सार्वजनिक कार्यक्रमात भेटले होते. मेलानिया यांनी एपस्टीनने त्यांची ट्रम्प यांच्याशी ओळख करुन दिल्याचा दावाही फेटाळला आहे. त्यांची भेट १९९८ च्या एका पार्टीत झाली होती, परंतु एपस्टीनने घडवून आणली नव्हती असे त्यांनी म्हटले. याशिवाय त्यांनी एपस्टीनच्या खाजगी बेटावर गेले नसल्याचे आणि त्याच्यासोबत विमानाने प्रवास केला नसल्याचेही स्पष्ट केले.

### ट्रम्प यांची प्रतिक्रिया

आश्चर्याची बाब म्हणजे, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना त्यांच्या पत्नीच्या विधानाबाबत कोणतीही पूर्वकल्पना नव्हती. एका मुलाखती दरम्यान ट्रम्प यांनी म्हटले की, मला माहित नव्हते की ती (मेलानिया ट्रम्प) आज असे काही बोलणार आहे. पण ती एपस्टीनला ओळखत नव्हती हे सत्य असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले. एवढेच बोलून ट्रम्प यांनी तातडीने मुलाखत संपल्याने मोठी खळबळ उडाली.

### इराण युद्धावरुन भरकटवण्याचा प्रयत्न?

तज्ज्ञांच्या मते, मेलानिया ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा अमेरिका इराणसोबतच्या युद्धात अडकली आहे. यावरुन दावा केला जात आहे की इराण युद्धात अपेक्षित यश न मिळाल्याने जगाचे लक्ष भरकटवण्याचा प्रयत्न सुरु आहे, किंवा एपस्टीन प्रकरणाशी संबंधित आणखी काही गुपिते खुली होणार आहे. यामुळे मेलानिया आणि ट्रम्प यांनी आपली बाजू आधीच स्पष्ट करुन ठेवली आहे.

**मोहीम** पृथ्वीवर सुखरूप पोहोचले अंतराळवीर

# ‘नासा’चे ‘आर्टेमिस २’ मिशन यशस्वी

**वॉशिंग्टन : दि.११ वृत्तसंस्था**

नासाकडून आर्टेमिस २ ही चंद्र मोहीम सुरु करण्यात आली होती. या मोहिमेत अंतराळवीर चंद्रावर न उतरता प्रदक्षिणा घालणार होते. त्यानुसार, ही मोहिम पूर्ण करून चारही अंतराळवीर पृथ्वीवर सुखरूप परतले आहेत. या मोहिमेचे अंतराळयान, ओरियन, १० दिवसांच्या यशस्वी मोहिमेनंतर आज पॅसिफिक महासागरात सुखरूप उतरले.

अंतराळवीरांना घेऊन जाणारे ओरियन अंतराळयान ११ एप्रिल रोजी स्थानिक वेळेनुसार रात्री ८:०७ वाजता आणि भारतीय प्रमाण वेळेनुसार पहाटे ५:३७ वाजता पॅसिफिक महासागरात सुखरूप उतरले. कॅलिफोर्नियातील सॅन दिएगोच्या किनाऱ्याजवळ पॅसिफिक महासागरात आर्टेमिस २ च्या उतरण्याचे थेट प्रक्षेपण




नेटफ्लिक्स आणि नासाच्या अधिकृत यूट्यूब चॅनलवर करण्यात आले. तब्बल ५४ वर्षांनंतर पुन्हा एकदा चंद्राच्या दिशेने मानवाचा प्रवास झाला. नासाची पहिली मानवी मोहीम आर्टेमिस- गुरुवारी (दि.२) भारतीय वेळेनुसार पहाटे ४:०५ वाजता फ्लोरिडामधून यशस्वीरित्या प्रक्षेपित झाली.

एसएलएस रॉकेटमध्ये क्रिस्टीना कोच, व्हिक्टर ग्लोव्हर, रीड वाईजमन आणि जेरेमी हॅन्सन हे अंतराळवीर होते. हा १० दिवसांचा प्रवास अंतराळवीरांना पृथ्वीपासून अंदाजे ४०६००० किलोमीटर दूर घेऊन गेला. ही मोहीम आतापर्यंतची सर्वात लांब मानवी अंतराळ प्रवास करणारी ठरली.

आर्टेमिस- मोहीम अंतराळवीरांना चंद्राच्या जवळ घेऊन गेली. मात्र, ते चंद्रावर उतरले नाहीत. ही एक चाचणी मोहीम होती. ज्याचा उद्देश भविष्यातील चंद्र मोहिमांसाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान आणि क्षमता तपासणे असे होते. संपूर्ण मोहीम अंदाजे १० दिवसांत पूर्ण झाले आणि अंतराळवीर चंद्राभोवती प्रदक्षिणा घालून पृथ्वीवर सुरक्षितपणे परत आले आहेत. नासाने सोशल मीडियावर पोस्ट करून लोकांना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आमंत्रित केले होते. संस्थेने म्हटले आहे की, ही मोहीम चंद्रावर आणि त्यानंतर मंगळावर मानवी वस्तीच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

### सर्वाधिक अंतर आता पार करणार

नासाच्या मते, आर्टेमिस- मोहीम चार अंतराळवीरांना सुमारे १० दिवसांच्या प्रवासात चंद्राभोवती घेऊन गेली. १९७२ नंतर प्रथमच मानव पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राच्या पलीकडे गेला आणि हे अंतर आजपर्यंतच्या कोणत्याही मानवी अंतराळ प्रवासापेक्षा जास्त असू शकते. ही मोहीम आर्टेमिस कार्यक्रमाचा एक भाग आहे, ज्याचा उद्देश चंद्रावर मानवाची कायमस्वरूपी वस्ती स्थापन करणे आहे. हे अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी डी. बी. कार्पोरेशन लिमिटेड, दिव्य मराठी, एन.एच.६, बनारसी धाब्याजवळ, बोरगाव मंजू, अकोला - ४४४००१ येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# अंतराळातील हिऱ्यांचा पाऊस!




विश्व भ्रमण
रूबेन वाळके
अकोला, मो. ७०२८१७३८८०

**अंतराळातील हिऱ्यांचा पाऊस ही संकल्पना ऐकायला एखाद्या परीकथेसारखी वाटली, तरी खगोलशास्त्रज्ञांच्या मते हे आपल्या सौरमंडळातील एक जळजळीत वास्तव आहे. पृथ्वीवर जसा पाण्याचा पाऊस पडतो, तसाच युरेनस आणि नेपच्यून या ग्रहांवर चक्क 'मौल्यवान हिऱ्यां'ची वृष्टी होते. युरेनस आणि नेपच्यून ग्रहांवर हिरे तयार होतात आणि ते ग्रहाच्या थरात गोठलेल्या अवस्थेत राहू शकतात. शनी आणि गुरू ग्रहांवरही हिरे तयार होतात, पावसासारखे पडतात, पण ग्रहाच्या अतिउष्णतेमुळे शेवटी वितळून द्रवरूप बनतात. विज्ञानाची ही बाजू पाहिली की लक्षात येते की, आपले सौरमंडळ आपण विचार करतो त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक अजब आणि वैभवशाली आहे! अंतराळातील हे 'अजब' वास्तव वाचायला एखाद्या विज्ञान कल्पित चित्रपटासारखे वाटले, तरी नेपच्यून आणि युरेनस या ग्रहांवर हिऱ्यांचा पाऊस पडतो, हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. या सर्व आश्चर्यकारक बाबींचा मागोवा घेणारा हा लेख...**

अंतराळातील अंतराळातील हिऱ्यांचा पाऊस ही संकल्पना ऐकायला एखाद्या परीकथेसारखी वाटली, तरी खगोलशास्त्रज्ञांच्या मते हे आपल्या सौरमंडळातील एक जळजळीत वास्तव आहे. पृथ्वीवर जसा पाण्याचा पाऊस पडतो, तसाच युरेनस आणि नेपच्यून या ग्रहांवर चक्क 'मौल्यवान हिऱ्यां'ची वृष्टी होते. आपल्या पृथ्वीवर पाऊस पडण्यासाठी ढग आणि पाण्याची वाफ लागते. परंतु, पृथ्वीपासून अब्जावधी किलोमीटर दूर असलेल्या युरेनस आणि नेपच्यून या 'आईस जायंट्स'ग्रहांची रचना पूर्णपणे वेगळी आहे. तिथे पाऊस पडण्यासाठी पाणी नाही, तर रसायनांचा खेळ कारणीभूत ठरतो. युरेनस आणि नेपच्यूनच्या वातावरणात हायड्रोजन आणि हेलियमसोबतच मिथेन वायू मोठ्या प्रमाणात आढळतो. मिथेनमध्ये कार्बनचा अणू असतो. हे ग्रह सूर्यापासून खूप लांब असल्याने त्यांच्या वरच्या थरातील तापमान अतिशय थंड असले, तरी त्यांच्या अंतरंगात प्रचंड दाब आणि उष्णता असते. जेव्हा मिथेन वायू ग्रहाच्या वातावरणातून खाली खोलवर जातो, तेव्हा त्यावर प्रचंड दाब पडतो. हा दाब पृथ्वीच्या वातावरणीय दाबापेक्षा लाखो पटीने जास्त असतो. या प्रचंड दबावामुळे मिथेनमधील हायड्रोजन आणि कार्बनचे बंध तुटतात. सुटा झालेला कार्बन अतिदाबामुळे एकत्र येतो आणि त्याचे स्फटिकात रूपांतर होते. हे स्फटिक म्हणजेच हिरे होय. हे तयार झालेले हिरे वजनाने जड असतात. त्यामुळे ते ग्रहांच्या केंद्रभागाकडे खेचले जातात. हजारो किलोमीटर खोलवर जात असताना ते पावसाच्या थेंबाप्रमाणे खाली पडतात. वैज्ञानिकांच्या मते, हे हिरे पृथ्वीवरील हिऱ्यांपेक्षा खूपच मोठे आणि अधिक शुद्ध असू शकतात. काही हिरे तर चक्क 'मिलियन कॅरेट'चे असू शकतात असा अंदाज आहे. ही केवळ एक कल्पना नसून, शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळेत याचे पुरावे शोधले आहेत. कॅलिफोर्नियातील 'नॅशनल एक्सीलरेटर लॅबोरेटरी'मध्ये वैज्ञानिकांनी लेझरचा वापर करून नेपच्यूनवरील वातावरणासारखा दाब निर्माण केला. या प्रयोगात त्यांना 'नॅनो-डायमंड्स'तयार करण्यात यश आले, ज्यामुळे या नैसर्गिक घटनेवर शिक्कामोर्तब झाले. काही संशोधकांचे असेही मत आहे की, या ग्रहांच्या गाभ्यापाशी तापमान इतके जास्त असते की तिथे हे हिरे वितळतात. यामुळे तिथे द्रवरूप कार्बनचा समुद्र उ आणि त्या समुद्रावर हिऱ्यांचे मोठम हिमनग तरंगत असावेत. निसर्गाची किमया अद्भुत आहे. जरी या ग्रहांवर हिऱ्यांचा खजिना असला, तरी तिथे पोहोचणे सध्याच्या मानवी तंत्रज्ञानासाठी अशक्य आहे. तिथला जीवघेणा दाब आणि गोठवणारी थंडी यामुळेहे ग्रहआजही मानवासाठी मोठे रहस्य बनून राहिले आहेत. युरेनस आणि नेपच्यूनप्रमाणेच शनी आणि गुरू या वायुरूप महाकाय ग्रहांवरही हिऱ्यांचा पाऊस पडत असल्याचा प्रबळ अंदाज शास्त्रज्ञांनी वर्तवला आहे. या दोन ग्रहांवरील हिऱ्यांच्या पावसाची प्रक्रिया नेपच्यूनपेक्षा थोडी वेगळी आणि अधिक रंजक आहे. युरेनस आणि नेपच्यूनवर मिथेनचे प्रमाण जास्त असते, पण शनी आणि गुरूवर हिरे बनण्याची सुरुवात एका वेगळ्या नैसर्गिक घटनेने होते. विजांचा कडकडाट. शनि आणि गुरूच्या वातावरणात प्रचंड मोठी वादळे येतात आणि तिथे सतत विजा चमकत असतात. जेव्हा या अतिशक्तिशाली विजा वातावरणातील मिथेन वायूवर आदळतात, तेव्हा मिथेनमधील कार्बन वेगळा होतो आणि त्याचे रूपांतर काजळीत होते. ही कार्बनची काजळी जेव्हा ग्रहाच्या गुरुत्वाकर्षणामुळे खाली जाऊ लागते, तेव्हा वातावरणाचा दाब वाढत जातो. ग्रॅफाईट: वातावरणाच्या खालच्या थरात हा कार्बन प्रथम 'ग्रॅफाईट'मध्ये रूपांतरित होतो. जसे आपल्या पेन्सिलमध्ये असते. हिरा: जेव्हा हे ग्रॅफाईट आणखी खाली सुमारे ६,००० किमी पेक्षा जास्त खोल जाते, तेव्हा प्रचंड दाब आणि उष्णतेमुळे त्याचे रूपांतर कठीण अशा हिऱ्यांत होते. संशोधकांच्या मते, शनिवार दरवर्षी सुमारे १,००० टन हिरे तयार होत असावेत. हे हिरे पावसाच्या थेंबासारखे नसून 'गारां'सारखे कठीण असतात. शनीच्या काही भागांत तर हिऱ्यांचा हा पाऊस इतका मोठा असू शकतो की त्याचे मोठे खडे खाली पडत असावेत. युरेनस आणि नेपच्यूनच्या तुलनेत शनी आणि गुरूचा गाभा अतिशय उष्ण असतो. यामुळे तिथे पडलेले हिरे अनंत काळ हिऱ्यांच्या स्वरूपात राहत नाहीत. जेव्हा हे हिरे ग्रहाच्या अति-उष्ण थरांमध्ये पोहोचतात जिथे तापमान ८,००० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते, तेव्हा ते वितळतात. अखेरीस, या हिऱ्यांचे रूपांतर द्रवरूप कार्बनमध्ये होते. नासाच्या जेट प्रोपल्शन लॅबोरेटरीमधील संशोधक केविन बेन्स आणि त्यांच्या टीमने केलेल्या ानुसार, शनीच्या वातावरणात हिरे ार होण्यासाठी आवश्यक असलेली म्प्रेशन'दाबस्थिती अगदी योग्य आहे. थोडक्यात सांगायचे तर युरेनस आणि नेपच्यून ग्रहांवर हिरे तयार होतात आणि ते ग्रहाच्या थरात गोठलेल्या अवस्थेत राहू शकतात. शनी आणि गुरू ग्रहांवरही हिरे तयार होतात, पावसासारखे पडतात, पण ग्रहाच्या अतिउष्णतेमुळे शेवटी वितळून द्रवरूप बनतात. विज्ञानाची ही बाजू पाहिली की लक्षात येते की, आपले सौरमंडळ आपण विचार करतो त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक अजब आणि वैभवशाली आहे! अंतराळातील हे अजब वास्तव वाचायला एखाद्या विज्ञान कल्पित चित्रपटासारखे वाटले, तरी नेपच्यून आणि युरेनस या ग्रहांवर हिऱ्यांचा पाऊस पडतो, हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. नेपच्यून आणि युरेनस: जिथे आभाळातून 'हिरे' बरसतात! आपल्या पृथ्वीवर पाऊस पडतो तेव्हा पाण्याचे थेंब पडतात, पण आपल्या सौरमंडळाच्या टोकावर असलेल्या नेपच्यून आणि युरेनस या ग्रहांचे विश्व पूर्णपणे वेगळे आहे. तिथे पावसाच्या थेंबांऐवजी चक्क हिऱ्यांच्या खड्यांची वृष्टी होते. हे कसे शक्य आहे? याचे शास्त्रीय कारण विचारात घेतले तर नेपच्यून आणि युरेनस यांना 'आईस जायंट्स'म्हटले जाते. त्यांच्या वातावरणात हायड्रोजन आणि हेलियमसोबतच मोठ्या प्रमाणात मिथेन वायू असतो. मिथेनमध्ये कार्बन असतो आणि हाच कार्बन हिरे बनण्याचे मुख्य कारण ठरतो. हिरे बनण्याच्या प्रक्रियेचा विचार केला असता या ग्रहांच्या अंतरंगात प्रचंड दाब आणि कमालीचे तापमान असते. ही प्रक्रिया विविध टप्प्यांत घडते. जेव्हा वातावरणातील मिथेन वायू ग्रहाच्या केंद्राकडे खोलवर जातो, तेव्हा प्रचंड दाबामुळे मिथेनमधील हायड्रोजन आणि कार्बन एकमेकांपासून वेगळेहोतात. वेगळा झालेला हा कार्बन अतिदाबामुळे एकत्र येतो आणि त्याचे स्फटिकात रूपांतर होते. पृथ्वीवर ज्याप्रमाणे कोळशापासून हिरा तयार होतो, अगदी तशीच पण कित्येक पटीने वेगवान प्रक्रिया तिथे घडते. हे तयार झालेले हिरे वजनाने जड असल्याने वातावरणातून खाली 'वृष्टी'च्या स्वरूपात पडू लागतात. वैज्ञानिकांच्या मते, हे हिरे पृथ्वीवरील हिऱ्यापेक्षा खूप मोठे आणि शुद्ध असू शकतात. 'हिऱ्यां'चा महासागर'संशोधकांचा असाही अंदाज आहे की, या ग्रहांच्या केंद्राजवळ इतकी उष्णता असते की तिथे हे हिरे पुन्हा वितळू शकतात. यामुळे ग्रहाच्या गाभ्याभोवती द्रवरूप हिऱ्यांचा एक अथांग महासागर असण्याची शक्यता नाकारता येत नाही, ज्यावर हिऱ्यांचे 'हिमनग'तरंगत असतील. हे केवळ कागदावरचे सिद्धांत नाहीत. शास्त्रज्ञांनी पृथ्वीवर 'नॅशनल एक्सीलरेटर लॅबोरेटरी'मध्ये लेझरचा वापर करून नेपच्यूनसारखी परिस्थिती निर्माण केली होती. या प्रयोगात प्लास्टिकच्या थेंबांपासून अतिशय सूक्ष्म हिरे तयार करण्यात यश आले, ज्यावरून या ग्रहांवर हिऱ्यांचा पाऊस पडतो या दाव्याला पुष्टी मिळाली. पृथ्वीवर पाऊस म्हणजे पाणी पडणे. पण ब्रह्मांडात पाऊस पडणे ही काही वेगळीच गोष्ट आहे. नेपच्यून आणि युरेनससारख्या दूरच्या ग्रहांवर पाण्याचे थेंब पडण्याऐवजी हिरे वातावरणातून पडतात. नेपच्यून आणि युरेनसच्या आत खोलवर असलेला दाब पृथ्वीच्या वातावरणापेक्षा लक्षावधी पट जास्त आहे. येथील तापमानही खूप उच्च पातळीपर्यंत पोहोचते. वातावरणात मिथेन वायू असतो. जे कार्बन आणि हायड्रोजनपासून बनलेले संयुग आहे. दाबामुळे मिथेनचे रेणू तुटतात, ज्यामुळे कार्बनी अणू हायड्रोजन वेगळे करतात. हे कार्बनी अणू फार काळ वेगळे राहत नाहीत, दाबामुळे त्यांना आकुंचन पावते व स्फटिकीकरण होऊन हिरे तयार होतात. येथे ही क्रिया नैसर्गिकरीत्या होते जी पृथ्वीवरील प्रयोगशाळेत केली जाते. यानंतर हे हिरे ग्रहाच्या आत पडू लागतात. असे दिसते आहे की हिऱ्यांचा पाऊस पडत आहे. युरेनस आणि नेपच्यून हे वातावरणातील घनीभूत कार्बन आहेत, त्यामुळे येथे हिऱ्यांचा पाऊस पडतो. पण इथे हिरे कुणालाच सापडत नाहीत, कारण या ग्रहावर खूप थंडी आहे. येथील तापमान उणे २०० डिग्री सेल्सिअसपर्यंत असते. संशोधनानुसार, शनी आणि गुरू ग्रहावर वायू सापडला आहे. अतिरिक्त वायूमुळे या ग्रहांवर हिऱ्यांचा वर्षावही होऊ शकतो. या ग्रहावर, विजेची वादळे मिथेनला ग्रॅफाइटसारख्या कार्बनमध्ये रूपांतरित करू शकतात, जे हिऱ्यांमध्ये बदलू शकतात. शास्त्रज्ञांच्या मते, या ग्रहांच्या आतील तापमान इतके जास्त असू शकते की हिरे वितळतात. हिऱ्यांचे महासागर त्यांच्या गाभ्याजवळ तयार होऊ शकतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात हिरे तयार होत असले तरी ते कोणाच्याही हाती लागत नाहीत. चंद्र आणि मंगळाला गवसणी घालणारा मानव या हिऱ्यांच्या संदर्भात अजूनही हवा तितका आग्रही झालेला नाही हे आजवरच्या परिस्थितीवरून दिसून येत असले तरी आगामी काळात कडाक्याच्या थंडीवर मात करून हे हिरे हस्तगत करण्यासाठी विकसित राष्ट्रांमध्ये चढाओढ लागलेली पहावयास मिळाली तर आश्चर्य वाटायला नको.




**(लेखक हे दैनिक 'अजिंक्य भारत'चे कार्यकारी संपादक असून आंतरराष्ट्रीय राजकारण व संबंधांचे अभ्यासक आहेत.)**

# प्रज्ञा-सूर्यांचा जागर: उत्सवाकडून विवेकाकडे वळताना...



प्रासंगिक
ॲड. अंजली अरुण हिवाळे
मो. 8446427320



एप्रिल महिना हा बहुजन समजासाठी केवळ कॅलेंडरवरील एक पान नसून, तो आत्मभानाचा आणि कृतज्ञतेचा महिना आहे. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य जोतिराव फुले यांची जयंती आणि १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. या दोन महापुरुषांच्या विचारांनी भारताच्या सामाजिक आणि राजकीय नकाशावर समतेची रेघ ओढली. एक वकील म्हणून कायद्याच्या चौकटीत काम करताना आणि एक आंबेडकरी महिला म्हणून समाजात वावरताना, आज या जयंती उत्सवांचे स्वरूप पाहिल्यावर मन थोडे विषण्ण होते आणि काही कठोर वास्तव मांडण्याची गरज भासते.

आज महात्मा फुले यांचे नाव आणि त्यांचे विचार जर समाजात प्रकर्षाने जिवंत असतील, तर त्याचे सर्वस्व श्रेय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना मानणाऱ्या अनुयायांकडे जाते, हे माझे ठाम मत आहे. बाबासाहेबांनी जोतिरावांना आपला तिसरे गुरु मानले. "शूद्रातिशूद्रांच्या दु:खाला वाचा फोडणारा हा महामानव आहे," हे बाबासाहेबांनी ठसवल्यामुळेच आंबेडकरी चळवळीने जोतिरावांना आपल्या डोक्यावर घेतले. परंतु, ज्या ओबीसी (इतर मागासवर्गीय) समाजासाठी जोतिरावांनी आपले आयुष्य वेचले, तो समाज मात्र आजही जोतिरावांच्या विचारांपासून तुटलेला दिसतो. दुर्दैवाने, ज्यांच्या हक्कासाठी जोतिबांनी शेणगोळे झेलले, त्याच समाजातील मोठा वर्ग आजही कर्मकांडांत आणि प्रतिगामी मानसिकतेत अडकलेला आहे. जोतिबांचे रेलेव्हन्स टिकवून ठेवण्याचे काम आंबेडकरी चळवळीने केले, अन्यथा प्रस्थापित व्यवस्थेने त्यांना केवळ एका जातीचे नेते बनवून इतिहासाच्या कोपऱ्यात ढकलले असते, नव्हे तर ढकलले आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर माझी अपार श्रद्धा आहे, पण ही श्रद्धा अंधभक्ती नाही. बाबासाहेबांनी आपल्याला बुद्ध दिला, ज्याचा आधार तर्क आणि विवेक आहे. मी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम करताना बऱ्याचदा असे जाणवते की, आपण बाबासाहेबांना मानणारा मोठा वर्ग हा त्यांची देव बनवून पुजायला लागला आहे , पण आजची स्त्री- मग ती उच्चवर्णीय असो वा मागासवर्गीय- तिला या उपकारांची जाणीव आहे का? ज्या बाबासाहेबांमुळे आज स्त्रिया वकील, डॉक्टर, इंजिनिअर होऊन फिरत आहेत, त्याच स्त्रिया आजही सण-वारांच्या नावाखाली स्वतःला गुलामगिरीच्या बेड्यांत अडकवून घेत आहेत. ही कृतघ्नता नाही तर काय?

आज ११ आणि १४ एप्रिलच्या जयंतीचे स्वरूप बदलत चालले आहे. चौकाचौकात लावणारे कानठळ्या बसवणारे डीजे, अश्लील गाण्यांवर होणारा धांगडधिंगा आणि शक्तीप्रदर्शनासाठी काढल्या जाणाऱ्या मिरवणुका... हेच का बाबासाहेबांना अपेक्षित होते? "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" असा संदेश देणाऱ्या महामानवाच्या जयंतीला आपण अभ्यास आणि सर्जनशीलता पूर्णपणे हद्दपार तर नाही करत आहोत हे तपासायला हवे.

सभ्य वर्तन आणि वैचारिक देवाणघेवाण याऐवजी उन्माद वाढत चालला आहे. ज्या समाजाने ग्रंथ पूजायला हवे होते, तो समाज आज डीजे समोर नाचण्यात धन्यता मानत आहे. एक वकील म्हणून जेव्हा मी पाहते की आमचे तरुण वाचनालयाऐवजी अशा धांगडधिंग्यात वेळ वाया घालवत आहेत, तेव्हा भीती वाटते की आपण पुन्हा एकदा मानसिक गुलामगिरीकडे तर झुकत नाही ना?

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्याही विचारांचा गाभा माणूस हा होता. या एप्रिल महिन्यात आपण या दोघांची संयुक्त जयंती साजरी करताना काही संकल्प करणे आवश्यक आहे. जसे जयंतीच्या खर्चातून किमान १०० पुस्तके विकत घेऊन ती तरुण पिढीला वाटली पाहिजेत. कारण वाचनाशिवाय परिवर्तन शक्य नाही. जोतिरावांनी सत्यशोधक समाज स्थापन केला आणि बाबासाहेबांनी धम्म स्वीकारला. या दोन्ही गोष्टींचा मूळ उद्देश बुद्धीप्रामाण्यवाद हाच होता. चमत्कारांमागे न धावता विज्ञानाची कास धरणे हीच खरी जयंती ठरेल. स्त्रियांनी केवळ दिखावा, मिरवणुकीत सहभागी न होता, बाबासाहेबांनी दिलेल्या हक्कांचा वापर करून स्वतःचे आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळवले पाहिजे. आंबेडकरी अनुयायी हा सुसंस्कृत आणि शिस्तप्रिय असावा.

ओबीसी आणि इतर मागासवर्गीयांनी हे समजून घेतले पाहिजे की, मंडल आयोग असो वा आरक्षणाचे इतर लाभ, त्याचे मूळ बाबासाहेबांनी लिहिलेल्या राज्यघटनेत आणि जोतिरावांच्या संघर्षात आहे. या उपकारांची जाणीव ठेवून जर हा समाज पुढे आला नाही, तर येणारा काळ आपल्याला माफ करणार नाही.

जयंती साजरी करणे म्हणजे केवळ फोटोला हार घालणे नव्हे, तर त्या महापुरुषाचा विचार आपल्या आचरणात आणणे होय. मला अशा समाजाचे स्वप्न पडते, जिथे ११ ते १४ एप्रिल दरम्यान गावोगावी व्याख्याने होतील, वैचारिक चर्चासत्रे होतील आणि विज्ञानाची कास धरणारा तरुण घडेल. चला, या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने आपण प्रतिज्ञा करूया की, आपण नाचणारे अनुयायी होण्यापेक्षा वाचणारे आणि विचार करणारे सैनिक बनू. तरच जोतिराव आणि बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईल. जय सावित्री, जय जोति, जय भीम!

# महाराष्ट्रातील बहुजनांच्या जमिनी वाचवण्यासाठी एल्गार!



चर्चा
नितीन जामनिक
मो. 90110 22447

महाराष्ट्र शेती जमीन (कमाल मर्यादा धारणा) अधिनियम १९६१ (सीलिंग ॲक्ट) रद्द करण्याच्या हालचाली विधानसभेत सुरू असतानाच, अकोल्याचे सजग सामाजिक कार्यकर्ते आणि विधी अभ्यासक नितीन साहेबराव जामनिक यांनी या प्रस्तावाचा तीव्र निषेध केला आहे. "हा कायदा रद्द करणे म्हणजे केवळ जमिनीचा प्रश्न नसून, तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या सामाजिक समता आणि न्यायाच्या संकल्पनेला हरताळ फासण्यासारखे आहे," असे ठाम प्रतिपादन जामनिक यांनी मुख्यमंत्री, महसूल मंत्री आणि प्रधान सचिवांना पाठवलेल्या निवेदनात केले आहे.

नितीन जामनिक यांनी आपल्या पत्रात अत्यंत गंभीर मुद्दे उपस्थित केले आहेत. १९६०-७० च्या दशकात शेकडो वर्षे चालत आलेली जमीनदारी आणि सरंजामशाही मोडून काढण्यासाठी सीलिंग कायदा आणला गेला होता. "जर हा कायदा रद्द केला, तर पुन्हा एकदा जमिनी मोजक्या धनदांडग्यांच्या हातात केंद्रित होतील आणि ग्रामीण भागातील बहुजन, दलित, आदिवासी व भूमिहीन शेतमजूर पुन्हा गुलामीच्या खाईत लोटला जाईल," अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. राज्यातील सीलिंग कायदा (शेती जमीन कमाल मर्यादा धारणा अधिनियम १९६१) रद्द करण्याच्या हालचाली सुरू असताना, अकोल्याचे सामाजिक कार्यकर्ते आणि विधी अभ्यासक नितीन साहेबाराव जामनिक यांनी सरकारला आरसा दाखवला आहे. "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत ज्या आर्थिक आणि सामाजिक लोकशाहीचे स्वप्न पाहिले होते, सीलिंग कायदा हा त्याचाच एक अविभाज्य भाग आहे. तो रद्द करणे म्हणजे संविधानाच्या मूळ भावनेवर घाला घालण्यासारखे आहे," असा आक्रमक पवित्रा जामनिक यांनी घेतला आहे.

नितीन जामनिक यांनी आपल्या पत्रात डॉ. आंबेडकरांच्या संविधान सभेतील ऐतिहासिक भाषणांचा आणि विचारांचा सविस्तर संदर्भ दिला आहे. बाबासाहेबांनी स्पष्ट केले होते की, जोपर्यंत देशात सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित होत नाही, तोपर्यंत राजकीय लोकशाहीला अर्थ राहणार नाही. " शेत जमिनीचे समान वाटप म्हणजेच शेतीचे राष्ट्रीयीकरण आणि औद्योगिकरण, तसेच सामूहिक शेती हाच गरिबांच्या उद्धाराचा मार्ग आहे," हे बाबासाहेबांचे सूत्र नितीन जामनिक यांनी अधोरेखित केले आहे. स्टेट अँड मायनॉरिटीस या ग्रंथामध्ये सुद्धा बाबासाहेबांनी सांगितले आहे की शेतीचे संघटन असे असावे की जिथे कोणीही जमीनदार नसावा आणि कोणीही भूमिहीन नसावा, सामूहिक शेती चे पुरस्कर्ते बाबासाहेब होते, राज्यांनी गरीब शेतकऱ्यांना संसाधन उपलब्ध करून देत उत्पादन घ्यावे असे त्यांचे मत होते,सीलिंग कायदा हा याच सूत्राचा आधार घेऊन बनवला गेला होता, जेणेकरून भूमीहीन शेतमजुरांना जमिनीचा हक्क मिळेल.

"सीलिंग कायदा रद्द केल्यास जमिनी पुन्हा काही मोजक्या धनदांडग्यांच्या हातात जातील, ज्यामुळे ग्रामीण भागात पुन्हा एकदा सरंजामशाही आणि जमीनदारी डोके वर काढेल," असा इशारा जामनिक यांनी दिला आहे. त्यांनी महसूल व वन विभागाच्या प्रधान सचिव तुकाराम मुंडे यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, यांत्रिकीकरण





आणि आधुनिकतेच्या नावाखाली गरिबांना त्यांच्या जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवणे हा उत्पादकतेच्या नावाखाली होणारा गुन्हा आहे. "आधुनिक शेती आणि यांत्रिकीकरणाच्या नावाखाली हा कायदा रद्द करण्याचा जो तर्क दिला जात आहे, तो अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी घातक आहे," असे नितीन जामनिक यांनी म्हटले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ज्याला शेती करता येत नाही त्याच्याकडे जमीन असणे हा उत्पादकतेचा गुन्हा आहे. यंत्रांच्या नावाखाली गरिबांची जमीन हिरावून घेणे हे आंबेडकरी तत्त्वांच्या विरोधात आहे. (पान ५ वर...)



लघुकथा
प्रा. मोहन काळे
मो. ७०३८२७६५५८

# ओझं

राहूलला काय करावं हे सुचेना. तो खूप मानसिक तणावात होता. हे मागील एक दोन महिन्यांपासून सुरू होतं. त्यानं स्थिती समजून घेण्याचा व त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला होता पण त्याला यश येत नव्हतं. एका गूढ अनामिक भीतीनं त्याला ग्रासलं होतं. बाजूच्या होस्टेलमध्ये मागील सहा महिन्यांपासून आतापर्यंत दोन अकल्पित घटना घडल्या होत्या आणि आपल्या होस्टेलमध्ये त्या घटनांची पुनरावृत्ती होते की काय अशी भयंकर शंका त्याच्या मनात येत होती. त्यामुळे त्याचं लक्ष अभ्यासातून उडालं होतं. रूममध्ये तो एकटा असताना तो कावराबावरा होऊन कधी खिडकीकडे पाहायचा तर कधी करकर आवाज करत गरगर फिरणाऱ्या पंख्याकडे पाहायचा. मागील सहा महिन्यांपासूनच्या घटनांची रील त्याच्या डोळ्यांसमोर यायची व त्याच्या अंगावर काटे उभे राहायचे.

"अरे राहूल, आजकाल तू खूपच डिस्टर्ब दिसतो. तू क्लासमध्ये टॉपर असूनही तुला या चाचणीत खूपच कमी गुण मिळाले. काही समस्या आहे का? की घरचं काही टेन्शन आहे? तुला याआधी इतक्या तणावात कधी पाहिले नाही मी." राहूलचा मित्र अनिकेत म्हणाला. त्याला सदैव आनंदी व उत्साही राहणाऱ्या राहूलच्या वर्तनातील बदल अलीकडे जाणवू लागला होता.

"काही नाही. सर्व ठीक आहे." असं राहूलनं म्हटलं तर खरं पण त्याच्या चेहऱ्यावरचे खोटे हसू मात्र अनिकेतच्या नजरेतून काही सुटले नाही. त्यानं राहूलच्या दोन्ही खांद्यांवर दोन्ही हात ठेवत म्हटलं, "राहूल, मी तुझा पाचवीपासूनचा मित्र आहे. मी तुला चांगलं ओळखतो. काहीतरी गंभीर कारण असल्याशिवाय तू तणाव घेणारा नाहीस. मला खरं खरं सांग की नेमकं कसं कोणतं संकट आलेलं आहे की तुझं अभ्यासातील लक्ष उडालेलं आहे. सरांनी तुझ्या चाचणीतील खाली जाणाऱ्या प्रगतीबद्दल तुला रागावल्याचं मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं आहे. सर्व विद्यार्थ्यांसमोर त्यांनी तुला झापलं म्हणून तुला तो अपमान वाटला आहे का आणि म्हणून तू डिस्टर्ब दिसत आहेस का?" अनिकेतनं पिच्छाच पुरवला. त्याला राहूलची काळजी वाटायला लागली.

"अनिकेत, तू विचारलंच म्हणून सांगतो, की माझी वैयक्तिक काहीच समस्या नाही. पण मी एका गोष्टीमुळे भयंकर घाबरलेलो आहे. तुला सचिन माहीत आहे ना? माझा रूममेट. तो अलीकडे रात्र रात्रभर झोपत नाही. तास न् तास शून्यात पाहत राहतो. त्यानं माझ्याशी बोलणंही कमी केलेलं आहे. मी बोललो तरच तो बोलतो अन् तेही हो किंवा नाही एवढंच. त्याच्या आईबाबांनी त्याला जबरदस्तीनं कोटाला पाठवलं आहे असं तो म्हणतो. त्याला या अभ्यासाचं वेळापत्रक झेपत नाही व जे वाचलं ते काहीच लक्षात राहत नाही असं तो सांगतो. पूर्ण डिप्रेशनमध्ये गेलेला आहे तो. तो अशा नजरेनं पाहतो की भीतीनं माझीच गाळण उडते. तसा तो अभ्यासात बऱ्यापैकी आहे पण त्याला इथं राहावंसं वाटत नाही. पळून जावंसं वाटते. पण त्याच्या बाबांच्या धाकामुळे तो इथं राहत आहे. पण फक्त शरीरानं तो हजर असतो पण त्याचं मन मात्र दूर दूर कुठेतरी फिरत असते. मला अलीकडे ही भीती वाटायला लागली आहे की त्यानं त्या रोशन व वैभव सारखं ना कराव. रोशननं सहा महिन्यांआधी होस्टेलच्या तिसऱ्या मजल्यावरील त्याच्या रूममधील खिडकीतून उडी मारून आत्महत्या केली होती तर वैभवनं होस्टेलच्या रूममध्ये पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली होती. त्या दोघांचे चेहरे माझ्या डोळ्यांसमोर येतात. त्यात माझ्या रूममध्ये सोबतीला सचिनचं असं वागणं. कधी कधी माझ्या मनात असा विचार येतो की सचिनच्या मनातही आत्महत्येचे विचार येत आहेत. अलीकडे मला तर स्वप्नंही तशीच पडायला लागली आहेत. मी तर कधी कधी झोपेतून खाडकन् जागी होतो व थरथर कापायला लागतो. मी पुरा धास्तावलो आहे. रात्री झोपताना पंख्याकडे पाहतो तेव्हा त्या पंख्याला सचिन लटकल्याचा भास मला होतो. खिडकीकडे पाहतो तेव्हा सचिन खिडकीतून उडी मारत असल्याचा भास मला होतो व मला दरदरून घाम फुटतो. आईबाबाला हे सांगू तर त्यांनाही टेंशन येईल म्हणून सांगायची हिंमत होत नाही. सरांना हे सांगावंसं वाटते पण सर मलाच मूर्खात काढतील असं वाटते. सचिनच्या आईवडिलांना सांगावं तर ते सचिनलाच बोलतील या विचारांनी मी स्वतःला त्यांना सांगण्यापासून आवरत आहे. काय करावं हे काहीच सुचून नाही राहिलं. तूच सांग यावर काही उपाय आहे का?" राहूलनं जे सांगितलं ते ऐकून अनिकेतलाही भीती वाटली. पण तो काही क्षणांसाठी विचारांत पडला. तो डोळे लावून या समस्येवर उपाय शोधत बसला.




"उपाय सापडला!" तीन चार मिनिटांतच मान हलवत व डोळे उघडत तो बोलला. "सांग, काय सोल्यूशन शोधलं तू?" राहूलच्या चेहऱ्यावर अचानक आशा दिसायला लागली. "माझे बाबा मला भेटायला आलेले आहेत. त्यांच्या कानावर मी ही बाब टाकतो. ते यातून निश्चितच काहीतरी मार्ग काढतील. ते मानसोपचारतज्ज्ञ आहेत. बरं झालं तुझ्याशी मी या विषयावर बोललो. चल माझ्या रूमवर. बाबांना हे सांगू." ते दोघंही अनिकेतच्या रूमवर गेले. अनिकेतच्या बाबांनी सर्व बाब खूप काळजीपूर्वक व लक्ष देऊन ऐकली. ते म्हणाले, " एकंदरीत माझ्या लक्षात सर्व गोष्टींचे चित्र स्पष्ट झालेलं आहे. अशा अनेक केसेस मी हाताळलेल्या आहेत. आज सायंकाळी तुम्ही क्लासमधून आल्यानंतर आपण सर्व राहूलच्या रूमवर जाऊ. मी सचिनशी बोलतो अन् त्यानंतर निष्कर्षाप्रत पोहचून त्यावर तोडगा सुचवतो. आता तुम्ही जा क्लासला. सायंकाळी भेटू." त्यांच्या बोलण्याने राहूलच्या मनावरील ताण बराच हलका झाल्याचं त्याच्या चेहऱ्यावरून दिसून येत होतं. सायंकाळी अनिकेतचे बाबा अनिकेतला घेऊन राहूलच्या रूमवर आले. तिथं ते बराच वेळ सचिनशी बोलत होते. सचिनच्या मनातील नकारात्मकता काढून सकारात्मकता निर्माण करण्याचा त्यांनी बराच प्रयत्न केला. त्यात वाईट काहीच नाही. परंतु पालकांनी त्यांच्या इच्छा आकांक्षा मात्र मुलांवर लादू नये. मुलांच्याही इच्छा आकांक्षा समजून घेऊन त्याप्रमाणे त्याला त्यांना त्यांच्या जीवनाचा मार्ग निवडू द्यावा. जे पालक ते जीवनात करू शकले नाहीत ते त्यांच्या मुलांनी करावं असा आग्रह धरणं तर्कसंगत नाही. मुलांच्या इच्छाही जर पालकांच्या अपेक्षेनुसार असल्या तर आनंदच आहे. पण मुलांनी अमुकच कोर्स करावा, अमुकच शाखा निवडावी, अमुकच बनावं असा दुराग्रह धरता कामा नये. मुलांचंही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते. त्यांची मतं वेगळी असतात, आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. पालकांना जे आवडेल ते मुलांनाही आवडेलच असं नाही. त्यांचा कल पाहून त्यांना त्यांचा जीवनमार्ग निवडण्यात मदत करावी, पण जबरदस्ती करू नये. प्रत्येक मुलामध्ये काही शक्ती तर काही मर्यादा असतात. त्यांची एक बौद्धिक, मानसिक कुवत असते.

त्याचा आपण आदर केला पाहिजे. जीवनाचं ध्येय आनंदी होणं असावं. विशिष्ट कोर्स करून पैसे कमावणाऱ्या गाडीचा बैल होणं नको. पालकांना सर्वांत महत्त्वाचे त्यांची मुलं व मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद महत्त्वाचा वाटला पाहिजे. बाकीची मुलं अमुक कोर्स करतात म्हणून आपल्याही मुलानं तोच कोर्स करावा असं आवश्यक नसते. तसा पालकांचा अट्टाहास नको. पालकांच्या अपेक्षांचं ओझं मुलांवर नको. नाहीतर कधी कधी ओझं व त्याचा ताण इतका वाटते, की मुलांना आपलं जीवन संपवून त्या ओझ्यातून मुक्ती मिळवावी असं वाटते. आणि हीच अवस्था सर्वांत जास्त धोकादायक असते. मुलांच्या मनातील तगमग, घालमेल जर मोठ्या प्रमाणात वाढली व त्याला त्यावेळी धीर देणारं, समजून घेणारं कुणी भेटलं नाही तर ते टोकाचं पाऊल उचलतात. पालक नंतर पश्चात्ताप करतात, रडतात. एकदा वाईट घटना घडून गेल्यावर पालक काहीच करू शकत नाही. त्यापेक्षा पालकांनी आपल्या मुलांना समजून घेतलं पाहिजे, त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. तो वाममार्गाला लागत असेल किंवा चुकीच्या सवयी किंवा संगती त्याला लागत असतील तर पालकांनी नक्कीच मुलांना मध्ये हस्तक्षेप करावा, त्यांना चांगलं काय, वाईट काय समजवावं पण करिअर निवडताना मात्र मुलांना त्यांचा कल, त्यांची आवड मात्र नक्कीच विचारली पाहिजे. नंतर रडल्यापेक्षा किंवा पश्चात्ताप केल्यापेक्षा वाईट गोष्ट घडूच नये हे पालकांच्या हातात असते. मुलांना आवडीचे क्षेत्र निवडू दिले तर त्यात ते उत्कृष्ट व दैदिप्यमान यश मिळवू शकतात. फक्त अमुक एकाच क्षेत्रात यश मिळवले म्हणजे आपण यशस्वी झालो असं नसते. सचिन तेंडुलकरने पुस्तकं न निवडता क्रिकेटचा अभ्यास केला, अमिताभनं अभिनय निवडला, विश्वास नांगरे पाटील यांनी विज्ञान शाखा न निवडता कला शाखा निवडली तरी ते त्यांच्या क्षेत्रात अत्युच्च शिखरावर आहेतच ना! अशी लाखो उदाहरणे आहेत. सगळेच इंजिनिअर होत नाहीत तसे सगळेच डॉक्टर होत नाहीत. काही सी ए होतात तर काही अधिकारी तर काही शैक्षणिक क्षेत्र, पत्रकारितेच्या क्षेत्रात यश मिळवतात. आज असंख्य क्षेत्रांत करिअरच्या संधी आहेत. अलीकडचेच उदाहरण पहा. एक पंधरा वर्षांचा वैभव सूर्यवंशी क्रिकेट क्षेत्रात धुमाकूळ घालत आहे. तुमचा सचिन तुमचे भविष्य आहे. त्याच्या आनंदात तुमचा आनंद असला पाहिजे. त्याला घरी न्या. एखादा महिना तुमच्या सहवासात राहू द्या. च्याच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारा. तुम्हांला निश्चितच सचिनची व तुमच्या जीवनाची दिशा सापडेल व त्यांत तुमचं सर्व कुटुंब निश्चितच आनंदी राहाल अशी मला खात्री आहे. ..." डॉक्टर जाधव इकडे बोलत असताना त्यांना सचिनच्या आईवडिलांच्या मनावरचं ओझं उतरून त्यांच्या चेहऱ्यावर नवीन साक्षात्काराचे भाव असतील याचा अंदाज अनिकेत व राहूलला येत होता.

# ओमान... ते मस्कत...



पर्यटन
स्वाती कर्वे
मो. ९४२०७२३३५४

भाग-३

तिकडे गेल्या गेल्या लेफ्टहँड ड्राइव्ह शिकायला सुनीलने सुरुवात केली होती; पण तिथे एल् बोर्ड लावून गाडी चालवण्याची प्रथा मात्र नाही.

मला मित्सुबिशी लॅन्सर गाडी मनापासून आवडली. पण त्याला स्वतःला ती फार वापरता आली नाही; कारण सामान ठेवण्याच्या दृष्टीने ती अगदी गैरसोयीची होती.

आपला द्रुतगती मार्ग तोवर सुरू झाला नव्हता... त्यामुळे रस्त्यांचं कौतुक ! मोठमोठे चार पदरी रस्ते. सरळसोट, सुंदर, सपाट, खड्ड्यांची भानगड नाही. रस्त्यांना चढउतार मात्र भरपूर आहेत. पुढच्या प्रवासात ते तुमच्या लक्षात येतीलच.

विमानतळापासून पन्नास किमीवर हॉटेल. तिथून जवळच ऑफिस. चालण्यापेक्षा थोडी दूर वाटेल अशी मेस; एरवी सुनील तिथेच रहायचा. मी आल्यावर त्याचं सगळंच वेळापत्रक बदललं.

हॉटेलजवळच्या रेस्टॉरंटमध्ये आम्ही डोसाबिसा खाल्ला. सुनील ऑफिसमध्ये. मी अंघोळ करून झोप काढली. मग फोनसाठी कार्ड कुठे मिळतंय का, ते बघायला बाहेर पडले. त्याच इमारतीत चारी बाजूंनी फिरलं की बरीच छोटी-छोटी दुकानं होती. भारतातलं कार्ड काढून माझ्या छोट्या फोनमध्ये मी नवीन घालून घेतलं. नंतर एकदा फोन करायला म्हणून बाहेर पडले तर शेजारच्या अर् सलाम रेस्टॉरंटमधला ओळखू लागलेला वेटर बाहेर येत होता. मी येऊ का बरोबर ! असं त्यानं विचारलं. हा येऊन काय करणार? हा मला पडलेला प्रश्न. मी नको म्हटलं.

मेसवरून रोज डबा आणून देण्याची जबाबदारी एकदोघांनी घेतली होती. उरलंसुरलं ठेवायला छोटासा फ्रीज होता. त्या संध्याकाळी सुनील मला घेऊन कौतुकाने टॅक्सी करून त्याच्या रोलर कोस्टरसारख्या रस्त्यावरून पोहण्याच्या बीचवर घेऊन गेला. या पोहण्याची पण एक मजा होती. ऑफिसच्या कामाव्यतिरिक्त फिरायला सुनीलकडे गाडी नव्हती. पोहायला येत नव्हतं असे काही जण त्यासाठी उत्सुक होते. मग असं ठरलं की त्यांनी गाडीतून सुनीलला बरोबर न्यायचं आणि सुनीलनी त्यांना पोहायला शिकवायचं. रोज समुद्रावर जायचं आणि रोज पोहायचं... दोन्ही सुनीलच्या आवडीच्या गोष्टी !

संध्याकाळी काय करायचं, हा आणि व्यायामाचा... दोन्ही प्रश्न निकालात निघाले. मेसमध्ये टेबलटेनिसची सोय होती. मात्र राहत्या खोलीच्या मागच्या बाजूच्या लहानशा खिडकीतून दिसणारे उघडेबोडके डोंगर त्याच्या डोळ्यांना फार खुपायचे. खासगी वाटावा असा अरुंद तोंडाचा, जेमतेम तीसचाळीस पावलांचा बीच. आत लांबपर्यंत पसरलेलं पाणी, दूरवर कुणी सर्फिंग करताना दिसत होतं. अंधार पडता पडता आम्ही परत आलो. रस्ता सुंदर बांधून काढलेला; पण पोटात गोळा येईल इतका वरखाली ! रस्ते आणि त्याच्या बाजूच्या सजावटी याची तर मला गंमतच वाटत होती. परत आलो, बील देताना लक्षात आलं ही टॅक्सीची चैन आपल्याला बिलकूल परवडण्यासारखी नाही. मग रोज संध्याकाळी चालत फिरायला जायचं, येताना एका खाणावळीतून लागेल तेवढीच पोळीभाजी घेऊन यायचं, लागेल तसं दूध आणायचं... असं रुटीन ठरवून टाकलं. सुरुवातीला हॉटेलमध्ये आम्हाला किचन असलेली रूम मिळाली होती. पण भांडी नव्हती. मग आम्ही ती रुम बदलून घेतली. थोडे पैसे वाचले. इलेक्ट्रिक किटली आणली आणि चहा-कॉफी तेवढी करू लागलो.

फिरायला गेलं की रस्त्याच्या बाजूने लावलेली - जोपासलेली झाडं, मुद्दाम राखलेली हिरवळ दृष्टीस पडू लागली. त्यावर घेतलेली मेहनत जाणवू लागली. तिथल्या कोरड्या हवेत, पन्नास डिग्रीच्या उन्हाळ्यात झाडं पुरती वाळून जातात. सप्टेंबर संपत आला, उन्हाळा कमी झाला की बाहेरून मोठी रोपं मागवून रस्त्याच्या सुशोभिकरणाची कामं सुरू होतात. त्यासाठी मैलोन् मैल ठिबकसिंचनाची सोय केलेली असते. मुळात तेल असणारा म्हणून श्रीमंत देश... निदान त्या वेळपर्यंत पाणी महाग आणि पेट्रोल स्वस्त अशी वस्तुस्थिती ! रस्त्याला आलिशान गाड्या दिसायच्या. पण तो सगळाच काळ बदलाचा होता. हे तेल आता फार वर्ष पुरेल असं नाही, याची चाहूल त्यांनाही लागलीच होती! हळूहळू पर्यटनाचा व्यवसाय वाढू लागला. त्या वेळी फार नव्हतं; पण आता त्यांच्याकडूनही त्याला खतपाणी मिळू लागलंय. चालण्याच्या अंतरावर आम्हाला जाण्यासाठी लुलू हे छोटं मॉल होतं, जिथे भांड्यांपासून सगळ्या गृहोपयोगी वस्तू मिळत. मोठं भाजी मार्केट, कोरडी ठक्क वादी कबीर - म्हणजे मोठ्ठी नदी, जवळचा मोठा राऊंडअबाउट, जॉगिंग ट्रॅक... अशी ठिकाणं एकएक दिवस पाहात आम्ही तिथेच आजूबाजूला फिरत असू. लुलूतून माझ्यासाठी इस्त्री, आमच्यासाठी इलेक्ट्रिक किटली, भाजी-मार्केटमधून फळं... अशी किरकोळ खरेदी करत असू. या भाजीमार्केटमध्ये जाण्याचीसुद्धा एक मज्जाच होती. आमच्या बाजूचा जॉगिंग ट्रॅक, मग त्यानंतरचा रस्ता क्रॉस करायचा; त्यानंतर दगडगोट्यांनी पिचिंग केलेला भरपूर उतार असलेला बांधीव काठ उतरायचा मग प्रत्यक्ष नदी ओलांडायची. पाणी नसेल तर उत्तम. पण थोडा जरी पाऊस पडला आणि पाऊलभर पाणी साठलं तर त्या पाण्याला प्रचंड ओढ असते. त्यात एकदा लहान मुलांनी पाय ठेवला, ती ओढली जाऊन वाहून जायला लागली म्हणून आधी आई, मग वडील त्यांना धरायला गेले... कुठपर्यंत वहात गेले कुणास ठाऊक पाण्याला इतकी प्रचंड ओढ! **(क्रमशः)**

# महाराष्ट्रातील बहुजनांच्या जमिनी वाचवण्यासाठी एल्गार!

(पान ४ वरुन...)

म्हणूनच समस्येचे मूळ आकारात नाही, तर संसाधनांत आहे.

बाबासाहेब त्यांच्या १९१८ च्या स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया अँड देअर रेमेडिस या शोध प्रबंधाच्या लेखात स्पष्ट सांगतात की, जमिनीचा तुकडा लहान असणे हा शेतीचा मुख्य दोष नाही, तर त्या तुकड्याला लागणारे भांडवल, अवजारे आणि पाण्याचा अभाव हा खरा दोष आहे. त्यामुळे सीलिंग कायदा रद्द करून जमीन मोठी केल्याने प्रश्न सुटणार नाही, तर लहान शेतकऱ्यांना पुरेसे भांडवल आणि आधुनिक तंत्रज्ञान सरकारने उपलब्ध करून देणे हा खरा उपाय आहे. आताच्या राजकारण्यांचा मग त्यात सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षांच्या लोकांचा तर्क आहे की मोठी जमीन म्हणजे फायदेशीर शेती. पण बाबासाहेबांनी हा तर्क खोडून काढला आहे. त्यांच्या मते, शेतीचा आकार कितीही मोठा असला तरी जर उत्पादन खर्च जास्त असेल, तर ती शेती तोट्याचीच राहते. त्यामुळे सीलिंग रद्द करून पुन्हा लँडलॉर्ड (जमीनदार) तयार केल्याने उत्पादकता वाढणार नाही. उलट, लहान जमिनींवरही सघन शेती करून ती फायदेशीर करता येते, हे बाबासाहेबांनी सिद्ध केले आहे.

बाबासाहेबांनी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा मांडला होता की, शेतीवर गरजेपेक्षा जास्त लोक अवलंबून आहेत. सीलिंग रद्द करून कॉर्पोरेटला जमिनी देण्यापेक्षा, सरकारने ग्रामीण भागात शेतीपूरक उद्योग सुरू करावेत. जेणेकरून शेतीवरील भार कमी होईल आणि उरलेल्या लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. सामाजिक उद्रेकाचा इशाराः अनुसूचित जाती, जमाती, इतर बहुजन समाज आणि भूमिहीन शेतमजुरांच्या अस्मितेचा आणि अस्तित्वाचा हा प्रश्न आहे. जर राजकीय दबावापोटी हा कायदा शिथिल किंवा रद्द केला, तर मोठा सामाजिक उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. महसूल सचिव तुकाराम मुंडे, विकास खरगे आणि इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन हा कायदा टिकवून ठेवावा, अशी आग्रही मागणी नितीन जामनिक यांनीईमेल द्वारे पत्र लिहून शासनाकडे केली आहे.

**» ''सीलिंग कायदा हा केवळ जमिनीचा कायदा नसून तो गरिबांच्या सन्मानाचा आधार आहे. तो रद्द करणे म्हणजे पुन्हा एकदा जमीनदारी आणि सरंजामशाही आणण्यासारखे आहे. आम्ही बाबासाहेबांच्या विचारांचा आणि संविधान सभेमध्ये जी दुखःद खंत डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त करून दाखवली होती त्या घटनेचा राजकारणी लोकांना विसर पडल्याने ते आज डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अपमान याठिकाणी करत आहेत, असे आम्ही कदापी सहन करणार नाही.''- नितीन साहेबराव जामनिक (विधी विद्यार्थी )**

# मनस्पर्शी दृश्यानुभव! विरेंद्र चोपडे यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन



दखल
आशिष यावले
नागपूर, मो. ९९२२२९००२२

(कलारंग)

मानवी मन हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे. त्यामध्ये विचार, भावना, आठवणी, निर्णयक्षमता आणि कल्पनाशक्ती यांचे एकत्रिकरण झालेले असते. मनात दडलेल्या इच्छा, आकांक्षा आणि भिती या सर्वांचा मानवी वर्तनावर सुक्ष्म परिणाम होत असतो. बाह्य परिस्थिती, समाज आणि तंत्रज्ञानाचा देखील मनावर प्रभाव पडत असतो. आनंद, दुःख आणि राग यांसारख्या भावना मन सतत अनुभवत असते; परिणामी मन माणसाला कधी शक्तिशाली बनवते, तर कधी कमकुवतही करते. मनाला समजून घेताना स्वतः ला ओळखणे आणि त्या संवेदनांना कलाकृतीतून अभिव्यक्त करणे, हे कौशल्य सर्वसामान्यांपेक्षा चित्रकारांमध्ये अधिक प्रमाणात आढळते. चित्रकार आपल्या मनातील भाव-भावनांना रंग, रेषा आणि विविध आकारांच्या माध्यमातून व्यक्त करीत असतो. अंतर्विचारांतून साकारलेल्या त्या कलाकृती केवळ दृश्यानुभव देत नाहीत, तर मानवी भावनांचा गाभा स्पर्शून चित्र बघणाऱ्यांशी एकरुप होतात. संवाद् लागतात. भक्ती, प्रेम, राग, लोभ, दुःख, वेदना, रितेपणा, विरह, वियोग, आशा, अपेक्षा आणि आकांक्षा अशा अवस्थांना निसर्गातील आकारांच्या साहाय्याने चित्रित करण्याची अद्वितीय क्षमता विरेंद्र चोपडे या सर्जनशील चित्रकारामध्ये आहे. चोपडे यांच्या कलाकृती पुण्यातील मोनालिसा कलाग्राममध्ये भरविण्यात आलेल्या अफोर्डेबल आर्ट एक्झिबिशनमध्ये प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. हे प्रदर्शन दि.१२ एप्रिलपर्यंत असून, सकाळी ११ ते सायंकाळी ७ यावेळेत कला रसिकांना बघता येणार आहे.


फ्लॉवर सेलर- दैनंदिन जीवनातील साध्या प्रसंगांमध्येही एक अंतर्मुख, आध्यात्मिक आणि भावनिक क्षण दडलेला असतो. नेमका तोच क्षण चित्रकाराने पकडून मानवी जीवनातील सहजता, श्रद्धा आणि वास्तव यांच्यातील संबंध उलगडून दाखविण्याचा प्रयत्न फ्लावर सेलर या चित्रातून केला आहे. चित्रात फुले विकणारी स्त्री साकारतांना, खडबड पोतमय चाफ्याच्या पानाला देवाचे रुप दिले आहे. तिची सर्व फुले विकली जावीत, याकरिता ती अवकाशातील देवरुपी पानाकडे बघून प्रार्थना करीत आहे. परंतू तिचा व्यवसाय फुले विकण्याचा असल्यामुळे तिची प्रार्थना उपजीविकेशी जोडलेली आहे. चित्रात आवश्यक घटकांची रचना करतांना खाली प्रतीकात्मक मानवाकृती आणि वर निसर्गरुपी देव असे अर्थपूर्ण संयोजन केले आहे. त्यामुळे सृष्टी आणि सृष्टीनिर्माता यांच्या नात्यातील भिन्नता अधिक स्पष्ट झाली आहे. एकूणच माणसाला श्रद्धेचा आधार घेऊन जगण्यासाठी करावी लागणारी धडपड आणि त्याचे निसर्गाशी असलेले नाते कलाकृतीतून अधोरेखित झाले आहे.



फ्लॉवर सेलर



प्रेयर




स्टे अवे फ्रॉम फ्लॉवर

प्रेयर- चित्रकाराने प्रेयर या कलाकृतीत स्वतःचे प्रतीकात्मक चित्रण केले आहे. चित्रकाराच्या मनातील इच्छा पुर्ण व्हाव्या, याकरिता मानवाकृती देवाकडे प्रार्थना करतांना दाखविली आहे.

स्टे अवे फ्रॉम फ्लॉवर- वाढते शहरीकरण, जंगलतोड, औद्योगिकीकरण, प्रदूषण, संसाधनांचा अतिरेकी वापर आणि हवामानातील बदल यामुळे निसर्गाचा समतोल धोक्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. या आशयाचा संदेश देणारी स्टे अवे फ्रॉम फ्लॉवर ही कलाकृती अतिशय बोलकी आहे. चित्रात मध्यवर्ती रचना केलेल्या मानवाकृतीसाठी चाफ्याचे पान केवळ निसर्गाचा भाग नाही, तर आसरा, सानिध्य आणि शांततेचे प्रतीक म्हणून पुढे आले आहेत. चित्राच्या डाव्या भागात निसर्गावर आक्रमण करणारी मानवनिर्मित शक्ती ही बाणाच्या रुपात चित्रित केली असून, या बाणांपासून निसर्गातील घटकांना वाचविण्यासाठी मानवाकृतीने पानाला घट्ट कवटाळले आहे. अर्थातच ''फुलांपासून दूर राहा'' हा संदेश कलाकृतीतून देत असतांना, रक्षणकर्त्यांच्या दृढ उपस्थितीपुढे वाकलेल्या बाणाच्या टोकांतील मंदावलेली तीक्ष्णता लक्ष वेधून घेते. यातून निसर्गरक्षणाच्या शक्तीसमोर विध्वंसक शक्ती देखील नम्र होऊ शकतात; हे कलाकृतीच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यात चोपडे यशस्वी झाले आहेत. मानवाकृती, पान आणि फुल यांनी चित्रातील उजव्या बाजूचा एक तृतीयांश भाग व्यापलेला आहे, तर डाव्या भागातील बाणांनी अत्यल्प जागा घेतल्यामुळे चित्रात संतूलन राखता आले. रक्षण आणि शौर्य हा कलाकृतीचा गाभा आहे, त्यासाठी चित्रात लाल आणि तपकीरी या उष्ण रंगछटांचा प्रभावी वापर केला आहे.

अनटायटल्ड- मानवी अस्तित्व, अंतर्मनाचा शोध आणि मानवाचे निसर्गाशी असलेले नाते या जीवनानुभूतींना अनटायटल्ड या चित्रातून उलगडून दाखविले आहे. पार्श्वभूमीतील मंद चंद्रप्रकाश आणि टिमटिमणाऱ्या तारांच्या शांत वातावरणात चाफ्याच्या पानावर विसावलेली मानवाकृती फुलाशी संवाद साधतांना दिसत आहे. चित्राची रचना करतांना खालच्या भागातील मानवाकृती आणि वरच्या भागातील चंद्र आणि ताऱ्यांमुळे विरोधाभास निर्माण झाला आहे. शांतता, अंतर्मुखता आणि आध्यात्मिक गुढता व्यक्त करण्यासाठी निळ्या रंगछटा, तर नव्या जीवनाची सुरुवात आणि नैसर्गिक उर्जेसाठी हिरव्या रंगछटांचा वापर केला आहे. सपाट रंगलेपनामुळे पानावरील सुक्ष्म पोत आणि आकाशातील चांदणे एकमेकांना पुरक वाटतात. एकूणच माणसाच्या भावविश्वातील गुंतागुंत आणि आत्मपरिक्षणाची प्रक्रीया कलाकृतीमधून प्रकर्षाने जाणवते. ही कलाकृती केवळ दृष्यानुभव देत नाही, तर निसर्गाशी एकरुप होण्यासाठी मानवी अस्तित्व आणि अंतर्मनाचा शोध घेऊन शांततेकडे वाटचाल करण्याचा मौलिक संदेश देखील देते. चोपडे हे मुळात संवेदनशील चित्रकार आहेत. त्यांची ही संवेदनशीलता त्यांच्या कृतिशील जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग बनली आहे; आणि म्हणूनच त्या अंतःप्रेरणेतून जीवनाच्या सर्वांगाला अलगद स्पर्श करणाऱ्या सुंदर कलाकृती सातत्याने जन्माला येतात.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 363



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
कर
कावा
कोप
गज
घर
जय
टाच
डग्गा
तट
तपि
तव
ताग
तात
तीर
दशा
पूरी
बक
रज
रवि
रीता
लस
लक्ष्मी
वाद
वाल
शेज
हात
हाल

**तीन अक्षरी**
अनाथ
अभंग
कपट
काजवा
कोळसा
खरीप
चपळ
जमाव
जवान
टवाळ
ठिगळ
तहान
तासणी
तासणे
ददात
नमक
पिटणे
पिठिका
बखर
मथळा
मलिदा
मानव
रकाना
रसना
रहीत
लानत
वनज
सखल
साबीत

**चार अक्षरी**
एकवार
कटमिती
कवतीक
कारावास
गणगोत
जतावणी
तक्तपोस
नभोवाणी
पटवारी
भालदार
भेदभाव
भेदरणे
रक्तपिती
रखडणे
रसभंग
रासलिला

**पाच अक्षरी**
वजिरात
वरदान
वाघनख
वाचस्पती
वावटळ
विप्रलंब
शिरकाण
शेरवानी
सभोवार
समजूत
सरबत
सोयरीक
गजगामिनी
गोळाबेरीज
चरमरीत
जवाबदारी
परावलंबी
पोटकरपी
बेबंदशाही
रजतवणी
लक्ष्मीपूजन
वादविवाद

**अन्य अक्षरी**
प्रसार विभाग
लालबहादुर शास्त्री


(उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 744



**—: आडवी विधाने:—**

1) भारतीय क्रिकेट संघातील 'सनी' नावाने प्रसिद्ध असलेला एक भूतपूर्व कर्णधार
5) भारतातील सर्वोच्च मीनार
10) सर्व, संपूर्ण
11) डोक्यावरील केस काढणे
12) विपरीत ज्ञान, भास
13) पावसाची आतुरतेने वाट बघणारा पक्षी
15) अंधारात प्रकाशणारी एक मौल्यवान औषधी गुणधर्म असलेली धातू
17) आवश्यकता
19) खाष्ट स्त्री चे विशेषण
21) तिरपा पाहणारा
22) योगासनात बसण्याची एक पद्धत
24) एकामागुन एक येणारी संख्या
26) शिकार
28) गुरूत्व, तोल
30) कागदी रूपया
31) स्वतःचे, ताब्यात असलेले
32) गवताची काडी
35) गुर्मी, ताठा
36) मोक्ष प्राप्तीचे साधन
38) लपाछपीचा खेळ
40) उंच, भव्य
41) स्वार्थ, आशय
43) यादवांमधील आपसी भांडण
44) अभिनेत्री
45) अंड्याच्या आतील पिवळा भाग
46) माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्रीजींच्या समाधीचे ठिकाण
48) नम्रतेने वाकलेला, झुकलेला झुकविणे
49) सफलता
51) जंगलाचा राजा
53) राष्ट्रभाषेतील प्रश्न
54) पोळी भाजण्याचे पात्र
56) आनंद
57) मनातील इच्छा दाबून ठेवणे
59) एक मिश्र धातू
60) वृत्तपत्र कचेरीतील एक अधिकार पद
62) फळाच्या आतील भाग
63) तुझे
64) ऐवज, द्रव्यसंख्या
67) कुत्रा
68) रक्षणकर्ता
69) पूर्णतः दुसऱ्यावर अवलंबून असलेला
72) जलाशय
73) चिर निद्रा
74) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी

**—: उभी विधाने:—**

1) श्रीविष्णुजवळ असलेले चक्र
2) रामायणात सीतेच्या रक्षणाकरीता लक्ष्मणाने आखून दिलेली रेषा
3) पाऊस, पर्जन्य
4) रुढी,, पद्धती (उर्दू)
5) कुठल्याही मंगलकार्यारंभी करण्यात येणारा कुलदेवतेच्या पूजेचा विधी
6) जल आणि जमीन या दोन्ही ठिकाणी विहार करणारा एक पक्षी
7) विनाकारण
8) सुटी
9) नातेवाईक
12) फुलांमधील रस ग्रहण करणारा भुंगा
14) तरतूद, व्यवस्था
16) एखादी गोष्ट वास्तविकतेपेक्षा जास्त फुगवून सांगणे
18) कुंतल
20) जमानत (हिं.)
23) मनातील हेतू पूर्ण होण्यासाठी देवाला काहीतरी अर्पण करण्याचा निश्चय
25) मनातील विचार
26) बाहेरील त्वचा, टरफल
27) न्यायालयात पक्षकाराची मांडण्यासाठी नेमलेली अधिकृत व्यक्ती
29) आयुर्वेद शास्त्रात लागणाऱ्या औषधोपयोगी मुळ्या, पाला इ. संचित द्रव्य
31) मार्ग दाखविणे
32) चीर, भेग
33) नवीन
34) गालातल्या गालात मंदपणे हसणे
35) मन मोहून टाकणारे, सुंदर
36) विपुल प्रमाणात मिळणारे
37) प्रेम, ममता
39) कमळ
42) ओठ (हिं)
44) नटणारा
46) ओसाड
47) घर्षण करणे
50) रात्रीच्या भोजनानंतर मंदगतीने थोडावेळ फिरणे
51) बारा महिन्यांचा कालावधी
52) सूर्योदयापासूनचे पहिले तीन तास
55) चर्चा, भांडण
58) दोरी
59) दिव्याच्या ज्योतीमुळे आजूबाजूला जमणारा काळा रंग
60) संतांनी सांगितलेले उद्‌बोधक वचन
61) हात
62) मनाचा संताप, पश्चाताप
65) दया, काळजी
66) भारताचा एक शेजारी देश
69) राजकीय पार्टी, बाजू
70) उंदराचे घर
71) तेज, कीर्ति, प्रकाश (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

# पालकमंत्री संजय राठोड यांची अशीही संवेदनशीलता

## अपघातग्रस्त दाम्पत्यास मदतीचा हात

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. ११ :** नेत्यांचा ताफा रस्त्याने कायम भरधाव जाणार हे गृहीत असते. मात्र संवेदना जपत प्रवास करणारे राजकीय नेते लाभले तर सर्वसामान्यांच्या सुख, दु:खात रात्री, अपरात्री ते धावून जातात. याचाच प्रत्यय शुक्रवारी रात्री यवतमाळ-अमरावती मार्गावर पालकमंत्री संजय राठोड यांच्या मदतीमुळे एका अपघातग्रस्त दाम्पत्यास आला.

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड हे शुक्रवारी रात्री नेर येथून आपल्या ताफ्याने यवतमाळकडे येत होते. सोनखास ते लासीना दरम्यान दुचाकीस्वार दाम्पत्यास अज्ञात




वाहनाने धडक दिली होती. हे दाम्पत्य रस्त्याच्या कडेने जखमी अवस्थेत विव्हळत पडून होते. त्याचवेळी पालकमंत्री संजय राठोड यांचा ताफा रस्त्यावरून जात होता. अपघाताचे हे दृश्य बघताच मंत्री संजय राठोड यांनी आपला ताफा थांबविला. त्यांनी तत्काळ त्यांच्या ताफ्यातील पोलीस वाहनातून या दाम्पत्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेण्याच्या सूचना केल्या. यवतमाळ येथे वैद्यकीय महाविद्यालयात आपल्या कार्यकर्त्यांना सूचना देवून डॉक्टरांशीही चर्चा केली. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांनी जखमींची आस्थेने विचारपूस केली. त्याच दरम्यान रूग्णवाहिका अपघातस्थळी पोहोचली. या जखमी व्यक्तींना तातडीने रूग्णवाहिकेतून यवतमाळकडे रवाना करण्यात आले. मंत्री संजय राठोड यांनी आपल्या ताफ्यातील पोलिसांचे सुरक्षा वाहन या रूग्णवाहिकेसोबत देवून जखमींवर उपचार होईपर्यंत दवाखान्यात थांबण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना केल्या. पालकमंत्री संजय राठोड यांच्या या संवेदनशील कृतीने दोन जखमी व्यक्तींना वेळीच उपचार मिळून त्यांना जीवदान मिळाले. यावेळी उपस्थित गावकरी आणि रस्त्याने जाणाऱ्या वाहनधारकांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्या कृतीबद्दल कौतुक करत धन्यवाद मानले.

# रेल्वेच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

## राजुरा तालुक्यातील चनाखा परिसरातील घटना

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**कोरपना, दि. ११ :** राजुरा तालुक्यातील विहिरगाव नाका परिसरात रेल्वेच्या धडकेत एका मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना (दि. ११ एप्रिल २०२६) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून वन्यजीव संरक्षणाबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. प्राप्त माहितीनुसार, सुमारे दीड वर्ष वयाच्या मादी बिबट्याचा मृतदेह दक्षिण मध्य रेल्वेच्या मार्गालगत आढळून आला. संबंधित परिसर हा राजुरा वनपरिक्षेत्रातील विहिरगाव उपक्षेत्र व चनाखा नियतक्षेत्रात येतो. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एन. पी. तेलंगे यांनी बिबट्याचे शवविच्छेदन केले असून अहवाल प्रतीक्षेत आहे. या भागातून जाणारा रेल्वेमार्ग हा वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गात येत असल्याने अशा घटना वारंवार घडत असल्याचे समोर आले आहे. यापूर्वीही राजुरा परिसरात रेल्वेच्या धडकेत वाघ व बिबट्यांचे मृत्यू झालेले आहेत, त्यामुळे वन्यजीवांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिक व मानवता विकास संस्थेने वारंवार केली आहे. वनविभागाकडून पुढील तपास सुरू असून, संबंधित रेल्वे प्रशासनाशी समन्वय साधून उपाययोजना करण्याबाबत चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. रेल्वे प्रशासनाचा तीव्र निषेध व्यक्त करीत वारंवार वन्यजीवांचा होणारा रेल्वे अपघातातील दुर्दैवी मृत्यू बघता आतातरी योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे मत बादल बेले महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यांनी व्यक्त केले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित आमदार देवराव भोंगळे, उप वनसंरक्षक योगेश वाघाये, विभागीय वन अधिकारी मंगेश गिरडकर, वन परिक्षेत्र अधिकारी गजानन इंगळे यांच्या समोर बादल बेले यांनी याच रेल्वे मार्गावर वारंवार वाघ, बिबट्या, हरिण व अन्य वन्यप्राणी अपघातात मृत्यूमुखी पडत असून यावर तात्काळ योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्या याबाबत चर्चा केली होती हे विशेष.

महत्त्वाचे

## आर्णीत जागतिक मेमन डे साजरा

**आर्णी :** ऑल इंडिया मेमन जमात फ डेरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी इकबाल ऑफिसर यांच्या नेतृत्वाखाली आर्णीत जागतिक मेमन डे साजरा करण्यात आला. कच्ची मेमन समाजातर्फे ग्रामीण रुग्णालय, शाळा आणि वृद्धाश्रमात विविध सामाजिक व सेवाभावी उपक्रम राबवून हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. मेमन डे निमित्त आर्णीतील मेमन समाजाने ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप केले, तर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. नागपुरे वृद्धाश्रमात वृद्ध नागरिकांना वैद्यकीय साहित्य आणि फळे देऊन सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमाप्रसंगी राष्ट्रीय सदस्य हाजी शफी खाकरा, हाजी युसूफ नागानी, यासिन धारिवाला आणि हाजी रऊफ डोसानी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जमात सचिव इम्रान फाजलानी, शमी देलानी, आर्णी मेमन जमात अध्यक्ष यासिन नागानी, फारुक धारिवाला, हाजी रफिक राजकोटीया आणि उपाध्यक्ष कादर इसानी यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग नोंदवला.

## बोरी खुर्दमध्ये स्वेच्छेने उतरवले भोंगे

**पुसद :** तालुक्यातील बोरी खुर्द येथे ११ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक सलोखा आणि कायद्याचे पालन करण्यासाठी सर्वधर्मीय ग्रामस्थांनी मंदिर, मशीद व बुद्ध विहारावरील विनापरवाना भोंगे स्वेच्छेने उतरवले. पुसद शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार शेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने हे पाऊल उचलून जिल्ह्यासमोर नवा आदर्श ठेवला आहे.

पोलीस प्रशासनाने कायद्याच्या नियमांची माहिती देऊन केलेल्या आवाहनाला बोरी खुर्द येथील नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या निर्णयानुसार गावातील जामा मशीद, अली मुर्तुजा मशीद, श्री संत दुधादारी महाराज मंदिर आणि धम्मभूमी बुद्ध विहार या धार्मिक स्थळांवरील भोंगे कोणत्याही वादाविना उतरवण्यात आले. या विधायक कामात जामा मज्जिदचे विश्वस्त शेख यासीन शेख रज्जाक, शेख सलीम शेख अकबर, अली मुर्तुजा मज्जिदचे जाबाज खा समशेर खा आणि शेख रहीम यांनी पुढाकार घेतला. तसेच मंदिर समितीचे अध्यक्ष सिताराम भाकरे, तंटामुक्त अध्यक्ष नारायण जारंडे, पोलीस पाटील कृष्ण पारत, बुद्ध विहाराचे शरद जाधव, अमोल खंदारे व विश्वनाथ मनवर यांनी मोलाची भूमिका बजावली. याप्रसंगी ठाणेदार शेवानंद वानखडे, गोपनीय अंमलदार अभिमन्यू चव्हाण आणि नितेश भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. पोलिसांनी सर्व ग्रामस्थ आणि विश्वस्तांचे आभार मानले. कायद्याचे पालन करून सामाजिक शांतता राखण्यासाठी बोरी खुर्दच्या नागरिकांनी दाखवलेले हे पाऊल कौतुकास्पद असल्याचे प्रशासनाने नमूद केले. पुसद शहरातील इतर धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांनीही याचप्रमाणे सहकार्य करून कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन पोलीस प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून, पुसद तालुक्यात या घटनेची सकारात्मक चर्चा होत आहे.

# कोळशीहेट्टी मार्गाच्या निकृष्ट कामावर ग्रामस्थांचा संताप; काम रोखले

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कोरपना, दि. ११ :** कोळशी ते हेट्टी या मार्गावरील सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट होत असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी काम तातडीने रोखले. रस्त्याच्या बांधकामात निकृष्ट साहित्याचा वापर केला जात असल्यामुळे भविष्यात रस्ता टिकणार नाही, अशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली. ग्रामस्थांच्या मते, रस्त्याचे काम सुरू असताना आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन होत नसून, योग्य देखरेखीचा अभाव जाणवत आहे. यामुळे नागरीकांच्या पैशाचा गैरव्यवहार होत असल्याचे नागरीक म्हणत आहे. काही ठिकाणी रस्त्याचे थर व्यवस्थित न टाकता घाईघाईने काम पूर्ण करण्याचा प्रयत्न होत



असल्याचेही त्यांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर संतप्त ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदाराविरोधात कारवाई करण्याची मागणी करत काम बंद पाडले.

तसेच, या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन कामाची तपासणी करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. ग्रामस्थांनी मात्र काम दर्जेदार पद्धतीनेच व्हावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# डेक्कन शुगरकडे ४० कोटींची थकबाकी

## पालकमंत्री संजय राठोड यांना शेतकऱ्यांचे साकडे; तातडीने देयके देण्याची मागणी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ११ :** तालुक्यातील डेक्कन शुगर कारखान्याने गाळप हंगाम २०२५-२६ मधील उसाचे सुमारे ४० कोटी रुपयांचे बिल अद्याप न दिल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. हक्काचे पैसे मिळवण्यासाठी ११ एप्रिल २०२६ रोजी त्रस्त शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हा सहसंपर्क प्रमुख चिंतामणी कदम यांच्या नेतृत्वाखाली यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन दिले.

उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने आपला ऊस डेक्कन शुगर, भैरवनाथ, शिऊर आणि सुभाष हदगाव या कारखान्यांना गाळपासाठी दिला होता. मात्र, डेक्कन शुगर कारखान्याने १ जानेवारीपासून शेतकऱ्यांच्या खात्यात एक रुपयाही



> शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी आणि प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना सोसायट्यांचे कर्ज वेळेत भरणे आवश्यक होते, परंतु कारखान्याने उसाचे पैसे न दिल्यामुळे मार्चअखेरपर्यंत हे व्यवहार पूर्ण करता आले नाहीत आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आर्थिक कोंडीत सापडलेल्या ऊस उत्पादकांना वाचवण्यासाठी कारखान्याने ४० कोटींची थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करणे आता अत्यंत गरजेचे झाले आहे.
>
> **- चिंतामणी कदम**
> (सहसंपर्क प्रमुख, शिवसेना यवतमाळ)

जमा केला नाही. सध्या ४० कोटी रुपयांची देयके थकल्यामुळे ग्रामीण अर्थचक्र पूर्णपणे कोलमडले आहे. शेतकऱ्यांसमोर घरची लग्नकार्ये, मुलांचे शिक्षण आणि आगामी खरीप हंगामासाठी शेतीची मशागत कशी करावी, असा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. याशिवाय बँक कर्ज, पतसंस्था आणि सोसायटीचे व्यवहारही थकीत बिलांमुळे ठप्प झाले आहेत. चिंतामणी कदम यांनी पालकमंत्र्यांचे लक्ष वेधताना सांगितले की, मार्च अखेर उलटूनही बिल न मिळाल्याने शेतकरी सोसायट्यांचे कर्ज भरू शकले नाहीत, ज्यामुळे त्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ऊस उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी आर्थिक संकटात सापडला असून, कारखानदारांच्या आडमुठ्या धोरणामुळे त्यांची फसवणूक होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून कारखान्याला देयके देण्याचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. जर लवकरच पैसे जमा झाले नाहीत, तर आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# प्रशासकीय यंत्रणा लोकांच्या दारी आल्यामुळे नागरिकांची कामे अधिक सुलभ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मारेगाव, दि. ११ :** तालुक्यातील बोटोनी येथे जळका मंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या सूचनेनुसार आणि उपविभागीय अधिकारी नितीनकुमार हिंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात सर्व शासकीय विभागांनी एकाच छताखाली शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांना विविध दाखले व योजनांचा लाभ दिला. तहसीलदार उत्तम निलावाड यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, प्रशासकीय यंत्रणा लोकांच्या दारी आल्यामुळे नागरिकांची कामे अधिक सुलभ झाली आहेत.

बोटोनी येथील या शिबिराचे उद्घाटन संजय देरकर यांच्या हस्ते झाले, तर अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी नितीनकुमार



हिंगोले होते. विचारपीठावर तहसीलदार उत्तम निलावाड, गटविकास अधिकारी भीमराव व्हनखंडे, सहाय्यक गटविकास अधिकारी हेमराज राठोड, तालुका आरोग्य अधिकारी मडावी, नायब तहसीलदार विजय मत्ते, दुय्यम निबंधक पाटील, महावितरणचे उपअभियंता शामसुंदर कुन्हा, मुख्याध्यापक बेले, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल देरकर आणि देवाभाऊ बोबडे उपस्थित होते.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तहसीलदार उत्तम निलावाड यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, प्रशासकीय यंत्रणा लोकांच्या दारी आल्यामुळे नागरिकांची कामे अधिक सुलभ झाली आहेत. या शिबिरात प्रामुख्याने तहसील कार्यालयाचा पुरवठा विभाग, संजय गांधी निराधार विभाग, सेतू केंद्र, आरोग्य, कृषी, वन आणि पशुवैद्यकीय विभागासह महावितरण व भूमी अभिलेख विभागांनी आपले स्टॉल लावून नागरिकांना सेवा दिली. प्रगतशील शेतकरी कैलास डोंगरकर यांनी फळबाग लागवडीबाबत मार्गदर्शन केले, तर तेजस्विनी गव्हाणे व तिच्या चमूने सादर केलेली लाठीकाठी आणि तलवारबाजीची प्रात्यक्षिके आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. शिबिरात ३ हजारांहून अधिक दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यामध्ये जात प्रमाणपत्र, अधिवास, उत्पन्न दाखले, नॉन क्रिमिलेयर, आधार कार्ड नोंदणी आणि नवीन शिधापत्रिकांचा समावेश होता. विशेष म्हणजे उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना ९५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य व प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. तसेच रोजगार हमी योजना, श्रावण बाळ योजना आणि दिव्यांगांना यंत्र वाटप करण्यात आले. आरोग्य विभागातर्फे विविध तपासण्या करून औषधोपचार करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल सोयाम यांनी केले, सूत्रसंचालन रघुनाथ कांडरकर यांनी तर आभार जयवंत कनाके यांनी मानले.

## खरीप हंगामपूर्व नियोजन व कृषी विक्रेता आढावा बैठक संपन्न

**बाभूळगाव :** तालुका कृषी विभाग आणि पंचायत समितीच्या वतीने ९ एप्रिल २०२६ रोजी पंचायत समिती सभागृहात खरीप हंगामपूर्व नियोजन व निविष्ठा विक्रेता आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. तालुका कृषी अधिकारी ऋतुजा डेरे यांनी या बैठकीत शेतकऱ्यांना अनधिकृत बीजी-३ कपाशी बियाण्यांच्या लागवडीपासून सावध राहण्याचे आवाहन केले. तालुका कृषी अधिकारी ऋतुजा डेरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत आगामी खरीप हंगामासाठी खते, बियाणे आणि कीटकनाशकांच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गेल्या काही वर्षांपासून बोंडअळी आणि निंदणाचा खर्च वाचवण्या साठी शेतकरी बीजी-३ या अनधिकृत कपाशी बियाण्यांकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. मात्र, शासनाने या बियाण्यांना अद्याप परवानगी दिलेली नाही. अशा बोगस बियाण्यांमुळे पीक वाया गेल्यास किंवा नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना कोणतीही शासकीय नुकसान भरपाई मिळणार नाही.

# खरातच्या भोंदूगिरीची अकोल्यात उघडणार गुपिते!

## १८ एप्रिल रोजी अकोल्यात बुवाबाजी विरोधी परिषद





अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** अंकज्योतिष आणि संकट निवारणाच्या नावाखाली शेकडो महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणात शिकलेल्या व्यक्तींची फसवणूक कशी झाली याची अनेक गुपिते अकोल्यात होणाऱ्या बुवाबाजी विरोधी परिषद '' मध्ये उघड केली जाणार असून त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने अकोल्यातील विविध सामाजिक संघटनांनी बुवाबाजी विरोधी परिषद '' आयोजित केली असून येत्या शनिवार दि. १८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता शहरातील मराठा मंडळ सभागृहात होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन जेष्ठ संपादक आणि किसान ब्रिगेडचे संस्थापक प्रकाश पोहरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते आणि बुवाबाजीचे कर्दनकाळ प्रा.श्याम मानव यांच्या विशेष उपस्थितीत आणि आ. अमोल मिटकरी,आ. . नितीन देशमुख , मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुपारी १ वाजता उदघाटन सत्र झाल्यावर महिलांची मानसिकता आणि बुवाबाजी यावर महिला आयोगाच्या माजी सदस्य डॉ. आशा मिरगे, जादूटोणा आणि मंत्रतंत्र यावर शरद वानखडे, चमत्कार प्रात्यक्षिके अशोक घाटे या विषयांवर विविध सत्रे होणार आहेत. अकोल्यात प्रथमच होणाऱ्या या परिषदेसाठी अकोला,वाशीम आणि बुलडाणा जिल्हयातून सामाजिक क्षेत्रातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. परिषदेसाठी अंनिससह मराठा सेवा संघ,भारतीय बोद्ध महासभा, जिजाऊ ब्रिगेड, महात्मा फुले समता परिषद, संभाजी ब्रिगेड, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघ, मराठा महासंघ, जिल्हा पत्रकार संघ, निर्भय बनो आंदोलन, लोकरंग, अकोल्याची जत्रा आणि अखिल भारतीय माळी महासंघ अश्या विविध सामाजिक संघटना मदत करीत आहेत.

**प्रा. श्याम मानवांचे व्याख्यान**

बुवाबाजी विरोधी परिषदेचा समारोप अंनिसचे राष्ट्रीय संघटक प्रा. श्याम मानव यांच्या भोंदू खरात - बुवाबाजी जोरात या विषयांवरील जाहीर व्याख्यानाने होणार आहे. त्यांनी आजवर केलेल्या शेकडो बुवा बाबांच्या भांडाफोडचे रंजक किस्से यावेळी ते सांगून महिला का बळी पडतात यावर प्रबोधन करणार आहेत.

या बुवाबाजी विरोधी परिषदेत अंनिसचे राज्य सहसंघटक अशोक घाटे विविध चमत्कार करून दाखविणार असून भोंदू खरात याने महिलांची फसवणूक करताना कोणत्या वैज्ञानिक ट्रिक वापरल्या आणि महिला त्याला कश्या बळी पडल्या याची मांडणी करीत चमत्कारांचा भांडाफोड करणार आहेत, त्यांचे चमत्कार प्रात्यक्षिके या परिषदेचे आकर्षण राहणार आहे.

# पशु-पक्षी यांच्या आरोग्याची आणि हक्कांची काळजी घेणे आपले कर्तव्य - केंद्रीय राज्यमंत्री बघेल

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** राजकीय पक्षातील कार्यकर्ते हक्कासाठी 'झिंदाबाद-मुर्दाबाद'चे नारे लावू शकतात; परंतु पशु-पक्षी राजकीय कार्यकर्त्यांप्रमाणे हक्कासाठी नारे लावू शकत नाहीत, असे प्रतिपादन केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांनी केले.राष्ट्रीय पशुवैद्यकीय, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मत्स्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, भारतीय पशुवैद्यक परिषदेचे अध्यक्ष उमेश शर्मा, हैदराबाद येथील राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळाचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. बी. के. बेहरा,




अ. भा. वि. प.चे देवदत्त जोशी, डॉ. शिरीष उपाध्याय आणि शिवम पांडे उपस्थित होते.एस. पी. सिंह बघेल म्हणाले, एखाद्या मानवावर अन्याय झाल्यास तो बोलून दाखवू शकतो; परंतु पशु-पक्षी बोलून दाखवू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना अडगळीत सोडू नये. त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला असून, एका दूरध्वनीवर पशुंच्या उपचारासाठी तज्ज्ञ पशुवैद्यक डॉक्टरांच्या पथकासह चलित वाहन तेथे पोहोचते. या पद्धतीमुळे पशु-पक्ष्यांवर वेळेवर उपचार होत आहेत. पूर्वी गाय-म्हैस तसेच इतर प्राण्यांची प्रकृती जास्त बिघडल्यास त्यांना मोठ्या वाहनाने पशुवैद्यकाकडे नेण्यासाठी शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागत होता. हा खर्च आता वाचत असल्याचेही बघेल यांनी सांगितले.भारताने यंदा १८ दशलक्ष मेट्रिक टन मासे, झिंगेसह इतर मत्स्य उत्पादनांची निर्यात केली असून त्यातून सुमारे ६५ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. मध्यंतरी अमेरिकेने अतिरिक्त कर लावल्यानंतर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती; मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ युरोपसह इतर देशांमध्ये दौरे करून पर्यायी बाजारपेठा शोधल्या. अनेक देशांमध्ये मागणी जास्त व उपलब्धता कमी असल्याने तेथे निर्यात वाढविण्यात आली. परिणामी, यंदा मत्स्य निर्यातीमध्ये सुमारे २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एका देशावर अवलंबून न राहता विविध देशांमध्ये व्यापार वाढविण्याचा निर्णय घेतल्याचेही केंद्रीय राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांनी स्पष्ट केले.

**गाय-म्हशींची कृत्रिम गर्भधारणा करण्याची गरज**

पंतप्रधानांच्या सकारात्मक दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी जोड व्यवसाय सुरू केल्याने त्यांचे राहणीमान सुधारले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट नव्हे, तर चारपट होत आहे. उच्च प्रतीच्या गायींसाठी कृत्रिम गर्भधारणा तंत्राचा वापर वाढविण्याची गरज आहे. या तंत्रामुळे सुमारे ९० टक्के मादी वासरांचे प्रमाण मिळते; तर नैसर्गिक पद्धतीत नर-मादीचे प्रमाण साधारण समान असते. सध्या शेती व इतर कामांमध्ये बैलांचा वापर कमी झाल्याने ते बेवारस होण्याची समस्या निर्माण होते. म्हणून कृत्रिम गर्भधारणेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या पद्धतीचा अवलंब केल्यास येत्या काही वर्षांत भारत दुग्ध उत्पादनात अग्रस्थानी येऊन निर्यातही वाढवू शकेल, असे बघेल यांनी नमूद केले.

**CHANGE IN NAME**
I have changed my
Old Name from
MOHAMMAD IRFANUR REHMAN
PASSPORT NO.R7811103
TO
MOHAMMAD IRFAN UR REHMAN
ABDUL SATTAR
Address
Mullah Pura Borgaon Manju
Dist Akola (M.S.) 444102

**CHANGE IN NAME**
I have changed my
Old Name from
TAMEEZA BEGUM
ABDUL SATTAR
PASSPORT NO.R7811103
TO
TAMIJA BEGAM
ABDUL SATTAR
Address
Mullah Pura Borgaon Manju
Dist Akola (M.S.) 444102

महत्त्वाचे

## किंग कोहलीकडून वैभव सूर्यवंशीचे कौतुक!

**नवी दिल्ली:** आयपीएल २०२६ च्या हंगामात गुरुवारी गुवाहाटीच्या मैदानावर केवळ धावांचा पाऊस पडला नाही, तर क्रिकेट विश्वाला सुवर्णक्षण पाहायला मिळाला. राजस्थान रॉयल्सचा () १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्या स्फोटक खेळीने आरसीबीचा पराभव तर केलाच, पण खुद्द विराट कोहलीलाही त्याचे कौतुक करण्यापासून रोखता आले नाही.आरसीबीविरुद्ध झालेल्या सामन्यात वैभव सूर्यवंशीने आपल्या बॅटने गुवाहाटीत वादळ निर्माण केले. २०२ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना वैभवने अवघ्या २६ चेंडूंत ७८ धावांची वादळी खेळी केली, ज्यामध्ये ८ चौकार आणि ७ गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. या विजयानंतर मैदानात एक भावूक क्षण पाहायला मिळाला, जेव्हा विराट कोहलीने वैभवच्या टोपीवर () ऑटोग्राफ दिला आणि त्यावर 'डियर वैभव, वेल डन' असा संदेश लिहिला.

## कोहलीच्या नागिण डान्सने चाहते हसून लोटपोट

**नवी दिल्ली:** इंडियन प्रीमियर लीगच्या १९व्या हंगामातील १६वा साखळी सामना १० एप्रिल रोजी गुवाहाटी येथील बरसापारा क्रिकेट स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळूर यांच्यात खेळला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने ६ गडी राखून एकतर्फी विजय मिळवत आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आणि हंगामातील आपला चौथा विजय नोंदवला. आरसीबीविरुद्धच्या राजस्थान रॉयल्सच्या विजयात वैभव सूर्यवंशी मुख्य नायक ठरला, त्याने शानदार ७८ धावा केल्या. दरम्यान सामना सुरू होण्यापूर्वी विराट कोहलीचा एक व्हिडिओ समोर आला आणि आता तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.विराट कोहली हा नेहमीच मैदानावर मजेशीर पद्धतीने डान्स करतो अथवा सरावादरम्यानही त्याची मस्ती चालू असते आणि त्यामुळेच तो सर्व खेळाडूंमध्ये खूपच प्रिय आहे. कोणाची मिमिक्री करणं असो वा एखाद्याची टर खेचणे असो इतकंच नाही तर गाण्यावर मैदानात खुलेआम डान्स करणं असो विराट यामध्ये अव्वल आहे.

# राजस्थानकडून आरसीबी 'चितपट'

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

आज गुवाहाटीमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगलोर विरुद्ध राजस्थान रॉयल्समध्ये सामना पार पडला. पाऊस झाल्यामुळे सामना अर्ध ते पाऊण तास उशिरा सुरू झाला. आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना २०१ रन्स केल्या. अडचणीत सापडलेल्या संघाला कर्णधार रजत पाटीदारच्या अर्धशतकी खेळीने सावरले. अखेर या सामन्यात राजस्थान रॉयल्सने सूर्यवंशी आणि जुरेलच्या खेळीवर आरसीबीचा ६ विकेट्सने पराभव केला आहे. आरसीबीने दिलेल्या २०२ रन्सचा पाठलाग करण्यासाठी राजस्थान रॉयल्सकडून यशस्वी जयस्वाल आणि वैभव सूर्यवंशी मैदानात उतरले. यशस्वी जयस्वाल या सामन्यात साजेशी कामगिरी करू शकला नाही. यशवी जयस्वाल १३ रन्स करून आउट झाला. आरआरच्या वैभव सूर्यवंशी




आणि ध्रुव जुरेलने पॉवर प्लेमध्ये गोलंदाजांची धुलाई केली. ६ ओव्हर्समध्ये राजस्थान रॉयल्सने ९३ रन्स केल्या. वैभव सूर्यवंशीने तडाखेबंद अर्धशतक केले. वैभव सूर्यवंशी २६ बॉल्समध्ये ७८ रन्सची तुफानी खेळी केली. ७८ रन्स करून तो आउट झाला. त्यानंतर हेटमायर देखील एकही रन करता आउट झाला. ध्रुव जुरेलने देखील आपले अर्धशतक पूर्ण केले. रवींद्र जाडेजा २४ रन्स करून नॉट आउट राहिला. तर ध्रुव जुरेल देखील ८१ रन्सवर नॉट आउट राहिला.राजस्थान रॉयल्सकडून पहिली ओव्हर जोफ्रा आर्चरने टाकली. त्याने पहिल्याच बॉलवर फील सॉल्टला आउट केले. त्यानंतर जोफ्रा आर्चरने देवदत्त पाडीकलची विकेट घेतली. रवी बिश्नोईने विराट कोहलीची विकेट पटकावली. रवी बिश्नोईने कृणाल पंड्याला देखील आउट केले. तर जितेश शर्माची विकेट ब्रिजेश शर्माने घेतली. ब्रिजेश शर्माने टीम डेव्हिडला आउट केले. तर रवींद्र जाडेजाने शेफर्डला आउट केले. कर्णधार रियान पराग कर्णधारपदाला साजेशी खेळी करू शकला नाही.

आरसीबीच्या गोलंदाजांनी राजस्थानची फॉर्ममध्ये असणारी जोडी पॉवर प्लेमध्ये फोडली. जोश हेझलवूडने यशस्वी जयस्वालला १३ रन्सवर आउट केले. कृणाल पंड्या तुफानी खेळी करत असलेल्या वैभव सूर्यवंशीला ७८ रन्सवर आउट केले. तर हेटमायरला बाऊन्सर बॉलवर आउट केले.जोश हेझलवूडने कर्णधार रियान परागला आउट केले.आरसीबीकडून सलामीला फलंदाजी करण्यासाठी विराट कोहली आणि फिलिप सॉल्ट मैदानात उतरले. दरम्यान फिलिप सॉल्ट पहिल्याच बॉलवर आउट झाला. त्यानंतर देवदत्त पाडीकल खेळण्यासाठी आला. पाडीकल ७ बॉलमध्ये १४ रन्स करून आउट झाला. विराट कोहलीने चांगली सुरुवात केली होती. मात्र त्याला त्याचे रूपांतर मोठ्या खेळीत करता आले नाही. विराट कोहली ३२ रन्स करून आउट झाला. ऑलराउंडर कृनाल पंड्या केवळ १ रन करून आउट झाला. विकेट किपर जितेश शर्मा ५ रन्स करून आउट झाला. टीम डेव्हिड १३ रन्स करून आउट झाला. शेफर्डने २२ रन्स केल्या. कर्णधार रजत पाटीदारने ६३ धावांची शानदार अर्धशतकी खेळी केली.

## सनरायझर्स हैदराबादचा वर्ल्ड रेकॉर्ड!



**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ मधील १७ व्या सामन्यात नाणेफेक जिंकून पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, त्याचा हा निर्णय अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या जोडीने पूर्णपणे चुकीचा ठरवला. सामन्याच्या पहिल्या षटकापासूनच या दोघांनी पंजाबच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. अभिषेक शर्माने अवघ्या १८ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण करून पंजाबच्या गोटात घबराट निर्माण केली. यासह हैदराबादने एक खास इतिहासही रचला.सनरायझर्स हैदराबादने या सामन्यात पहिल्या ६ षटकांत बिनबाद १०५ धावा कुटल्या. आयपीएलच्या इतिहासात पावरप्लेमध्ये १०० पेक्षा जास्त धावा करण्याची हैदराबादची ही तिसरी वेळ आहे. जगातील इतर कोणत्याही टी-२० संघाला ही कामगिरी एकपेक्षा जास्त वेळा करता आलेली नाही. यापूर्वी २०२४ मध्ये दिल्लीविरुद्ध १२५ आणि लखनऊविरुद्ध १०७ धावा हैदराबादने पावरप्लेमध्ये केल्या होत्या. ज्यामुळे हैदराबादच्या नावावर वर्ल्ड रेकॉर्डची नोंद झाली आहे.

## आयुष शेट्टीने विश्वविजेत्या क्रिस्टीला लोळवत रचला इतिहास!




**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

भारताचा उदयोन्मुख बॅडमिंटनपटू आयुष शेट्टीने आशियाई चॅम्पियनशिपच्या उपांत्यपूर्व फेरीत दमदार विजय नोंदवला आहे. आयुषने इंडोनेशियाच्या अव्वल मानांकित जोनाथन क्रिस्टीचा सरळ सेटमध्ये २३-२१, २१-१७ असा पराभव केला. या विजयासह आयुषने स्पर्धेतील आपले पदक निश्चित केले असून, अशी कामगिरी करणारा तो गेल्या सहा वर्षांतील पहिला भारतीय पुरुष एकेरी खेळाडू ठरला आहे. जोनाथन क्रिस्टीविरुद्धचा आयुषचा हा पहिलाच विजय आहे. पहिल्या सेटमध्ये दोघांमध्ये काट्याची टक्कर पाहायला मिळाली. मध्यांतरापर्यंत क्रिस्टी ११-१० ने पुढे होता आणि एकवेळ त्याने १८-१५ अशी आघाडी घेतली होती. मात्र, आयुषने जिद्द न सोडता खेळ 'ड्यूस'पर्यंत खेचला आणि २३-२१ ने पहिला सेट खिशात घातला. दुसऱ्या सेटमध्ये आयुषने सुरुवातीपासूनच नियंत्रण राखले. त्याने ११-९ अशी आघाडी घेतल्यानंतर आपली आक्रमकता कायम ठेवली आणि २१-१७ ने सेट जिंकत ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले.आयुष शेट्टीने या पदकासह २०१८ मधील एच.एस. प्रणॉयच्या विक्रमाची पुनरावृत्ती केली आहे. २०१८ नंतर आशियाई चॅम्पियनशिपमध्ये पदक निश्चित करणारा तो पहिला भारतीय पुरुष एकेरी खेळाडू ठरला आहे. २०२३ मध्ये सात्विक-चिराग जोडीने जिंकलेल्या सुवर्णपदकानंतर बॅडमिंटनमध्ये भारतासाठी हे मोठे यश मानले जात आहे.या स्पर्धेत भारताच्या इतर दिग्गज खेळाडूंना मात्र अपयशाचा सामना करावा लागला. दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती पी.व्ही. सिंधू दुसऱ्या फेरीतच बाहेर पडली, तर लक्ष्य सेनला पहिल्या फेरीत पराभवाचा धक्का बसला.

## बेजबाबदार खेळीनंतर ऋषभ पंतवर टीकेची झोड

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात बेजबाबदारपणे आपली विकेट बहाल केल्यामुळे ऋषभ पंतवर जोरदार टीका होत आहे. भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने पंतच्या बाद होण्यावर सडकून टीका करताना, मधल्या फळीतील फलंदाजांनी अधिक जबाबदारीने खेळण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले.कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर पार पडलेल्या सामन्यात पदार्पण करणाऱ्या मुकुल चौधरीने लखनौ सुपर जायंट्सला अखेरच्या क्षणी सावरले आणि दोन गुण मिळवून दिले. मात्र, या विजयामुळे लखनौच्या फलंदाजीतील उणिवा लपलेल्या नाहीत. प्रत्येक सामन्यागणिक ऋषभ पंत आणि निकोलस पूरन यांची खराब फॉर्मची चिंता प्रकर्षाने जाणवत आहे. चालू हंगामात सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या विजयात पंतने योगदान दिले असले तरी, एकूणच त्याची फलंदाजी लयबद्ध वाटत नाहीये. केकेआरविरुद्ध जेव्हा संघाला मधल्या फळीत स्थैर्याची गरज होती, तेव्हा पंत अवघ्या १० धावा करून बाद झाला.पंत बाद झाल्यामुळे फलंदाजीच्या फळीवर प्रचंड दडपण आले आणि सामना लखनौच्या हातातून निसटतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली होती. एका टप्प्यावर सामना गमावण्याची चिन्हे दिसत असताना, मुकुलने संयमी आणि अविस्मरणीय खेळी करत सामन्याचा नूर पालटला. मुकुलच्या कामगिरीमुळे लखनौने विजय तर मिळवला, मात्र मधल्या फळीतील सातत्यहीन आणि तकलादू कामगिरीचा प्रश्न अद्याप कायम आहे.मोहम्मद कैफने पंतच्या फलंदाजीवर परखड मत व्यक्त करताना सांगितले की, डावाला आकार देण्याची महत्त्वाची संधी पंतने गमावली. पॉवरप्लेमध्ये लखनौची स्थिती मजबूत असताना, अनुभवी खेळाडू म्हणून पंतने अखेरपर्यंत खेळून सामना संपवणे अपेक्षित होते, असे कैफला वाटते.कैफ म्हणाला, ''संघाला गरज असताना पंतने खेळपट्टीवर थांबणे आवश्यक होते.

## आयपीएलमध्ये रोहित शर्माचा नवा रेकॉर्ड मुंबई इंडियन्समध्ये केली १५ वर्ष पूर्ण

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

मुंबई इंडियन्सने आतापर्यंत ५ वेळा आयपीएल ट्रॉफी जिंकली आहे आणि तीदेखील रोहित शर्माच्या कॅप्टन्सीमध्ये. रोहित शर्माला मुंबईचा राजादेखील म्हटलं जातं. अशा या राजाने अर्थात रोहित शर्माने मुंबई इंडियन्ससोबत १५ वर्षे पूर्ण केली आहेत. फ्रँचायझीने त्याला २०११ च्या मेगा लिलावात संघात घेतले होते. त्यापूर्वी तो डेक्कन चार्जर्स संघाचा भाग होता. त्या हंगामात, मुंबईने १० एप्रिल रोजी दिल्लीविरुद्ध आपला पहिला सामना खेळला. तो रोहित शर्माचा फ्रँचायझीसाठीचा पहिलाच सामना होता. रोहितच्या कर्णधारपदाखाली मुंबई इंडियन्सने पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. फ्रँचायझीसोबतची १५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, सध्याचा कर्णधार हार्दिक पांड्याने फ्रँचायझीच्या वतीने रोहितला एक भेटवस्तू दिली आणि भावूक हार्दिक पांड्याने आपल्या भावनादेखील यावेळी व्यक्त केल्या. या निमित्ताने मुंबई इंडियन्सच्या एका व्हिडिओमध्ये हार्दिक पांड्या म्हणाला, ''रो,




१५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन. तुम्ही इतकी वर्षे ज्या प्रकारे या फ्रँचायझीचे नेतृत्व केले आहे, त्याबद्दल धन्यवाद. मी पदार्पण केले, बूमने केले आणि आमच्यापैकी अनेकांनी तुमच्या कर्णधारपदाखाली पदार्पण केले. या फ्रँचायझीसाठी, तसेच भारतासाठी खेळलेल्या अनेक लोकांना प्रेरणा दिल्याबद्दल धन्यवाद. एक माणूस म्हणून, तुम्ही अद्भुत आणि अप्रतिम आहात.
'' तुम्ही नेहमीच खूप मनमिळाऊ आणि मोकळ्या मनाचे राहिला आहात. तुम्ही नेहमीच आघाडीवर राहून नेतृत्व केले आहे, त्यामुळे तुमचे अभिनंदन आणि तुम्ही ज्या प्रकारे अनेक वर्षे संघाचे नेतृत्व केले त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.डेक्कन चार्जर्सकडून तीन वर्षे खेळल्यानंतर, २०११ मध्ये मुंबई इंडियन्ससाठी रोहित शर्माला सर्वाधिक बोली लागली. तो त्या हंगामातील चौथा सर्वात महागडा खेळाडू होता. तो २ दशलक्ष डॉलर्समध्ये मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला. २०१३ च्या हंगामाच्या मध्यात मुंबईने रोहितला कर्णधार म्हणून नियुक्त केले आणि त्या हंगामात संघ पहिल्यांदाच चॅम्पियन बनला.

## देशातील सर्वात मोठ्या बँकेचे ग्राहकांना अलर्ट

**नवी दिल्ली:** देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांना अलर्ट देण्यात आला आहे.
जर तुम्ही तुम्ही इंटरनेट किंवा मोबाइल बँकिंगद्वारे पेमेंट करत असाल, तर तुम्हाला अडचणीचा सामना करावा लागू शकतो. कारण आज ११ एप्रिल २०२६ काही तांत्रिक अडचणींमुळे बँकेचं अॅप बंद राहणार आहे.
नियोजित देखभालीच्या कामामुळे -आधारित सेवांमध्ये काही वेळ अडथळे येण्याची शक्यता आहे, अशी माहिती बँकेने दिली आहे.
यामुळे इंटरनेट बँकिंग, आणि सेवांच्या काही सुविधा काही काळासाठी विस्कळीत राहतील. रात्री २:३० ते २:५० या २० मिनिटांच्या कालावधीत ही देखभाल प्रक्रिया पार पडणार आहे. मात्र त्यानंतरही काही काळ अडचण येण्याची शक्यता आहे. बँकेने स्पष्ट केले आहे की, जरी ओटीपी आधारित सेवांमध्ये अडथळा असला तरी, ग्राहकांना अखंडित सेवेसाठी, पैसे काढण्यासाठी एटीएमचा वापर करता येईल. यूपीआय व्यवहार सुरू राहतील.
ओटीपी ऐवजी 'एसबीआय ऑथेंटिकेटर'चा वापर करून व्यवहार पूर्ण करता येतील. यात प्रॉम्प्ट, कोड किंवा अॅप-आधारित चा समावेश असतो, हे चा सुरक्षित आणि आधुनिक पर्याय आहे.

# १०० दशलक्ष बॅरल रशियन कच्चे तेल बाजारात

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेतील तणावामुळे नेहमीच चर्चेत राहणारी 'होर्मुजची सामुद्रधुनी' ही भारतासाठीच नाही तर संपूर्ण जागतिल देशांचा महत्त्वपूर्ण भाग ठरते. कारण देशांमध्ये तेल आयातीसाठी ती जीवनवाहिनी मानली जाते. या मार्गावर संकट आले की भारतात पेट्रोल-डिझेल महागण्याची भीती असते. मात्र, आता भारतासाठी एक मोठी खुशखबरी आहे. अमेरिकेने रशियन तेल खरेदीसाठी ३० दिवसांची सूट दिली होती, जी ११ एप्रिल रोजी संपत आहे. या परवान्याअंतर्गत, १२ मार्चपर्यंत रशियन टँकरमधून तेलाची विक्री करता येत होती. त्यानंतर अवघ्या एका आठवड्याने, १९ एप्रिल रोजी, इराणशी संबंधित असाच एक परवाना



देखील कालबाह्य होणार आहे. भारताने आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी अशा काही पर्यायांवर काम पूर्ण केले आहे, ज्यामुळे होर्मुजचा मार्ग बंद झाला तरी भारताचा इंधन पुरवठा खंडित होणार नाही.रशिया आणि इराणकडून मोठ्या प्रमाणात तेल जागतिक बाजारपेठेत येऊ देण्यासाठी अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने हे परवाने दिले होते. यामुळे जागतिक तेल पुरवठा वाढला आणि भारत व इतर आशियाई देशांना दिलासा मिळाला.
अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे प्रशासन लवकरच रशियन तेल पुरवठ्यावर दिलेली सूट वाढवू शकते, ज्यामुळे काही विशिष्ट देशांना प्रतिबंधित रशियन तेल आणि पेट्रोलियम उत्पादने खरेदी करणे सुरू ठेवता येईल. एका वृत्तानुसार, जागतिक तेल पुरवठ्यावरील दबाव कमी करण्यासाठी हा निर्णय लवकरच घेतला जाणार आहेरशियाचे राष्ट्रपतींचे विशेष दूत किरिल दिमित्रीव्ह यांनी यापूर्वी म्हटले होते की, या सवलतीमुळे सुमारे १०० दशलक्ष बॅरल रशियन कच्चे तेल बाजारात येऊ शकते. हे प्रमाण अंदाजे एका दिवसाच्या जागतिक तेल पुरवठ्याइतके असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजाराला मोठा दिलासा मिळू शकतो.लअमेरिकेच्या अर्थमंत्र्यांनी गुरुवारी व्हाईट हाऊसमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली आणि रशियन

व्यापार जगत

तेलावरील सवलत वाढवण्याबाबत चर्चा केली. एका सूत्राच्या माहितीनुसार, ही सवलत वाढवणे हे योग्य पाऊल असेल यावर दोघांचे एकमत झाले. पण व्हाईट हाऊस आणि अर्थ विभागाने तात्काळ कोणतेही अधिकृत निवेदन जारी केले नाही. दरम्यान, होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या अंशतः बंदमुळे पुरवठ्यावर झालेल्या परिणामामुळे, युद्ध सुरू झाल्यापासून तेलाच्या किमती वाढल्या आहेत.अमेरिकेने निर्बंध शिथिल केल्यामुळे आणि तेलाच्या किमती वाढल्यामुळे रशिया आणि इराण या दोन्ही देशांच्या कमाईला चालना मिळाली आहे. हे देश महत्त्वपूर्ण आर्थिक लाभ मिळवत असताना, त्यांच्यावरील अमेरिकेची पकड कमकुवत होत असल्याचे दिसत आहे. अटलांटिक कौन्सिलच्या अहवालानुसार, ब्लूमबर्गच्या अंदाजानुसार रशिया दररोज अतिरिक्त १५० दशलक्ष डॉलर्सची कमाई करत आहे, तर इराण दररोज अंदाजे १३९ दशलक्ष डॉलर्स कमावू शकतो. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, रशियाच्या सर्वात मोठ्या तेल करातून मिळणारा महसूल एप्रिलमध्ये जवळपास ९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकतो, जो पूर्वीच्या अंदाजाच्या जवळपास दुप्पट आहे.

## युद्ध बंद होताच भारताचा परकीय चलन साठा वाढायला सुरुवात; ६९७.१ अब्ज डॉलरवर पोहोचला

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

आखातातील पेचप्रसंग संपुष्टात येण्याची शक्यता वाढली आहे. त्याचबरोबर सोन्याचे दर या आठवड्यात बऱ्याच प्रमाणात वाढले. त्यामुळे भारताकडील परकीय चलन साठ्यात भक्कम वाढ झाली असल्याचे दिसून येते. या अगोदरच्या दोन आठवड्यामध्ये भारताकडील परकीय चलन साठा बराच कमी झाला होता. त्यामुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.युद्ध संपुष्टात येण्याची शक्यता वाढल्यामुळे भारतातील विविध क्षेत्रात आशावाद निर्माण झाला आहे. चलन बाजारावरही याचा सकारात्मक परिणाम झाला आहे. रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या माहितीनुसार तीन



एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात भारताकडील परकीय चलन साठा नऊ अब्ज डॉलरने वाढून ६९७.१ अब्ज डॉलर या पातळीपर्यंत गेला आहे.
परकीय चलनसाठा या अगोदरच्या आठवड्यात तब्बल १०.२ अब्ज डॉलरने कमी झाला होता. विशेष म्हणजे ही आकडेवारी युद्ध संपण्याची घोषणा होण्यापूर्वीची आहे. आता युद्ध समाप्त झाल्यानंतर या आघाडीवर भारताची परिस्थिती अधिक सकारात्मक होईल असे समजले जाते.२७ फेब्रुवारी रोजी म्हणजे युद्ध सुरू होण्याअगोदर भारताकडे ७२८.४ अब्ज डॉलर इतका विक्रमी परकीय चलन साठा होता. २८ फेब्रुवारीला युद्ध सुरू झाल्यापासून परकीय चलन साठ्यावर दबाव आला होता. आता परिस्थिती वेगाने सकारात्मक होत असल्याचे दिसून येते.
संबंधित आठवड्यामध्ये जागतिक बाजारात सोन्याच्या किमती बऱ्याच वाढल्या. त्यामुळे रिझर्व्ह बँकेकडे असलेल्या सोन्याचे मूल्य या कालावधीत ७.२ अब्ज डॉलरने वाढून १२०. ७४ अब्ज डॉलर या पातळीवर गले आहे. त्यामुळे भारताकडील परकीय चलन साठ्याचे मूल्य या कालावधीत वाढण्यास मदत झाली आहे.

## सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री! रोजच्या वापरातील वस्तूंच्या किमती वाढण्याची भीती

**नवी दिल्ली: दि.११ वृत्तसंस्था**

उन्हाळा सुरू होताच कोल्ड ड्रिंक्सची मागणी वाढली आहे, मात्र याच काळात ग्राहकांना महागाईचा चटका बसण्याची शक्यता आहे. जागतिक ठिकाणी असलेली परिस्थिती त्यामुळे महागाईचं सावट संपूर्ण जगभर पसरलेलं आहेत त्यात केवळ शीतपेयेच नव्हे, तर साबण, शॅम्पू, डिटर्जंट आणि कपड्यांच्या किमतीतही वाढ होण्याचे संकेत मिळत आहेत. या दरवाढीमागे कच्च्या मालाच्या किमतीत झालेली मोठी वाढ हे मुख्य कारण आहे.
कॉस्टिक सोड्याच्या दरात झालेल्या अचानक वाढीमुळे देशातील अॅल्युमिनियम उद्योग, एफएमसीजी आणि वस्त्रोद्योग क्षेत्रात खळबळ उडाली आहे.



देशांतर्गत बाजारात कॉस्टिक सोड्याच्या दरात १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. या रसायनाचा वापर अॅल्युमिनियम शुद्धीकरण, कागद, वस्त्रोद्योग, साबण, डिटर्जंट आणि जलशुद्धीकरण यांसारख्या अनेक उद्योगांमध्ये केला जातो. कॉस्टिक सोड्याच्या दरातील ही वाढ अॅल्युमिनियम वितळवणाऱ्या कंपन्यांसाठी दुहेरी फटका ठरली आहे. अॅल्युमिनियम उत्पादन प्रक्रियेत बॉक्साइट खनिजातून अॅल्युमिना वेगळा करण्यासाठी कॉस्टिक सोडा हा एक महत्त्वाचा कच्चा माल आहे. उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, १ टन अॅल्युमिनियमच्या उत्पादनासाठी अंदाजे १७०-२०० किलोग्रॅम कॉस्टिक सोडा लागतो.

## थोडक्यात

### पाचपावलीत दिवसाढवळ्या घरफोडी

**नागपूर :** शहरात घरफोडीच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसून, पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरदिवसा एका घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी २ लाख ४९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. श्रीमती सत्यभामा रमेश गजभिये (वय ६० वर्षे) १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २ च्या दरम्यान आपल्या कामावर गेल्या होत्या आणि त्यांचा मुलगा घराला कुलूप लावून वाचनालयात अभ्यासासाठी गेला होता. घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप आणि कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील लोखंडी कपाटातून १,५०० रुपये रोख आणि सोन्या-चांदीचे विविध दागिने असा एकूण २ लाख ४९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. सत्यभामा गजभिये यांनी दिलेल्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०५(अ) आणि ३३१(३) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कुणाल शेडमाके करत आहे.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी

**नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम" दिनांक ८ ते १४ एप्रिल या कालावधीमध्ये साजरा करण्यात येत आहे. त्यानुषंगाने जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा, त्यांचे आरोग्य चांगले राहावे या उद्देशाने नागपूर जिल्हयातील ज्येष्ठ नागरिकांकरीता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन १२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या कालावधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर कार्यालयामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय आय. टी.आय. समोर, श्रध्दानंद पेठ, नागपूर येथे करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य शिबिराच्या उपस्थित राहून आरोग्य तपासणीचा लाभ घ्यावा.

### धारदार शस्त्रासह एक ताब्यात

**नागपूर :** घातक शस्त्र बाळगून फिरणाऱ्या एका व्यक्तीला कपिलनगर पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. ही कारवाई १० एप्रिल २०२६ रोजी रात्री ८:३० ते ९:०० वाजेच्या सुमारास लेंडेनगर भागातील मोकळ्या मैदानात करण्यात आली. कपिलनगर ठाण्याचे तपास पथक परिसरात गस्त घालत असताना, त्यांना गुप्त माहिती मिळाली की लेंडेनगर येथील एका मोकळ्या मैदानात निळ्या-पिवळ्या रंगाचा शर्ट घातलेला एक इसम संशयास्पदरीत्या शस्त्र घेऊन फिरत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली. मिळालेल्या वर्णनाचा व्यक्ती पोलिसांना दिसताच, त्याने पोलिसांना पाहून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पथकाने पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. पंचांसमोर त्याची विचारपूस केली असता त्याने आपले नाव श्रीकृष्ण शामाजी तितिरमारे (वय ४०, रा. कवडठा रोड, लेंडेनगर) असे सांगितले.आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याच्या पँटच्या कमरेला खोचलेला एक लोखंडी धारदार चाकू मिळून आला. पोलीस अंमलदार संजू भूषणम यांच्या तक्रारीवरून पोलीस उपनिरीक्षक रणजित रणनवरे यांनी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा (कलम ४, २५) आणि महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# महानगरपालिका मुलांसाठी उभारणार बहुउद्देशीय क्रीडांगण

## आयुक्तांनी केली नदी स्वच्छता, उद्यानांचे नूतनीकरण, वॉकेबल स्ट्रीट मार्गाची पाहणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ : महानगरपालिकाच्या वतीने ज्ञानेश्वर उद्यानात मुलांसाठी बहुउद्देशीय क्रीडांगण उभारण्यात येणार आहेयाठिकाणी विविध प्रकारचे खेळ खेळता येणार आहे. मनपा आयुक्त डॉ.विपिन यांनी यांनी यासंदर्भात महत्त्वाचे निर्देश अधिका०यांना दिले.**



आयुक्तांनी सक्करदरा, दत्तात्रय नगर येथील संत ज्ञानेश्वर उद्यानाला भेट दिली. जॉगिंग ट्रॅक, सुरक्षा भिंत आणि लहान मुलांच्या खेळण्याच्या ठिकाणाची पाहणी केली. आयुक्तांनी उद्यानातील दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यासोबतच मुलांसाठी येथे स्केटिंग ट्रॅक, बॅडमिंटन आणि बास्केटबॉल अशा विविध खेळांची सोय असलेले 'बहुउद्देशीय मैदान' तयार करण्याचे आदेश दिले. याप्रसंगी उद्यान उपायुक्त गणेश राठोड, उद्यान संवर्धक अमोल चौरपगार व नागरिक उपस्थित होते. मनपा आयुक्त डॉ विपीन यांनी शनिवारी (ता.११) सेंट झेवियर्स शाळा ते अशोक चौक दरम्यानच्या नदी सफाई, सक्करदरा दत्तात्रय नगर येथील संत ज्ञानेश्वर उद्यान, व्हीएनआयटी समोरील वॉकेबल स्ट्रीट मार्ग आणि चिल्ड्रेन पार्क ते लक्ष्मी भवन चौक दरम्यानच्या मार्गाची, अंबाझरी जलपर्णी काढण्याच्या कामाची पाहणी केली.

**सफाई कार्याची पाहणी**

मनपा आयुक्त डॉ.विपिन यांनी अशोक चौक ते सेंट झेवियर्स शाळेदरम्यान सुरू असलेल्या नदी-नाला सफाई कार्याची पाहणी केली. सफाई कामासाठी तैनात करण्यात आलेल्या पोकलेन आणि जेसीबी मशीनचा वापर पूर्ण क्षमतेने करावा, कामाचा वेग वाढवण्यासाठी गरज पडल्यास अतिरिक्त यंत्रसामग्री लावावी असे निर्देश दिले. याप्रसंगी मुख्य अभियंता मनोज तालेवार आणि सहायक आयुक्त घनश्याम पंधरे, कार्यकारी अभियंता गिरीश लीखार उपस्थित होते. व्हीएनआयटी समोरील वॉकेबल स्ट्रीट आणि चिल्ड्रेन पार्क ते लक्ष्मी भवन चौक दरम्यानच्या मार्गाचीही आयुक्त डॉ. विपीन यांनी पाहणी केली. हे काम सुरू करण्यापूर्वी स्थानिक लोकप्रतिनिधी, पीएमसी आणि आर्किटेक्ट यांच्याशी सविस्तर चर्चा करूनच अंतिम आराखडा निश्चित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नगरसेवक विजय होले, अधीक्षक अभियंता लीना उपाध्ये, सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, कार्यकारी अभियंता मनोज गद्रे उपस्थित होते. याशिवाय त्यांनी अंबाझरी तलावातील जलपर्णी काढण्याच्या कामाची पाहणी केली. याप्रसंगी अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, कार्यकारी अभियंता श्रीकांत वाईकर आदी उपस्थित होते.



# गटनेते शकील पटेल यांचा पदग्रहण सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** थोर समाजसुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून AIMIM चे गटनेते शकील पटेल यांचा पदग्रहण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

सोहळ्याला मुफ्ती अब्दुल कादीर, सभापती शिवानी दानी, निसार सिद्दीकी, शोएब अहमद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाला नगरसेवक पवन कोये, असलम खान मुल्ला, तसनीम नियामत खान ताजी, वर्षा बंडू डोंगरे, मुस्तफा अंसारी, रेखा विश्वास पाटील, सोफिया आसिफ मंडवा, आलीशा फहीम खान, फैयाज कुरेशी, इशाक मन्सूरी उपस्थित होते, पदग्रहण समारंभादरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांनी श्री. शकील पटेल यांचे अभिनंदन केले. त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या नवीन जबाबदारीमुळे जनहितार्थ कामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करत सर्वांनी त्यांच्या यशस्वी कारकीर्दीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# रातुम विद्यापीठात विकसित भारत स्टार्टअप कॉन्क्लेव्ह

## नवीन संकल्पना निर्माण करीत रोजगार निर्माते होण्याचे आवाहन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात इंक्युबेशन फाउंडेशन आणि विदर्भ इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिल (वेद) यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित भारत स्टार्टअप कॉन्क्लेव्ह आयोजित करण्यात आले.



कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाला विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे माजी अध्यक्ष देवेंद्र पारेख, विद्यापीठाच्या इंक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. अभय देशमुख, वेदच्या अध्यक्ष रीना सिन्हा, महासचिव अली अजगर वाघ यांची प्रामुख्याने उपस्थित होती. विदर्भ विकासाला चालना मिळावी याकरिता नागपूर शहरातील नागरिकांनी एकत्र येत विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलची निर्मिती केली असून या माध्यमातून विदर्भ विकासाला चालना मिळत असल्याचे देवेंद्र पारख यांनी सांगितले. विमानतळ विकास, मिहान, लॉजिस्टिक पार्क, आयटी हब, समृद्धी महामार्ग, कृषी उत्पादनात वाढ आदी विविध संकल्पना कशा प्रकारे साकार करण्यात आल्या, असे श्री. पारेख यांनी सांगितले. नागपूर कर्मभूमी असलेले विवेक देशपांडे व किरीट जोशी, सत्यनारायण नुवाल, बसंत साव, शिवकिसनजी अग्रवाल, निलेश व विशाल अग्रवाल आदी यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा त्यांनी सांगितली.

रीना सिन्हा यांनी विदर्भ इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिलची निर्मिती कशाप्रकारे झाली. वेदचे कार्य कशाप्रकारे चालते. नवीन उद्योजकांना कशाप्रकारे सहकार्य करण्याची भूमिका घेतली जाते, याची माहिती भाषणातून दिली. विद्यापीठाच्या इंक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. अभय देशमुख यांनी केंद्राच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण संकल्पना स्टार्टअप म्हणून पुढे येत असल्याचे सांगितले. विद्यार्थी तसेच अन्य नागरिकांना उद्योजक म्हणून पुढे आणण्याकरिता व्यवसायाकरिता लागणारे कौशल्य, निधी आदी विविध बाबींची मदत केंद्राच्या वतीने केले जात असल्याचे डॉ. देशमुख यांनी सांगितले. नागपूर तसेच विदर्भाला नाविन्यपूर्ण स्टार्टअप हब निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी या क्षेत्रामध्ये येण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन अभिषेक अंगोले यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, नवउद्योजक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना महावितरणचे अभिवादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर दि. ११ :** थोर समाज क्रांतिकारक, यशस्वी उद्योजक, प्रखुर विचारवंत आणि दीन-दलितांसह शेतकरी व बहुजन समाजाचे उद्धारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणच्या वतीने त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.



महावितरणच्या काटोल मार्ग येथील 'विद्युत भवन' कार्यालयात आयोजित कार्यक्रमात नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी बोलताना मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक अतुलनीय कार्यावर प्रकाश टाकला आणि त्यांच्या विचारांची आजच्या काळात असलेली गरज अधोरेखित केली. कार्यक्रमात राकेश सयाम यांनी महात्मा फुले यांच्या जीवनप्रवासातील प्रेरणादायी प्रसंगांना उजाळा देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सोहळ्याला सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रवीण काटोले, प्रभारी कार्यकारी अभियंता अजित जिचकार आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरणचे विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी प्रतिमेचे दर्शन घेऊन महामानवास विनम्र अभिवादन केले.

# विभागीय महिला लोकशाही दिन सोमवारी

**नागपूर, दि. ११ :** विभागीय स्तरावरील महिला लोकशाही दिन विभागीय आयुक्त (महसुल), नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. मार्च २०२६ विभागीय महिला लोकशाही दिन १३ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या तक्रारी तसेच अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी व समाजातील पीडित महिलाना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून "महिला लोकशाही दिन राज्यस्तरावर, विभागीय स्तरावर, जिल्हास्तरावर व तालूका स्तरावर राबविण्यात येतो. लोकशाही दिनात तक्रारी स्वीकारण्याचे पुढीलप्रमाणे निकष आहे. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरूपावे असावे व तक्रार अर्ज दोन प्रतीत सादर करावा. तक्रार निवेदनावर यापूर्वी झालेल्या जिल्हा स्तरावरील महिला लोकशाही दिन समितीचा कार्यवाही अहवाल जोडणे आवश्यक आहे. जिल्हा स्तरावरील महिला लोकशाही दिनात यापूर्वी दिलेला अर्ज व त्यावर कार्यवाही केलेला अर्ज असावा.न्यायप्रविष्ट प्रकरणे, विहित नमुण्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेला अर्ज, सेवा विषयक आस्थापना विषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल तर स्वीकारणार नसल्याचे कळविण्यात आले आहे.

# दिघोरी-इंदोरा उड्डाणपुलाला 'सम्राट अशोक' यांचे नाव द्यावे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** दिघोरी-इंदोरा उड्डाणपुलाला 'प्रियदर्शी सम्राट अशोक' यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सम्राट अशोका फाऊंडेशनचे अध्यक्ष सुरेश गोटेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.



सुरेश गोटेकर यांनी सम्राट अशोकांच्या वारशाचे जतन आणि सन्मान करण्यासाठी विविध मागण्यांचे पत्र केंद्रीय मंत्र्यांना दिले. दिघोरी-इंदोरा पुलाला 'प्रियदर्शी सम्राट अशोक' यांचे नाव द्यावे.अशोक चौकात सम्राट अशोकांचा भव्य पूर्णाकृती पुतळा (स्टॅच्यू ऑफ पीस) उभारण्यात यावा. संविधानाने स्वीकारलेले राष्ट्रीय अशोक चिन्ह स्थापित करावे आणि पुलाच्या स्तंभांवर सम्राट अशोकांचा जीवनपट दर्शवणारी भित्तिचित्रे रेखाटावीत. केंद्र सरकारने सम्राट अशोक जयंतीनिमित्त तिथीनुसार सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. अशोक काळातील स्तूप, लेणी, शिलालेख आणि स्तंभांचे संवर्धन करावे. सम्राट अशोकांच्या पुतळ्याची सजावट करण्यात यावी. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन दिल्याची माहिती सुरेश गोटेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. शिष्टमंडळात कृष्णा सहारे, राजू गणवीर, अनिलनाथ शील, किरण गौरखेडे, शिल्पा नागदेवते, नंदिनी वाळके, लीला तामगाडगे, पुष्पा धाबर्डे, रमा रामटेके, रत्नमाला नगरारे, प्रतिभा गोटेकर, माधुरी तायडे, भीमराव निकोसे, एस. म्हैसकर, शंभूराजे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रपतींच्या दौऱ्यानिमित्त प्रशासकीय पूर्वतयारीचा आढावा



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या १५ आणि १६ एप्रिल दरम्यान नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांच्या नियोजित दौऱ्याबाबत विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढावा घेतला.

राष्ट्रपतींच्या नियोजित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले\ विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, वर्धा जिल्हाधिकारी वानमथी सी., अपर आयुक्त तेजुसिंग पवार तसेच इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.राष्ट्रपतींच्या उपस्थितीत १५ एप्रिल रोजी एम्स तसेच एनएडीटी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर त्या १६ एप्रिल रोजी वर्धा येथे जाणार आहेत. निर्देशीत सूचनांची संबंधितांकडून काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच, दौऱ्याच्या सर्व ठिकाणी आरोग्य पथक सर्व सुविधांसह सज्ज ठेवण्याच्या सूचना श्रीमती बिदरी यांनी दिल्या.

**मान्सूनपूर्व देखभाल ...** वीज यंत्रणेची कार्यक्षमता वाढणार

# पावसाळ्यातही वीजपुरवठा राहणार 'सुरळीत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** नागपूर महावितरणने नागपूर जिल्ह्याच्या संपूर्ण वीजयंत्रणेच्या 'हेल्थ चेकअप' म्हणजेच मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्ती मोहिमेचा शुभारंभ केला आहे. पावसाळ्याच्या कालावधीत वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमीत कमी राखणे आणि ग्राहकांना दर्जेदार, अखंडित सेवा देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

आगामी पावसाळ्यातील संभाव्य तांत्रिक अडथळे, वादळ-वारा आणि अतिवृष्टीमुळे उद्भवणारे वीज संकटाचे धोके टाळण्यासाठी महावितरणने आतापासूनच व्यापक तयारी सुरू केली आहे. ज्याप्रमाणे मानवी शरीराला भविष्यातील आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी डॉक्टर आगाऊ तपासणी करतात,

महावितरणने या दुरुस्तीच्या कामांसाठी एक सविस्तर आणि नियोजित वेळापत्रक तयार केले आहे. या आराखड्यानुसार जिल्ह्यातील विविध भागांत दर बुधवारी देखभाल-दुरुस्तीच्या कामांवर विशेष भर दिला जाणार आहे. तथापि, कामाचा आवाका आणि निकड लक्षात घेता, गरज भासल्यास इतरही दिवशी ही कामे पूर्ण केली जातील. पूर्वनियोजित मोहिमेमुळे संपूर्ण वीज यंत्रणेची कार्यक्षमता वाढणार असून, ऐन पावसाळ्यात होणाऱ्या तांत्रिक बिघाडांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटण्यास मदत होणार आहे. या कामांच्या स्वरूपाचा विचार करता, संबंधित भागांतील वीजपुरवठा ठराविक काळासाठी खंडित ठेवणे अनिवार्य आहे, जेणेकरून तांत्रिक कर्मचारी सुरक्षितपणे आपली कामे पूर्ण करू शकतील. मान्सूनपूर्व कामांच्या या विस्तीर्ण आराखड्यात अनेक महत्त्वाच्या तांत्रिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने वृक्ष छाटणीवर भर दिला जात असून, वीजवाहिन्यांना स्पर्श करणाऱ्या किंवा वादळात धोकादायक ठरू शकणाऱ्या झाडांच्या फांद्यांची शास्त्रोक्त पद्धतीने छाटणी केली जात आहे. यंत्रणा सक्षमीकरणाच्या अंतर्गत जुन्या आणि गंजलेल्या वीजखांबांच्या जागी नवीन खांब बसवणे, सैल झालेल्या तारांमधील झोल काढून त्या घट्ट करणे आणि अत्यंत जुन्या झालेल्या वीजतारा बदलण्याची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

# विद्यापीठात क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ११ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती कार्यक्रम जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात ११ एप्रिल २०२६ रोजी पार पडला. सामान्य प्रशासन विभागाचे सहाय्यक कुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. अंकेक्षण विभागाचे प्रभारी अधीक्षक दिनेश दखणे यांच्यासह नितीन पालकर, मधुकर इंगोले, माधव इंगळे व अन्य कर्मचारी उपस्थित होते

# स्वच्छता अभियान १३ एप्रिलला

**नागपूर, दि. ११ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाच्या निमित्ताने अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमधून स्वच्छता अभियानाचे आयोजन १३ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वाजता रहाटे नगर टोली शताब्दी चौक, रिंग रोड रामेश्वरी नागपूर येथील मांग-गारूडी वस्तीत करण्यात आले आहे. या अभियानाच्या वेळी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त मंगेश वानखेडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानचे व्यवस्थापकीय संचालक सुरेन्द्र पवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुखदेव कौरती व इतर मान्यवर व सामाजिक न्याय विभागाचे कर्मचारी आणि स्थानिक राहिवासी उपस्थित राहणार आहेत. या स्वच्छता अभियानात नागरीकांनी स्वयंस्फुर्तीने सहभाग घ्यावा.

# अजिंक्य भारत
# आपलं अकोला

अकोला, रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com


## श्री शिवाजी महाविद्यालयात 'समता पर्व' उपक्रमाला प्रारंभ

**अकोला:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने 'समता पर्व २०२६' या पाच दिवसीय उपक्रमाचा शुक्रवारी प्रारंभ झाला. ध्वजारोहण, सेवार्थ पाणीपोई व व्याख्यानाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे होते. प्रमुख वक्ते विशाल नंदागवळी यांनी 'भाऊसाहेब देशमुख यांचे जीवन व कार्य' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा. सुरेशराव राऊत, अशोकराव देशमुख, डॉ. आशिष राऊत, डॉ. संजय पोहरे, डॉ. राजेश गीते आदी उपस्थित होते. डॉ. संजय तिडके यांनी प्रास्ताविक केले, ज्ञानेश्वरीने सूत्रसंचालन केले तर रोहन बुंदेले यांनी आभार मानले.





**शोभायात्रा** | क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती अकोलाच्या वतीने सिटी कोतवाली चौक येथून गांधी रोड मार्गे भव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेला मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ करून अशोक वाटिका येथे समारोप करण्यात आला.( छाया. संजय ताथुरकर )

# एमआयडीसीत तरुणाचा खून

## 'सिनेस्टाईल' पाठलाग करून रेल्वे स्थानकावरून आरोपी जेरबंद; थांबता थांबेना हत्याकांडाची शृंखला!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** जिल्ह्यात सुरू असलेल्या हत्याकांडाच्या मालिकेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच एमआयडीसी परिसरात आणखी एका तरुणाचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या २ तासांत 'सिनेस्टाईल' पाठलाग करून रेल्वे स्थानकावरून जेरबंद केल्याने घटनेला नाट्यमय वळण मिळाले. आठवडाभरात अर्धा डझन हत्यांच्या घटनांनी अकोला शहर हादरले असून ''खाकीवरील धाक संपला की काय?'' अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.


मृतक



एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, शिवणी येथे दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास ही भीषण घटना घडली. मृतक अभिषेक उर्फ बंटी रवींद्र गवई (२३) हा रात्री जेवण करून घराबाहेर पडला असताना जुन्या वादातून अयोग जीवन सावद (२०)रा. बहुजन नगर, शिवणी) व गणेश दयानंद सोनी (२०), रा. राहुल नगर, शिवणी) यांच्यासह इतर साथीदारांनी त्याच्यावर अचानक चाकूने सपासप वार केले.

गंभीर जखमी अवस्थेत अभिषेक घरी पोहोचण्याचा प्रयत्न करत होता; मात्र पोट व पाठीवर झालेल्या खोल जखमांमुळे काही क्षणातच त्याचा मृत्यू झाला. या घटनेने शिवणी परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन आरोपींची माहिती गोळा केली व दोन विशेष पथके तयार केली. तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे आरोपी रेल्वेने फरार होण्याच्या तयारीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलीस निरीक्षक शंकर शेळके व त्यांच्या पथकाने रेल्वे स्थानक परिसरात सापळा रचला. दरम्यान आरोपींना पोलीस दिसताच त्यांनी पळ काढत चालत्या रेल्वेत बसण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तत्परता दाखवत 'सिनेस्टाईल' पाठलाग करून रेल्वेत बसण्यापूर्वीच दोन्ही आरोपींना जेरबंद केले. या धाडसी कारवाईमुळे शहरात संभाव्य अप्रिय घटना टळल्याचे बोलले जात आहे. अटक आरोपींना पुढील कारवाईसाठी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, आयपीएस अधिकारी ईशान आनंद व त्यांचे सहकारी उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढविल्याची माहिती समोर आली आहे.

### आठवडाभरात अर्धा डझन हत्या;

अकोला जिल्ह्यात गेल्या आठवड्यात सलग अर्धा डझन हत्यांच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये मोठी भीती निर्माण झाली आहे. वारंवार घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांमुळे कायद्याची भीती कमी होत चालली आहे का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून शहरात कायदा व सुव्यवस्था अधिक कडक करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आरोपींनी प्राथमिक चौकशीत जुन्या भांडणाच्या कारणावरून खून केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे.

### आरोपी अटक होईपर्यंत अंत्यसंस्कार नाही

मृतकाचे वडील रवींद्र गवई यांनी संतप्त प्रतिक्रिया देत सांगितले की, ''माझा मुलगा जेवण करून बाहेर गेला होता. काही मुलांनी त्याच्यावर चाकूने हल्ला केला. तो गंभीर जखमी अवस्थेत घरी पोहोचला; मात्र त्याचा जीव वाचू शकला नाही. आरोपींना तात्काळ अटक झाली नाही, तर मी माझ्या मुलाचे अंत्यसंस्कार करणार नाही,'' असा इशारा त्यांनी दिला होता. त्यांच्या या भूमिकेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## महत्त्वाचे

### आरोग्य तपासणी शिबिर

**अकोला :** अमरनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी भाजपा व जिल्हा स्त्री रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट शिबिराचे आयोजन रविवार, १२ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने यांनी माहिती दिली की, माजी केंद्रीय मंत्री संजय धोत्रे यांनी सुरू केलेली ही परंपरा आमदार रणधीर सावरकर यांनी कायम ठेवली आहे. जिल्हा स्त्री रुग्णालयात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर होईल. यावेळी खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, माजी महापौर शारदा खेडकर, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अकोला जिल्ह्यातून दरवर्षी ५ हजारांहून अधिक भाविक यात्रेला जातात, त्यांच्या सुविधेसाठी गिरीश जोशी, अजय शर्मा व त्यांच्या टीमने हे नियोजन केले आहे.

### सौर ऊर्जा प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध


**अकोला :** मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्पाची उभारणी जिल्ह्यात ठिकठिकाणी होत आहे. या योजनेला मुख्यमंत्र्यांचे नाव असले तरी, प्रत्यक्षात खासगी कंपन्या काम करीत आहेत. या कंपन्यांना शासकीय अधिकाऱ्यांचे छुपं सहकार्य लाभत असल्याचा गंभीर आरोप करीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. यावेळी रघुनाथदादा पाटील प्रणीत शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. अकोला जिल्ह्यातील आडगाव बु. येथील गट क्र. २४५ मध्ये होणाऱ्या सौर प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांचा तीव्र विरोध आहे. ही जमीन ई-क्लास (गायरान) असल्याने ती कंपनीला अल्प दरात देण्यात आली आहे. या भागात भूजल पातळी आधीच खालावलेली असताना, जलसंधारण योजनेंतर्गत लाखो रुपये खर्चून तीन मोठ्या तलावांची निर्मिती करण्यात आली होती. या तलावांमुळे परिसरातील सिंचनाचा प्रश्न सुटला होता. मात्र, कंपनीने ताबा घेताच या तलावांचे पाणी बंद केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

## जिल्ह्यात जाणवले भूकंपाचे अतिसौम्य धक्के

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** अकोला मराठवाड्यात शनिवारी सकाळी भूकंपाचे धक्के जाणवल्याने अकोल्यातही ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८:५० च्या सुमारास काही भागात अतिसौम्य धक्के काहींना जाणवले. सुदैवाने यात कोणतेही नुकसान झाले नाही. राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता भूकंपाच्या धक्क्याची नोंद झाली असून, या धक्क्याची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ एवढी नोंदवण्यात आली आहे. याचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्याच्या उत्तरेला होता, असे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

यापूर्वी मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणीचा काही भाग सौम्य भूकंपाने हादरला होता. सहा ठिकाणी ५ धक्के बसले होते. अशातच शनिवारी ८ वाजून ४७ मिनिटांनी हिंगोली जिल्ह्यात भूकंप झाला. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवण्यात आली. नांदेड, परभणी परिसरातील काही भागात कंपने जाणवली. हा भूकंप १९.५३३ अक्षांश व ७७.२०२ रेखांश दरम्यान




जाणवला. दरम्यान अकोला जिल्ह्यात काही ठिकाणी भूकंपाचे अतिसौम्य धक्के जाणवले. सुदैवाने यात कोणतेही नुकसान नाही. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता भूकंपाच्या धक्क्याची नोंद झाली. हा धक्का सौम्य प्रकारचा होता. या धक्क्यामुळे अकोला जिल्ह्यात कुठलीही जीवित व वित्तहानी झाली नाही, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**या गावांमध्ये जाणवले धक्के**

खगोल अभ्यासकांच्या मते त्यांना गायगाव, चांदूरसह तेल्हारा तालुक्यातील काही भागात अतिसौम्य धक्के जाणवल्याची माहिती आहे. एक-दोन ठिकाणी घरातील भांडी पडली. मात्र या भांड्यांची रचना योग्य नसल्याने ते सौम्य धक्क्याने पडल्याचे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदवले.

## गॅस वितरण प्रणालीत सावळागोंधळ; बुकिंगविनाच मिळताहेत डिलिव्हरीचे संदेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** शहरातील घरगुती गॅस सिलिंडर वितरण प्रणालीमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि फसवणूक होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अनेक ग्राहकांना गॅस सिलिंडरचे बुकिंग न करताच डिलिव्हरी झाल्याचे संदेश प्राप्त होत आहेत, तर दुसरीकडे रीतसर बुकिंग करूनही प्रत्यक्षात सिलिंडर हातात पडत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, सिलिंडर मिळाला नसतानाही ग्राहकांच्या खात्यात ४.२१ रुपयांपर्यंतचे किरकोळ अनुदान जमा होत असल्याने या संपूर्ण प्रक्रियेतील पारदर्शकतेवर मोठे



प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात एचपीसीएलच्या एका गॅस एजन्सीशी संबंधित प्रकार उघडकीस आला आहे. एका ग्राहकाने कोणतेही बुकिंग केले नसताना त्याला सिलिंडर घरपोच मिळाल्याचा संदेश धडकला. याबाबत विचारणा केली असता, एजन्सीने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, ग्राहकाने तांत्रिक पुरावे सादर करताच तांत्रिक बिघाड असल्याचे कारण पुढे करत घाईघाईने दुसऱ्या दिवशी सिलिंडरची डिलिव्हरी करण्यात आली.

असाच प्रकार बीपीसीएल गॅस एजन्सीच्या बाबतीतही घडला आहे. येथे एका ग्राहकाने रीतसर सिलिंडर बुक केला होता, परंतु त्याला प्रत्यक्ष पुरवठा झालाच नाही. त्याऐवजी केवळ सिलिंडर मिळाल्याचा संदेश पाठवून प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दाखवण्यात आले. याप्रकरणी ग्राहकाने जिल्हा पुरवठा अधिकारी यन्नवार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनीही तांत्रिक त्रुटीचे कारण पुढे करत या गंभीर प्रकरणाकडे कानाडोळा केला. हेल्पलाईन कडूनही ग्राहकांना कोणतीही ठोस मदत मिळत नसल्याचे चित्र आहे.

## आता मालमत्ता करातूनच वसूल होणार घंटागाडीचे शुल्क!

### अकोलेकरांच्या खिशाला कात्री; सत्ताधाऱ्यांचा डाव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** शहरात आधीच वाढीव मालमत्ता करावरून संतापाचे वातावरण असताना, आता सत्ताधारी गटाने अकोलेकरांना आणखी एक धक्का देण्याची तयारी केली आहे. कचरा घंटागाडीची सेवा मोफत करण्याच्या विरोधी पक्षांच्या मागणीला केराची टोपली दाखवत, सत्ताधाऱ्यांनी हे शुल्क थेट मालमत्ता करात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार, १३ एप्रिल रोजी होणाऱ्या विशेष सभेत या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची दाट शक्यता असून, हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या ''समोरच्या खिशातून पैसे न काढता मागच्या खिशातून काढण्याचा डाव'' असल्याची टीका होत आहे.

काय आहे सध्याची स्थिती? सध्या शहरात गल्लीबोळातून कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीसाठी नागरिकांना दरमहा ५० रुपये शुल्क द्यावे लागते. हे पैसे थेट कंत्राटदाराकडे जातात,



शिवाय महापालिका देखील कंत्राटदाराला दरमहा २७ लाख रुपयांची देयके अदा करते. राज्यातील इतर अनेक महापालिकांमध्ये ही सेवा विनामूल्य दिली जाते. याच धर्तीवर अकोला महापालिकेनेही ही सेवा मोफत करावी, अशी मागणी काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि शिवसेना (उबाठा) या विरोधी पक्षांनी लावून धरली होती. मात्र, सत्ताधाऱ्यांनी ही मागणी फेटाळून लावत उलट हे शुल्क कराच्या स्वरूपात अनिवार्य करण्याचा मार्ग निवडला आहे. करांचा बोजा वाढणार या निर्णयामुळे आता नागरिकांनी घंटागाडीत कचरा टाकला किंवा नाही, तरीही त्यांना वर्षाकाठी ६०० रुपये मोजावेच लागणार आहेत. सध्या मालमत्ता कराची वसुली केवळ ४० ते ४२ टक्क्यांच्या घरात आहे. अनेक नागरिक घंटागाडीचे पैसे स्वतंत्रपणे देत नाहीत, मात्र आता हा शुल्क करात जोडला गेल्यामुळे कंत्राटदाराचा फायदा निश्चित मानला जात आहे. कंत्राटदार केवळ कचरा उचलणाऱ्या मालमत्तांचा आकडा महापालिकेला सादर करेल आणि त्या बदल्यात पालिकेकडून आपली रक्कम पदरात पाडून घेईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

अनेकाविध उपकरांची भरमार महापालिका आधीच नागरिकांकडून सामान्य कर, रस्ता कर, मलजल कर, अग्निशमन कर, पाणीपट्टी, शिक्षण कर, विशेष स्वच्छता कर आणि वृक्ष करासह विविध उपकरांची वसुली करते. आता या लांबलचक यादीत घंटागाडी सेवा कराची नवीन भर पडणार आहे. विरोधकांनी या मुद्द्यावर आयुक्तांना निवेदने देऊन आणि महासभेत आवाज उठवूनही सत्ताधारी आपल्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसत आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे सर्वसामान्यांच्या बजेटवर पुन्हा एकदा ताण येणार असून, सोमवारच्या विशेष सभेकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

**मागणी** | अनुसूचित जाती-जमाती आरक्षणात उपवर्गीकरण लागू करा

## हिंदू दलित संघाचा आग्रह; बैठकीत सविस्तर चर्चा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात उपवर्गीकरण लागू करण्याबाबत हिंदू दलित संघाची महत्त्वाची बैठक नुकतीच अकोला येथे संपन्न झाली. आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समान रीतीने पोहोचवण्यासाठी उपवर्गीकरण तातडीने लागू करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली.

काही राज्यांत अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणात वर्गीकरण करण्यात यावे, अशी मागणी होत असून यासाठी अनेकदा आंदोलनेही झाली आहेत. आरक्षणाचा फायदा त्या त्या प्रवर्गातील केवळ काही निवडक




जातींना झाला असून इतर अनेक जाती आजही उपेक्षित राहिल्या आहेत, असा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या पार्श्वभूमीवर, स्थानिक शासकीय विश्रामगृहामध्ये ही बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संजय धनाडे होते. हिंदू दलित संघाचे उपाध्यक्ष उमेश लखन यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, ''गरीब घटकांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक फायदे मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे. ज्यांनी आजवर आरक्षणाचा लाभ घेतला नाही, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने याची त्वरित अंमलबजावणी करावी.''

याप्रसंगी संघाचे सरचिटणीस गवई पाटील यांनी राष्ट्रीय चर्मकार संघानेही या लढ्यात सहकार्य करावे, असे आवाहन केले. बैठकीत वाल्मिकी समाजाचे चौधरी गुरुजी सारवान यांचा अयोध्या येथील श्रीराम मंदिरात गर्भगृहाच्या चौकटीचे प्रथम पूजन केल्याबद्दल गौरव करण्यात आला. यावेळी सतपाल एललकार, आकाश सावते व इतर पदाधिकारी उपस्थित होते. संघाचे प्रचारक बाळकृष्ण गायकवाड यांनी आरक्षणाविषयी विस्तृत माहिती दिली. जिल्हा प्रचारक बाळासाहेब गायकवाड यांनी कार्यक्रमाचे संचालन केले व आभार मानले.

### निवेदनाच्या माध्यमातून करणार पाठपुरावा

उपवर्गीकरणाचा लढा केवळ एका जातीचा नसून, तो आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी आहे, असे आवाहन हिंदू दलित समाजातील सर्व जातींना करण्यात आले. राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली या विषयासाठी समिती गठीत केली आहे. या समितीला जास्तीत जास्त संघटनांनी निवेदने देऊन उपवर्गीकरण प्रक्रिया जलद सुरू करण्याची मागणी करावी, असे बैठकीत ठरले. जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत संघटित राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## तिक्ष्णगत सोसायटी व अजिंक्य भारततर्फे महात्मा फुले यांना अभिवादन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ११ :** येथील तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेलफेअर सोसायटी आणि अजिंक्य भारत यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचे स्मरण करत अभिवादन करण्यात आले.

तिक्ष्णगत सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार आणि जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या नेतृत्वात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेलफेअर सोसायटीच्या कार्यालयात अभिवादन सभेचे आयोजन करण्यात




आले होते. समाजात शिक्षणाची गंगा पोहोचवणारे आणि समतेचा विचार रुजवणारे महापुरुष म्हणून महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर यावेळी प्रकाश टाकण्यात आला.

या कार्यक्रमाला तिक्ष्णगत सोसायटी आणि अजिंक्य भारतचे पदाधिकारी तसेच सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''महात्मा फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजकार्य करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल,'' असा सूर या प्रसंगी व्यक्त करण्यात आला. यावेळी राजू चोरपगार, श्वेता शिरसाट, सपना, साक्षी, यश साळवे, भीमा, भारत, प्रवीण वानखडे, प्रतीक, यश मोटे, योगेश, गौरव आदींसह तिक्ष्णगत सोसायटी आणि अजिंक्य भारतचे सदस्य उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### प्रा. तृप्ती इंगळे यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार



**अकोट :** तेल्हारा येथील डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालयात ९ एप्रिल रोजी पार पडलेल्या होरायझन २०२६ या आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषदेत स्थानिक सेंट पॉल्स ज्युनियर कॉलेजच्या प्राध्यापिका तृप्ती चौरे-इंगळे यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांना या परिषदेत सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्काराने गौरविण्यात आले. रोख रक्कम, गौरवचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
त्यांनी ग्रीन केमिस्ट्री फॉर सस्टेनेबल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट : रिसेंट ॲडव्हान्सेस अँड फ्युचर या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. त्यांच्या या सखोल संशोधनाची दखल घेत निवड समितीने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लुनकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, प्रा. नीलिमा देशमुख, पर्यवेक्षक अभिजित मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, वैशाली गावत्रे व शिक्षकवृंदाने त्यांचे अभिनंदन केले आहे.

### अकोल्यात भव्य 'भार्गव दर्शन यात्रा' दाखल

**अकोला :** श्री परशुराम प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'भार्गव दर्शन यात्रा'चे यंदा १२ वे वर्ष असून, ही यात्रा रविवारी, १२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता अकोल्यात दाखल होत आहे. अकोल्यातील जानोरकर मंगल कार्यालय येथे यात्रेचे आगमन होणार असून, या सोहळ्यासाठी भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे.
या यात्रेत अहिल्यानगर येथून सुमारे १७० भाविक सहभागी झाले आहेत. यात्रेच्या भव्य स्वागतासाठी अकोल्यातील संत तुकाराम हॉस्पिटल चौक येथे सायंकाळी ६:३० वाजता जय्यत तयारी करण्यात आली आहे. या स्वागत सोहळ्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी व भाविकांनी एकत्र यावे, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, अकोला शाखेचे अध्यक्ष श्यामजी कुलकर्णी, संयोजक प्रा. कुशल विजय सेनाड तसेच सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे. यात्रेच्या माध्यमातून भार्गव संस्कृतीचे दर्शन घडणार असून, अकोलेकरांनी या भक्तिमय सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता

### जाईबाई मोहोड



**अकोला :** येथील रणपिसे नगर येथील रहिवासी जाईबाई आनंदराव मोहोड यांचे शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ३:३० वाजताच्या सुमारास दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन सुना, चार नातवंडे व बराच मोठा आप्तपरिवार आहे. आपल्या प्रेमळ आणि मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांचा मोठा मित्रपरिवार असून, त्यांच्या निधनाने मोहोड परिवारावर शोककळा पसरली आहे.

# अकोट नगरपालिकेच्या उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिका निलंबित!

## शालेय पोषण आहाराचा गैरव्यवहार अन् वर्तणुकीचा ठपका; मुख्याधिकाऱ्यांचा दणका

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**अकोट : दि.११ :** शालेय व्यवस्थापन समितीने केलेल्या गंभीर तक्रारी आणि प्राथमिक चौकशीत समोर आलेली अनियमितता लक्षात घेता, अकोट नगर परिषद उर्दू शाळा क्रमांक २ च्या प्रभारी मुख्याध्यापिका नाजेमाखातून मुर्तुजाखान यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी ९ एप्रिल २०२६ रोजी हा निलंबनाचा आदेश पारित केला.



> शाळा व्यवस्थापन समितीच्या प्राप्त तक्रारीवरून प्राथमिक चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. निष्पक्ष चौकशीसाठी संबंधित मुख्याध्यापिकेला सक्तीच्या रजेचा आदेश दिला होता, मात्र त्यांनी त्याचे उल्लंघन केले. चौकशी अहवाल आणि कार्यालयीन शिस्तभंगाच्या कारणावरून ९ एप्रिल रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
> **- शशिकांत बाबर,** मुख्याधिकारी, नगर परिषद अकोट.

शाळा व्यवस्थापन समितीने मुख्याध्यापिकांविरुद्ध तक्रारीचा पाढाच मुख्याधिकाऱ्यांकडे वाचला होता. यामध्ये त्या शाळेत वेळेवर न येणे, पालक व विद्यार्थ्यांशी असभ्य भाषेत वर्तन करणे, शालेय पोषण आहाराचे साहित्य घरी नेणे आणि किचन शेड दुरुस्तीच्या नावाखाली निधीचा अपहार करणे, अशा गंभीर आरोपांचा समावेश होता. या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने ३० मार्च रोजी प्राथमिक चौकशी समिती गठीत केली होती.
चौकशी प्रक्रिया निष्पक्ष व्हावी, यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी नाजेमाखातून यांना सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश दिले होते. मात्र, पदाचा मोह न सुटल्याने त्यांनी कार्यभार सोपवण्यास नकार देऊन वरिष्ठांच्या आदेशाची पायमल्ली केली. हे वर्तन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारे असून, बेजबाबदारपणाचा कळस असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. अखेर शिस्तभंगाच्या कारवाईअंतर्गत त्यांना तात्काळ प्रभावाने सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
समितीने दिलेल्या तक्रारीनुसार, मुख्याध्यापिकांचा शाळेवर कोणताही अंकुश नव्हता. पोषण आहारातील पूरक आहार विद्यार्थ्यांना मिळत नव्हता, तर खिचडी बनवणाऱ्या कर्मचाऱ्यांना विनाकारण त्रास दिला जात होता. मी महिला असून माझे कोणी काही वाकडे करू शकत नाही, अशा धमक्या त्यांनी समितीला दिल्याचेही निवेदनात म्हटले होते. प्रशासनाने कारवाई न केल्यास शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा अध्यक्ष रमजान शाह, उपाध्यक्ष सरफराज बेग, अतहर हुसेन व इतर सदस्यांनी दिला होता.

# शिर्ला येथील ग्रामविकास अधिकारी निलंबित

## अनियमिततेचा ठपका; अकोला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कारवाई

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**पातूर : दि.११ :** कर्तव्यात हलगर्जीपणा आणि नियमांचे उल्लंघन केल्याच्या गंभीर आरोपावरून पातूर पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या शिर्ला येथील ग्रामविकास अधिकारी दिलीप शा. वाहोकार यांना निलंबित करण्यात आले आहे. अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली असून, या निर्णयामुळे जिल्ह्यात खळबळ माजली आहे.
दिलीप वाहोकार यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे उल्लंघन केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. त्यांच्यावर आशा स्वयंसेविका भरती प्रक्रियेत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणे आणि वरिष्ठांच्या आदेशांची पायमल्ली केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. तसेच ग्रामपंचायतीत आधीच ३ ग्राम रोजगार सेवक कार्यरत असताना,




नियमबाह्य पद्धतीने आणखी ७ नवीन सेवकांची नियुक्ती करण्यासाठी चुकीचा ठराव मंजूर केल्याचा गंभीर आरोपही त्यांच्यावर आहे.
या कारणांमुळे त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अन्वये तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. निलंबन काळात वाहोकार यांचे मुख्यालय बार्शीटाकळी पंचायत समिती येथे निश्चित करण्यात आले असून, त्यांना परवानगीशिवाय मुख्यालय सोडण्यास आणि खाजगी व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# सावरा आरोग्य केंद्रात लसीकरणाचा जागर; कर्करोगमुक्तीसाठी मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## कवठा बु. येथील पालकांचा पुढाकार; अपप्रचाराला झुगारून लसीकरणावर भर



> सध्या सावरा केंद्रांतर्गत सर्व गावांतील पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही लस कर्करोगापासून बचावासाठी वरदान आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षित आहे.
> **- डॉ. वैशाली पारसकर** (वैद्यकीय अधिकारी, सावरा)

> काही अफवांमुळे पालकांमध्ये भीती होती, परंतु डॉक्टरांच्या मार्गदर्शनानंतर मी माझ्या मुलीचे लसीकरण करून घेतले. पालकांनी अफवांवर विश्वास न ठेवता मुलींचे आरोग्य सुरक्षित करावे.
> **- गोपाल सु. साविकर** (पालक, कवठा बु.)

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**कवठा बु. : दि.११ :** गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून मुलींचे संरक्षण करण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेला सावरा प्राथमिक आरोग्य केंद्रात उत्साहात सुरुवात झाली आहे. विशेषतः कवठा बु. येथील १४ ते १५ वयोगटातील मुलींनी आणि त्यांच्या पालकांनी या मोहिमेत मोठ्या प्रमाणात सहभागी होत एक नवा आदर्श निर्माण केला आहे.
ग्रामीण भागात या लसीबाबत समाजमाध्यमांतून काही चुकीचा अपप्रचार झाला होता, ज्यामुळे पालकांमध्ये काहीसा संभ्रम होता. मात्र, आरोग्य विभाग आणि सुजाण नागरिकांच्या प्रयत्नांमुळे हा संभ्रम दूर झाला आहे. कवठा बु. येथील पत्रकार राजेश साविकर यांनी स्वतःच्या मुलीला लस देऊन या मोहिमेत पुढाकार घेतला, ज्याचे कौतुक आरोग्य विभागाने केले आहे.
त्यांच्या प्रेरणेतून गुरुवारी गावातील १० ते १२ मुलींनी सावरा येथे जाऊन या मोफत लसीकरणाचा लाभ घेतला.
ही लस पूर्णपणे सुरक्षित असून गर्भाशयाच्या कर्करोगाला रोखण्यासाठी ८० टक्क्यांपर्यंत प्रभावी आहे. खासगी रुग्णालयात ही लस महागडी असली तरी सरकारी रुग्णालयात ती मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. सावरा आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली पारसकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीपणे राबवली जात आहे.

# अकोटच्या श्री शिवाजी महाविद्यालयात ३७ निराधार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**



**अकोट : दि.११ :** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे खऱ्या अर्थाने महान शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी ज्ञानाचा दीप प्रज्वलित करून शिक्षणातून समाज परिवर्तनाची क्रांती घडवून आणली, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. अशोक इंगळे यांनी केले.
स्थानिक श्री शिवाजी महाविद्यालय येथील पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिन आणि समता सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मातृ-पितृ छत्र हरविलेल्या ३७ निराधार विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील पांडे होते. त्यांनी भाऊसाहेबांच्या कृषी, अर्थव्यवस्था आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेत महामानवांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले. यामुळे विद्यार्थ्यांचे जीवन संस्कारमय होऊन ते ज्ञानाचे शिखर सहज गाठू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी दुसरे प्रमुख वक्ते डॉ. संतोष कायंदे यांनी संविधान सभेतील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती दिली. तसेच संगीत विभागात राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या कु. गौरी मालठणकर, अमर कतोरे, अजय हागे, कु. ईश्वरी इंगळे आणि कु. आचल सरदार या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. अनिल अंबलकार यांनी केले. डॉ. अशोक इंगळे लिखित कवितेचे वाचन करून भाऊसाहेबांना अभिवादन करण्यात आले. आभार अनुज सिरस्कार यांनी मानले. तांत्रिक सहाय्य किशोर लाधे यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जानोरी मेळ येथे 'छत्रपती ते घटनापती' व्याख्यानाने प्रबोधन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजन; गुणवंतांचा झाला सत्कार

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**जानोरी मेळ: दि.११ :** निंबा सर्कल अंतर्गत येत असलेल्या जानोरी मेळ येथील धम्म उदय बुद्ध विहार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवाचे औचित्य साधून 'छत्रपती ते घटनापती' या वैचारिक प्रबोधन वारीचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत १० एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथील युवा व्याख्याते गुड्डू तायडे यांचे व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.
कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध, माता रमाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाली. या प्रसंगी कृषी अधिकारी उद्धवरावजी धुमाळे, व्याख्याते गुड्डू तायडे, प्रकाश धुमाळे, जीवन परघरमोर, स्वप्नील परघरमोर, देवराव परघरमोर आदींची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी महाराष्ट्र शासनाचा 'तिफन पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल उद्धवरावजी धुमाळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र सुरक्षा रक्षक दलात नियुक्ती झाल्याबद्दल वैभव संदीप परघरमोर आणि फॉरेन्सिक डिपार्टमेंटमध्ये निवड झाल्याबद्दल स्वप्नील विनोद परघरमोर यांचाही ग्रामस्थांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.
व्याख्याते गुड्डू तायडे यांनी आपल्या मार्गदर्शनात छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा उलगडून दाखवला. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती केवळ नाचून नाही, तर वाचून साजरी करा,'' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. प्रबोधनकार अनिकेत तायडे यांनीही विविध विषयांवर प्रकाश टाकला.
कार्यक्रमाला भन्ते दीपरत्न यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी उपस्थित जनसमुदायाला आशीर्वाद गाथा दिली. धम्म उदय बुद्ध विहार समिती व जानोरी मेळ ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन समितीचे सचिव तथा पत्रकार देवराव परघरमोर यांनी केले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्गदर्शन

### प्रा. विठ्ठल कांगणे यांचा मूर्तिजापुरात एल्गार; स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांचा महासागर

# अपयश हीच यशाची पहिली पायरी; खचून न जाता जिद्दीने लढा!

**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**मूर्तिजापूर : दि.११ :** ''स्पर्धा परीक्षेत येणारे अपयश हे अंतिम नसते, तर तो यशाचा मार्ग सुकर करणारा अनुभव असतो. अपयशाकडे नकारात्मक दृष्टीने न पाहता, त्यातून धडा घेऊन पुन्हा नव्या जोमाने उभे राहण्याची जिद्द बाळगली, तर यश तुमचेच असेल,'' असे प्रेरणादायी प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. विठ्ठल कांगणे यांनी केले.



मूर्तिजापूर येथे आयोजित स्पर्धा परीक्षा आणि आजचा विद्यार्थी या विषयावरील व्याख्यानात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण व आरोग्य सभापती माया नाईक होत्या, तर उद्घाटन संजय नाईक यांच्या हस्ते झाले.
प्रा. कांगणे यांचे व्याख्यान ऐकण्यासाठी मूर्तिजापूरसह परिसरातील हजारो विद्यार्थ्यांनी विक्रमी गर्दी केली होती. सभागृह अपुरे पडल्याने शेकडो विद्यार्थ्यांनी उभे राहून व्याख्यानाचा लाभ घेतला.
यावेळी कांगणे यांनी अभ्यासातील सातत्य, वेळेचे नियोजन आणि डिजिटल युगातील आव्हाने यावर सविस्तर प्रकाश टाकला. ''माहितीच्या महापुरात योग्य ज्ञान निवडण्याची क्षमता विकसित करा,'' असा कानमंत्रही त्यांनी दिला.

> **कांगणे सरांचा सक्सेस मंत्र**
> » स्पर्धा परीक्षेची तयारी करताना केवळ पुस्तकी कीडा न होता, मानसिक कणखरता जपण्याचा सल्ला प्रा. विठ्ठल कांगणे यांनी दिला. ''सोशल मीडियाचा वापर अभ्यासासाठी करा, वेळ वाया घालवण्यासाठी नाही. तुमची आजची शिस्तच उद्याचे तुमचे भविष्य ठरवेल,'' हा त्यांचा विचार विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवून गेला.

यावेळी शासकीय सेवेत निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात माया नाईक यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संचालक रवि गोंडकार यांनी केले. सूत्रसंचालन अंबेचरण ननीर यांनी उत्कृष्ट प्रकारे केल्याने कार्यक्रमात रंगत आली. याप्रसंगी प्रा. गजानन वर्घट, ज्ञानेश टाले, वंचितचे तालुकाध्यक्ष सुनील सरदार, नगरसेविका शुभांगी सरनाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पातूर तालुका पशुवैद्यकीय दवाखान्याला कुलूप; बळीराजा वाऱ्यावर!

## वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही प्रशासनाला पाझर फुटेना; प्रभारी राजामुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात




**अजिंक्य भारत । प्रतिनिधी**

**पातूर : दि.११ :** शासनाच्या उदासीन धोरणामुळे पातूर येथील तालुका पशुवैद्यकीय दवाखान्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या दवाखान्याला नेहमीच कुलूप लटकलेले राहत असल्याने, आजारी जनावरांना उपचारासाठी आणणाऱ्या पशुपालकांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे. प्रशासकीय अनास्थेमुळे शेतकऱ्यांवर खाजगी डॉक्टरांकडून महागडे उपचार करून घेण्याची वेळ आली असून, यामुळे त्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे.
पातूर येथील या दवाखान्यात दीर्घकाळापासून स्थायी पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे पद रिक्त आहे. सध्या एका प्रभारी अधिकाऱ्याकडे सोमवार आणि गुरुवारची जबाबदारी सोपवण्यात आली आहे; मात्र हे अधिकारीदेखील विहित दिवशी उपस्थित राहत नसल्याचा आरोप पशुपालक करत आहेत. काही महिन्यांपूर्वी नवीन नियुक्ती झाल्याची चर्चा होती, मात्र अद्यापही कोणताही अधिकारी प्रत्यक्ष सेवेत रुजू झालेला नाही. परिणामी, दुर्गम भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना दवाखान्याच्या प्रवेशद्वारावरूनच माघारी फिरावे लागते. दवाखान्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर नेहमीच एक ठरलेला सूचना फलक पाहायला मिळतो. त्यावर ''ऑफिसच्या कामकाजासाठी दवाखाना बंद राहील'' असे लिहिलेले असते. वारंवार असे कोणते कार्यालयीन काम असते, ज्यामुळे दवाखाना दीर्घकाळ बंद ठेवावा लागतो? असा संतप्त सवाल पशुपालकांनी उपस्थित केला आहे. दै. अजिंक्य भारत ने यापूर्वीही अनेकदा हा प्रश्न लावून धरला होता, परंतु वरिष्ठ स्तरावर याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

**खाजगी डॉक्टरांची चांदी!:**
सरकारी दवाखाना बंद राहत असल्याने खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांचे फावले आहे. हतबल झालेल्या शेतकऱ्यांना हजारो रुपये खर्च करून खाजगी उपचार करावे लागत आहेत. जिल्हा पशुसंवर्धन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ स्थायी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
अकोला, रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com


# डीबीझेड सौर ऊर्जा कंपनीकडून कराराने शेती घेतलेल्यांना डावलत दुसऱ्यांनाच रोजगारात प्राधान्य

## महसूल प्रशासनाकडे हस्तक्षेपाची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मानोरा, दि. ११ :** तालुक्यातील तीर्थक्षेत्र अमरगड (वाई गौळ) परिसरामधील काही शेतकऱ्यांची शेती करार पद्धतीने सौर ऊर्जा प्रकल्पासाठी घेतलेल्या कंपनी प्रशासनाने कंपनी मध्ये निर्माण झालेल्या रोजगारासाठी ज्या शेतकरी कुटुंबातील शेती घेतली आहे अशा शेतकरी कुटुंबातील सुशिक्षित तरुणांना कंपनीत निर्माण झालेल्या रोजगारामध्ये सामावून घेण्यासंदर्भात हस्तक्षेप करण्याची मागणी तालुका आपत्ती निवारण प्राधिकरणाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मानोरा तहसीलदार कार्यालयात तीर्थक्षेत्र अमरगड येथील ज्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील शेती उपरोक्त सौर ऊर्जा प्रकल्प चालू केलेल्या कंपनी प्रशासनाला देण्यात आली आहे त्या कुटुंबातील सुरज रमेश जाधव आणि जाधव सह इतर नऊ बेरोजगारांच्या वतीने लेखी निवेदन देऊन उपरोक्त मागणी करण्यात आली आहे.

अमरगडमधील शेतकऱ्यांची शेती उपरोक्त सौर ऊर्जा प्रकल्पासाठी करार पद्धतीने घेण्यात येत असताना कंपनीकडून नियुक्त मध्यस्थाने सौर ऊर्जा प्रकल्पामध्ये जे काही रोजगार निर्मिती होतील त्यामध्ये अमरगड (वाई गौळ) येथील करार पद्धतीने शेती देणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील शिकलेल्या मुलांना प्राधान्यक्रम दिला जाईल असे तोंडी आश्वासन देण्यात आले होते.

कंपनीकडून नेमलेल्या मध्यस्ताच्या आश्वासनाला डीबीझेड कंपनी प्रशासन वाटाण्याच्या अक्षता लावून तीर्थक्षेत्र अमरगड (वाई गौळ) ला बगल देऊन इतर गावातील तरुणांना बोलावून येथे रोजगार देत असल्याचा आक्षेप शेती दिलेल्या शेतकरी कुटुंबातील तरुणाच्या वतीने लावण्यात आला आहे.

काही शेतकरी कुटुंबातील संपूर्ण शेती या सौर ऊर्जा प्रकल्पाला करार पद्धतीने देण्यात आली असून ज्याची किरकोळ जमीन या प्रकल्पामध्ये करार पद्धतीने घेण्यात आली आहे अशांना प्राधान्य देऊन सौर ऊर्जा प्रकल्प प्रशासन अन्याय करीत असल्यामुळे करार करणाऱ्या दलाला मार्फत कंपनी प्रशासनाला त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शेती गेलेल्या कुटुंबातील धीरज जाधव, मोहित ईश्वर जाधव, पांडुरंग वामन जाधव, ऋत्विक सुरेश राठोड, अमोल भाऊराव राठोड, संतोष केशव राठोड, अविनाश उमला जाधव आणि नितीन उमला जाधव या सुशिक्षित बेरोजगारांना या प्रकल्पात रोजगार देताना प्राधान्य देण्यात येण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदार कार्यालय मानोरा येथे देण्यात आले आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर संपन्न



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. ११ :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कारंजा येथील छत्रपती शिवाजी नगर, हनुमान मंदिर येथे जय आसरा माता एजन्सी, उद्धव बाबा ट्रेडर्स व प्रगत मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर रक्तदान शिबिराला प्रारंभ झाला. या शिबिरात एकूण ३० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले. सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कांतादेवी डाळे ब्लड बँक, वाशिम तसेच राजू ठोसरे, विजय गागरे, प्रगत मीत्र मंडळ, आशीष मालखेडे, गजानन राजगुरे, नारायण काटकर, पांडुरंग गव्हाळे, महादेव अंबाळकर, प्रल्हाद पानझाडे, रविंद्र इंगळे, योगेश मालखेडे, अमोल गोडवे, ज्ञानेश्वर अंबळकर, यदुनाथ राजुस्कर, गणेश चंद्रशेखर, गौतम सावळे, विशाल कांबळे, गणेश गडकर आदींनी अथक परिश्रम घेतले. सदर उपक्रमामुळे गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, सामाजिक कार्यात अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

## महत्त्वाचे

### भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेची प्रत भेट




**मंगरुळपीर :** मंगरुळपीर शहरातील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्याचा आगळ्या वेगळ्या पध्दतीने वाढदिवस साजरा करण्यात आला. नविन सोनखास मंगरूळपीर येथील स्वामी विवेकानंद इंग्लीश स्कुलमध्ये ईयत्ता पहिली मध्ये शिकणारा विद्यार्थी अर्णव गणेश रासकर यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना संविधानाची उद्देशिका प्रत देवुन व उद्देशिकेचे वाचन करून साजरा करण्यात आला. वाढदिवस कार्यक्रमाच्या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका निलीमा मुंढरे, सारिका नाकाडे,तेजस्वी इंगळे, प्रियंका डुबुले, वैशाली खिराडे, छाया गावंडे,मुटगुळे,संगत ताई तसेच विद्यार्थ्याचे पालक व शाळेत इतर विद्यार्थी व बार्टीच्या मंगरूळपीर तालुका समतादुत श्वेता राऊत उपस्थित होत्या.

### विविध कार्यक्रमाचे आयोजन; कोंडोलीवाशी यांना नगर भोजन

**कोंडोली :** येथील श्रद्धावंत बौद्ध विहाराच्या व रमाई महिला मंडळ व पंचशील नवयुवक मंडळाच्या वतीने सालाबादा प्रमाणे याही वर्षी दि १४ एप्रिलला महात्मा ज्योतिबा फुले, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे ठरविण्यात आले आहे यावेळी दि १३ एप्रिलला सकाळी नगर भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक १४ एप्रिल ला डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य मिरवणूकीचे आयोजन ही सालाबादाप्रमाणे करण्यात आले आहे. मानोरा तालुक्यात कोंडोली गावात सिस्तबद्य पद्धतीने निघणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीची तयारी मोठया उत्साहात करण्याचे ठरविण्यात आले आहे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्य होणाऱ्या १४एप्रिल ला नगर भोजनाचा व १४ एप्रिल ला भव्य मिरवणुकीत सामील होण्याचे आव्हान श्रद्धावंत बौद्ध विहाराच्या व रमाई महिला मंडळ व पंचशील नवयुवक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### त्रिवेंद्रम येथील क्रीडा स्पर्धेत वाशीमच्या चमूची उत्कृष्ट कामगिरी

**वाशीम :** त्रिवेंद्रम येथे नुकत्याच पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत वाशीम येथील क्रीडा चमुने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून आयोजक व प्रेक्षकांची वाहवा मिळवली. यावेळी माजी सैनिक गोविंद व्यवहारे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र मास्टर्स ॲथलेटिक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत येथील चमुने ४६ व्या राष्ट्रीय मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये केरळची राजधानी तिवेंद्रम येथे सुद्धा क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. या क्रीडा चमूमध्ये शिंदे, रविंद्र नप्ते, रामदास उखळे, राहुल व्यवहारे, सतिष व्यवहारे व गोविंद व्यवहारे यांचा समावेश होता. या चमुस वाशीम येथील जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी मार्गदर्शन करून खेळाडूंचा उत्साह वाढवीला. त्रिवेंद्रम येथे पाच दिवस या क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व खेळाडूंनी आपापल्या क्रीडाप्रकारात विशेष कामगिरी करून वाशीम जिल्ह्याचे नाव उंचावले. माजी सैनिक गोविंद व्यवहारे यांनी यापुर्वी सुद्धा विविध क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवून स्वतःच्या व जिल्ह्याच्या लौकिकात भर घातली. या कामगिरीबद्दल वाशीमच्या चमुचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेतकऱ्यांचा शेती बटई, ठोका पध्दतीने देण्याकडे वाढता कल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ११ :** नैसर्गिक संकटांचा वाढता मारा, शेतीमालाला मिळणारे अल्प भाव आणि वाढता उत्पादन खर्च, यामुळे शेती आधीच संकटात सापडली असतांना आता शेतकऱ्यांपुढे सालगड्याच्या टंचाईचे नवे संकट उभे ठाकले आहे. शेतात काम करण्यासाठी सालगडी शोधूनही मिळत नसल्याने शेतकरी हैराण झाले आहेत. एखादा गडी मिळालाच तर तो वर्षाला तब्बल दीड ते पावनेदोन लाखांचे पॅकेज मागत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आसल्याने आनेक शेतकऱ्यांनी शेती बटई किंवा ठोका पध्दतीने देण्याकडे कल वाढला आहे.

यंदा खरीप हंगामातील पिकांना अपेक्षीत भाव मिळाला नाही अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पीके हातचे गेले आहेत. त्यामुळे शेती व्यवसाय करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. सालगड्यांना वाढत्या महागाईमुळे व वाढत्या अपेक्षांमुळे दर आकारल्या शिवाय गत्यंतर नाही. महागाईमुळे अन्न, वस्त्र, निवारा या सारखे प्रश्न सोडवणे कठीण बनले आहे. त्यात काही चैनीच्या वस्तू खरेदी कराव्या लागतात. यामुळे नित्याचे जीवन जगणे कठीण झाले आहे. त्यात भरीस भर म्हणून कापूस आणि सोयाबीनच्या पिकांना समाधानकारक भाव न मिळाल्याने व उत्पादनात घट झाल्याने मोठा फटका सहन करावा लागला आहे. गुढीपाडवा नंतर सालगडी ठेवुन त्याचा हिशोब देत होते गुडीपाडवा होऊन महिना लोटत आहे तरी शेतकरी सालगड्याच्या शोधात आहेत. सध्या शेतकऱ्यांना सर्वात मोठा प्रश्न सध्या सालगड्यांचा भेडसावत आहे. राहण्यासाठी जागा तसेच वार्षिक मानधन म्हणून १ लाख पन्नास हजार ते १ लाख सत्तार हजार रूपये सालगड्यांना देण्यात येतात. अनेक ठिकाणी सालगडी परवडत नसल्याच्या कारणाने शेती बटईद्वारे किंवा ठोका पध्दतीने शेती दुसऱ्यांना कसण्यासाठी दिली जात आहे.

## खरीप हंगामात शेतकऱ्यांना फटका; खतांचे दर १०० ते ३०० रुपयांनी वाढले!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि. ११ :** जागतिक युद्धाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या मालाच्या आयात धोरणाच्या परिणामामुळे खतांच्या किमतीत झालेल्या अचानक वाढीमुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

१ एप्रिलपासून विविध खतांच्या दरात १०० ते ३०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली असून, याचा थेट परिणाम खरीप हंगामाच्या तयारीवर होत आहे. आधीच अवकाळी पावसामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही दरवाढ आणखी एक मोठा फटका ठरत आहे. स्थानिक बाजारात मिश्र खतांच्या दरात वाढ दिसून येत आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, उत्पादन खर्च वाढत असताना शेतीमालाला अपेक्षित दर मिळत नाहीत त्यामुळे खतांच्या वाढलेल्या किमतीमुळे शेती करणे अधिकच कठीण होत चालले आहे.जागतिक बाजारातील परिणाम खतांच्या किमतीवर झाला आहे मात्र, यावर शासनाने नियंत्रण ठेवून शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक आहे. दरम्यान,मंगरुळपीर तालुक्यातील शेतकऱ्यांनी खतांच्या दरवाढीवर नाराजी व्यक्त करत आहेत. शेतकऱ्यांना गरजेची नसलेली दुय्यम खतेसुद्धा खत कंपन्या कृषी केंद्रधारकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. खतांवरील लिंकिंग ही कृषी केंद्रधारकांना व शेतकऱ्यांना सुद्धा महागाईत ढकलणारी आहे. वारंवार लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनाच्या कानावर विषय घातला असूनसुद्धा अजूनपर्यंत तरी लिंकिंगला शासन स्तरावरून विरोध होताना दिसत नाही.खरीप हंगाम तोंडावर असतांना ही वाढ झाल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. खत जुन्याच दरात जुना साठा विक्रीला उपलब्ध आहे. मात्र, नव्या आर्थिक वर्षात अर्थात १ एप्रिलपासून नव्याने खरेदीच्या खताच्या किमतीत वाढ झालेली आहे. परंतु, अजूनपर्यंत कोणत्या खत कंपनीने किती रुपयाची दरवाढ झाली हे अधिकृतपणे कळिवलेले नाही. युरिया खतसुद्धा जुन्याच किमतीत असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे.

## महाराजस्व समाधान शिबिरांना प्रतिसाद; सहाही तालुक्यांमध्ये यशस्वी आयोजन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**वाशिम, दि. ११ :** नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारी व अडचणींचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने दि.१० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांना' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जिल्ह्यातील सर्व सहाही तालुक्यांमध्ये प्रत्येकी एका मंडळ स्तरावर ही शिबिरे प्रभावीपणे राबविण्यात आली.या उपक्रमांतर्गत वाशिम तालुक्यातील वारला व केकतउमरा, कारंजा तालुक्यातील हिवरा लाहे, मंगरूळपीर तालुक्यातील शेलू, मानोरा तालुक्यातील कुपटा, मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे तसेच रिसोड तालुक्यातील बाळखेड मंडळ क्षेत्रात शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सर्व ठिकाणी शिबिरे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. प्रामुख्याने ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, वारस नोंद, नामांतरण, उत्पन्न व रहिवासी दाखले, जात प्रमाणपत्र, तसेच इतर प्रलंबित प्रकरणांबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले. अनेक नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपल्या समस्या थेट अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

शिबिरांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन करत होते. काही प्रकरणांचे जागेवरच निराकरण करण्यात आले, तर उर्वरित प्रकरणे निश्चित कालमर्यादेत निकाली काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

या उपक्रमामुळे नागरिकांना शासकीय कार्यालयांचे फेरे मारण्याची गरज कमी झाली असून सेवा अधिक सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध झाल्याचे समाधान नागरिकांनी व्यक्त केले. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी हा उपक्रम विशेषतः उपयुक्त ठरला.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने अशा प्रकारची शिबिरे भविष्यातही नियमितपणे आयोजित करून नागरिकांना अधिकाधिक सेवा घराजवळ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### संपूर्ण जिल्ह्यातला सेवा वितरणाचा तपशील

महाराजस्व अभियानांतर्गत आयोजित समाधान शिबिरामध्ये विविध महसूल सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. अभियानांतर्गत निकाली काढण्यात आलेले एकूण फेरफार २०६, ७/१२ मधील दुरुस्तीसंदर्भात स्वीकारण्यात आलेल्या अर्ज ९७, ८१४ डिजिटल ७/१२, ८अ उतारे ५८६, यासोबतच १ हजार ४६ विविध प्रकारची प्रमाणपत्रे नागरिकांना वितरीत करण्यात आली. एक खिडकी व्यवस्थेअंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांपैकी १४७ अर्ज निकाली काढण्यात आले. १३३ जीवंत सातबारे, काही प्रकरणांचे जागेवरच निराकरण करण्यात आले असून उर्वरित प्रकरणे संबंधित कार्यालयांकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित करण्यात आली. कार्यक्रमाला महसूलसह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## फुलचंद भगत यांचा स्तुत्य उपक्रम; गरीब गरजूंना माठ वाटप



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ११ :** पिण्याचे पाणी हे केवळ गरज नाही तर तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे.स्वच्छ पिण्याच्या पाण्यावर सर्वांचा समान अधिकार आहे. हा ऊद्देश समोर ठेवुन वाढदिवस व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्य ऊन्हातान्हात गरीब गरजु कष्टकरी काम करतात त्यांना प्यायला थंड पाणी मिळावे या ऊद्देशाने सामाजिक कार्यकर्ते फुलचंद भगत यांनी गरजूंना माठ वाटप करुन हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला.

दान करून सत्कर्म कमवा या उपक्रमाअंतर्गत ही वस्तू भेट म्हणून देण्यात आली.ऊन्हात काम कष्ट करणाऱ्या गरजू बांधवांना माठ (मटके), मिठाई आणि पिण्याचे ग्लास वाटप करण्यात आले.फक्त वस्तू नव्हे, तर थंडावा, आदर आणि माणुसकी देण्याचा हा प्रयत्न होता.त्या थंड पाण्याच्या घोटात फक्त तृप्ती नव्हती, तर आधार, आपुलकी आणि माणुसकीचा स्पर्श होता आणि तोच आनंद प्रत्येक कष्टकऱ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.या समाजसेवी कार्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.याआधीही सामाजीक कार्यकर्ते फुलचंद भगत यांनी विविध समाजपयोगी उपक्रम राबवले आहेत. आज समाजाची अवस्था खूप गंभीर झाल्याचे चित्र दिसत आहे. शिक्षण, आरोग्य, भूक, बेरोजगारी, लोकसंख्या, रस्ते, वीज , पाणी आदी अनेक समस्या उग्र रूप धारण करू लागल्या आहेत. विज्ञान तंत्रज्ञानाने खूप प्रगती केल्याचा गवगवात होत आहे. पण मानवाच्या मुलभूत गरजा , समस्या सोडवण्याची पूर्ण जबाबदारी विज्ञान तंत्रज्ञान पार पाडू शकलेले नाही. पाण्यासाठी मानवाचा संघर्ष सुरूच आहे. जगातल्या ज्या ज्या गोष्टी मुलभूत आणि मौल्यवान आहेत या सर्व गोष्टींसाठी मानवाचा संघर्ष सुरु आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने जग जवळ आल्याचे बोलले जात असले तरी हि माणूस माणसापासून कित्येक योजने दूर गेला हि वस्तुस्थिती आहे.माणूस हा सामाजिक प्राणी आहे असं समाजशास्त्र सांगत. समाजाचे माणसावरती प्रचंड ऋण आहेत. त्यामुळे माणसामध्ये असलेली परोपकाराची वृत्ती लक्षात घेता माणसाने देखील समाजासाठी काहीतरी करने अपेक्षित आहे. हेच सूत्र पकडून सामाजिक जाणीवेच्या भावनेपोटी फुलचंद भगत हे नेहमी सामाजीक कार्यात स्वतःला वाहुन घेवून अनेक समाजपयोगी कार्य करीत असतात.

### समाजकार्यात माझा खारीचा वाटा


समाजासाठी काहीतरी करावं अशी अनेकांची इच्छा असते पण त्यांच्यातले काहिजन मात्र खरोखरच ऊभे राहतात आणी आपल्याला महत्वाच्या वाटर्णाया एखाद्या कामासाठी स्वतःला झोकुन देतात. लौकीक अर्थाने त्यांचे काम मोठे नसेलही पण समाज पुढे जाण्याच्या प्रक्रीयेत तो खारीचा वाटा खुप महत्वाचा असतो याच प्रेरणेने मी सुद्धा विविध समाजपयोगी ऊपक्रम राबवत असतो.

**- फुलचंद भगत,** सामाजिक कार्यकर्ते,मंगरुळपीर

## कारावास | मंगरुळपीर सत्र न्यायालयाचा निकाल

# सासू- मेहुणीच्या हत्येप्रकरणी आरोपीस जन्मठेप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि. ११ :** मंगरुळपीर तालुक्यातील शेलूबाजार येथे घडलेल्या सासू आणि मेहुणीच्या दुहेरी हत्याकांड प्रकरणात मंगरुळपीर सत्र न्यायालयाने आरोपी सचिन धर्मराज थोरात (रा. पर्वती, पुणे) याला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत आजन्म कारावास (जन्मठेप) व १० हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास एक वर्षाचा साधा कारावास भोगावा लागणार आहे. हा निकाल अतिरिक्त सत्र न्यायाधीश वैभव व्ही. पाटील यांनी १० एप्रिल २०१६ रोजी सुनावला.

या प्रकरणात शेलूबाजार येथील पोलिस पाटील मदन तुकाराम जुंगाडे यांनी १३ मे २०२२ रोजी मंगरुळपीर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारीनुसार, त्याच दिवशी सकाळी सुमारे ८ वाजता आरोपीने सासू निर्मलाबाई भिकाजी पवार आणि मेहुणी विजया गुंजावळे यांच्यावर लोखंडी सत्तुराने हल्ला केल्याची माहिती मिळाल्यानंतर फिर्यादी घटनास्थळी गेले. तेथे दोघीही रक्तबंबाळ अवस्थेत बेशुद्ध पडलेल्या होत्या, तर आरोपी हातात शस्त्र घेऊन उभा होता.घटनेनंतर पोलिसांनी आरोपीला तत्काळ ताब्यात घेतले. जखमींना शेलूबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले व पुढील उपचारासाठी वाशिमला हलविण्यात

आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती दोघींनाही मृत घोषित केले. याप्रकरणी मंगरुळपीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पूर्ण करून तत्कालीन सहायक पोलिस निरीक्षक तुषार जाधव यांनी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. खटल्या दरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण १५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. प्रत्यक्षदर्शी साक्ष, वैद्यकीय अहवाल व इतर वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.सरकार पक्षाची बाजू अतिरिक्त शासकीय अभियोक्ता गोवर्धन गंगावणे यांनी मांडली, तर कोर्ट पैरवीसाठी एलपीसी सुवर्णा मनवर व पोलिस हवालदार राम नागूलकर यांनी सहाय केले.सदर कारवाई मध्ये तपास अधिकारी पोलिस निरीक्षक सुनिल हुड,पिएसआय मंजुषा मोरे,पिएसआय तुषार जाधव,पोलीस शिपाई गोपाल कवर, संदीप खडसे, ज्ञानेश्वर राठोड, सुनिल गंडाईत,ज्ञानेश्वर राठोड यांनी गुन्ह्याचा उत्कृष्ट तपास केला. सर्व पुरावांच्या आधारे विद्यमान न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले.

# अकोला जिल्ह्यात क्रांतीसूर्याचा जागर; खेड्यापाड्यांत घुमला समतेचा विचार!

## कुठे वृक्षारोपण तर कुठे आरोग्य शिबिर; महामानवाच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमांवर भर

**स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती अकोला जिल्ह्यासह सर्व तालुक्यांत आणि खेड्यापाड्यांत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ही जयंती केवळ शहरांपुरती मर्यादित न राहता, दुर्गम गावांमधील ग्रामपंचायती, शाळा आणि सार्वजनिक मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून या महामानवाला अभिवादन केले. जिल्ह्यात कुठे वृक्षारोपण, कुठे आरोग्य शिबिर, तर कुठे गरजूंना मदतीचा हात देऊन कार्यकर्त्यांनी जयंतीचे सार्थक केले. अनेक ठिकाणी प्रबोधनात्मक व्याख्याने आणि प्रतिमा मिरवणुकीद्वारे महात्मा फुलेंचा समतेचा विचार जनमानसांत रुजवण्यात आला. शासकीय कार्यालयांपासून ते शेताशिवारातील बांधापर्यंत आज केवळ क्रांतीसूर्याचा जयघोष ऐकायला मिळाला. विशेषतः तरुण वर्गाचा वाढता सहभाग जिल्ह्याच्या वैचारिक समृद्धीची ग्वाही देणारा ठरला.**

### श्री शिवाजी विद्यालयात महात्मा फुले जयंती

**नींबा :** स्थानिक श्री शिवाजी विद्यालय, निंबा येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे माजी प्रभारी मुख्याध्यापक विनोद धांडे होते. मंचावर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी नितीन पाटील, शिक्षक प्रतिनिधी प्रमोद तरटे आणि एकनाथ राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित मनोगते व्यक्त केली. प्रमोद तरटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महात्मा फुले यांच्या जीवनकार्याची माहिती दिली, तर एकनाथ राठोड यांनी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात विनोद धांडे यांनी महात्मा फुले यांनी समाजातील अनिष्ट




रूढी-परंपरांना झुगारून समाजसुधारणेसाठी दिलेल्या लढ्याविषयी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय डाबेराव यांनी केले, तर आभार सावंत यांनी मानले. या प्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### पिंजर ग्रामपंचायतीत महात्मा फुले जयंती साजरी

**पिंजर :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पिंजर ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने शनिवारी एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायतीमध्ये नोंदणीकृत असलेल्या अपंग बांधवांना उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेता, पिण्याच्या पाण्याच्या कॅनचे मोफत वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी पांडुरंग ठक, प्रदीप पाटील लहाने, रमेश आप्पा खोबरे, अशोकराव लाण्गागे, बंडू राऊत, दिलीप बाप्पू देशमुख, अशोकराव इंगळे, रहीम



काजी, महेश घनगाव, विठ्ठल वडुरकर, मुकेश इंगळे आणि मोहन लोण्गागे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जयंतीचे औचित्य साधून केवळ उत्सव न साजरा करता, समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे केल्याबद्दल ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, ग्रामपंचायत कर्मचारी आणि दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### अडगाव बु. विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

**अडगाव बु :** तेल्हारा तालुक्यातील अडगाव बु. येथील जिल्हा परिषद विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने ११ एप्रिल रोजी स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक क्रांतीच्या आठवणींना उजाळा दिला.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे प्राचार्य चारूदत्त मेहरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास वानखडे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे शिक्षणप्रेमी तज्ज्ञ अमोल खंडारे यांच्या हस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राध्यापक डॉ. संतोष गायकवाड, विष्णू मिसाळ, किरण साखरे, नीता निखाडे, आरती लबडे, दीक्षा अवचार, अभिजित लोखंडे, संतोष सोळंके आणि मिलिंद लोखंडे यांनीही क्रांतीसूर्यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण केले. प्रास्ताविकातून प्रा. डॉ. संतोष गायकवाड यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांनी विषमतेविरुद्ध दिलेला लढा आणि शिक्षणाचे महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. महापुरुषांचे विचार अंगीकारणे हीच खरी जयंती असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. आभार प्रदर्शन नीता निखाडे यांनी केले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

### पिंपळखुटा येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त रक्तदान

**पिंपळखुटा :** येथील जय बजरंग व्यायाम शाळा, माळी युवक संघटना व गावकरी मित्र मंडळाच्या संयुक्त वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. केवळ उत्सवी स्वरूप न देता, सामाजिक बांधिलकी जपत यावसंगी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेला कुमकुम तिलक लावून व पुष्पहार अर्पण करून विनम्र आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन गावातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्व जगन्नाथजी उपाख्य भाऊसाहेब खरप यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात गावातील तरुणांनी मोठा उत्साह दाखवत रक्तदान केले.



हा सोहळा यशस्वी करण्यासाठी बाबुराव सावत, संदीप माडोकार, रवींद्र महानकार, शेख नासीर, राजेश तराळे, श्रीकृष्ण सोळंके, नितीन इंगळे, गणेश नागोलकार, सुभाष वाहोकार, दिगांबर माडोकार, विजय वानखडे, प्रशांत वानखडे, बाळू वानखडे, रामकृष्ण लाहुडकार, सुनील माडोकार, गणेश माडोकार, सुपु शहा, धनंजय जुमळे, वैभव देशमुख, गोपाल अंभोरे, मेहमूद खान, संतोष घाटोळ, भूषण कव्हळे आदींनी परिश्रम घेतले.

### लाखपुरी येथे क्रांतीसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन



**लाखपुरी :** येथील सिद्धार्थ बौद्ध विहार व बस स्थानक चौक परिसरात ११ एप्रिल रोजी स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक प्रबोधन, जातीव्यवस्था निर्मूलन आणि स्त्री शिक्षणाचे अग्रदूत असलेल्या या महामानवाच्या क्रांतिकारी स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावसंगी ग्रामीण पत्रकार संघाचे मूर्तिजापूर तालुकाध्यक्ष अतुल नवघरे यांनी महात्मा फुलेंच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. या सोहळ्याला पत्रकार आकाश जामनिक, पत्रकार गजानन गवई, ग्रा.प. सदस्य फिलिप जामनिक, अंगणवाडी सेविका ज्योती गावंडे, सुनीता मेहर, मीना जामनिक, सुरेखा जामनिक, भावना व्यास, शीला जामनिक, सुरेश जामनिक, सिद्धार्थ जामनिक, मनोज हिंगणकर, राजू जामनिक, महेंद्र जामनिक आणि रवी जामनिक यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके संचालन आकाश जामनिक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार गजानन गवई यांनी मानले. जयंतीनिमित्त गावात दिवसभर उत्साहाचे वातावरण दिसून आले.

### रुईखेड विद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**अकोट :** स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अकोट तालुक्यातील रुईखेड येथील श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावसंगी महापुरुषांच्या विचारांचा जागर करत त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सेवा ज्येष्ठ शिक्षिका अनिता मानकर यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर आणि सामाजिक क्रांतीवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला मुख्याध्यापक निनाद मानकर, किरण मानकर, अनिता मानकर, संतोष काळे, वनिता सरोदे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा. रूपेश गायगोले, प्रा. रूपेश खंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोसे, संगीता नाठे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल



मांडवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अनिल ओखारे यांनी मानले. शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

### नेहरू पार्क येथे क्रांतीसूर्य महात्मा फुले जयंती उत्साहात

**अकोला :** स्त्री उद्धारासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना साथ देऊन समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध आयुष्य वेचणारे महात्मा ज्योतिबा फुले हे आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी शोधणारे आणि शिक्षणाचे खरे मर्म जगाला सांगणारे फुले यांचे विचार चंद्र-सूर्य असेपर्यंत समाजाला दिशा देत राहतील, असे प्रतिपादन योगगुरू मनोहर इंगळे यांनी केले.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सवानिमित्त शिवतेज प्रतिष्ठानच्या वतीने नेहरू पार्क येथील योगवर्गात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी अनुराधा इंगळे यांनी सावित्रीबाईंच्या तर मनोहर




इंगळे यांनी महात्मा फुलेंच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी उपस्थित सर्व योगसाधकांनी फुले दांपत्याच्या ऐतिहासिक कार्याचे स्मरण करून त्यांना नमन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बी. एस. देशमुख, ॲड. वामन चौधरी, पुरुषोत्तम गुप्ता, अतुल पळसपगार, विष्णू भड, राजीव जाजू, ढोमणे सर, वसंत रावणकर, शिवतेज इंगळे, अनुराधा इंगळे, वंदना तायडे, अरुणा धुमाळे, शीतल नालट, सरला कागलीवाल व विनोद भसीन यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. विद्या ठाकरे यांनी केले, तर आभार बाळासाहेब काळे यांनी मानले. शांतीपाठाने सोहळ्याची सांगता झाली.

# वरून कडक उन्हाचा चटका, खाली शेतकऱ्यांना 'साईट बंद'चा फटका!

## सातबारा, आठ-अ साठी बळीराजाची वणवण; अकोट तालुक्यात महाभुलेखच्या संथ गतीचा मनस्ताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ११ :** खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी बँकांकडून पीक कर्ज मिळवण्याच्या घाईत असलेल्या अकोट तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. वरून कडक उन्हाचा पारा चाळीशी पार करत असताना, दुसरीकडे पीक कर्जासाठी आवश्यक असलेले सातबारा, आठ-अ आणि फेरफार उतारे मिळवण्यासाठी ऑनलाइन साईट वारंवार बंद पडत असल्याने शेतकऱ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.




अकोट तालुक्यातील नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वीच कर्जाची फेड केली आहे. आता नवीन कर्ज मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सातबारा डाऊनलोड करण्यासाठी वापरली जाणारी शासकीय वेबसाईट अतिशय संथ गतीने चालत असून तासनतास बंद राहत आहे. परिणामी, शेतकरी आणि सामान्य नागरिकांची सरकारी कार्यालये तसेच सेतू केंद्रांवर मोठी गर्दी होत आहे. खरेदी-विक्री व्यवहार आणि बँकिंग प्रक्रियेसाठी सातबारा हा महत्त्वाचा दस्तऐवजी मानला जातो, मात्र तोच वेळेवर मिळत नसल्याने अनेक व्यवहार ठप्प पडले आहेत.

विशेष म्हणजे, दिवसा कार्यालयीन वेळेत साईट पूर्णपणे बंद असते आणि रात्री उशिरा किंवा पहाटेच्या वेळी ती काही काळ सुरू होते, अशी माहिती समोर येत आहे. ''आम्ही रात्री कागदपत्रे काढण्यासाठी सेतू केंद्रावर यायचे का?'' असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत. तांत्रिक अडचणींचा हा थेट फटका शेतीच्या कामांना बसत असून, प्रशासनाने सर्व्हरची क्षमता वाढवून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

**प्रशासनाची डिजिटल थट्टा!**

एकीकडे सरकार डिजिटल इंडियाचा नारा देत आहे, मात्र दुसरीकडे हक्काचा सातबारा मिळवण्यासाठी शेतकऱ्याला दिवसभर उन्हात ताटकळत उभे राहावे लागत आहे. पीक कर्जाची वेळ निघून गेल्यास याला जबाबदार कोण? असा सवाल करत बळीराजाने प्रशासकीय दिरंगाईबद्दल संताप व्यक्त केला आहे.

# वृक्ष लागवडीचे देयक रोखणाऱ्या त्या दोषींवर कारवाई करा!

## शेतकरी राजा ग्रुपचे सीईओना निवेदन; १६ एप्रिल रोजी ठिय्या आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. ११ :** रोजगार हमी योजने अंतर्गत चंदन वृक्ष लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची देयके तांत्रिक कारणास्तव प्रलंबित ठेवणाऱ्या आणि चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, या मागणीसाठी शेतकरी राजा ग्रुपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. यासंदर्भात ९ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) निवेदन देऊन १६ एप्रिल रोजी ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



❑ चान्नी येथील शेतकऱ्यांच्या हक्काची देयके गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. चौकशीत दोष सिद्ध होऊनही संबंधितांवर केवळ दंडात्मक कारवाई करून त्यांची पाठराखण केली जात असल्याचा आमचा आरोप आहे. दोषींना निलंबित न केल्यास आम्ही १६ एप्रिल रोजी सीईओ दालनात ठिय्या मांडणार आहोत.

\- **रवी सोनोने,** शेतकरी राजा ग्रुप, पातूर

निवेदनातील माहितीनुसार, पातूर तालुक्यातील चान्नी येथे तीन वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी चंदन वृक्षांची लागवड केली होती. मात्र, संबंधित यंत्रणेकडून देयके मिळण्यास विलंब होत असल्याने शेतकऱ्यांनी भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त करत वारंवार तक्रारी केल्या होत्या. या प्रकरणी यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सहा दिवस अन्नत्याग उपोषणही करण्यात आले होते. प्रशासकीय चौकशीत काही कर्मचाऱ्यांना दोषी धरून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असली तरी, ही कारवाई अपुरी असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. तत्कालीन जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता, त्यांना तात्काळ निलंबित करून फौजदारी प्रक्रिया राबवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर रवी सोनोने, योगेश ताले, संजय शर्मा, ज्ञानेश्वर गाडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

अजिंक्य भारत • आपलं बुलडाणा

बुलडाणा, रविवार, दि.१२ एप्रिल २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### मिलिंद डुकरे महाराष्ट्र संपर्क प्रमुखपदी



**मेहकर :** राष्ट्रीय लोककलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या महाराष्ट्र संपर्क प्रमुखपदी मिलिंद डुकरे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष संदीपकुमार बोरकर यांनी त्यांच्या कार्यक्षमतेवर विश्वास ठेवत ही महत्वाची जबाबदारी सोपवली आहे. या नियुक्तीमुळे राज्यातील लोककलावंत, निराधार व दिव्यांग बांधवांना विविध शासकीय योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचवून त्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. तसेच या घटकांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने संघटना अधिक सक्रिय होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. यावेळी विजय चव्हाण, संदीपकुमार बोरकर आदी मान्यवर विश्रामगृहावर उपस्थित होते.

### मृतदेहावर ओमसाई फाउंडेशनकडून दफनविधी

**बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध झाली असून, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्लेसमेंट ड्राइव्ह'चे आयोजन करण्यात आले आहे. ही प्लेसमेंट ड्राइव्ह सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदुरा, जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली आहे. या मेळाव्यात चिरायु पॉवर (खामगाव), क्रेडिट ॲक्सीस ग्रामीण (नांदुरा) आणि क्वीज कॉर्प (पुणे) यांसारख्या नामांकित कंपन्या सहभागी होणार असून विविध रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे उमेदवारांच्या थेट मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी देखील उपलब्ध होणार आहे. दहावी, बारावी, आयटीआय तसेच पदवीधर पुरुष व महिला उमेदवारांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी मिळणार आहे.

### निधनवार्ता



**नांदुरा :** दि.नांदुरा अर्बन को-ऑप बँक लि. नांदुरा मध्ये शिपाई म्हणून प्रदीर्घ सेवा देऊन सेवानिवृत्त झालेले विश्वनाथ तुकाराम बंबटकार यांचे अल्पशा आजाराने दिनांक ९ एप्रिल रात्री ९ वाजता निधन झाले .ते ७८ वर्षांचे होते. स्थानिक स्मशानभूमी त्यांच्या प्रार्थिवावर दिनांक १० एप्रिलला ११ वाजता अग्निसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, दोन मुली ,नातवंडे व मोठा आप्तपरिवार आहे.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २००० - २१२५ |
| गहू | १६०० -२२०० |
| तुर | ६१०० - ८९५० |
| हरभरा | ३९००- ५२२५ |
| सोयाबीन | ४५००- ५४०० |
| उडीद | ५६०० - ६७०० |
| मुग | ४८०० - ४८०० |

# प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना; विस्तारीत टप्पा-२ व ३ मध्ये जिल्ह्यातील १६ हजार १७७ लाभार्थ्यांची जोडणी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.११ :** केंद्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री उज्वला गॅस योजनेअंतर्गत जिल्ह्यात गॅस जोडण्यांच्या विस्ताराला गती मिळाली आहे. या योजनेच्या विस्तारीत टप्पा २ आणि ३ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १६ हजार १७७ लाभार्थ्यांना एलपीजी गॅस जोडणी देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिली आहे. गरीब व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना स्वयंपाकासाठी स्वच्छ व सुरक्षित इंधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना सुरू केली आहे.

या योजनेमुळे ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होत असून पारंपरिक इंधनाच्या धुरापासून होणाऱ्या आजारांमध्येही घट होत आहे. जिल्ह्यात या योजनेचा पहिला टप्पा यशस्वीपणे राबविण्यात आला होता. विस्तारीत योजना-१ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८९ हजार ३४७ लाभार्थ्यांना गॅस जोडणीचा लाभ मिळाला आहे. या यशानंतर केंद्र शासनाने देशभरात योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार विस्तारीत टप्पा २ मध्ये ७५ लाख आणि विस्तारीत टप्पा ३ मध्ये २५ लाख अशा एकूण १ कोटी अतिरिक्त गॅस जोडण्या मंजूर करण्यात आल्या आहेत. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातही जिल्हा उज्वला समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थ्यांची निवड व गॅस जोडणी प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येत आहे. विस्तारीत टप्पा २ अंतर्गत जिल्ह्यातील ८ हजार ६९४ लाभार्थ्यांना, तर विस्तारीत टप्पा ३ अंतर्गत ७ हजार ४८३ लाभार्थ्यांना गॅस जोडणी देण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण १६ हजार १७७ कुटुंबांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचला आहे. या योजनेचा मुख्य उद्देश महिलांना धूरमुक्त स्वयंपाकघर उपलब्ध करून देणे हा आहे. पारंपरिक इंधन जसे की लाकूड, शेणकांड्या किंवा कोळसा यांचा वापर केल्यामुळे निर्माण होणारा धूर महिलांच्या आरोग्यास घातक ठरतो. उज्वला योजनेमुळे हा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला असून महिलांच्या आरोग्याबरोबरच कुटुंबातील इतर सदस्यांचेही आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. याशिवाय, पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीनेही ही योजना महत्वाची ठरत आहे. पारंपरिक इंधनाचा वापर कमी झाल्यामुळे जंगलतोडीवर आळा बसण्यास मदत होत असून स्वच्छ ऊर्जा वापराला चालना मिळत आहे. तसेच महिलांचा वेळ व श्रम वाचून त्यांना इतर उपजीविकेच्या संधींकडे वळण्यासही प्रोत्साहन मिळत आहे. एकूणच, प्रधानमंत्री उज्वला गॅस योजना ही केवळ गॅस जोडणी देणारी योजना नसून महिलांच्या सशक्तीकरणाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा एक प्रभावी उपक्रम ठरत असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त शिवसेनेचे अभिवादन; रॅलीत शिवसैनिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.११ :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज खामगाव शहरात शिवसेनेच्या वतीने भव्य अभिवादन करण्यात आले. स्थानिक सामान्य जिल्हा रुग्णालय परिसरातील महात्मा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर, समाज बांधवांच्या वतीने भव्य रॅली काढण्यात आली.

शहराच्या प्रमुख मार्गावरून निघालेल्या या रॅलीचा समारोप माळी भवन येथे झाला. या रॅलीमध्ये शिवसेनेच्या वतीने सक्रिय सहभाग नोंदवत महापुरुषांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. जय ज्योती, जय क्रांती आणि महात्मा फुले यांचा विजय असो अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण शहर परिसर दणाणून गेला होता. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी समाज बांधवांसोबत खांद्याला खांदा लावून या उपक्रमात सहभाग घेतला आणि महात्मा फुलेंच्या क्रांतीकारी विचारांचा जागर केला. या रॅलीमध्ये शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख संजय अवताडे, हिंदू सेवक ॲड. अमोलभाऊ अंधारे, तालुका प्रमुख राजेंद्र बघे, शहर प्रमुख चेतन ठोंबरे, उपशहर प्रमुख बंटी पवार, तालुका संघटक सुजित तायडे, महिला आघाडी तालुका प्रमुख सौ. जयश्रीताई देशमुख, युवती शहर प्रमुख श्वेताताई पाटील, विभाग प्रमुख जीवन साळुंखे, संकेत तायडे, रवी माळवंदे, रमेश अवचार यांच्यासह शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त मुकबधीर विद्यार्थ्यांना अन्नदान

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**साखरखेर्डा दि.११ :** आनंद स्वामी शिक्षण प्रसारक संस्था देऊळगाव मही संचालित जिजामाता मूकबधिर निवासी विद्यालय साखरखेर्डा या ठिकाणी आज दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली जयंतीचे अवचित्या साधून आज राहुल जगताप यांच्या वतीने मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राहुल जगताप यांनी उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून श्री गुरुप्रसाद गाताडे तसेच मंगल सिंग ठाकूर यांची उपस्थिती लाभली तसेच प्रमुख अतिथी म्हणून मयुरी जगताप यांची उपस्थिती होती तसेच या कार्यक्रमाला प्रवीण जगताप यांची सुद्धा महत्वाची उपस्थिती लाभली. या सर्व मान्यवरांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला तसेच संस्थेचे अध्यक्ष तसेच सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद तसेच सर्व मूकबधिर विद्यार्थी यांच्या समावेत आज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम व जयंतीनिमित्त राहुल जगताप यांच्या वतीने आयोजित भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## भाजपाच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा फुले यांना अभिवादन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.११:** भाजपाच्या वतीने जयंतीनिमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

स्त्री शिक्षणासाठी संपूर्ण आयुष्य वेचणारे भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती भाजपच्या वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम स्थानिक महात्मा फुले उपजिल्हा सामान्य रुग्णालयातील क्रांतिसूर्य महात्मा फुले यांचे पुतळ्याला भाजपा महाराष्ट्र प्रदेश सोशल सहसंयोजक सागर फुंडकर व नगराध्यक्षा सौ अपर्णाताई फुंडकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस शरदचंद्र गायकी, माजी प स सभापती सौ उर्मिलाताई गायकी, डॉ एकनाथ पाटील,जिल्हा सचिव संजय शिनगारे, न प गटनेते विजय उगले, उल्हास वानखडे, विलास काळे, विनोद टिकार, राजेश तेलंग, युवराज मोरे, सुरेशसिंग तोमर, दत्ता जवळकार, आदी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच भाजप कार्यालयात जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर पुरोहित, खामगांव विधानसभा मतदार संघ विस्तारक डॉ एकनाथ पाटील, जसवंतसिंग शिख, सतेंद्र ठाकूर, संदीप जोशी, ज्ञानेश्वर फाटे, आदी भाजपा पदाधिकाऱ्यांनी क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचे प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.

## करवंडची गढी हे जिल्ह्याचे वैभव : आमदार खरात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**शेलसूर दि.११ :** करवंडची इंगळे घराण्याची गढी ही जिल्याचे वैभव आहे. असे प्रतिपादन मेहकर विधानसभेचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. आज दिनांक १०एप्रिल रोजी करवंड येथे भेट देऊन मोहत्सवाच्या तयारीचा आढावा त्यांच्याकडून घेण्यात आला यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना त्यांनी करवंड मोहोत्सव समितीचे कौतुक करून करवंड येथील ऐतिहासिक वारस्याची ओळख जगाला करून दिली व शासनाच्या निदर्शनास आणून दिली त्याबद्दल मोहोत्सव समितीचे अभिनंदन केले. शिवाजी महाराजांची सासुरवाडी असलेले व स्वराज्यासाठी अनेक मावळ्यांचे बलिदान देणारी ही भूमी असल्यामुळे शासनाने केवळ मोहोत्सव करून न थांबता ह्या वास्तूला ऐतिहासिक वारसा स्थळाचा दर्जा मिळून पुरातन गढीला पर्यटणाचा दर्जा प्राप्त व्हावा यासाठी आपण प्रयत करू असे आश्वासन त्यांनी गावाकऱ्यांस दिले. यावेळी त्यांच्यासोबत करवंड महोत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख, राजे हरिरुद्र इंगळे, नायब तहसीलदार मुरलीधर गायकवाड, राजेंद्र इंगळे, सुनील जवंजाळ यांच्यासाह ग्रामस्थाची उपस्थिती होती.

# विदर्भातील तीव्र उष्णतेचा विचार करता शाळा २६ जुन नंतरच सुरू करण्याची मागणी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.११ :** विदर्भातील तीव्र उष्णतेचा विचार करता विदर्भातील शाळा २६ जुन नंतरच सुरू कराव्यात अशी मागणी शिक्षक आघाडी चे अध्यक्ष तथा माजी विधान परीषद सदस्य श्रीकांत देशपांडे यांनी दि.८ एप्रिलला शिक्षण संचालक पुणे यांना दिलेल्या पत्रात केली आहे त्यांनी आपल्या पत्रात राज्यातील शाळांच्या उन्हाळी सुट्टी बाबत व शैक्षणिक वर्ष २०२६-२७बाबत आपण दि २८/०४/२०२६ रोजी पत्र निर्गमित केले आहे. निर्गमित केलेल्या पत्रानुसार उन्हाळी सुट्टी ०२ मे २०२६पासून जाहीर केली असुन राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा नविन सत्र २०२६-२७ शैक्षणिक सत्र दि १५/०६/२०२६ पासुन सुरु करण्यात याव्यात असे नमूद केले आहे. परंतु विदर्भातील तीव्र उष्णतेचा विचार करता दरवर्षीप्रमाणे विदर्भातील शाळेची तारिख दरवर्षी वेगळीच असते. त्याप्रमाणेच या वर्षी सुध्दा दि २६/०६/२०२६ नंतरच सुरु करण्यात याव्यात. विदर्भातील तापमानात जून महिन्यात ते४५ ४६ डिग्री सेल्सिअस असते. तीव्र उष्णतेचा विचार करता विद्यार्थ्यांना उष्माघातासारख्या धोक्यापासून वाचविण्याकरिता विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करुन विदर्भातील प्राथमिक माध्यमिक शाळा २६ जून नंतरच सुरु करण्यात याव्यात. या बाबत आपण विदर्भातील शाळा करिता स्वातंत्र्य लेखी आदेश काढावा असे नमूद केले आहे.

# अवैध धंद्यावर पोलिसांचे धाडसत्र सुरुच, जुगारी व अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**नांदुरा दि.११ :** पोलीस स्टेशन नांदुराचे प्रभारी अधिकारी आदित्य कुमार सिंह (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यावर पोलिसांचे धाडसत्र सुरुच असून दोघां वरली मटका जुगारी व दोघांअवैध देशी दारू विक्रेत्यावर पोलिसांनी दिनांक १० एप्रिलला दुपारी कारवाई केली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचासमक्ष धाड टाकून आरोपी अशोक नामदेव मुंढे वय ६० वर्ष राहणार निमगाव याला ताब्यात घेण्यात.

ग्राम निमगाव बस स्टँड च्या समोर सार्वजनिक जागेत आरोपीकडून नगदी रोख १८६० रुपये, एक डॉट पेन किंमत ५ रूपये, वरली मटका आकडे लिहिलेली चिठ्ठी असा एकूण १८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या घटनेत आरोपी गणेश चंद्रभान महाले वय ३७ वर्ष राहणार निमगाव याला ताब्यात घेण्यात आले. ग्राम निमगाव हॉटेल सूर्यवंश चे समोर सार्वजनिक जागेत आरोपीकडून नगदी १२५० रुपये ,एक डॉट पेन किंमत ५ रुपये, एक वरली मटका आकडे लिहिलेली चिठ्ठी असा एकूण १२५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध महाराष्ट्र जुगारबंदी कायदा १२( अ) कलमाखाली गुन्हा दाखल केला. निमगाव येथील बस स्टँड समोर सार्वजनिक रोडवर आरोपी सिताराम तुकाराम बोदडे वय ३६ वर्ष याला ताब्यात घेण्यात आले. यावेळी आरोपीच्या ताब्यातून देशी दारू टांगो पंच कंपनीच्या ९० मिलीच्या बारा नग शिश्या प्रत्येकी ४० रुपये प्रमाणे ४८० रुपये, एक थैली १० रुपये असा एकूण ४९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर दुसऱ्या घटनेत आरोपी दुर्गादास रामकृष्ण नाईक ६५ वर्ष राहणार दहिगाव याला ताब्यात घेण्यात आले.यावेळी आरोपीच्या घरासमोरील सार्वजनिक ठिकाणी रोडवर देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या २३ नग शील बंद शिश्या प्रत्येकी ४०रुपये प्रमाणे ९२० रुपये, एक थैली २० रुपये असा एकूण ९४० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा ६५ (ई) कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास नांदुरा पोलीस करीत आहे.

## आदर्श विवाह | अन् कुंकवाच्या कार्यक्रमातच संपन्न झाला विवाह

# श्लोकानंदसोबत रुपालीची साधेपणात उजळली रेशीमगाठ !

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**बुलडाणा दि.११ :**आधुनिक काळातील दिखाऊपणा, अवडंबर आणि खर्चिकतेच्या वावटळीतही काही निर्णय असे असतात, जे शांतपणे समाजाला नवी दिशा देऊन जातात. जिल्ह्यातील साखळी बु. येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यरत उच्चशिक्षित यंत्रा अभियंता तथा समाजकारण, राजकारणात सक्रीय असणारे श्लोकानंद सदानंद डांगे आणि छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील उंडणगाव येथील स्पर्धा परीक्षेची तयारी करणारी, सुसंस्कृत व सुशिक्षित रुपाली रामराव शिनगारे यांच्या विवाहाने याच मूल्यांची जणू साक्ष दिली. नियोजित कुंकवाच्या कार्यक्रमातच ३१ मार्च रोजी अवघ्या १५० जणांच्या स्नेहसाक्षीने, कोणताही गाजावाजा न करता, कोणत्याही भपक्याला न जुमानता त्यांनी आयुष्याची रेशीमगाठ बांधली. आणि त्या क्षणी साधेपणालाच एक वेगळीच दिव्यता प्राप्त झाली. आजच्या काळात विवाह म्हणजे मोठे स्टेज, तेजस्वी दिवे, भव्य सजावट आणि लाखो रुपयांचा खर्च अशी एक सर्वसाधारण धारणा बनली आहे. मात्र, या तरुण जोडप्याने त्या रूढ चौकटीला जाणीवपूर्वक फाटा देत, ''सुखाचा खरा अर्थ साधेपणातच दडलेला असतो,'' हे कृतीतून दाखवून दिले. दोन्ही कुटुंबे समाजात मानाचे स्थान लाभलेली, प्रतिष्ठेची उंची गाठलेली इच्छित असते तर हा सोहळा वैभवाच्या शिखरावर झळकू शकला असता. पण त्यांनी निवडली ती विचारांची आणि मूल्यांची वाट. अनावश्यक खर्चाला नकार देत, परंपरेला नव्या अर्थाने उजाळा देत, त्यांनी समाजासमोर एक सशक्त आदर्श उभा केला. साधेपणात उजळलेल्या, मूल्यांनी समृद्ध झालेल्या श्लोकानंद आणि रुपाली यांच्या या विवाह सोहळ्याचे समाजातील विविध स्तरातून कौतूक होत आहे. आज अनेक कुटुंबे प्रतिष्ठेच्या नावाखाली कर्जाच्या ओझ्याखाली दबली जातात. अनेक पालक आयुष्यभराची साठवण एका दिवसाच्या सोहळ्यासाठी खर्च करतात. अशा वेळी श्लोकानंद आणि रुपाली यांनी दिलेला संदेश लाखमोलाचा ठरत आहे, हे विशेष..!

**लग्न हे प्रदर्शनासाठी नसून आयुष्यभराच्या सहप्रवासाचा पाया**

''लग्न हे केवळ दोन व्यक्तींचे नव्हे, तर दोन विचारांचे, दोन संस्कारांचे मिलन असते. ते प्रदर्शनासाठी नसून आयुष्यभराच्या सहप्रवासाचा पाया असतो. साधेपणातही आनंद तितकाच, किंबहुना अधिक शाश्वत असतो. आम्ही खर्चाऐवजी मूल्यांना जपण्याचा प्रयत केला,'' अशा शब्दांत वधू-वरांनी आपल्या निर्णयामागील भूमिका व्यक्त केली. आजच्या तरुण पिढीसमोर उभ्या असलेल्या दिखाऊपणाच्या आकर्षणातही विवेक, संयम आणि सामाजिक जबाबदारी जपता येते, हे या रेशीमगाठीने अधोरेखित केले आहे.

# महात्मा फुले यांचे विचार तरुण पिढीसाठी मार्गदर्शक - उत्तमराव झोरे

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**किनगाव राजा दि.११ :** क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले यांचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरत असल्यांचे मत सेवानिवृत्त शिक्षक उत्तमराव झोरे यांनी केले आहे. किनगांव राजा येथे महात्मा जोतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन सावता माळी भवन येथे करण्यात आले होते.मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.उत्तमराव झोरे पुढे म्हणाले की,महात्मा ज्योतिराव फुले शिक्षणाला सर्वात मोठे शस्त्र मानले आणि प्रत्योकाला शिक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी आयुष्यभर संघर्ष केला,मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी घेतलेली पुढाकार घेतला.

सेवानिवृत्त उच्च श्रेणी मुख्याध्यापक शिवाजीराव काळुसे यांनी सांगितले की, महात्मा फुले यांनी समतेचा विचार मांडत समाजातील सर्व घटकांना समान हक्क मिळावेत यासाठी आवाज उठवला.त्यांनी शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी कार्य केले.त्यांच्या विचारांमुळे तरुणांना सामाजिक जबाबदारीची जाणीव होते आणि अन्याया विरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळते.शिक्षणातून प्रगती, समतेतून शक्ती आणि एकोप्यातून विकास हा संदेश त्यांनी दिल्या असल्यांचे त्यांनी सांगितले.यावेळी गणेशराव जाधव,डॉ.ज्ञानेश्वर नागरे यांच्यासह नागरीकांनी मनोगत व्यक्त केले,सायंकाळी ५ ते १० गावातील प्रमुख रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली होती.महिलांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन केले.यावेळी उत्तमराव झोरे,शिवाजीराव काळुसे,दत्तात्रय झोरे,शिवाजी हरकळ,गजाननराव वानखेडे,गणेशराव जाधव,डॉ ज्ञानेश्वर नागरे,सखाराम हरकळ,विलास झोरे, ज्ञानेश्वर कायंदे, दीपक पडुळकर, रामेश्वर काकड,सर्जेराव झोरे,प्रभाकर काकड,अशोक झोरे,जितेंद्र कायंदे,विक्रम सानप, भगवान हरकळ,कैलास झोरे,रमेश काकड,दीपक झोरे,दिगांबर झोरे,आसिफ कुरेशी,विशाल जाधव, शिवहरी हरकळ,गजानन काळुसे,यांच्यासह क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले उत्सव समितीचे पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव झोरे तर आभार प्रदर्शन पवन झोरे यांनी केले.

महत्त्वाचे

## मातेरे गोळा करण्याच्या वादातून महिलांना मारहाण

**जळगाव जामोद :** कॉटन मार्केट परिसरात मातेरे (धान्य) जमा करण्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटात जोरदार हाणामारी झाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. या वादात चार जणांनी मिळून दोन बहिणींना प्लास्टिक पाईपने बेदम मारहाण केली असून, आरोपी महिलांनी फिर्यादीला चक्क दातातून चावा घेऊन जखमी केले आहे. बाळापूर फैल येथील रहिवासी भारती प्रेम लाड (२८) आणि त्यांची बहीण या शनिवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास कॉटन मार्केटमध्ये सांडलेले धान्य (मातेरे) जमा करत होत्या. यावेळी आरोपी ज्योती भारत मोरे ही तिथे आली. माझं मातेरे का झाडलं? असे म्हणत तिने भारती यांच्याशी वाद उकरून काढला. वादाचे रूपांतर लवकरच हाणामारीत झाले. आरोपी ज्योती मोरे हिने फिर्यादीचे केस पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. भारती यांची बहीण भांडण सोडवण्यासाठी आली असता, आरोपी भारत मोरे हा प्लास्टिकचा पाईप घेऊन तिथे धावून आला. आरोपींनी दोन्ही बहिणींना डोक्यावर आणि हातावर पाईपने मारहाण करून जखमी केले. धक्कादायक म्हणजे, भांडणादरम्यान आरोपी ज्योती मोरे आणि लक्ष्मी नागोलकर यांनी भारती यांच्या हाताच्या करंगळीला आणि त्यांच्या बहिणीच्या खांद्यावर जोरात चावा घेतला. जीव वाचवण्यासाठी दोन्ही बहिणी लपून बसल्या असताना, आरोपींनी त्यांना शोधून काढले आणि पुन्हा लाथाबुक्क्यांनी मारहाण करत अश्लील शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी ज्योती भारत मोरे (४०), भारत भीमराव मोरे (४५), लक्ष्मी किसना नागोलकर (२६), आकाश दादाराव सोनवणे (३२) सर्व राहणार बाळापूर फैल, खामगाव मेडिकल सर्टिफिकेट आणि तक्रारीवरून कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५)बी.एन.एस. २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास अधिकारी पोहेकॉ. संतोष इटमल्लू करीत आहे.

## लग्नाच्या मिरवणुकीत गाणे वाजविण्यावरुन वाद

**खामगाव :** जयपूर लांडे येथील रहिवासी परमेश्वर गोपाल बेलोकार (३२) यांच्या नातेवाईकाचा विवाह असल्याने १० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास गावातून बिनोरा मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणूक सुरू असताना आरोपी सागर पवार आणि ऋषिकेश पवार यांनी डीजेवर गाणे वाजवण्याच्या क्षुल्लक कारणावरून वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद एवढ्यावरच थांबला नाही, तर काही वेळातच आरोपींनी बेकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांवर लाठ्याकाठ्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीच्या बाजूचे लोक जखमी झाले आहेत. आरोपींनी केवळ मारहाणच केली नाही, तर अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आणि लग्नाच्या गाडीच्या काचा फोडून मोठे नुकसान केले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले. फिर्यादी परमेश्वर बेलोकार यांच्या तक्रारीवरून आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे खामगाव शहर पोलिसांनी सागर रमेश पवार, ऋषिकेश दयालसिंग पवार, मोहन संजय पवार, सूर्यकांत राजू पवार (उर्फ छोटू), सौरभ रामसिंग पवार तसेच गावातील इतर ७ ते ८ अनोळखी इसमांविरुध्द कलम १८९ (२), १९१(२), १९१(३), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३२४ (२), ३(५) बी.एन.एस. नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोहेकाँ मनोहर गोरे करीत आहे.

## २६ बकऱ्या लंपास

**खामगाव :** ९ एप्रिलच्या रात्री त्यांनी आपल्या घरामगील गोठ्यात बकऱ्या नेहमीप्रमाणे बांधल्या होत्या. मात्र, मध्यरात्री ११ वाजेपासून ते १० एप्रिलच्या पहाटे २ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात प्रवेश केला. चोरट्यांनी संधी साधून गोठ्यातील एकूण २६ नग जनावरे चोरून नेली. यामध्ये १९ गाभण वकऱ्या (४ काठेवाडी, २ बिटल आणि १३ गावरानी किंमत अंदाजे ३८ हजार रुपये, १ बिटल जातीचा बोकड किंमत अंदाजे ४ हजार रुपये, ६ गावरानी कोकरे (पिल्ले) किंमत अंदाजे ६ हजार रुपये असा एकूण ४८ हजार रुपयाच्या बकऱ्या चोरुन नेल्या. पहाटे हा प्रकार लक्षात येताच वसंता जाणे यांनी जळगाव जामोद पोलीस स्टेशन गाठून तक्रार दिली.

# प्रलंबित वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाची मागणी तत्काळ सोडवा

## वृत्तपत्र विक्रेता संघटनेची मुरव्यमंत्र्यांकडे मागणी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.११ :** शासनाने जवळपास १४ महिने उलटूनही आश्वासन देऊनही वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ स्थापन केले नाही. सदर महामंडळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. त्यामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांमध्ये मोठी नाराजी व अस्वस्थता निर्माण झाली आहे. वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळ तत्काळ कार्यान्वित करण्याची मागणी राज्यभरातील वृत्तपत्र विक्रेता तसेच बुलडाणा जिल्हा वृत्तपत्र संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्याकडे आज दि. ११ एप्रिल रोजी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भानुसार वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा अत्यंत महत्वपूर्ण व ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयामुळे राज्यातीन हजारो कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांमध्ये आशेचा किरण निर्माण झाला होता. दिनांक ११ मार्च रोजी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात श्रीकांत भारतीय यांनी हा मुद्दा उपस्थित केला असता, माहिती व जनसंपर्क मंत्री आशिष शेलार यांनी पुढील अधिवेशनापूर्वी वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी म हामंडळ स्थापन करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन दिले आहे. महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना गेल्या पंधरा वर्षांपासून राज्यातील कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या हक्कांसाठी सातत्याने या विषयावर लढा देत आहे. वृत्तपत्र विक्रेते हे लोकशाही व्यवस्थेतील माहितीचा प्रवाह जनतेपर्यंत पोहोचवणारे अत्यंत महत्वाचे दुवे आहेत. पहाटेच्या वेळी, प्रतिकूल परिस्थितीत काम करत असतानाही हा घटक समाजासाठी महत्वाची सेवा बजावत असतो. तरीही हा घटक असंघटित कामगार म्हणून आजही सामाजिक सुरक्षा, विमा, निवृत्ती वेतन किंवा अन्य कल्याणकारी योजनांपासून वंचित आहे. म्हणूनच शासनाने घेतलेला वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय हा अत्यंत स्वागतार्ह व ऐतिहासिक निर्णय आहे. मात्र जो केवल प्रत्यक्षात तातडीने कार्यान्वित होणे अत्यावश्यक आहे. राज्यातील हजारो कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अपेक्षा शासनाकडेकडे लागून आहेत. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुमार तत्काळ शासन आदेश काढून स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळ लवकरात लवकर कार्यान्वित करावे, जेणेकरुन राज्यातील हजारो वृत्तपत्र विक्रेत्यांना सामाजिक सुरक्षा व न्याय मिळेल. राज्यातील वृत्तपत्र विक्रेते शासनाकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा ठेवून आहेत. आपल्या माध्यमातून या कष्टकरी घटकाला न्याय मिळेल, अशी मागणी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, कार्याध्यक्ष बालाजी पवार,महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कोषाध्यक्ष तथा बुलडाणा जिल्हाध्यक्ष राजेंद्र टिकार, सरचिटणीस विकास सुर्यवंशी यांच्या लेखी निवेदनावर सह्या आहेत.

बुलडाणा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेकडून बुलडाण्याचे निवासी जिल्हाधिकारी सुरेश कव्हळे साहेब यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे पदाधिकारी रवींद्र चिंचोळकर, वैभव वाघमारे, सचिन निमकर्डे, माधव देशमुख, यादवराव हाके, जगदीश कोथळकर व राजेंद्र टिकार यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# कामगार कायद्यातील सुधारणांमुळे कामगारांबरोबरच उद्योगांनाही फायदा- कामगार मंत्री आकाश फुंडकर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**खामगाव दि.११ :** केंद्र शासनाने विविध कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करून चार व्यापक कामगार संहितांमध्ये रूपांतर केले असून, यामुळे कामगार कायदे अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी होणार आहेत. यामुळे कामगारांचे हक्क बळकट होण्याबरोबरच उद्योगांसाठी सुसंगत व सुलभ नियामक व्यवस्था उपलब्ध होईल, असे प्रतिपादन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागांतर्गत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत आयोजित "नारायण मेघाजी लोखंडे व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य पुरस्कार २०२५" वितरण कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते जिओ कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, संचालक (बाष्पके) श्री. ध. प्र. अंतापूरकर तसेच वरिष्ठ अधिकारी व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध उद्योग क्षेत्रांतील सुमारे १६०० कारखाना प्रतिनिधींनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली. यावेळी राज्यातील सुरक्षा व आरोग्य विषयक उत्कृष्ट कामगिरीबद्दल धोकादायक तसेच धोकादायक नसलेल्या उद्योगांचा गौरव करण्यात आला. विविध श्रेणींमध्ये एकूण २४ पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कामगार मंत्री फुंडकर म्हणाले की, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक धोरणात्मक सुधारणा केल्या आहेत. औद्योगिक संरचनेमध्ये लवचिकता आणल्यामुळे उद्योग आणि कामगार दोघांनाही फायदा झाला आहे. यामुळे उत्पादकतेत वाढ झाली आहे. उद्योगांना चालना देतानाच कामगारांचे हित जपण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून २०१४ पासून देश व राज्यात उद्योगस्नेही वातावरण निर्माण झाले असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग आणि कामगार या दोघांचेही हित जपले जात असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांना जलद सेवा मिळावी यासाठी मानवी हस्तक्षेपविरहित प्रणालीवर सरकारचा भर असून विविध सेवा ऑनलाइन केल्या जात आहेत. यामुळे तक्रारींचे त्वरित निवारण होण्यास मदत होत आहे. महिला कामगारांच्या सक्षमीकरणासाठी, पूर्वी प्रतिबंधित असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये महिलांना काम करण्याची संधीसुद्धा देण्यात आली आहे.

# 'नामस्मरणाने भक्तिभाव निर्माण होतो.' - शैलेश सावजी

**डोणगाव दि.११ :** डोणगाव पासुन जवळ असलेल्या शेलगाव देशमुख येथील मारुती मंदिर मठ संस्थानमध्ये आयोजित करण्यात आलेल्या भागवत सप्ताह सोहळ्याला यंदा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला असून संपूर्ण सप्ताहभर विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी परिसर भारावून गेला. गावातील तसेच पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सप्ताहाचा लाभ घेतला. दि. ९ एप्रिल रोजी सप्ताहानिमित्त विशेष पूजाअर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या पूजाविधीचे औचित्या साधून जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांच्या हस्ते विधीवत पूजाअर्चा संपन्न झाली. यावेळी त्यांनी आपल्या मनोगतातून



उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, "नामस्मरणाने भक्तीभाव निर्माण होतो, भक्तीभावाने सदाचार राहतो आणि सदाचाराने गावात आनंदाची निर्मिती होते." त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. सप्ताहादरम्यान भागवताचार्य ह.भ.प. नवले महाराज यांनी श्रीमद्भागवत महापुराणाचे सखोल व प्रभावी वाचन करून उपस्थितांना धर्म, नीती, भक्ती व जीवनमूल्यांचे मार्गदर्शन केले.

# जि.प.शाळा मंगरूळ नवघरे येथे वर्ग पहिलीत ४० विद्यार्थी दाखल

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मंगरूळ नवघरे दि.११ :** उपक्रमशील शाळा म्हणून नावारुपास आलेल्या जि प केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा, मंगरूळ नवघरे येथे सन २०२६-२७ या वर्षासाठी वर्ग पहिलीचे प्रवेश अभियान राबवण्यात आलेले असून सदर शाळेत आजवर ४० विद्यार्थ्यांचा पहिली मध्ये प्रवेश झालेला आहे. आणि त्यांचा वर्ग पहिली चा प्रत्याक्ष वर्ग सुद्धा सुरू करण्यात आलेला आहे.

चिखली तालुक्यातील मंगरूळ नवघरे येथील जिल्हा परिषद शाळा गुणवत्ता पूर्ण आणि दर्जेदार शिक्षण देणारी शाळा म्हणून नाव रूपास आलेली आहे. येथील सर्व शिक्षक मंडळी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी खूप मेहनत घेत आहेत.त्याचीच परिणती म्हणून आजवर येथील शाळेत वर्ग पहिली मध्ये ४० विद्यार्थी दाखल झालेले आहेत आणि अजूनही मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शाळेत दाखल होत आहेत. शाळेने लोकसहभागातून अनेक सुविधा उपलब्ध करून घेतलेले आहेत. शाळेत बोलका परिसर, बोलक्या वर्गखोल्या, आरामदायी आणि उत्कृष्ट अशा पियुसी युक्त वर्ग खोल्या,सुसज्ज ग्रंथालय, आरो फिल्टर पाण्याची सुविधा, इंटरऍक्टिव्ह पॅनल सह डिजि-




टल शिक्षण, मोफत अबॅकस शिक्षण, अतिरिक्त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यासह अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेमध्ये राबवल्या जात आहेत. यामुळे शाळेच्या पटसंखेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. शाळेच्या या कार्यात बुलढाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात साहेब, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, गटशिक्षणाधिकारी अनाळकर साहेब, गटसमन्वयक प्रवीण वायाळ ,केंद्रप्रमुख रामदास भगत यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत आहे. तसेच शाळेला शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पालक सर्व गावकरी मंडळी मंगरूळ नवघरे यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य लाभत आहे. त्यामुळे येत्या काळात ही शाळा पटसंख्येतच नव्हे तर गुणवत्तेतही मोठ्या प्रमाणात भरारी घेत आहे.

# डॉ. तौशिफ शेख राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी

**लाखनवाडा दि.११ :** डॉ. तौशिफ शेख यांची राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉ. शेख हे सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेले व्यक्तिमत्व असून सर्व जाती-धर्मातील लोकांना सोबत घेऊन चालण्याची त्यांची कार्यपद्धती आहे.

समाजहितासाठी वेळेचे भान राखून कार्य करणे, तसेच गोरगरीब नागरिकांच्या न्याय व हक्कांसाठी सातत्याने लढणे ही त्यांची ओळख आहे. ते माधवराव जानकर (माजी मंत्री) यांचे निकटवर्ती व विश्वासू कार्यकर्ते म्हणूनही ओळखले जातात. राज्यभरातील अनेक




गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले आहेत, त्यामुळे महाराष्ट्रात त्यांची विशेष ख्याती आहे. डॉ. शेख यांच्या या निवडीमुळे पक्ष संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्षातील ज्येष्ठ व अनुभवी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. तसेच क कडून जल्लोष साजरा करण्यात येत आहे.

# बीबी ग्रामीण रुग्णालयात जागतिक होमिओपॅथी दिन साजरा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बीबी दि.११ :** बीबी येथे ग्रामीण रुग्णालयात दरवर्षी १० एप्रिल रोजी सर सम्युएल हनेमन यांच्या जयंती निमित्त जागतिक होमिओपॅथी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाने होमिओपॅथी चिकित्सा पद्धतीचा अधिकाधिक प्रचार व प्रसार होण्यासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार ग्रामीण रुग्णालय बिबी येथे १० एप्रिल रोजी जागतिक होमिओपॅथी दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी आरोग्य अधिकारी डॉ. समाधान मुळे, डॉ स्वप्निल सोनुने, डॉ शरद कुहीटे, डॉ विवेक बंगाळे (होमियोपैथिक वैद्यकीय अधिकारी,) डॉ विशाल इंगोले (आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी), डॉ आमेना शेख (युनानी वैद्यकीय अधिकारी) हे प्रमुख उपस्थित होते. शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी ह्या थीम सह ह्यावर्षी साजरा करण्यात आलेल्या जागतिक होमिओपॅथी दिवसाबाबतचे प्रास्ताविक आयुष वैद्यकीय अधिकारी अधिकारी ह्यांनी उपस्थितांना सांगितले तर होमिओपॅथी चिकित्सा पद्धतीचे महत्व डॉ. विवेक बंगाळे यांनी विषद केले.



आयुष विभागाद्वारे गरजु रुग्णावर उपचार करण्यात आले, कार्यक्रम यशस्वितेसाठी अधिपरीचारीका श्रीमती शिंपणे, शिंदे,पडघान,गोंड, घोडके, ठाकरे , औषध निर्माण अधिकारी आंधळे, खंडागळे, पंधे, चव्हाण, वरिष्ठ लिपिक सोनुने, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नागरे, समुपदेशक शेगोकार, चव्हाण , खरात आरमाळ, श्रीमती ढंढोरे, श्रीमती चावरे आदि कर्मचारी उपस्थित होते.

# धामणगाव बढे येथे सर्वधर्मीय ईद मिलन व अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**धामणगाव बढे दि.११ :** येथे मोताळा तालुका काँग्रेस कमिटी व धामणगाव बढे शहर काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वधर्मीय ईद मिलन व अभिष्टचिंतन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. "नफरत के दौर में, मोहब्बत का पैगाम" हा संदेश देत सामाजिक एकोपा, प्रेम आणि सौहार्द वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. सिंदखेडचे सरपंच व मोताळा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रवीण (आप्पा) कदम यांच्या वाढदिवसानिमित्त या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला सर्व धर्मीय बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विविध समाजघटक



एकत्र आल्याने कार्यक्रमाला एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाला काँग्रेसचे जिल्हा नेते संदीप शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर वक्त्यांनी आपल्या मनोगतातून सर्वधर्म समभाव, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मतेचे महत्व अधोरेखित केले. आजच्या तणावपूर्ण सामाजिक परिस्थितीत अशा प्रकारचे सर्वधर्मीय कार्यक्रम समाजात एकतेचा आणि शांततेचा भक्कम संदेश देतात, असे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. मा. प्रवीण (आप्पा) कदम यांनी उपस्थितांचे आभार मानत सांगितले की, समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन प्रेम, सौहार्द आणि बंधुभाव जपणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपा अधिक दृढ होतो, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. ईद निमित्त पारंपरिक शिरखुरमा देण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सर्व धर्मीय बांधवांनी एकत्र बसून भोजनाचा आस्वाद घेत एकतेचे सुंदर उदाहरण घालून दिले. या प्रसंगी उपस्थितांनी मा. आप्पा कदम यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचे कौतुक केले. "नको ठेकेदार, हवा सेवेदार" या त्यांच्या प्रचार वाक्याचेही विशेष कौतुक करण्यात आले. सुयोग्य नियोजन आणि उपस्थितांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

समस्या | मामाच्या गावचा आनंद हरवला !

# संवादाला लागले कुलूप, तर मैदानी खेळ होत आहेत इतिहास जमा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लोणार दि.११ :** लोणार परिसरामध्ये एकेकाळी शाळांना सुट्ट्या लागल्या की उन्हाळ्याच्या सुट्ट्या म्हणजे मुलांसाठी आनंदाचा उत्सव असायचा. शाळा सुटली की मुलं थेट मामाच्या गावाला जाण्याची तयारी करत असत. मात्र बदलत्या काळानुसार आता हा आनंद हळूहळू इतिहासजमा होताना दिसत आहे. तालुक्यात मुलांना शाळांना सुट्ट्या लागल्या की मुलं मामा च्या गावाला जाण्याची तयारीत असतात तर या गावातील भाचे इकडे म्हणजेच मामाच्या घरी येण्यासाठी तयार असतात मामाच्या गावाला जाणे म्हणजे केवळ प्रवास नव्हे, तर एक वेगळीच जीवनशैली अनुभवण्याची संधी असायची. शेतात फिरणे, आंब्याच्या झाडावर चढून कैऱ्या तोडणे, मोहोळाचा स्वाद घेणे, विहिरीत पोहणे, मित्रांसोबत खेळणे आणि गावातल्या मोकळ्या वातावरणात बागडणे या सर्व गोष्टी मुलांच्या बालपणाचा अविभाज्य भाग होत्या. त्या आठवणी आजही अनेकांच्या मनात ताज्या आहेत.




मात्र सध्याच्या काळात मोबाईल, इंटरनेट आणि विविध क्लासेसमुळे मुलांचे जग पडद्यामागे गेले आहे. शैक्षणिक स्पर्धा वाढल्यामुळे पालकही मुलांच्या अभ्यासावर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. परिणामी, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्येही क्लासेस, ऑनलाइन शिक्षण आणि मोबाईल गेम्स यांनाच प्राधान्य दिले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, शिक्षणासोबतच शारीरिक आणि मानसिक विकासासाठी मैदानी खेळ, पोहणे, मित्रांसोबत संवाद साधणे या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत. मात्र आजच्या मुलांना या अनुभवांपासून वंचित राहावे लागत आहे. मोबाईलच्या आहारी गेलेली मुले दिवसेंदिवस बाहेरील जगापासून दूर जात असल्याची चिंताजनक बाब समोर येत आहे.

पालकांनी शिक्षणाबरोबरच खेळण्यासाठी, निसर्गात वेळ घालवण्यासाठी आणि सामाजिक अनुभव मिळवण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या केवळ अभ्यासासाठी नसून, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाच्या असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

# 'गौ-बुक ॲप'द्वारे देशभरातील गोसंवर्धन क्षेत्राला डिजिटल जोडणी- नरेंद्र पुरोहित

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.११ :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गत कार्यरत वर्धा येथील महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकीकरण संस्था (एमगिरी) येथे दिनांक ६ ते १० एप्रिल दरम्यान "पंचगव्य उत्पादांवरील प्रशिक्षण कार्यक्रम" आयोजित करण्यात आला होता. या सहा दिवसीय प्रशिक्षणात गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्रातील विविध गोशाळांच्या प्रतिनिधींनी सहभाग घेत एमगिरीत विकसित करण्यात आलेल्या पंचगव्य उत्पादनांचे प्रशिक्षण घेतले.

समारोप कार्यक्रमात खामगाव येथील नरेंद्र पुरोहित यांनी सांगितले की, एमगिरी, वर्धा ही पंचगव्य उत्पादनांच्या विकास व मानकीकरणासाठी संशोधन करणारी देशातील एकमेव शासकीय संस्था असून, ही संस्था विकसित तंत्रज्ञान गोशाळा, शेतकरी व महिला बचत गटांपर्यंत पोहोचवून



रोजगारनिर्मितीस चालना देत आहे. यावेळी त्यांनी गौ बुक ॲप विषयी सविस्तर माहिती देताना सांगितले की, हा ॲप देशातील सर्वात मोठा गौ-संबंधित डिजिटल समुदाय तयार करत असून, देशभरातील गोशाळा, स्वयंसेवी संस्था, गौ-सेवक, दाते, तज्ज्ञ, सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्स व विक्रेते यांना एकाच प्लॅटफॉर्मवर जोडतो. त्यांनी सर्व गोशाळा, पंचगव्य उत्पादक व तज्ज्ञांनी या ॲपशी जोडण्याचे आवाहन केले. प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या भारतीय सेनेचे सेवानिवृत्त कर्नल कौशिक यांनी नरेंद्र पुरोहित यांचे स्वागत केले. कार्यक्रमात जैव प्रक्रिया विभागाचे उपनिदेशक डॉ. अग्निहोत्री, वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. जयकिशोर छांगाणी आणि नरेंद्र पुरोहित यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी डॉ. जयकिशोर छांगाणी व कु. पायल कथले यांच्या मार्गदर्शनाखाली पंचगव्य आधारित साबण, शॅम्पू, हँडवॉश, फ्लोअर क्लिनर, हेअर ऑईल, हेअर कंडिशनर, फेस पॅक, धूपबत्ती, अगरबत्ती आदी उत्पादनांच्या निर्मितीचे प्रात्यक्षिक व प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या विविध योजना, यंत्रसामग्री व कच्चामाल पुरवठादार, पॅकेजिंग, मार्केटिंग, परवाना प्रक्रिया, प्रोजेक्ट प्रस्ताव तयार करणे यासंदर्भातही डॉ. छांगाणी यांनी मार्गदर्शन केले.

## महत्त्वाचे

### आज काँग्रेसचा मेळावा

**जालना :** काँग्रेस पक्षाच्या वतीने रविवार दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता जालना शहरातील भोकरदन नाका परिसरात असलेल्या आयएमए हॉल या ठिकाणी संघटन, सृजन अभियानातंर्गत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास अभियानाचे निरीक्षक गुजरातचे माजी आमदार हिम्मतसिंह पटेल, खासदार डॉ. कल्याण काळे, प्रदेश कमिटीकडून निरीक्षक म्हणून माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले, माजी आमदार सुरेश देशमुख, प्रदेश पदाधिकारी अब्दुल हफिस, जिल्हा पक्ष प्रभारी अशोक निलंगेकर, आमदार राजेश राठोड, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, कल्याण दळे आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा होणार आहे.

### जिल्ह्यात राष्ट्रीय पोषण पंधरवड्याचे आयोजन

**जालना :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रस्तरावर दि. ९ एप्रिलपासून ८ वा राष्ट्रीय पोषण पंधरवडा मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. बालकाचा शारीरिक विकासासोबतच मानसिक आणि बौद्धिक विकास व्हावा, यासाठी कुटुंब आणि समुदायामध्ये योग्य पद्धतींचा सराव व्हावा, हा या मोहिमेचा केंद्रबिंदू आहे. दि. २३ एप्रिल २०२६ पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त पालकांनी आणि लाभार्थ्यांनी केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यंदाचा पोषण पंधरवडा १). माता व बालकाचे पोषण: गरोदर माता आणि बालकांच्या आहाराबाबत मार्गदर्शन. २). मेंदू विकास (० ते ३ वर्षे): लहान मुलांच्या बौद्धिक वाढीसाठी पूर्व उद्दीपन. ३). खेळातून शिक्षण (३ ते ६ वर्षे): मुलांसाठी खेळ आधारित पूर्व शालेय शिक्षण. ४). स्क्रीन टाइमवर नियंत्रण: मुलांचे मोबाईल व टीव्हीचे व्यसन कमी करण्यासाठी पालकांची भूमिका. ५). सक्षम अंगणवाडी: अंगणवाडी केंद्रांच्या सक्षमीकरणासाठी लोकसहभाग वाढवणे. या विषयावर प्रामुख्याने आधारित असेल. असे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### विशेष साप्ताहिक एक्सप्रेस रेल्वेगाडी

**जालना :** उन्हाळ्याच्या सुट्टीच्या काळात प्रवाशांची वाढलेली गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेच्या समन्वयाने दक्षिण रेल्वेने कोयंबतूरजयपूरकोयंबतूर दरम्यान विशेष साप्ताहिक एक्सप्रेस रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ०६१८१ कोयंबतूरजयपूर साप्ताहिक एक्सप्रेस विशेष ही गाडी दिनांक ०९ एप्रिल २०२६ ते ०४ जून २०२६ या कालावधीत दर गुरुवारी कोयंबतूर येथून पहाटे ०२.३० वाजता सुटेल व शनिवारी दुपारी १३.२५ वाजता जयपूर येथे पोहोचेल. या कालावधीत एकूण ९ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. परतीच्या प्रवासात गाडी क्रमांक ०६१८२ जयपूरकोयंबतूर साप्ताहिक एक्सप्रेस विशेष ही गाडी दिनांक १२ एप्रिल २०२६ ते ०७ जून २०२६ या कालावधीत दर रविवारी रात्री २२.०५ वाजता जयपूर येथून सुटेल व बुधवारी सकाळी ०८.३० वाजता कोयंबतूर येथे पोहोचेल. या गाडीच्या देखील ९ फेऱ्या चालविण्यात येणार आहेत. या विशेष गाडीमध्ये एकूण २० एलएचबी डबे असतील, ज्यामध्ये १८ वातानुकूलित थ्री-टियर डबे व २ लगेज-कम-ब्रेक व्हॅनचा समावेश आहे. ही गाडी विद्युत इंजिनाद्वारे चालविण्यात येईल.

# जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन हेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते-डॉ.रतनलाल

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ११ :** या देशातील जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते आणि आजच्या परिस्थितीत त्यांचे विचार अधिकच समर्पक ठरतात, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील इतिहासकार व विचारवंत डॉ. रतनलाल यांनी येथे केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. ॲड. शिवाजी आदमाने हे यावेळी अध्यक्षस्थानी होते. माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर, डॉ.भगवानसिंग ढोबाळ, डॉ.कालीदास सूर्यवंशी आदींची यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. विचारमंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ.शांताराम रायपुरे, सचिव सुधाकर रत्नपारखे, कार्याध्यक्ष साईनाथ चिन्नादोरे आदींची उपस्थिती होती.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे महत्त्व या विषयावर विचार मांडतांना डॉ.रतनलाल पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर समानतेवर आधारित समाजाची कल्पना मांडली. मात्र आज बहुजन या संकल्पनेचा योग्य अर्थ लावला जात नाही. अनेक नेते बहुजन हा शब्द वापरतात; परंतु त्याचे सखोल विश्लेषण करत नसल्याचे त्यांनी नमूद केले. या देशातील जातीय व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अंतिम ध्येय होते, मात्र फुले-शाहू-आंबेडकर यांच्या भूमीत जात व्यवस्था उध्वस्त व्हायला पाहिजे होती, ती उध्वस्त होतांना दिसत नाही. बाबासाहेबांचा उदोउदो करणाऱ्यांनी सुद्धा जात व्यवस्था मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले असल्याची टीका त्यांनी केली. शूद्र जात समूहांना संघटित करून अनुयायांनी राजकारण केले असते तर या देशातील आजचे चित्र वेगळे दिसले असते, असे ते म्हणाले. कार्ल मार्क्स, गौतम बुद्ध आणि महात्मा जोतिराव फुले यांच्याप्रमाणेच बाबासाहेबही समानतेच्या ध्येयाने प्रेरित होते; परंतु आजच्या काळात सत्य मांडण्यास लोक घाबरत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महापुरुषांचे दैविकरण केले जात असल्याचे ते म्हणाले. फोटोला, पुतळ्याळास वंदन केले म्हणजे कार्य संपले. महात्मा गांधी आणि बाबासाहेब यांच्यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणाले की, गांधीजी अस्पृश्यता निर्मूलनावर भर देत होते तर बाबासाहेबांचे अंतिम ध्येय संपूर्ण जाती व्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे हे होते. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे विचार आत्मसात करणे तसेच शिक्षण घेऊन ज्ञानी होणे हेच तरूण पिढीने आपले ध्येय समजावे, असे आवाहनही डॉ.रतनलाल यांनी यावेळी केले.

प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना डॉ.भगवानसिंग ढोबाळ म्हणाले की, देशातील दीनदुबळ्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. त्यांचे परिवर्तनवादी विचार तळागाळातील समाजात पोहचवण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेच्या माध्यमातून होत आहे.

अध्यक्षीय समारोप करताना ॲड. शिवाजी आदमाने म्हणाले की, वेशीच्या बाहेर असलेल्या समाजातील महिलांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या माध्यमातून शिक्षणाची संधी मिळाली आहे. वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ.आंबेडकर यांनी केले. संविधानामुळे वंचित समाज घटक आज सत्तेत सहभागी होतांना दिसत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी चळवळीमुळेच मोठे परिवर्तन घडले असल्याचे सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला ही अनेक अडचणींवर मात करीत अविरतपणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन डॉ. प्रियदर्शन भवरे यांनी केले.


## बोरगाव बु.येथे निरोप समारंभ व महिला-पालक मेळावा उत्साहात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जाफ्राबाद, दि. ११ :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव बु. येथे इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ, महिला-पालक मेळावा आणि नवागतांचे स्वागत असा त्रिवेणी कार्यक्रम शुक्रवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात संवाद साधत विविध सामाजिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळा समितीचे अध्यक्ष सुभाष फदाट यांनी भूषविले. यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून श्री ह. भ. प. नारायण पिंपळे आणि श्रीमती क्रांती एस. मेरत मॅडम यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून केंद्र प्रमुख तथा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. बी. एल. देशमुख उपस्थित होते.व्यासपीठावर शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.व्ही.जगताप सर, शेवाळे सर,राजू बोर्डे ,अभिजीत साळवे, चव्हाण सर, संतोष शेळके,रमेश जोशी,मारोती जोशी,श्रीमती स्मिता न्याहाळ, सिमा रिंढे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील सोनाली काळे,कृतिका जाधव,दिव्या खंदाडे, राजकन्या जाधव, सृष्टी माकोडे, या इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केली.''मुले हीच पालकांची खरी संपत्ती असून त्यांच्या जडणघडणीत आईची भूमिका महत्त्वाची आहे.'' त्यांनी संविधानाने महिलांना दिलेल्या अधिकारांवर भाष्य करत मुलींना सक्षम व निर्भय बनवण्याचे आवाहन श्रीमती क्रांती मेरत मॅडम यांनी केले. त्यानंतर ह.भ.प. नारायण पिंपळे बोलताना म्हणाले,मराठी शाळा, सरकारी दवाखाने आणि एसटी बस या ग्रामीण भागाच्या जीवनवाहिन्या आहेत. या सार्वजनिक व्यवस्था टिकवणे समाजाची जबाबदारी आहे.'' त्यांनी पालकांना जिल्हा परिषद शाळेतच पाल्यांचे प्रवेश घेण्याचे आवाहन हभप पिंपळे माऊली यांनी केले. सुत्रसंचलन शिक्षक प्रल्हाद काळे प्रास्ताविक गोपाल बेडवाल, तर आभार राजेंद्र भुजबळ यांनी मानले.

कार्यक्रमाप्रसंगी, संजय निकम, राजेंद्र सोनवणे, राजेंद्र भुजबळ, गायकवाड सर, भास्कर फदाट,विष्णू चव्हाण, सतिश फदाट,कृष्णा वाहुळे, महादु फदाट , सुनील फदाट, सचिन फदाट, हर्षल फदाट, देविदास खंदाडे,विनोद फदाट, खेडेकर सर, म्हात्रे सर,राहुल फदाट, शिवाजी चव्हाण, अनिल जाधव,अजबराव जाधव,ज्ञानेश्वर जाधव,बबन खंदाडे,विनायक फदाट,अलीम शेख, बालु पठाण,मारुती मतकर, प्रकाश जोशी यांच्यसह ग्रामस्थ व महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.



### आठवणींच्या उजाळ्याने विद्यार्थिनीला अश्रू अनावर

जिल्हा परिषद शाळेत इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ अत्यंत भावूक वातावरणात पार पडला. या प्रसंगी शाळेतील विद्यार्थिनी सृष्टी माकोडे हिने आपले मनोगत व्यक्त करताना शाळेतील आठवणींना उजाळा दिला, मात्र बोलताना तिला आपले अश्रू अनावर झाले. सृष्टी हिने आपल्या भाषणात सांगितले की, ''जिल्हा परिषद शाळेने केवळ शिक्षणच दिले नाही तर जगायचे कसे याचे संस्कारही दिले. शिक्षकांनी दिलेल्या प्रेमामुळे ही शाळा आमचे दुसरे घर बनली होती.'' हे सांगताना सृष्टीचा कंठ दाटून आला आणि तिला अश्रू अनावर झाले. तिने उपस्थित सर्व शिक्षकवृंदांचे आभार मानले.

## जातीय द्वेषामुळे काँग्रेस पक्ष जिल्हयात रसातळाला-नंदा पवार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ११ :** जालना जिल्ह्यातील काँग्रेस पक्ष रसातळाला नेणारे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी जातीयद्वेषातून आपल्यावर पक्ष निलंबनाची कारवाई केली असून काँग्रेस पक्षाने निष्क्रिय जिल्हाध्यक्ष देशमुख यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष नंदा पवार यांनी जालन्यात आयोजित एका पत्रकार परिषदेत केली.



नंदा पवार म्हणाल्या की, काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी माझे जे निलंबन केले ते चुकीचे आणि बेकायदेशीर आहे. माझ्यावरती जे बिन बुडाचे आरोप केले आहेत ते सर्व खोटे आहेत. देशमुख यांनी मला रीतसर पत्र द्यायचे होते. माझा खुलासा मागविणे अपेक्षित होते. त्यांनी जाणीवपूर्वक मी मागासवर्गीय महिला असल्यामुळे माझ्यावर अन्याय केला आहे. देशमुख यांनी जिल्ह्यातील काँग्रेस पार रसातळाला नेली आहे. देशमुख जिल्हाध्यक्ष झाल्यापासून त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात काँग्रेसला भाजप आणि शिंदे शिवसेनाच्या दावणीला बांधल्यामुळे काँग्रेस पक्षाचे पतन झाले आहे, ते जातीयवादी असल्यामुळे निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला आहे, त्यांनी केवळ भोकरदनची नगरपालिका आपल्या ताब्यात राहण्यासाठी भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांच्या सांगण्यावरून काम करत गेले. यामुळे काँग्रेस पक्षाची खूप मोठी हानी झाली आहे. भाजप आणि शिंदे शिवसेना गट यांच्या सांगण्यावरून आर्थिक देणे घेणे करून नगरपालिका व महानगरपालिका निवडणुकीत त्यांनी तिकीट विकले. काँग्रेस पक्षात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यावर त्यांनी अन्याय केला आहे. राजाभाऊ देशमुख हे जातीयवादी असल्यामुळे मागासवर्गीय, मुस्लिम-ओबीसी समाजातील कार्यकर्त्यावर अन्याय झाला आहे. मी स्वतः मागासवर्गीय असल्यामुळे व आर्थिक संपन्नन नसल्यामुळे महानगर पालिकेच्या निवडणुकीत तिकीटासाठी पैसे देऊ शकत नसल्याने जाणीवपूर्वक माझे तिकीट कापण्याचा प्रयत्न केला व माझ्या विरोधात पैसे घेऊन शिंदे गटाचा उमेदवार उभा करून मला पराभूत केले. महिला काँग्रेसची जिल्हाध्यक्ष झाल्यापासून प्रभाग क्रमांक ४ तसेच जिल्ह्यासह शहरात मी काँग्रेसचे महिला संघटन उभे केले. यामुळे मला पक्षाने माझ्या प्रभागात उमेदवारी दिली, मात्र जिल्हाध्यक्ष देशमुख, अतिकखान यांनी रातोरात मुंबईला जाऊन प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील यांना माझ्याबद्दल खोटी व चुकीची माहिती देऊन मला दिलेली उमेदवारी रद्द करण्याचे पत्र आणले व ते पत्र सगळीकडे व्हायरल केले. मला जालना महानगरपालिका निवडणुकीमध्ये जाणीवपूर्वक पाडले. मी १००% टक्के निवडून येणार होते. गणेश पाटील, राजाभाऊ देशमुख यांनी एका मागासवर्गीय महिलेच्या विरोधात इतके जातीयवादी धोरण घेऊन माझा पराभव केला. राजाभाऊ देशमुख यांनी जालना जिल्ह्यामध्ये काँग्रेस मातीत घातली असून त्यांना जिल्हा अध्यक्षपदावर राहण्याचा काहीही अधिकार नाही, त्यांची तात्काळ जिल्हाध्यक्षपदावरून हकालपट्टी करावी, अशी मागणी आपण काँग्रेस पक्ष श्रेष्ठीकडे करणार आहोत असेही नंदा पवार यांनी यावेळी सांगितले.

## महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्साहात साजरी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. ११ :** बदनापूर तालुक्यातील नुतन वसाहत, सेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रपिता जोतीराव फुले यांची १९९ वी जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम राष्ट्रपिता जोतीराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संजय हेरकर म्हणाले की, देशातील सर्व महिलांनी क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले, जोतीराव फुले यांच्या कार्याचा इतिहास समजून घेतला पाहिजे. इतिहास वाचून त्यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांचे विचार आपल्या जिवनात सतत तेवत ठेवले पाहिजे तरच आपले जीवन हे आनंदमय आणि सुखमय होईल. यावेळी संजय हेरकर, राहूल खिल्लारे, बबलू शेख, विशाल सोनवणे, शिक्षक संजय गंगवाल, अंगणवाडी कर्मचारी निर्मला दायमा, रंजना जाधव, मंदा घोरपडे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## आईला छेडल्याच्या रागातून तरुणाचा खून

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



मयत



संशयित आरोपी

**जालना, दि. ११ :** जालना तालुक्यातील सिरसवाडी येथील शेतवस्तीवर झोपलेल्या एका तरुणाला आईला छेडल्याच्या कारणावरून त्याच गावातील दुसऱ्या एका तरुणाने चाकूचे सपासप वार करून खून केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली.

या घटने विषयी अधिक माहिती अशी की, २९ वर्षीय तरुण निखिल वाघमारे याच्याशी तेथीलच दुसऱ्या एका तरुणाचे वैयक्तिक कारणावरून वाद होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार निखिल वाघमारे याने आरोपीच्या आईची छेड काढल्यावरूनच ही घटना घडली आहे. शुक्रवारच्या मध्यरात्री निखिल त्याच्या शेतात झोपलेला असताना सदरील आरोपीने त्याच्यावर चाकूचे सपासप वार करून तो तेथून पसार झाला होता. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिस ठाण्याच्या पथकाने पळून जाण्याच्या बेतात असलेल्या आरोपीस जालना-संभाजीनगर रोडवरील काकडे पेट्रोलपंपाजवळ त्याला अवघ्या काही तासात जेरबंद केले.



## मनपा शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी कडक निर्देश

### प्रत्येक वर्गात किमान २० विद्यार्थी अनिवार्य

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ११ :** जालना महानगरपालिका शिक्षण विभागाची महत्त्वपूर्ण बैठक शिक्षण सभापती सौ.भाग्यश्री जोगस यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या सभागृहात पार पडली. या बैठकीस मराठी व उर्दू माध्यमांच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षणाधिकारी उपस्थित होते. बैठकीत महापालिकेच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे व विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक वर्गात किमान २० विद्यार्थ्यांची उपस्थिती अनिवार्य राहील, अन्यथा संबंधित वर्ग बंद करण्याचा इशारा सभापती जोगस यांनी दिला. तसेच कामात हलगर्जीपणा करणाऱ्या शिक्षकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

डिजिटल शाळा संकल्पना, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, अत्याधुनिक शिक्षण साधनांचा वापर यासंदर्भातही बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी शिक्षकांनी सर्वसामान्य नागरिकांमध्ये जाऊन जनजागृती करावी, तसेच महापालिका शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या मोफत शिक्षण व विविध सुविधांची माहिती पालकांपर्यंत पोहोचवावी, असे निर्देश देण्यात आले. शिक्षकांच्या उपस्थितीसाठी बायोमेट्रिक प्रणाली सुरू करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या असून यासाठी मुख्य शिक्षणाधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी सभागृह नेते महेशराव निकम, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे यांनीही मनोगत व्यक्त केले. शिक्षण समितीच्या सदस्या कार्तिकी इंगळे, ज्योती सले, स्नेहलता कामड, मंगल गरदस, सहआयुक्त केशव कानपुडे, शिक्षणाधिकारी फैजल सर यांच्यासह सर्व मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. या बैठकीत महापालिकेच्या शाळांना अधिक सक्षम, आधुनिक व गुणवत्तापूर्ण बनवण्याच्या दृष्टीने ठोस निर्णय घेण्यात आले.

**आदर्श** भीम जयंतीनिमित्त प्रेरणादायी उपक्रम

## सिद्धार्थ महाविद्यालयात १८ तास अखंड वाचन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जाफ्राबाद, दि. ११ :** येथिल सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून १८ तास अखंड पुस्तक वाचन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल म्हस्के म्हस्के यांनी या उपक्रमाचे उद्घाटन केले. यावेळी प्राचार्य डॉ.म्हस्के म्हणाले की, बाबासाहेबांच्या अफाट व्यासंग आणि अभ्यासू वृत्तीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थी आणि संशोधकांनी सलग १८ तास एकाग्रतेने विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करावे, या निमित्ताने महाविद्यालयाच्या ऐतिहासिक ग्रंथालयातील बाबासाहेबांच्या हस्तलिखितांचे आणि दुर्मिळ ग्रंथांचे दर्शन घेण्याची संधी उपस्थितांना मिळेल. या उपक्रमाचे आयोजन ग्रंथपाल प्रा.अशोक पठाडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथालय समितीने आणि विभागाने केले. सूत्रसंचालन डॉ.संतोष पहारे यांनी केले तर आभार प्रा.मनीष बनकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्रसिद्धी प्रमुख प्रा.अनिल वैद्य यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, रविवार १२ एप्रिल २०२६

## थोडक्यात

### सुफिया नगरात दुचाकी जळून खाक

अमरावती : शहरातील सुफिया नगरात घराच्या आवारात पार्क करून ठेवलेल्या दोन दुचाकीपैकी एक दुचाकी जळून खाक झाली. ७ एप्रिल रोजी ही घटना रात्रीदरम्यान घडल्याचे सकाळी उघडकीस आली. सैय्यद समीर सैय्यद नासीर यांनी त्यांच्या दोन्ही मोटारसायकल घराच्या आवारात पार्क ठेवल्या होत्या. त्यापैकी एमएच २७ बीडी ०५८७ क्रमांकाची दुचाकी जळून खाक झाल्याने त्यांचे अंदाजे ५५ हजार रूपयांचे नुकसान झाले. सदर दुचाकीला अज्ञातान आग लावल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. त्या आधारे नागपुरी गेट पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### कार-दुचाकी धडकेत दोघे जखमी

अमरावती : काँग्रेसनगर मार्गावरील तक्षशिला कॉलेजनजिक भरधाव अज्ञात कारने दुचाकीला जबर धडक दिल्याने दुचाकी दुभाजकावर धडकाल्याने अपघात घडला. यात दुचाकीवरील दोन्ही मित्र जखमी झाले. यावेळी कार चालकाने न थांबता पळून गेला. काही नागरिकांनी जखमींना जिल्हा रूग्णालयात हलविले. प्रेम परमेश्वर सोनोने वय १९, रा. एकतानगर, बिच्छुटेकडी व त्याचा मित्र असे जखमींचे नाव आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रारीवरून अज्ञात कार चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

अमरावती : दारू विक्रेत्यांवर पोलिसांनी धाडी घातल्या. आरोपींना ताब्यात घेत मुद्देमाल जप्त करून गुन्हा नोंदविला. राजापेठ हद्दीत प्रदीप बाबुलाल कुरवाने वय ४५, रा. चिचफैल याच्याजवळून २५ नग देशी दारू बॉटलस किंमत अंदाजे १ हजार रूपयांचा माल जप्त केला. भातकुली पोलिसांनी सागर गणेश आवठले याला पकडून त्याच्या ताब्यातून ११ नग देशी दारू बॉटल्स किंमत अंदाजे ५५० रूपयाचा माल जप्त केला. दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून नंतर त्यांची समजपत्रावर सुटका करण्यात आली.

### उघड्यावर मास विक्री करणाऱ्यांवर कारवाई

अमरावती : भातकुली मार्गावरील विजय मंगल कार्यालय, खाटीकपुरा परिसरात उघड्यावर मास विक्री करणाऱ्या चार जणांविरूध्द पोलिसांनी गस्तीदरम्यान कारवाई करण्यात आली. सुनील ढोके, चंद्रशेखर ढोके, राजू ढोके व मारोती भोपसे उघड्यावर मास विक्री करताना आढळून आले. याप्रकरणी पोकों विवेक मोहोड, प्रदीप ठाकरे प्रशांत वानखडे यांच्या फिर्यादीवरून भातकुली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### जुगार अड्डयावर पोलिसांची धाड

अमरावती : शहरात वेगवेगळया ठिकाणी सुरू असलेल्या जुगारावर पोलिसांनी गस्तीदरम्यान धाडी घालून आरोपींना ताब्यात घेतले. यावेळी जुगार साहित्यासह रोख जप्त करून गुन्हा नोंदविला. गाडगेनगर पोलिसांनी अनिकेत क्षिरसागर, आदीत्य बिसने, भूषण शिंदे, मोन्टू वानखडे, दिनेश वानखडे, अजय नाईक, भूषण चव्हाण, स्वप्नील सगणे यांना रंगेहात ताब्यात घेत जुगार साहित्य, रोख व एक मोटारसायकल असा ५० हजार मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करून नंतर त्यांची समजपत्रावर सुटका करण्यात आली.

# संत पगडीवाला सेल्सला भीषण आग

## लाखो रूपयांचे नुकसान | अग्निशमन दलाच्या प्रयत्नाने आग नियंत्रणात





अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** श्याम चौकातील संत पगडीवाला सेल्समध्ये लागलेल्या भीषण आगीमुळे २० लाख रुपयांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाने अमरावतीमध्ये एक मोठी दुर्घटना टळवली. तीव्र उष्णता आणि सूर्यप्रकाशामुळे सर्वजण त्रस्त आहेत. परिणामी, आगीच्या घटना नियमितपणे घडत आहेत.

शनिवारी दुपारी सुमारे १.१० वाजता, कोतवाली पोलीस स्टेशनसमोर असलेल्या श्री संत पगडीवाला सेल्स या दुकानाला भीषण आग लागली, ज्यामुळे अंदाजे २० लाख रुपयांचे नुकसान झाले. आगीचे कारण अद्याप अज्ञात आहे. घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. मिळालेल्या माहितीनुसार, श्री संत पगडीवाला सेल्स हे दुकान कोतवाली पोलीस स्टेशनसमोर, संत कंवरम मार्केटमध्ये आहे. या दुकानात महिलांचे कपडे आणि स्टेशनरी विकली जाते. शनिवार, ११ एप्रिल रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास या दोन मजली दुकानाच्या वरच्या मजल्यावर अचानक आग लागली. आग झपाट्याने पसरली. दुकानाचे मालक आणि कर्मचारी तात्काळ बाहेर पडले. दुकानातून निघणाऱ्या दाट धुरामुळे जवळच्या दुकानदारांमध्ये आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांमध्ये भिती पसरली. घटनेची माहिती अग्निशमन दलाला तात्काळ देण्यात आली. सुरक्षेच्या कारणास्तव, कोतवाली पोलीस ठाण्यातून एक पोलीस पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले, परंतु तोपर्यंत आग मोठ्या प्रमाणात पसरली होती. वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने परिसरातील संपूर्ण वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यानंतर अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. अग्निशमन अधीक्षक अजय पांढरे आणि सुनील काकडे यांच्या निर्देशानुसार, चालक गौरव फुके, अग्निशमन दलाचे जवान अमोल साळुंके, राजेश गजबे, हर्षद दहातोंडे, निखिल बांते, गोविंद धुळे, रोशन आलुडे, निशांत राठोड, सागर माकोडे, कसम खान आणि नितीन इंगोले यांच्या पथकाने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. आग दुसऱ्या मजल्यावर लागल्याने, आग विझवण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागले. अग्निशमन दलाच्या जवानांनी दरवाजा तोडून आग विझवण्यास सुरुवात केली. सुमारे ४५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. दुकानदाराच्या म्हणण्यानुसार, आगीमुळे २० लाख रुपयांचे नुकसान झाले. अग्निशमन दलाच्या सतर्कतेमुळे अंदाजे २ कोटी रुपयांचे नुकसान टळले. या घटनेत भांडी, साहित्य, कपडे, यंत्रसामग्री आणि फर्निचर जळून खाक झाले. सुदैवाने, कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीचे कारण अद्याप अज्ञात आहे. आग लवकर नियंत्रणात आणल्याने जवळच्या दुकानदारांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

# मंदिरात चोरी करणाऱ्याला रंगेहाथ पकडले!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** शहरात वाढत्या चोरीच्या घटनादरम्यान भैरव बाबा मंदिरात चोरीचा धक्कादायक प्रयत्न उघडकीस आला आहे. देवाच्या चरणी अर्पण केलेले चांदीचे दागिने चोरण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरट्याला स्थानिक नागरिकांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. संतोष प्रकाश गावंडे (वय ३१, रा. म्हैसपूर, ता. दर्यापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवार (दि. ७ एप्रिल) रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास मंदिराचे पुजारी रमण विद्याधर उपाध्याय (वय ६५, रा. बुधवारा) हे नेहमीप्रमाणे पूजा साहित्य घेऊन मंदिरात पोहोचले. यावेळी मंदिर परिसरात गुलाबी रंगाचा ड्रेस घातलेला एक संशयास्पद व्यक्ती फिरताना दिसल्याने त्यांच्या लक्षात संशय आला. पुजाऱ्यांनी त्याच्याकडे चौकशी केली असता, तो गडबडून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. तत्काळ आरडाओरडा केल्याने आसपासच्या नागरिकांनी धाव घेत पाठलाग करून त्याला पकडले. पकडताना आरोपीने अंगावरील गुलाबी ड्रेस काढून फेकला. आतमध्ये पँट-शर्ट घातलेले असल्याने त्याने ओळख लपवण्यासाठी वेषांतर केल्याचे स्पष्ट झाले. झडतीदरम्यान आरोपीकडून भैरव बाबांना अर्पण केलेला चांदीच्या फुलांचा हार जप्त करण्यात आला. त्यातील दोन चांदीची फुले हस्तगत करण्यात आली असून त्यांची किंमत सुमारे १० हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. घटना समजताच संतप्त नागरिकांनी आरोपीला चांगलाच चोप दिला. त्यानंतर खोलापुरी गेट पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक रमेश निंभोर पुढील तपास करत आहेत. आरोपीने यापूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे मंदिरातील मौल्यवान ऐवज चोरीपासून वाचला असून, त्यांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# समाजकंटकांनी गाड्या पेटविल्या

## सुफियान नगर, नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील घटना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील सुफियान नगर क्रमांक २ येथील रहिवासी सय्यद समीर नासिर (२८) यांच्या घरासमोर पार्क केलेल्या दोन वाहनांना कोणीतरी आग लावली. या घटनेत वाहने जळून खाक झाली असून, मोठे नुकसान झाले आहे. तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सय्यद समीरने ७ एप्रिल रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास आपली होंडा ड्रीम युगा मोटरसायकल (क्रमांक एमएच २७ /बीडी-०५८७) आणि ॲक्टिव्हा मोपेड (क्र. एमएच २७ / सीपी-०३४३) घरासमोरील रस्त्यावर पार्क केली होती. त्या रात्री तो झोपायला घरात गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी, सुमारे साडेचारच्या सुमारास, जेव्हा तो उठला, तेव्हा त्याला त्याची मोटरसायकल पूर्णपणे जळालेली आणि मोपेडचा मोठा भागही जळालेला



आढळला. घराच्या आवारातील प्लास्टिकचे आसन आणि विजेच्या ताराही जळाल्या. या घटनेत सय्यद समीर यांचे अंदाजे ५५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. रात्री १० वाजल्यानंतर आग लावण्यात आल्याचा अंदाज आहे. सय्यद समीर यांच्या म्हणण्यानुसार, कोणीतरी आधी गेटवर आणि घराच्या आत डिझेल फवारले आणि नंतर आग लावली. मोठा अपघात घडवण्याच्या उद्देशाने आरोपीने आग लावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# काँग्रेस नेत्यांबद्दल अपशब्द वापरल्याने तीव्र आंदोलन

## हिमंता बिस्व शर्माचे पोस्टर जाळून निषेध

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** येथे आज युवक काँग्रेसच्या वतीने आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. आसामचे मुख्यमंत्री व भाजपचे नेते हिमंता बिस्व शर्मा यांनी लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसेच राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात केलेल्या अपशब्दांचा निषेध करत युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोस्टर जाळून आणि जोडे मारून आंदोलन केले.

शहरातील कॉंग्रेस भवन येथे जमलेल्या युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. काँग्रेस नेत्यांचा अपमान सहन केला जाणार नाही, असे म्हणत आंदोलनकर्त्यांनी हेमंता बिस्वा सरमा यांच्या प्रतिमेचे पोस्टर जाळून निषेध नोंदवला.



त्याचप्रमाणे दलितविरोधी भाजपा नेत्यांच्या विरोधात तीव्र नारेबाजी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने युवक कार्यकर्ते उपस्थित होते. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, देशातील वरिष्ठ नेत्यांविषयी अशा प्रकारची भाषा वापरणे ही अत्यंत निंदनीय बाब आहे. लोकशाहीत मतभेद असू शकतात, मात्र वैयक्तिक टीका आणि अपमानास्पद वक्तव्ये योग्य नाहीत, असे त्यांनी नमूद केले. संबंधित नेत्यांनी तत्काळ माफी मागावी, अन्यथा राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात राहुल येवले, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, समीर जवंजाळ, सागर कलाने, निलेश गुहे, आशिष यादव, राहुल साबळे, ऋत्विक देशमुख, केदार भेंडे, गोकुल देशमुख, सागर यादव, मोहित भेंडे, कुणाल गावंडे ,वेदांत केने, प्रियाल मोहाड, शुभम बांबल , अक्षय साबळे, धनंजय बोबडे, राहुल येवले, ओम कुबडे, चैतन्य गायकवाड, व्यंकटेश नेरकर, अनय वाटाणे, सुजल इंगळे, शशिकांत बोंडे, विजू खंडारे, प्रफुल तंतरपाडे, गोविंद ठाकरे, पार्थ धानोरकर, जयंत बंदीवान, रोहित खोब्रागडे , अमेय येऊतकर, मुकेश लालवानी, आकाश गेडाम, रोहीत खंडेराव, हर्षल साखरकर, युवराज सोलव,शुभम वानखडे, आनंद बरडे, श्रेयस गाडे, श्रेयस धर्माळे, जिगर शिंदे, लकी धनाडे व इतर युवक कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठवडी बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट

## चार मोबाईल लंपास

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.११ :** शहरातील गुरुवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात चोरट्यांनी पुन्हा एकदा हात साफ केल्याची घटना समोर आली आहे. बाजारातील गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने स्वप्नील रावसाहेब पोटे गजानन रामदास नवलकर खुरमाबाद, मोहम्मद अब्रार दर्यापूर,सागर पवित्रकार लासुर या चार नागरिकांचे चालू असलेले मोबाईल फोन लंपास केल्याची घटना घडली.

आठवडी बाजारात खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी होत असते. याच गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी नागरिकांना लक्ष्य



केले असून मोबाईल चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे बाजारात येणाऱ्या नागरिकांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी, तसेच अशा घटनांवर आळा घालण्यासाठी संबंधित प्रशासनाने बाजार परिसरात पोलीस गस्त वाढवावी व सीसीटीव्हीची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. वृत्त लिहिस्तोर चोरट्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.आठवडी बाजाराच्या दिवशी बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून या गर्दीच्या फायदा चोरटे घेत असतात तरी नागरिकांनी आपल्या जवळील पैशाची मोबाईलची व मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते मौल्यवान वस्तू सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी नेऊ नये.

# नदीपात्रातून युवकाचा मृतदेह काढला बाहेर

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि.११ :** मोर्शी-वरूड मार्गावरील माडू नदीच्या पात्रात घसरून पडलेल्या एका युवकाचा मृतदेह अखेर दोन दिवसांनी शोधून काढण्यात आपदा मित्र संघटनेला यश आले. ही दुर्दैवी घटना गुरुवार, ९ एप्रिल रोजी दुपारी सुमारास उघडकीस आली. भाईपूर येथील निखिल निरंजन इंगळे (वय २५) हा युवक ७ एप्रिलपासून घरून बेपत्ता होता. कुटुंबीयांकडून त्याचा शोध सुरू असतानाच, ९ एप्रिल रोजी मोर्शी-वरूड रोडवरील मायवाडी परिसरातील माडू नदीच्या मध्यभागी त्याचा मृतदेह पाण्यावर तरंगताना नागरिकांना दिसून आला. ही माहिती तत्काळ प्रशासनाला देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सतर्क केले. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत आपदा मित्र संघटनेला पाचारण केले. आपदा मित्रांच्या पथकाने कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी पोहोचून शोधकार्य सुरू केले. पाण्याचा प्रवाह आणि परिस्थितीचा धोकालक्षात घेऊन लाइफ जॅकेट, दोरी (रोप) आणि बांबूच्या सहाय्याने तयार केलेल्या स्ट्रेचरचा वापर करत अत्यंत कौशल्याने मृतदेह बाहेर काढण्यात आला. या मोहिमेत प्रियंशू तायवाडे, विवेक सावरकर, श्याम भलावी आणि सागर तायडे यांनी विशेष मेहनत घेतली.

# गळफास लावून युवकाची आत्महत्या

**अचलपुर, दि.११ :** शहरातील संन्यासपेंड परिसरातील स्मशानभूमीत बुधवारी (दि.८ एप्रिल) सकाळी एका ४५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे विविध तर्कवितर्कांना उधाण आले असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मृत व्यक्तीचे नाव विजय किसनराव वाघमारे (वय ४५,रा. बिलनपुरा, अचलपुर) असे आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विजय वाघमारे हे गेल्या काही काळापासून कुटुंबापासून वेगळे राहत होते. ते एकटेच वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. त्यांची पत्नीही त्यांच्यासोबत राहत नसल्याचे समजते. घटनेच्या दिवशी सकाळी स्मशानभूमी परिसरात स्थानिक नागरिकांना झाडाला लटकलेल्या अवस्थेत एक मृतदेह दिसून आला.

# रेल्वे पोलिसांच्या मदतीने पूनम पोहोचली आई-वडिलांकडे



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बडनेरा, दि.११ :** ८ एप्रिल बुधवारी रोजी मुलगी नामे पुनम जयेंद्र बाल पांडे वय १९ वर्ष राहणार मांडवी तालुका जिल्हा भंडारा हिला रेल्वेने तिरोडा या गावी जायचे होते परंतु सदर मुलगी ही चुकून रेल्वे स्टेशन बडनेरा येथे पोहोचली नमूद मुलगी रेल्वे पोलिसांना भेटल्यानंतर रेल्वे पोलिसांनी तिला विचारपूस केली. परंतु ती तिचा पूर्ण पत्ता सांगण्यास असमर्थ असून भंडारा-गोंदिया एवढेच सांगत होते.रेल्वे पोलिसांनी आपले तपास चक्र फिरवीत तिचे राहते पत्त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला असता गोंदिया येथील सामाजिक कार्यकर्ते सुधीर आगळे यांचे मदतीने नमूद मुलीचे घरचा पत्ता मिळून आला. तिच्या वडिलांशी पोलिसांनी संपर्क करून जयेंद्र बाल पांडे यांना दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी पोलीस स्टेशनला बोलावून त्यांची मुलगी सुखरूप त्यांच्या ताब्यात दिली. नमूद मुलगी सुखरूप ताब्यात दिल्याने मुलीच्या आई-वडिलांनी व परिवाराने रेल्वे पोलिसांचे व सामाजिक कार्यकर्ते यांचे आभार मानले. सदर कामगिरी प्रभारी अधिकारी अर्चना गाढवे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कुर्वे पोलीस शिपाई मनीष पाटील व सामाजिक कार्यकर्ते सुधीर आगळे यांनी केली.

**कारवाई** | दोन तालुक्यात १.६५ कोटींचा धान्य गैरव्यवहार प्रकरण

# चांदूरबाजार पुरवठा निरीक्षक जितेंद्र पाटील निलंबित

अजिंक्य भारत | गजानन ढवळे

**चांदूर बाजार, दि.११ :** चांदूरबाजार तहसिल कार्यालया अंतर्गत कार्यरत पुरवठा निरीक्षक अधिकारी जितेंद्र पाटील यांनी तालुक्यातील रेशन दुकानदारांना अतिरीक्त धान्य वितरण केल्याचे उघड झाल्यानंतर त्यांच्या अमरावतीत कार्यरत असतांना केलेल्या धान्य वितरणाची चौकशी करण्यात आली असता तेथे चांदूरबाजारपेक्षा अधिक धान्य वितरण केल्याचे निष्पन्न झाले.यात दोन्ही तालुक्यात १.६५ कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पुरवठा

शाखेकडून मोठी कारवाई करण्यात आली असून निरीक्षण अधिकारी जितेंद्र



पाटील यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. रास्तभाव दुकानांना नियमानुसार देय असलेल्या धान्यापेक्षा मोठ्या प्रमाणात अतिरिक्त धान्य मंजूर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

तपासणी अहवालानुसार, चांदूर बाजार व अमरावती तहसील अंतर्गत कार्यरत असताना जितेंद्र पाटील यांनी काही विशिष्ट दुकानदारांना संगनमताने अतिरिक्त धान्य मंजूर केले.

चांदूर बाजार येथे ४१३.०२ क्विंटल तर अमरावती तहसीलमध्ये तब्बल ३८७३.९० क्विटल असे एकूण ४२८६.९२ क्विंटल धान्य अतिरिक्त मंजूर करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. या गैरप्रकारामुळे शासनाचे एकूण सुमारे १ कोटी ६५ लाख ५६ हजार ५४१ रुपये इतके आर्थिक नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये धान्याच्या बाजारमूल्यासह वाहतूक व हमाली खर्चाचाही समावेश आहे. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. मात्र सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने ते अमान्य करण्यात आले. तसेच, निर्धारित मुदतीत योग्य खुलासा न केल्याने कारवाई अधिक तीव्र करण्यात आली. ही कृती शासनाची प्रतिमा मलिन करणारी असून पदाचा दुरुपयोग करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार केल्याचे चौकशी अहवालात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे उल्लंघन केल्याबद्दल त्यांना निलंबित करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी यांच्या आदेशात नमुद आहे. या कारवाईमुळे पुरवठा विभागात मोठी खळबळ उडाली असून इतर ठिकाणीही तपासणीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### वाळुची वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला

शिरखेड : वाळुची चोरटी वाहतूक करणारा ट्रॅक्टर शिरखेड पोलिसांनी राजुरावाडी ते नेरपिंगळाई मार्गावर पकडून त्यातील वाळूसह वाहन असा ५.७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. पोहकॉ मनोज कळसकर यांच्या तक्रारीवरून अनिकेत राजेंद्र बोंडे वय २७, रा. राजुरावाडी यांच्याविरूध्द शिरखेड पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास शिरखेड पोलीस करीत आहे.

### विनयभंग प्रकरणातील आरोपीला अटक

आसेगाव पूर्णा : शाळेत जात असलेल्या एका अल्पवयीन मुलीचा पाठलाग व जबरीने बोलण्याचा प्रयत्न करून विनयभंग केल्याप्रकरणी एका २४ वर्षीय युवकाला पीडित मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अटक केली. सारंग नितनवरे असे अटक आरोपीचे नाव आहे. ७ ऑक्टोबर २०२५ ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान ही घटना आसेगाव पूर्णा हद्दीत घडली. या संदर्भात घाबरलेल्या मुलीला हा प्रकार वडिलांना सांगितल्यानंतर वडिलांनी सदर युवकाला समज दिली होती.

त्यानंतर हा प्रकार त्यांनी सुरू ठेवल्याने अखेर ८ एप्रिल रोजी तक्रार दिली. त्या आधारे पोलिसांनी पोस्कोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल आरोपीला ८ एप्रिल रोजी अटक केली.या घटनेचा पुढील तपास ठाणेदार करीत आहेत.

### ढाकूलगाव शिवारातून तुरीचे कट्टे लंपास

कुऱ्हा : नजिकच्या ढाकूलगाव शिवारातील टिनाच्या झोपडीचे कुलूप तोडून त्यातून १० क्विंटल तूर किंमत अंदाजे ६० हजार चोरी झाल्याची घटना ५ जानेवारी पूर्वी घडली होती. याप्रकरणी शेतकरी विलास मधुकर मोकलकर वय ४५, रा. ढाकुलगाव यांनी कुऱ्हा पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवित आरोपीस अटक केली. आदीत्य मोरेश्वर पंधरे वय १९ रा. ढाकुलगाव असे अटक आरोपीचे नाव आहे. कुऱ्हा पोलीस ठाण्यात त्याच्याविरूध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### महिलेच्या पर्समधून रोकड लंपास

दर्यापूर : दर्यापूर बस स्थानकात महिलेच्या पर्समधून १० हजारांची रोकड अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ एप्रिल रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. पनोरा येथील रूकसाना बी साबीर वय ४५ ही महिला अकोट येथे जाण्याकरीता दर्यापूर बस स्थानकात पोहोचली. बस आल्यानंतर तिकीट काढण्यासाठी पर्सची पाहणी केली असता त्यातील १० हजारांची रोकड चोरी झाल्याचे आढळले.

### शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी

येवदा : खरेदी केल्यानंतर शेतात ट्रॅक्टर घेवून नागरी करण्याकरीता जाताना दाम्पत्याला ट्रॅक्टरच्या चाकासमोर झोपून कामात अडथळा निर्माण केला तसेच शेतकऱ्यास शिवीगाळ करून जीवे मारण्याची व खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिली.

नांदरून शेत शिवारात ही घटना ४ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी हबीबखान असदउल्ला खान वय ५९, रा. सुफि प्लॉट, दर्यापूर यांच्या तक्रारीवरून संजय हरिभाऊ बागडे व त्याची पत्नी दोघेही रा. नांदरून यांच्याविरूध्द येवदा पोलिसात गुन्हा नोंदविला.

### कमळजापुरात इसमाला काठीने मारहाण

चांदूर रेल्वे : मोटारसायकल अडवून एका युवकाने इसमाला काठीने मारहाण केली. कमळजापूर येथे ही घटना ८एप्रिल रोजी घडली. प्रमोद आत्माराम दवंडे वय ४५ असे जखमीचे नाव आहे.

# कृषी महाविद्यालयांमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी पन्नास टक्के कोटा असावा

**हर्षवर्धन देशमुख यांची मागणी | शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख पुण्यतिथी निमित्त पुष्पांजली व मानवंदना**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जन्मगावी पापळ येथे येत्या सत्रापासून कृषी महाविद्यालय सुरु होत आहे. कृषि महाविद्यालयातील प्रवेश हे केंद्रीय पद्धतीने होत असल्याने स्थानिक विद्यार्थी कृषी शिक्षणापासून वंचित राहतो, त्यामुळे कृषी महाविद्यालयांमध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी पन्नास टक्के कोटा असावा,अशी मागणी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केली व त्यासाठी विदर्भातील लोकप्रतिनिधींनी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती भवन येथे आयोजित पुष्पांजली व मानवंदना कार्यक्रमात ते बोलत होते. विधान परिषद सदस्य आमदार संजय खोडके, अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके, महापौर श्रीचंद तेजवानी हे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, कोषाध्यक्ष श्री.दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे, प्रा.सुभाषराव बनसोड, संस्थेचे सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.



शासनाच्या धोरणात विरोधाभास असल्याने मराठी शाळा जगवणे हे एक मोठे आव्हान होऊन बसले असून श्री शिवाजी शिक्षण संस्था त्याला अत्यंत समर्थपणे तोंड देत आहे. शाळेच्या शैक्षणिक आणि भौतिक प्रगतीसाठी आम्ही सतत प्रयत्नशील असून भविष्यातही संस्थेच्या मराठी शाळा बंद होणार नाही, अशी ग्वाही हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून दिली.शासनाचे धोरण शैक्षणिक क्षेत्रापासून बाजूला होत असून शासन हळू हळू शिक्षणापासून दूर जात असल्याने गरीब बहुजन समाजाचे मोठे नुकसान होणार असून शिक्षणाचा खर्च पेलण्याची क्षमता नसलेला वर्ग अशिक्षित राहण्याची भीती निर्माण झाली आहे,असेही ते म्हणाले. आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी, शिक्षण, शेती, क्रीडा आणि आरोग्य या सर्वच क्षेत्रात श्री शिवाजी शिक्षण संस्था प्रगतीपथावर असल्याबद्धल संस्थेचा अभिमान व्यक्त केला. डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती भवनासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करू, असे आश्वासन देण्यासोबतच भाऊसाहेबांचे हे स्मृतीभवन बघून सर्वांनी प्रेरणा घ्यावी,असे आवाहन केले.श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून हर्षवर्धन देशमुख यांनी कारभार हाती घेतल्यापासून या संस्थेला पक्षविरहित संस्था म्हणून मान्यता प्राप्त झाली असून सर्व पक्षांचा आणि पदांचा मान ठेवून ही संस्था कार्य करत आहे,त्यामुळे सर्वजण सातत्याने या संस्थेला मदत करण्यास तयार असतात, असे आमदार संजय खोडके म्हणाले.आपण याच परिवारातील असल्याने संस्थेची भैय्यासाहेब सांगतील ती कामे करण्यास आपण तयार आहोत,असेही ते म्हणाले. अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी महापौर झाल्यानंतर पहिल्यांदाच मराठीतून भाषण केले व भाऊसाहेबांना आदरांजली अर्पण केली.भाऊसाहेबांच्या विचारांचा अंगीकार करून समाजाच्या विकासासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे महापौर म्हणाले.या कार्यक्रमात महापौरांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनीही भाऊसाहेबांना पुष्पांजली अर्पण केली.

संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेचा गेल्या चार वर्षाच्या कार्याचा आढावा सादर केला.डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती भवनाच्या विकासासाठी शासनाकडे पाठविण्यात आलेला ३५ कोटीचा प्रस्ताव शासनाने मंजूर केल्याचे त्यांनी सांगितले.संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्ही.पाटील पूसदेकर, केशवराव मेतकर, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.डॉ.मनीष गायकवाड यांनी संचालन केले तर ज्येष्ठ उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर यांनी आभार मानले. दर्यापूर येथील बाबासाहेब सांगळूदकर महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या डॉ.राजेश उमाळे व चमूने गौरवगीत सादर केले.कार्यक्रमाला संस्थेचे आजीव सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व अमरावतीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसटी प्रवास भाड्यात हंगामी भाडेवाढ

**अमरावती विभागाकडून साध्या बसच्या भाड्यात १० टक्के वाढ**



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** उन्हाळी सुट्ट्या, सण-उत्सव आणि लग्नसराईच्या काळात होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साध्या बसच्या भाड्यात १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ १५ एप्रिल २०२६ च्या मध्यरात्रीपासून लागू होणार असून १५ जून २०२६ पर्यंत कायम राहणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने महामंडळाला गर्दीच्या काळात ३० टक्क्यांपर्यंत भाडेवाढ करण्याची मुभा दिली आहे, त्याअंतर्गत अमरावती विभागाचे सक्षम प्राधिकारी यांनी ही १० टक्के दरवाढ मंजूर केली आहे.

या निर्णयामुळे साध्या बसचा सध्याचा १०.०५ रुपये प्रति टप्पा दर आता ११.०५ रुपये इतका होईल. अमरावती येथून विविध महत्त्वाच्या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना आता जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. सुधारित दरपत्रकानुसार, अमरावती ते नागपूर प्रवासासाठी आता २९० रुपये (आधी २६२), अमरावती ते धारणी २६८ रुपये (आधी २४२) आणि अमरावती ते अकोला १९१ रुपये (आधी १७२) मोजावे लागतील. तसेच परतवाडा, दर्यापूर आणि मोर्शी या मार्गांसाठी ९१ रुपयांऐवजी १०२ रुपये भाडे आकारले जाईल.

महत्त्वाची बाब म्हणजे ही भाडेवाढ केवळ साध्या बस प्रकारासाठीच लागू असून, महामंडळाच्या इतर प्रगत सेवांचे दर पूर्वीप्रमाणेच स्थिर राहणार आहेत. प्रवाशांनी या बदलाची नोंद घेऊन महामंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती विभागाचे नियंत्रक सचिन डफळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. वाढत्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि प्रवाशांना सेवा देण्यासाठी ही दरवाढ आवश्यक असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# स्वामी विवेकानंद उद्यानातील बंद दिवे उजळणार

**मनपा शिक्षण सभापतींसह सुनील राणा यांनी केली पाहणी**



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** प्रभाग क्र. १२ मधील प्रशांत नगर येथील स्वामी विवेकानंद उद्यानाच्या समस्यांबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांनी उपमहापौर सचिन भेंडे तसेच नगरसेविका तथा मनपा शिक्षण सभापती ॲड. प्रिती हर्षल रेवणे (बनारसे) यांच्यासह उद्यानाला प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली. या पाहणीदरम्यान उद्यानातील विविध समस्या समोर आल्या. विशेषत: उद्यानातील अनेक विद्युत दिवे बंद अवस्थेत असल्यामुळे सायंकाळच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. तसेच पाण्याच्या पाईप लाईनमध्ये अडथळे निर्माण झाल्यामुळे उद्यानातील हिरवळ आणि झाडांना योग्य पाणीपुरवठा होत नसल्याची बाबही निदर्शनास आली. स्थानिक नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत नगरसेविका तथा मनपा शिक्षण सभापती ॲड. प्रिती हर्षल रेवणे (बनारसे) यांनी या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. उद्यानातील बंद पडलेले विद्युत दिवे तात्काळ दुरुस्त करून पुन्हा सुरू करणे, विद्यमान पाईप लाईनची तपासणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करणे तसेच गरज भासल्यास नवीन पाईप लाईन टाकण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी मार्गदर्शक सुनिल राणा यांनी सांगितले की, प्रशांत नगर येथील स्वामी विवेकानंद उद्यान हे परिसरातील नागरिकांसाठी एक महत्त्वाचे विरंगुळ्याचे ठिकाण आहे. त्यामुळे हे उद्यान स्वच्छ, सुरक्षित आणि सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज असणे अत्यंत आवश्यक आहे. लवकरात लवकर सर्व कामे पूर्ण करून नागरिकांना एक प्रशस्त व सुंदर उद्यान उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे. या पाहणीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, लवकरच उद्यानातील समस्या मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# आ.लवटे यांच्या मध्यस्थीने उपोषणाची सांगता

**अंजनगाव सुर्जी नगर परिषद साहित्य चोरी प्रकरण**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.११ :** अंजनगाव सुर्जी नगर परिषदेच्या शासकीय साहित्याच्या चोरीप्रकरणी दोषींवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हाप्रमुख शंभू मालठाणे यांनी गेल्या दोन दिवसांपासून निष्काम कर्मयोगी गाडगे बाबा यांच्या पुतळ्याजवळ सुरू केलेले उपोषण अखेर मागे घेतले आहे. आमदार गजानन लवटे यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीनंतर प्रशासनाने लेखी आश्वासन दिले असून १५ दिवसांत चौकशी पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.



नगर परिषदेच्या मालकीचे शासकीय साहित्य चोरीला गेल्याची तक्रार शंभू मालठाणे यांनी प्रशासनाकडे केली होती. या प्रकरणात कंत्राटदाराची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप त्यांनी केला होता. वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने मालठाणे यांनी उपोषणाचे हत्यार उपसले होते.मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या सहीनिशि दिलेल्या लेखी पत्रात चोरी प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एक विहित कायदेशीर चौकशी समिती गठीत करण्यात येणार असल्याचे नमुद आहे . समितीच्या अहवालात जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. सुटीवरून आल्यानंतर १५ दिवसांच्या आत चौकशी अहवाल सादर केला जाईल. असे मुख्यधिकारी यांनी सांगितले आमदार गजानन लवटे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन परिस्थिती जाणून घेतली. त्यांनी तातडीने मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रकरणाचा निकाल लावण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर, आमदार लवटे यांच्या हस्ते लिंबू पाणी प्राशन करून शंभू मालठाणे यांनी उपोषण सोडले. यावेळी शंभू मालठाणे यांच्यासोबत बाळू रोंगे, संदीप देशमुख, राहुल धानोरकर, पियुष पारीख, प्रफुल्ल वाठ, योगेश भालतिलक, अमर महाजन उपस्थित होते. उपोषण सोडवताना आमदार लवटे यांच्यासह शिवसेना तालुका प्रमुख कपिल देशमुख, यक्ष लवटे आणि सौ. अर्पणाताई मालठाणे यांचे सह पत्रकार मंडळी यांची उपस्थिती होती.या मध्यस्थीमुळे नगर परिषद वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, आता सर्वांचे लक्ष १५ दिवसांनंतर येणाऱ्या चौकशी अहवालाकडे लागले आहे.

### शहरात घरफोडीचे सत्र सुरूच

अमरावती : शहरात वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात सोमवारी (दि. ६) घरफोडीचे तीन गुन्हे दाखल झालेत. चोरट्यांनी एकूण ९९ हजारांचा मुद्देमाल चोरून नेला. या घटना इंगोले ले-आऊट, स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या मागे, विजयपथ नगर व हनुमान नगर येथे घडल्यात. बडनेरा पोलिसांनी दोन, तर गाडगे नगर पोलिसांनी घरफोडीचा एक गुन्हा नोंदवला. प्राप्त तक्रारीनुसार, इंगोले ले-आऊट येथील रहिवाशी प्रभाकर जनार्धन कोकणे (४९) हे घटनेच्या वेळी अकोला येथे नातेवाईकाच्या लग्नात गेले होते. परत आले असता, त्यांना कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी पाहणी केली असता, चोरट्याने सोन्याची अंगठी व डोरले, असा 10 हजारांचा ऐवज चोरून नेल्याचे दिसले.

# श्री पांडुरंग हरी आश्रमात निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.११ :** तालुक्यातील तोंगलाबाद-सौंदळी फाट्यावरील श्री पांडुरंग हरी आश्रम येथे श्री पांडुरंग हरी आश्रम व जाधव परिवार तोंगलाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने गावचे माजी सरपंच स्व.ओंकारबापू जाधव व त्यांच्या पत्नी स्व. इंदिराबाई जाधव यांच्या ५ व्या पुण्यस्मरण सोहळ्या निमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार तथा राष्ट्रीय धर्माचार्य ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचा समाजप्रबोधनपर विनोदी कीर्तन सोहळा शुक्रवार,दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७ ते १० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

श्री पांडुरंग हरी आश्रम येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा या समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यासोबतच स्व.तुकारामजी बिडकर पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे.त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कब्बडी खेळाडू सोनाली शिंगाटे,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त नाळ चित्रपटातील बालकलाकार श्रीनिवास पोकळे,दहा हजार युवकांना मानाचा रोजगार मिळून देणारे बहुजन राष्ट्रनिर्माण प्रशासकीय अकादमी दर्यापूरचे संचालक प्रा.गजानन कोरे यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रकाशराव बिडकर अध्यक्ष हनुमान प्रतिष्ठान,कुंभारी उपस्थित राहणार आहे.तर प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे, दर्यापूरचे आमदार गजानन लवटे,माजी खासदार नवनीत राणा, दर्यापूरचे नगराध्यक्षा सौ.मंदाकिनी सुधाकरराव भारसाकळे, भारतीय कब्बडी फेडरेशनचे सहसचिव जितुभाऊ ठाकूर आदी उपस्थित राहणार आहेत.तरी या समाजप्रबोधनपर कीर्तन सोहळा व पुरस्कार वितरण सोहळयाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जाधव परिवार तोंगलाबाद व श्री पांडुरंग हरी आश्रम तोंगलाबाद-सौंदळी यांनी केले आहे.

**समस्या | मेळघाटातील पाणी प्रश्न पेटला; अनेक गावात पाणी समस्या**

# खा.बळवंत वानखडे यांनी घेतला मेळघाटातील पाणी टंचाईचा आढावा



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.११ :** मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात पाणीपुरवठ्याच्या योजना जल जीवन मिशन व इतर विभागामार्फत कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले चिखलदरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठ मोठ्या टाक्या बांधण्यात आल्यात विहीर खोदण्यात आल्यात शासनाचे कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले आहेत पण तरीही मेळघाटातील आदिवासी बांधवांना शुद्ध पाणी मिळत नाही अनेक गावांमध्ये बांधलेल्या योजना अतिशय निकृष्ट दर्जाच्या बांधण्यात आलेल्या आहेत कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे आदिवासी बांधवांना घोटभर पाण्यासाठी वन भटकंती करावी लागते या सर्व पाणी टंचाईच्या समस्येबाबत अमरावती जिल्ह्याचे खासदार आदरणीय बळवंत वानखडे यांनी चिखलदरा तहसील कार्यालय येथे पाणी टंचाईची आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीचे अध्यक्षस्थानी खासदार बळवंत वानखडे या सर्व प्रामुख्याने चिखलदरा नगरीचे नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर चिखलदरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विनोद खेडेकर,महेंद्र गैलवाल,दयाराम काळे,सहदेव बेलकर,राहुल येवले,रोहित पटेल,राजेश शेमलकर, पीयूष मालवीय, किशोर झारखंडे संजय भेलकर तसेच पाणी पुरवठा विभागाचे अधिकारीव सर्व ग्रामपंचायतचे पदाधिकारी व ग्रामसेवक तलाठी मोठ्या संख्येने या सभेमध्ये उपस्थित होते खासदार बळवंत वानखडे यांनी चिखलदरा तालुक्यातील प्रत्येक गावातील पाणीटंचाईचा आढावा घेतला चिखलदरा तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई आहे.

अनेक ठिकाणच्या योजना अपुऱ्या आहेत दुर्गम भागातील गावांमध्ये अजूनही पाणी पोहोचले नाही मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या पाण्याची समस्या सोडविली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल अशी ताकीद सुद्धा खासदार बळवंत वानखडे यांनी यावेळी दिली,चिखलदरा शहरासह अलाडोह लवादा शहापूर या ठिकाणची पाणीपुरवठाची योजनेचे काम सध्या बंद झालेले आहे बागलिंगा धरणातून हे पाणी येणार आहे परंतु काम बंद असल्यामुळे येणाऱ्या काळामध्ये चिखलदरा शहरासह या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा सामना नागरिकांना करावा लागत आहेहे काम सुद्धा तात्काळ सुरू करण्यात यावी अशी नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला.

मेळघाटातील नागरिकांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो प्रशासन कायमस्वरूपी उपाययोजना करत नाहीत त्यामुळे नागरिकांना पण त्यांचा सामना करावा लागतो सध्याच्या गावांमध्ये पाणीटंचाई आहे त्या ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आलेला आहेत तसेच मेळघाटातील कायमस्वरूपी पाणीटंचाई सोडून या संदर्भात सुद्धा तोडगा काढण्याचे आदेश सुद्धा देण्यात आलेले आहेत वनविभाग यांच्यामार्फत सुद्धा अनेक ठिकाणी पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात अडथळे येतात त्याचा सुद्धा आम्ही फॉलोअप घेत राहतो केंद्राकडून त्यांचे परवानगी मिळवून देण्यासाठी आमचा प्रयत्न असतो असे खासदार बळवंत वानखडे यांनी बोलताना सांगितले.






## 'बाबासाहेब का जागले? का रडले?'

**यवतमाळ :** येथील समता पर्वात 'बाबासाहेब का जागले? का रडले?'हे नाट्यकृती शुक्रवारी (दि.१०) सादर करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक मंडळ, नागपूर यांनी सादर केलेल्या नाट्यकृतीने प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका प्रवीण गडपायले यांनी तर माता रमाईची भूमिका वैशाली गडपायले यांनी दमदारपणे साकारली. तर, प्रा. राजेंद्र गायकवाड यांनी पत्रकार आणि रत्तुची भूमिका साकारली. या नाटकात उद्धव जांभूळकर आणि संजय बोरकर यांनीही भूमिका केल्या. या नाटकाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या जीवनातील संघर्ष आणि त्याग कुणासाठी होता हे पटवून देण्यात आले. या नाटकाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

## थोडक्यात



### मार्जिन मनी कर्ज योजनेवर कार्यशाळा

**यवतमाळ :** सामाजिक समता सप्ताहानिमित्त यवतमाळच्या बाबाजी दाते शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत 'मार्जिन मनी' कर्ज योजनेवर विशेष मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मंगला मून यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी शासनाच्या आर्थिक मदतीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यशाळेत मंगला मून यांनी प्रकल्प किमतीच्या १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एम. डी. सीडाम यांनी प्रस्ताव तयार करण्याच्या पद्धतीवर प्रकाश टाकला. आयडीबीआय बँकेचे मुख्य व्यवस्थापक निखिल बोरकर यांनी कर्ज मंजुरीसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देऊन पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विजय नागोरे यांनी कौशल्यप्राप्त विद्यार्थ्यांना ही योजना आत्मनिर्भरतेसाठी कशी उपयुक्त ठरेल, हे स्पष्ट केले. ज्योत्स्ना तिजारे यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन रुपेश वानखेडे यांनी केले. आर. एन. मेश्राम यांनी आभार मानले. संविधानाच्या प्रस्ताविकेच्या वाचनाने कार्यशाळेची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प अधिकारी राहुल कराळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रगतीसाठी मोलाची दिशा मिळाली आहे.

### यवतमाळात आज रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**यवतमाळ :** शिवीरी चेस अकादमी व जिल्हा बुद्धिबळ संघटनेतर्फे १२ एप्रिल २०२६ रोजी यवतमाळ येथील संदीप मंगलम येथे एकदिवसीय 'ओपन रॅपिड चेस स्पर्धा' आयोजित केली आहे. सिद्धकरणजी ऋद्धकरणजी कुचेरिया यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणाऱ्या या स्पर्धेत सहभागी खेळाडूंना ३५ हजार रुपयांची पारितोषिके जिंकण्याची संधी असून बुद्धिमत्तेला व्यासपीठ मिळवून देणे हा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा स्विस लीग रॅपिड फॉरमॅटमध्ये पार पडणार असून ओपन गटातील विजेत्याला ७ हजार रुपये व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येईल. वयोगट ९, १२ आणि १५ अंतर्गत मुले-मुलींसाठी स्वतंत्र रोख बक्षिसे, ट्रॉफी व पदके देण्यात येतील. याव्यतिरिक्त बेस्ट फीमेल, बेस्ट व्हेटरन आणि सर्वात लहान वयाच्या खेळाडूसाठी विशेष पारितोषिके असून १० एप्रिलनंतर नोंदणीसाठी ५५० रुपये शुल्क आकारले जाईल. नोंदणी व अधिक माहितीसाठी शीला विलास कुचेरिया आणि हर्षिता विलास कुचेरिया यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यासह बाहेरील खेळाडूंनाही आपले कौशल्य दाखवता येईल. शिवीरी चेस अकादमीने यवतमाळमधील शतरंज प्रेमींना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले असून उत्कृष्ट नियोजनावर भर दिला आहे.

### स्टेट बँकेत पेन्शनर्सच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**यवतमाळ :** स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन यवतमाळ जिल्हा युनिटच्यावतीने बुधवारी (दि. १५) सकाळी १० वाजता ज्येष्ठ नागरिक भवन, बालाजी सोसायटी येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात यवतमाळ जिल्ह्यातील सर्व सेवानिवृत्त बँक सदस्यांना एकत्र आणून त्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन आणि संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. या स्नेहसंमेलनात स्टेट बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक प्रशांत एकुडे, एच.आर. मॅनेजर कुणाल दीप, मुख्य व्यवस्थापक मिलिंद नाईक, सुनील लांडे आणि स्वप्नील तमाने मार्गदर्शन करणार आहेत. तसेच असोसिएशनचे झोनल अध्यक्ष ज्ञानप्रकाश खोब्रागडे आणि सचिव दीपक पिंजरकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जिल्हा युनिटचे अध्यक्ष विजय पांढरकर, उपाध्यक्ष पुंडलीक भेंडे, दिगंबर पांपट्टीवार, सचिव गोपालकृष्ण गाडगे आणि कोषाध्यक्ष उमेशचंद्र इनामदार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला आहे. सहसचिव रवींद्र बोरकर, महिला प्रतिनिधी स्मिता ओक आणि मेघा बोडबोले यांनी जिल्ह्यातील सर्व सदस्यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून सेवानिवृत्तांच्या अडीअडचणींवर चर्चा होऊन बँक प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी सभासदांनी या संधीचा लाभ घेऊन स्नेहभोजनाला उपस्थित राहावे, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

# दारव्हा तालुक्यात रेती तस्करांचा उच्छाद

## नद्यांमधून रेतीची मोठी लूट, तलाठ्यांचे तस्करांना कथित पाठबळ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दारव्हा, दि. ११ :** दारव्हा तहसील अंतर्गत वडगाव गाढवे आणि पाथ्रड देवी परिसरात नद्यांच्या पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती उपसा सुरू असून, या तस्करीला स्थानिक महसूल अधिकारी आणि तलाठ्यांचे अभय असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही कोणतीही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, तलाठ्यांकडून तस्करांना अधिकाऱ्यांच्या 'लोकेशन'ची माहिती पुरविली जात असल्याचा खळबळजनक आरोप आता परिसरातील संतप्त नागरिकांनी केला आहे.



दारव्हा तालुक्यातील मौजा वडगाव गाढवे आणि पाथ्रड देवी या गावांमधून वाहणाऱ्या नद्यांची पात्रे सध्या रेती तस्करांचे मुख्य केंद्र बनली आहेत. दररोज अनेक ट्रॅक्टर नदी पात्रात उतरवून मजुरांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात रेती उपसा केला जातो. दिवसभर जमा केलेली ही रेती रात्रीच्या सुमारास ट्रक, ट्रॅक्टर आणि टिप्परच्या माध्यमातून विल्हेवाट लावून विकली जाते. विशेष म्हणजे, ही संपूर्ण प्रक्रिया महसूल प्रशासनाच्या डोळ्यादेखत सुरू असूनही संबंधित अधिकारी आणि कर्मचारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. स्थानिक तलाठी आणि महसूल कर्मचाऱ्यांचे तस्करांसोबत असलेले लागेबांधे आता चव्हाट्यावर आले आहेत. वरिष्ठ अधिकारी कारवाईसाठी येत असताना तलाठी स्वतः तस्करांना भ्रमणध्वनीवरून लोकेशनची माहिती देऊन सतर्क करीत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. यामुळे अधिकारी येण्यापूर्वीच तस्करीची वाहने बंद केली जातात. अनेकदा विना नंबर प्लेटचे ट्रक आणि ट्रॅक्टर तलाठ्यांच्या समारून रेतीची अवैध वाहतूक करतात, मात्र तरीही त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जात नाही. लाडखेड फाटा ते वडगाव गाढवे या दरम्यान तस्करांचे खबरी सक्रिय असून, महसूल विभागाच्या गाड्यांवर पाळत ठेवली जाते. ग्रामस्थांच्या मते, जर महसूल प्रशासनाने कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अचानक धाड टाकली, तर हा सर्व प्रकार रंगेहात पकडता येऊ शकतो. परंतु, महसूल यंत्रणेने मौन बाळगल्याने रेती माफियांना सुगीचे दिवस आले आहेत. या तस्करीमुळे पर्यावरणाचे आणि शासनाच्या महसुलाचे मोठे नुकसान होत आहे. पाथ्रड देवी, वडगाव गाढवे आणि पांडुर्णा भागातील या अवैध व्यवसायाला लगाम घालण्यासाठी आता थेट वरिष्ठ स्तरावरून कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जर स्थानिक प्रशासन कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असेल, तर उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष देऊन दोषी अधिकारी आणि तस्करांच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

### कर्मचाऱ्यांचे तस्करांशी साटेलोटे

**वडगाव गाढवे व पाथ्रड देवी येथील महसूल अधिकारी आणि तलाठ्यांचे रेती तस्करांशी अतिशय जवळचे संबंध असल्याचे नागरिक सांगतात. हे कर्मचारी कार्यालयीन वेळेतही तस्करांसोबत बैठका आणि पार्ट्यांमध्ये व्यस्त असल्याचे धक्कादायक वृत्त आहे. या अर्थपूर्ण संबंधांमुळेच तस्करांना प्रशासनाचे अभय मिळत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कारवाईची माहि आधीच तस्करांपर्यंत पोहोचविली जाते. अशा भ्रष्ट कर्मचाऱ्यांची तात्काळ बदली करून त्यांच्यावर खातेनिहाय चौकशी सुरू करण्याची मागणी जनतेने केली आहे.**

# वाढत्या उन्हाचा मजुरांना मोठा तडाखा

## कडक उन्हामुळे जनजीवन विस्कळीत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**झरी जामणी, दि. ११ :** तालुक्यात एप्रिल महिन्याच्या सुरुवातीपासूनच तापमानाचा पारा चढल्याने कडक उन्हाचे चटके बसत असून, नागरिक घामाघूम झाले आहेत. वाढत्या उष्म्यामुळे नागरिक घरात थांबणे पसंत करत असतानाच, हातावर पोट असलेल्या मजूर वर्गाला मात्र उदरनिर्वाहासाठी भर उन्हात भटकंती करावी लागत असून आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

तालुक्यात सूर्य आग ओकत असल्याने सकाळी दहा नंतरच रस्ते ओस पडत आहेत. शेतकरी पहाटेची कामे आटोपून लवकर घरी परतत असले, तरी मजुरांची कामासाठी भटकंती सुरूच आहे. मार्चमधील संमिश्र वातावरणानंतर आता उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. त्यातच महावितरणच्या भारनियमानामुळे सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. ग्रामीण भागातून शासकीय कामासाठी येणाऱ्या जनतेला कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने पाणी विकत घ्यावे लागत आहे. शहरात अद्याप कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय संघटनेने पाणपोई सुरू केली नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. विशेषतः खाजगी बांधकामावर काम करणाऱ्या मजुरांना उन्हापासून बचावासाठी कोणत्याही सुविधा मिळत नसल्याने, प्रशासनाने मजुरांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरत आहे.

### पाण्यासाठी वणवण

**तालुक्यातील वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असताना अनेक शासकीय कार्यालयांमध्ये पिण्याच्या पाण्याची साधी व्यवस्थाही करण्यात आलेली नाही. शहरातील सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांनी अद्याप सार्वजनिक पाणपोई सुरू न केल्याने ग्रामीण भागातील जनतेला आर्थिक भुर्दंड सोसून पाणी विकत घ्यावे लागत असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पाण्याचे योग्य नियोजन करणे आता काळाची गरज बनली आहे.**

# ज्ञानेश्वर शिंदे यांची तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. ११ :** विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाला बळकटी देण्यासाठी तालुका युवक काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. यामध्ये चालगणी येथील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर शिंदे (धानोरकर) यांची तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या पक्षनिष्ठा व सामाजिक कार्याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली आहे.



तालुका युवक काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसाठी ही महत्त्वाची निवड करण्यात आली आहे. ज्ञानेश्वर शिंदे यांनी आपल्या निवडीचे श्रेय काँग्रेस नेते साहेबराव कांबळे, राम पाटील देवसरकर, तातू भाऊ देशमुख आणि दत्तराव शिंदे यांच्यासह स्थानिक नेत्यांना दिले आहे. पक्षाने सोपवलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडणार असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून रामेश्वर पाटील कदम, त्रिंबक पाटील थोटे, सुरेश पाटील, गणेशराव कदम, बंडू पाटील आणि रामदास नामदेव थोटे यांनी शिंदे यांचे अभिनंदन केले आहे. या नियुक्तीमुळे ग्रामीण भागात युवक काँग्रेसचे जाळे विस्तारण्यास मदत होणार असून, आगामी काळात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## शेतकऱ्यांनी फळबाग लागवड करावी

**मारेगाव, दि. ११ :** तालुक्यात सिंचन सुविधा वाढल्याने शेतकऱ्यांनी शाश्वत उत्पन्नासाठी आणि आर्थिक समृद्धीसाठी आपल्या शेतात फळबाग लागवड करावी, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी दिपाली खवले यांनी केले आहे. कृषी विभागामार्फत शंभर टक्के अनुदानावर आंबा, संत्रा, मोसंबी यांसह विविध फळपिकांची लागवड करण्याची संधी सध्या उपलब्ध करून देण्यात आली आहे. मजुरांच्या समस्येवर फळबाग हा उत्तम पर्याय असल्याचे मंडळ कृषी अधिकारी किशोर डोंगरकार यांनी सांगितले. या योजनेत पेरू, सीताफळ, चिकू आणि लिंबू यांसारख्या पिकांचा समावेश असून कृषी विभाग मार्गदर्शन करण्यास सज्ज आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी लाभ घेण्यासाठी गावातील सहायक कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा थेट तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधून नोंदणी करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# बांधकाम कामगार समितीची बैठक

## नोंदणी प्रक्रियेचा आढावा, शासकीय योजनांच्या लाभावर चर्चा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ११ :** आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या स्थानिक सनियंत्रण समितीची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकरण आणि शासकीय लाभांच्या प्रभावी वाटपासंदर्भात सविस्तर चर्चा करून यंत्रणेला गती देण्याचे निर्देश देण्यात आले.



आढावा बैठकीदरम्यान कामगार नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि नूतनीकरणासाठी होणारा विलंब यावर सखोल चर्चा करण्यात आली. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी कामगारांना विविध योजनांचे लाभ पारदर्शक व सुलभ पद्धतीने मिळवून देण्यासाठी यंत्रणेत समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. पात्र कामगारांपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती पोहोचवणे आणि लाभ वितरणात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या बैठकीला समितीचे सदस्य नंदू कुडमेथे, दिनेश इंगळे, दशरथ कांबळे, झिशान शेख, मनिषा देशमुख आणि रजनी हिंगासपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच जिल्हा कामगार अधिकारी राहुल काळे, गुल्हाने आणि जतकर प्रामुख्याने उपस्थित होते. कामगारांच्या हितासाठी कार्यपद्धती अधिक सक्षम करण्यावर याप्रसंगी भर देण्यात आला. नोंदणी प्रक्रिया सोपी करून शेवटच्या पात्र कामगाराला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन आमदार मांगुळकर यांनी केले. या बैठकीमुळे जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून कामगार कल्याणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# जनगणनेचे काम अचूक व पारदर्शकपणे करा

## जिल्हाधिकारी विकास मीना : यवतमाळमध्ये फिल्ड ट्रेनर्ससाठी सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिर संपन्न

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ११ :** आगामी 'जनगणना २०२७' यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली ६ ते ११ एप्रिल २०२६ दरम्यान यवतमाळ येथे जिल्हास्तरीय फिल्ड ट्रेनर्स प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे जनगणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षमपणे पूर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील चार्ज स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



प्रशिक्षणादरम्यान घर यादी आणि घर गणना प्रभावीपणे राबवण्यासाठी 'मोबाईल ॲप'च्या वापरावर विशेष भर देण्यात आला. मास्टर ट्रेनर प्रवीण भगत आणि विशाल दिवेकर यांनी कर्मचाऱ्यांना नागरिकांकडून माहिती संकलन करताना प्रश्नांची योग्य हाताळणी कशी करावी आणि ती माहिती ॲपवर अचूकपणे कशी अपलोड करावी, याचे सखोल तंत्रज्ञान अवगत करून दिले. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेता हे काम अत्यंत गांभीर्याने आणि गोपनीयतेचे भान राखून करण्याचे निर्देश दिले. माहितीची अचूकता आणि निर्धारित वेळापत्रकाचे पालन करणे अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मोहिमेत तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी सांख्यिकी तज्ज्ञांनी शंकांचे निरसन केले. शेवटी, नागरिकांनी प्रगणकांना खरी माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी केले.

### जनगणनेसाठी नागरिकांना प्रशासनाचे विशेष आवाहन

**ेशाच्या उज्वल भविष्यासाठी आणि नियोजित विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी जनगणना हा एक अत्यंत महत्त्वाचा आधार स्तंभ आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना कुटुंब आणि घराची इत्थंभूत व खरी माहिती देऊन राष्ट्रीय कर्तव्यात आपला मोलाचा वाटा उचलावा. ही सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनास पूर्णतः सहकार्य करावे.**

## जिल्ह्यात आपदा मित्र प्रशिक्षण सुरू


**यवतमाळ, दि. ११ :** जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली 'आपदा मित्र' योजनेच्या दुसऱ्या बॅचचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. या मोहिमेत १५० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असून नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी स्थानिक पातळीवर तात्काळ मदत कार्य उपलब्ध करून देणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणामध्ये पूर, आग आणि भूकंप अशा कठीण परिस्थितीत बचावकार्य व प्रथमोपचार करण्याचे तंत्र शिकवले जात आहे. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सराव द्वारे आपत्कालीन समन्वय साधण्याचे मार्गदर्शन मिळत आहे. यामुळे आपत्तीच्या वेळी जीवित व वित्तहानी रोखण्यास मदत होईल. स्थानिक स्वयंसेवकांची ही प्रशिक्षित फळी भविष्यात अधिक प्रभावी काम करेल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला असून या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

# पुसदसह दारव्हा, उमरखेड, महागावमध्ये भूकंप

## रिश्टर स्केलवर ४.७ तीव्रतेची नोंद : नागरिकांची उडाली तारांबळ, सुदैवाने जीवितहानी टळली, प्रशासन पूर्णपणे सतर्क

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ११ :** हिंगोली जिल्ह्यात शनिवारी सकाळी ४.७ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा जोरदार धक्का बसला असून, त्याचे थेट पडसाद यवतमाळ जिल्ह्यातील पुसद, दारव्हा, उमरखेड आणि महागाव या तालुक्यांमध्ये उमटले आहेत. पाच ते सहा सेकंद चाललेल्या या अनपेक्षित थरथरीमुळे घरातील भांडी पडली आणि इमारती हादरल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. सुदैवाने या नैसर्गिक आपत्तीत कोणतीही जीवितहानी झाली नसून, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आणि महसूल प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे.




शनिवारी सकाळी ८:४५ वाजताच्या सुमारास हिंगोली जिल्ह्यात जमिनीच्या पोटात झालेल्या हालचालींमुळे भूर्कपाचा मोठा हादरा बसला. या भूकंपाचे केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील शिंदे पांगरा परिसरात असून त्याची खोली १० किलोमीटर इतकी नोंदवली गेली आहे. या भूकंपाचे सौम्य ते मध्यम स्वरूपाचे झटके यवतमाळ जिल्ह्याच्या सीमावर्ती आणि अंतर्गत भागांनाही जाणवले. पुसद शहर आणि वसंतनगर परिसरातील बहुमजली इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना चक्कर आल्यासारखे वाटले आणि खिडक्या थरथरल्याने अनेकांनी जिवाच्या आकांताने मोकळ्या मैदानाकडे धाव घेतली. सकाळच्या वेळी नागरिक आपल्या दैनंदिन कामात व्यस्त असतानाच अचानक जमीन हादरल्याचा अनुभव आल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, यवतमाळ जिल्ह्यात कोठेळी जीवितहानी किंवा मालमत्तेचे मोठे नुकसान झालेले नाही. आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि स्थानिक महसूल यंत्रणेने तातडीने परिस्थितीचा आढावा घेत सर्व गावांमधून माहिती संकलित करण्यास सुरवात केली आहे. सोशल मीडियावर भूकंपाबाबत अनेक चुकीचे संदेश आणि अफवा पसरण्याची शक्यता असल्याने, नागरिकांनी केवळ अधिकृत सरकारी माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, लिफ्टचा वापर टाळणे आणि मोकळ्या जागेत आश्रय घेणे यासारख्या सुरक्षात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांना सतर्क करण्यात आले आहे. पोलिस आणि अग्निशमन दल कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्ज ठेवण्यात आले आहेत.

### बोरी अरबमध्ये प्रत्यक्ष अनुभव

**दारव्हा :** तालुक्यातील बोरी अरब परिसरात भूकंपाचा प्रत्यक्ष अनुभव नागरिकांना आला. सावळी येथील ज्येष्ठ नागरिक राजू पाटील ठाकरे हे सकाळी पलंगावर बसले असताना अचानक पलंग हलू लागला. काही विचार करण्यापूर्वीच त्यांना भूकंपाची जाणीव झाली. गावातील व्यावसायिक दीपक जयस्वाल यांनीही घरातील भांडी खाली पडल्याचा अनुभव सांगितला. या अनपेक्षित घटनेमुळे बोरी परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ मोठी भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

### मुळाव्यात घरांना भेगा



**उमरखेड :** तालुक्यातील पोफाळी, नागापूर, पळशी, कुपटी, जनुना आणि आंबाळी या गावांमध्ये भूकंपाचे धक्के तीव्रतेने जाणवले. मुळावा परिसरात तर काही घरांच्या भिंतींना किरकोळ भेगा पडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यावेळी जमिनीतून काळी काळ गूढ आवाज आल्याचेही स्थानिक नागरिकांनी सांगितले. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली असून, महसूल यंत्रणेने तातडीने या भागाला भेट देऊन नुकसानग्रस्त घरांची पाहणी आणि पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.

### महाप्रसादावेही गोंधळ

**महागाव :** तालुक्यातील वाकोडी आणि डोंगरगाव परिसरात भूकंपाचे कंप स्पष्टपणे जाणवले. विशेषतः मोरथ येथील हनुमान मंदिरात महाप्रसादाचा कार्यक्रम सुरू असताना अचानक जमीन हादरली. यामुळे उपस्थित भाविकांमध्ये प्रचंड गोंधळ उडाला. मात्र, ग्रामस्थांनी तत्परतेने शांतता राखत सर्व भाविकांना सुरक्षितपणे मंदिराबाहेर काढले. उटी आणि वागद गावांमध्येही पत्र्यांच्या छपरांमधून आवाज आल्याने नागरिक भीतीने घराबाहेर आले. सुदैवाने येथील मोठी दुर्घटना टळली.

### अपार्टमेंट्समधून नागरिकांची धाव

**पुसद :** शहर आणि वसंतनगर परिसरामध्ये बहुमजली इमारती आणि अपार्टमेंट्सची संख्या मोठी आहे. सकाळी जेव्हा भूकंपाचे धक्के बसले, तेव्हा इमारतींमधील नागरिक प्रचंड घाबरले. अनेक लोक लिफ्टचा वापर न करता थेट जिन्यावरून धावत खाली रस्त्यावर आणि मोकळ्या मैदानांवर जमा झाले. काही सेकंद जमीन थरथरल्याने आणि खिडक्यांच्या काचा वाजल्याने शहरातील जनजीवन काळी काळ ठप्प झाले होते. सुदैवाने या भागात कोणतेही स्ट्रक्चरल नुकसान झाले नाही.

## महत्वाचे

### ऊस तोडीच्या पैशांवरून मारहाण

**पुसद :** पुसद तालुक्यातील वसंत वाडी येथे ८ एप्रिल रोजी दुपारी १४.३० वाजता ऊस तोडीचे उरलेले ५०००० रुपये मागितल्याच्या कारणावरून एका व्यक्तीला जबर मारहाण करण्यात आली. मनोहर बाबुराव राठोड हे ४० वर्षीय व्यक्ती तिथे राहतात. त्यांनी आपले पैसे मागितले असता आरोपी हेमराज शिवचंद्र चव्हाण आणि गजानन हेमराज चव्हाण यांनी संगणमत करून त्यांच्यासोबत वाद घातला. या दोन्ही आरोपींनी मनोहर यांना शिवीगाळ करून त्यांच्या डोक्यावर दगडाने जोरात मारले आणि त्यांना गंभीर जखमी केले. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. खंडाळा पोलिसांनी या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### टीन पत्र्याच्या वादातून हल्ला

**बिटरगाव :** उमरखेड तालुक्यातील अनंत वाडी निगनूर येथे ८ एप्रिल रोजी रात्री ८.३० वाजता कौटुंबिक वादातून एकावर लाकडी बडग्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. राजू संजय खोकले हे २७ वर्षीय तरुण आहेत. त्यांच्या घरात टीन पत्रे कमी मिळाल्याच्या क्षुल्लक कारणावरून त्यांचा ३० वर्षीय आरोपी परमेश्वर मारोती खोकले याने वाद घातला. रागाच्या भरात परमेश्वर याने राजू यांचे ५८ वर्षीय वडील संजय मारोती खोकले यांच्या डोक्यावर आणि पोटावर लाकडी बडग्याने जोराने प्रहार करून त्यांना गंभीर जखमी केले. बिटरगाव पोलिसांनी ९ एप्रिल रोजी आरोपीविरुद्ध रीतसर कायदेशीर गुन्हा दाखल करून पुढील सविस्तर तपास वेगाने सुरू केला आहे.

### शिवारातून दुचाकीची चोरी

**पाटण :** पाटण पोलिस ठाण्यांतर्गत माथार्जुन शेत शिवारातून ८ एप्रिल रोजी पहाटे ४.३० वाजता एक दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरल्याची घटना घडली आहे. नवनित लिंगारेड्डी हे ३५ वर्षीय व्यक्ती सुर्दापुर येथे राहतात. त्यांनी आपली ५०००० रुपये किमतीची एमएच २९ बीएक्स ३१८९ या क्रमांकाची दुचाकी शेत शिवारात उभी करून ठेवली होती. कोणीतरी अज्ञात चोरट्याने संधी साधून त्यांची ही महागडी दुचाकी तिथून पळवून नेली. नवनित यांनी ९ एप्रिल रोजी रात्री उशिरा पोलिस ठाण्यात जाऊन रीतसर तक्रार दाखल केली. पोलिसांनी या प्रकरणी लगेच अज्ञात आरोपीविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचा तपास वेगाने सुरू केला आहे.

# घाटंजी येथे तरुण व्यावसायिकाची आत्महत्या

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. ११ :** शहरातील ३४ वर्षीय तरुण कापड व्यावसायिक उमेश गजानन गावंडे यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी ही घटना उघडकीस आली असून, त्यांनी फोनला प्रतिसाद न दिल्याने नातेवाईकांनी घरी धाव घेतली असता हा प्रकार समोर आला. या घटनेने शहरात हळहळ व्यक्त होत आहे.




उमेश गजानन गावंडे हे घाटंजी येथे 'रुक्माई साडी सेंटर' या नावाने कापड व्यवसाय चालवत होते. घटनेच्या वेळी त्यांचे कुटुंबीय मूळ गावी सुकळी येथे गेले होते. उमेश गावंडे सततच्या फोनला दाद देत नसल्याने संशय बळावला आणि नातेवाईकांनी घरी पाहणी केली असता ते गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, पत्नी आणि एक मुलगी असा मोठा परिवार आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. या प्रकरणाची नोंद करण्यात आली असून घाटंजी पोलिस पुढील तपास करीत आहेत. एका उमद्या व्यावसायिकाने अशा प्रकारे जीवन संपवल्यामुळे घाटंजी परिसरात शोककळा पसरली आहे. सामाजिक आणि व्यावसायिक वर्तुळातून या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले जात असून पोलिस या आत्महत्येमागचा शोध घेत आहेत.

# वाहनात चालणाऱ्या सट्ट्याचा पर्दाफाश

## तिघांना ठोकल्या बेड्या, स्थानिक गुन्हे शाखेची कळंब हद्दीत कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ११ :** यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी (दि. ९) रात्री नागपूर-तुळजापूर हायवेवरील नरसापूर फाट्यासमोर एका हुंडाई कारमध्ये ऑनलाईन आयपीएल क्रिकेट मॅचवर जुगार खेळणाऱ्या तीन सट्टेबाजांना रंगेहात पकडले. लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स या सामन्यावर पैशांची हार-जीत लावत असताना पोलिसांनी ही कारवाई करून मुद्देमाल जप्त केला.



स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंगवर असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, देवेंद्र कटियारा नावाचा इसम आपल्या कारमध्ये बसून हायवेवर आयपीएल मॅचवर सट्टा खेळवत आहे. माहितीची खातरजमा करून पोलिसांनी नरसापूर प्रवासी निवाऱ्याजवळ उभी असलेल्या 'हुंडाई एक्सटर' (क्र. एमएच २९, सीजे ०२८८) या कारवर झडती घेतली. यावेळी कारमध्ये देवेंद्र दिलीपकुमार कटियारा (२८, रा. पळवाडी कॅम्प), आशुतोष लक्ष्मीकांत गुप्ता (२९, रा. मारवाडी चौक) आणि दिलेश संतोष कुकुलवार (२८, रा. चापनवाडी) हे तिघे मोबाईल फोनच्या माध्यमातून ग्राहकांशी संपर्क करून सट्टा खेळताना मिळून आले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातील १ लाख ६० हजार रुपये किमतीचे चार मोबाईल फोन आणि ४ हजार ८७० रुपये रोख जप्त केले. तसेच गुन्ह्यात वापरलेली ४ लाख रुपये किमतीची हुंडाई कार असा एकूण ५ लाख ६४ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनीष गावंडे, गजानन राजमलू व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. अटकेतील आरोपींना पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी कळंब पोलिस स्टेशनच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

# घरात घुसून महिलेचा विनयभंग, दोघांविरुद्ध गुन्हा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. ११ :** शहरातील एका महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची आणि तिच्या पती व सासऱ्यास मारहाण केल्याची घटना शुक्रवारी (दि. १०) रात्री ११.३० वाजता च्या दरम्यान घडली आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आपल्या पती व सासऱ्यासह घरात झोपलेली असताना अचानक दरवाज्यावर जोरात आवाज झाला. दरवाजा उघडताच आरोपी गजानन अशोक डहाळे (वय २४) व अथर्व विजय माळवे (वय २४, दोन्ही रा, उमरखेड हे जबरदस्तीने घरात घुसले. यावेळी आरोपी अथर्व माळवे याने फिर्यादीचा हात धरून तिला जवळ ओढत तिचा विनयभंग केला. महिलेला त्याच्या तावडीतून सोडवण्यासाठी तिचे पती व सासरे पुढे आले असता, दोन्ही आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करून मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पिडीतेने उमरखेड पोलिस ठाण्यात दिली या स्वरुपाच्या तक्रारीवरून पोस्टे ला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रकाश बोंबले हे करीत आहे.

# निम्न पैनगंगा धरण प्रकल्प रद्द करण्याची मागणी

## आर्णीत शेतकऱ्यांचे चक्का जाम आंदोलन, तुळजापूर-नागपूर महामार्ग रोखला

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ११ :** निम्न पैनगंगा धरण प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रीय किसान मोर्चाच्यावतीने आर्णी येथे तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर भव्य चक्का जाम आंदोलन करण्यात आले. ९५ गावांतील हजारो शेतकरी आणि महिलांनी सुपीक जमीन वाचवण्यासाठी महामार्गावर ठिय्या देऊन शासनाच्या धोरणांचा तीव्र निषेध नोंदवला.



प्रस्तावित निम्न पैनगंगा धरण प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील शेती आणि शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. या प्रकल्पामुळे सुमारे ९५ गावे पूर्णतः बाधित होणार असून, जवळपास ५० हजार एकर सुपीक काळी जमीन कायमस्वरूपी पाण्याखाली जाण्याची भीती आहे. या प्रचंड विस्थापनामुळे दीड लाख नागरिकांचे भविष्य अंधकारमय होणार असल्याचा आरोप करत शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आंदोलकांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पासाठी आवश्यक असलेले सामाजिक परिणाम मूल्यांकन, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि २०१३ च्या भूमी अधिग्रहण कायद्यानुसार पुनर्वसनाची प्रक्रिया अद्याप कागदावरच आहे. या अन्यायाविरुद्ध १० एप्रिलला सकाळी शेकडो शेतकरी आर्णी येथे जमा झाले आणि त्यांनी राष्ट्रीय महामार्ग ३६१ वरील वाहतूक पूर्णपणे रोखून धरली. 'गाव वाचवा, शेती वाचवा' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रीय किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष दीपक इंगळे पाटील, प्रदेश प्रभारी बालाजी कांबळे आणि कार्याध्यक्ष चक्रधर देवसरकर यांनी केले. यावेळी बिमोद मुधाणे, भुवन मुनेश्वर, सुनील गवई, प्रशांत मुनेश्वर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सुमारे दोन तास चाललेल्या या आंदोलनामुळे महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, सुपीक जमीन नष्ट करून होणारा हा विकास शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा आहे. जोपर्यंत शासन हा विनाशकारी प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करण्याचा निर्णय घेत नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील. प्रशासनाला दिलेल्या निवेदनात इशारा देण्यात आला आहे की, मागण्या मान्य न झाल्यास आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र करून मंत्रालयावर धडक देण्यात येईल. तणाव टाळण्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. शेवटी प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन शांततेत आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# वृद्धाश्रमात भोजन आणि रुग्णांना फळवाटप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. ११ :** कामगार उपायुक्त राजेश आडे यांचा वाढदिवस उमरीपठार आणि लोणी येथे विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यांच्या अनुपस्थितीतही कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन वृद्धाश्रमात भोजन सेवा, वस्त्रदान आणि शासकीय रुग्णालयात रुग्णसेवा देत समाजसेवेची परंपरा कायम राखली, ज्यामुळे प्रशासकीय वर्तुळात त्यांचे विशेष कौतुक होत आहे.



उमरीपठार येथील स्व. दोला महाराज वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांना भोजन देण्यात आले आणि वस्त्रदान करण्यात आले. लोणी येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या उपक्रमांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना कामगार उपायुक्त राजेश आडे यांनी सांगितले की, सहकाऱ्यांनी समाजोपयोगी कामे करून दिलेली ही भेट माझ्यासाठी प्रेरणादायी आहे. या उपक्रमात तिलक मांडवगडे, नंदू देशमुख, विजय सोलंकी, हिरासिंग चव्हाण, अनिल चौधरी, खेमसिंग राठोड, अमित रामटेके, अनिल कोळेकर, रमेश कोरटकर, भारत बैस, बाबाराव खोडणकर, गणेश एकंदवार, आशिष ढाकुलकर, सुनील आडे, गोपाल कोर्टमकार, सचिन धाये, संतोष जयसवाल आणि अमोल टोपरे उपस्थित होते. कार्यकर्त्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे वृद्धाश्रमातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून लोणी परिसरात या उपक्रमाचे स्वागत झाले. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या असून, या उपक्रमातून समाजात एक सकारात्मक संदेश गेला आहे. नागरिकांचे प्रेम आणि आशीर्वाद आगामी काळात अधिक जबाबदारीने काम करण्याची ऊर्जा देत असल्याचे आडे यांनी नमूद केले.

# यवतमाळात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

## पालकमंत्री संजय राठोड यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातही पुष्पहार अर्पण करून अभिवादन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. ११ :** संपूर्ण जिल्ह्यात शनिवारी (दि. ११) क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात पार पडली. पालकमंत्री संजय राठोड यांनी यवतमाळातील मुख्य चौकातील पुतळ्यास अभिवादन केले, तर जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी प्रतिमेचे पूजन केले. यावेळी विविध विकासकामांचा शुभारंभ आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा आढावा घेण्यात आला.






क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळ शहरासह जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री नामदार संजय राठोड यांनी यवतमाळ येथील महात्मा ज्योतिबा फुले चौकात जाऊन त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना महात्मा फुले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले. या सोहळ्याचे औचित्य साधून पालकमंत्री राठोड यांच्या हस्ते नगर परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. यामध्ये महात्मा फुले शाळेजवळील खुल्या जागेचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे आणि पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश आहे. यावेळी खासदार संजय देशमुख आणि आमदार बाळासाहेब मांगुळर प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी शहराच्या सुशोभीकरणासह शैक्षणिक परिसराचा विकास करण्यावर भर दिला. दुसरीकडे, जिल्हाधिकारी कार्यालयातही जयंती कार्यक्रम अत्यंत साध्या आणि गरिमामय पद्धतीने पार पडला. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. याप्रसंगी महसूल विभागातील विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस फुले अर्पण केली. महात्मा फुले यांच्या सामाजिक समतेच्या विचारांनी प्रेरित होऊन प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि जनहितैषी करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक संघटनांच्या वतीनेही अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले असून, सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते. जिल्ह्यात सर्वत्र महापुरुषाच्या विचारांचा जागर करीत हा दिवस मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

# रितिका मेसेकारची विमान वारीचे स्वप्न साकार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**घाटंजी, दि. ११ :** मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या 'महादीप' उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा शिरोलीची आठवीची विद्यार्थिनी रितिका प्रवीण मेसेकार हिने जिद्दीच्या जोरावर विमान वारीचे स्वप्न साकार केले. मागील वर्षी एका मार्काने संधी हुकल्यानंतरही खचून न जाता तिने पुन्हा जोमाने अभ्यास करून या विशेष प्रवासासाठी आपली पात्रता सिद्ध केली.



जिल्हा परिषदेच्या महादीप उपक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना विमानाने फिरण्याची संधी दिली जाते. रितिका मेसेकार मागील वर्षी अवघ्या एका गुणाने अपात्र ठरली होती. मात्र, तिने हार न मानता स्वतःच्या उणिवा शोधून कठोर परिश्रम घेतले आणि यंदा हे यश खेचून आणले. विमानाचा प्रवास करून परतल्यानंतर रितिकाने आपले अनुभव शाळेत अतिशय आनंदाने व्यक्त केले. या यशामुळे ती अत्यंत उत्साहात असून तिच्या जिद्दीपासून शाळेतील इतर विद्यार्थ्यांनी मोठी प्रेरणा घेतली आहे. रितिकाने आपल्या या यशाचे श्रेय आई-वडील, आजी-आजोबा आणि मार्गदर्शक शिक्षकांना दिले आहे. ग्रामीण भागातील एका विद्यार्थिनीने दाखवलेल्या या चिकाटीमुळे शिरोली गावात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या महत्वकांक्षांना नवी दिशा मिळत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.